म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
स. क्र. ८८६

REFBK-0027784

# देश कांगारूंचा

REFBK-0027784

कमलिनी काटदरे



प्रकाशक .
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३ शनिवार पेठ, पुणे ३०

© कमलिनी काटदरे
C/o कॅप्टन डी जी खारकर
५ बी, गार्डनरोझ सोसायटी,
चार बंगला रस्ता, अंधेरी (प)
मुंबई ४०० ०५८

मुद्रक :
प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशन दिनांक · २४ डिसेंबर १९९३

टाइपसेटिंग .
आशय टाइपसेटर्स
२६६ शनिवार पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ व आतील चित्रे
दत्ता महाबळेश्वरकर

मूल्य . साठ रुपये

माझे जीवन साथी

**डॉ. मनोहर**

यांच्या

अविस्मरणीय स्मृतीस

# पुरस्कार

श्रीमती कमलिनी काटदरे या आता कायमच्या दक्षिण ऑस्ट्रेलियात त्यांचे चि डॉ सुहास व सूनबाई डॉ आशा यांच्यापाशी राहतात पण या वयातही त्यांची लेखनकला तेज आहे याचे प्रत्यतर 'देश कांगारूंचा' या पुस्तकावरून यावी अॅडलेड या द [illegible]

त्यांनी ऑस्ट्रेलियात जे जे म्हणून बघण्यासारखे आहे ते ते सर्व बघून घेतलेले आहे सुसंस्कृत व रूचिसंपन्न मनोव्यापारामुळे त्याची ऑस्ट्रेलियन निसर्गसौंदर्याची वर्णने, ऑस्ट्रेलिया बघण्याची इच्छा वाचकाच्या मनात निर्माण करतील याविषयी मला संदेह नाही

ऑस्ट्रेलियात जाऊन राहावे अशी प्रवृत्ती अधिकतर प्रमाणात भारतीय तरुणांत वाढत आहे भारतीय जीवन अस्थिर वाटू लागले आहे. भ्रष्टाचार, बेकारी वगैरेंमुळे सुस्थित जीवनाची शाश्वतीच वाटेनाशी झाली आहे हे सर्व खरे आहे ऑस्ट्रेलियातील जीवनातही अस्थिरता नाहीच असे म्हणता येणार नाही. आजवर तेथे कायम राहण्यास प्रवेश मिळालेल्याना नोकरी लागेपर्यंत ऑस्ट्रेलियन सरकार 'जॉब सर्चिंग अलॉउन्स' देत असे तोही आता पहिले सहा महिने बंद करण्यात आला आहे हे वास्तव जाणून घेऊन ज्यांना जाता येणे शक्य होईल त्यानी जरूर जावे कारण एकदा तेथील जीवनाशी जुळवून घेतल्यावर सामान्य जनजीवनात भ्रष्टाचार नाही व सुविधा भरपूर आहेत हा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही यादृष्टीने श्रीमती काटदरे यानी लिहिलेले अखेरचे प्रकरण मला सर्वाधिक महत्त्वाचे वाटते

ऑस्ट्रेलिया आहे तरी कसा हे धावत्या दौऱ्यात जे बघू इच्छितात त्यांच्या मनाला सतत एक प्रश्न स्पर्श करील इनमिन दोनशे वर्षांत ब्रिटिशांनी या छोट्या खंडाचं रूपान्तर एवढ्या समृद्धतेत कसे केले असेल? ब्रिटिशांची शिस्त, कल्पकता, संशोधक वृत्ती, साहस या गुणांनीच ही समृद्धी आली आहे अशी त्यांच्या मनाची खात्री पटेल या आदिवासींना ब्रिटिशांनी प्रारंभी क्रूरतेने वागविले आणि सहस्रावधींचा बळी दिला त्याच आदिवासींचे रास्त हक्क लोकशाही मार्गाने मान्य करण्याची प्रवृत्ती आता तेथे मूळ धरू लागली आहे, हेही त्यांच्या लक्षात येईल अशा किंचित्काल प्रवासी म्हणून ऑस्ट्रेलियाचा दौरा करणाऱ्यांना हे पुस्तक फारच उपयोगी पडेल

श्रीमती काटदरे यांच्या या लेखन प्रयत्नाबद्दल त्यांना धन्यवाद देऊन जिज्ञासूंनी हे पुस्तक अवश्य वाचावे अशी मी शिफारस करतो.

— रामकृष्ण बाक्रे

# पुस्तकाची पार्श्वभूमी

गोष्ट तशी फार जुनी नाही. तरी पण उणीपुरी वीस वर्षं होऊन गेली मुंबईचे ख्यातनाम क्ष-किरणतज्ज्ञ डॉक्टर, कॅप्टन श्रीधर उर्फ मनोहर काटदरे हे आपल्या व्यवसाय-निवृत्तीच्या वयाजवळ आले होते तोपर्यंत त्यांची कन्या कीर्ती पदवीधर होऊन वैमानिक कॅप्टन दिलीप खारकर यांची सहधर्मचारिणी झाली होती, आणि त्यांचा सुपुत्र सुहास हाही शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झाला होता मुंबईच्याच भाऊगर्दीत वडिलांचा व्यवसाय चालू ठेवण्याऐवजी त्याने आणि वडिलानीही आपली नजर जरा दूरवर इकडे-तिकडे फिरवली सुदैवाने सुहासला पत्नी लाभली तीही डॉक्टर— माहेरची आशा कामत त्या दोघानी परदेशी जायचा विचार करताना, जिकडे फारसे भारतीय किंवा फारसे महाराष्ट्रीय लोक तोपर्यंत जात नसत, अशा ऑस्ट्रेलियात जायचा बेत केला प्रथम तिकडे दोघही नोकरी पत्करून गेली, नि मग उच्च अभ्यास करून कालातराने स्वतंत्र व्यवसायात स्थिरावली

डॉ मनोहर यानी मुबईच्या वैद्यकीय क्षेत्रात रेडिऑलॉजिस्ट म्हणून जस उत्तम नाव कमावलं, तसं त्याच्या शिक्षित पत्नी कमलिनीबाई यांनी छानदारपणे प्रपच चालवून स्थानिक 'सायन भगिनी समाजा'च्या कार्यकर्त्या म्हणून लौकिक मिळवला खेरीज, हौसेखातर जमेल तस थोडफार लेखन करण ही त्याच्या खास आवडीची बाब होती जॉर्ज वॉशिंग्टनच्या बालपणीच्या कुऱ्हाडीप्रमाणे त्या आपली लेखणी उत्साहाने चालवू लागल्या त्यावेळी त्यांचे लेखविषय आपल्याकडील सण-समारभांतील ग्राह्यग्राह्यतेशी निगडीत असत

मुलगा आणि सून याच्या ऑस्ट्रेलियातल्या नव्या बिऱ्हाडाला भेट द्यायची ह्या सासू-सासऱ्याची उत्सुकता अगदी स्वाभाविकच होती १९७३ मधे तशी सधी त्याना मिळाली काही महिन्यांच्या तिथल्या वास्तव्यात त्यानी तिकडील अनेक प्रेक्षणीय स्थळ जशी पाहिली, तसंच तिथल्या लोकांचा स्नेह संपादन करून समाज-जीवनाचही निरीक्षण केल

इतिहास सागतो की, एके काळी ब्रिटनच्या राज्यशासनाने आपल्याला उपद्रवकारक ठरलेल्या गुन्हेगारांचे जथे हद्दपार करून त्याना ऑस्ट्रेलियाच्या विस्तीर्ण भूमीकडे रवाना केल पण त्याच जमिनीवर त्यानी नि त्याच्या पुढच्या पिढ्यांनी स्वकष्टाने शेती, दुग्धव्यवसाय, मेंढीपालन

इत्यादी उद्योग करून आपला जीवनमार्ग सुधारला. मग त्या भूमीचा चेहरा-मोहरा पालटून तीवर आधुनिक लहान-मोठी शहर, सळसळती व्यापारकेंद्र, उद्योगधंदे नि समृद्ध जीवनाची साक्ष देणारी असंख्य स्थळ निर्माण झाली ह्याहूनही महत्त्वाचा बदल म्हणजे ह्या मूळ कैद्यांचे वंशज हे अगदी सुसंस्कृत असे सज्जन, अगत्यशील नागरिक बनले..

ऑस्ट्रेलियातल्या जीवनाच्या अशा कितीतरी अनुभवाच्या नवलकथा, तिकडचा दौरा पूर्ण करून मुबईला परतल्यावर काटदरे दंपतीने आपल्या आप्तमित्राना सुनवल्या

त्या भाग्यवान श्रोत्यांपैकी मी एक मी त्याना— विशेषत कमलिनी वहिनींना म्हटलं, "इंग्लड-अमेरिकेत जाऊन आलेल्या बऱ्याच जणानी आत्तापर्यंत प्रवासवृतान्त लिहिले आहेत पण ऑस्ट्रेलियात आपले फारसे कुणी लोक गेलेले नाहीत, आणि तिकडच्या समाज-जीवनाची फारशी माहिती मराठी वाचकाना अजून मिळालेली नाही ती तुम्ही का लिहीत, नाही?"

ती कल्पना कमलिनीबाईना पटली, आणि हळू हळू त्यानी आपल्या अनुभवांना जोड देणारे आवश्यक संदर्भ जमवून ऑस्ट्रेलिया-विषयक एकेक लेख लिहिला गेल्या काही वर्षांत त्याचे बरेच लेख किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, लोकप्रभा, केसरी, साप्ताहिक सकाळ, प्रभृती अनेक नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहेत काही ठिकाणी त्यांनी श्रोत्यासाठी ऑस्ट्रेलिया-विषयक माहितीपर भाषणंही केली आहेत डॉ मनोहर काटदरे यांनी बरेच फोटो घेऊन स्लाइडस् तयार केल्या आणि त्यांसहित दोघाचीही व्याख्यानं झाली आहेत

पुढे या उभयतानी मुला-नातवडात ऑस्ट्रेलियातच वास्तव्य कायम केलं, आणि मग अधून-मधून आप्तमित्रांना भेटण्यासाठी ते उलट दिशेने भारताचे— त्यातल्या त्यात महाराष्ट्राचे दौरे करू लागले!

१९८६ च्या आरंभी तिकडच्या वास्तव्यातच, अवचितपणे ओढवलेल्या पतिवियोगाच्या दु.खातून स्वत च्या मनाला पुन्हा उभारी आणण्यासाठी त्यांच्या लेखणीने त्याना मोठाच दिलासा दिला इतकंच नव्हे तर, तिकडचं कुटुबा-कुटुबातल जीवन जाणून घेताना काही ऑस्ट्रेलियन महिलाशी त्याचे स्नेहसबंध दृढ झाले आहेत आपल्या मैत्रिणींसमवेत तिथल्या स्त्रीलेखिकासस्थाच्या विविध उपक्रमांत श्रीमती काटदरे आवर्जून सहभागी होत असतात त्यातही विशेष म्हणजे, भारतीय

संस्कृतीतले आदर्श त्या समाजाला समजावेत म्हणून, रामायण-महाभारतातल्या कथाना इंग्लिश संवादरूपात लिहून काढून आपल्या सूनबाईच्या सहकार्याने, नातवडाच्याकरवी काही बाल-नाटिका तिथल्या रंगमंचावर त्यानी सादर केल्या आहेत

तथापि, इतकं असलं तरी आमच्या कमलिनी वहिनी ह्या काही शिक्का बसलेल्या साहित्यिक नाहीत त्या आहेत एक मध्यवर्गीय कुटुंबवत्सल गृहिणी परदेशीय समाजाशी संपर्क आल्यावर त्याच्या ठाकठीक राहणीचा स्वीकार करताना, माणुसकीवर आधारलेल्या त्यांच्या न्यायबुद्धीचा आपण अवश्य अंगीकार करावा, पण आपल्याच मागील पिढ्याकडून आलेला सुसंस्काराचा वारसाही पुढील पिढ्याकडे पोचवावा, आणि हे सार आपल्या दैनंदिन बोलण्या-वागण्यातून सहजपणे घडत राहाव, अशी त्याची धारणा आहे. म्हणूनच त्याच्या लेखनात अधून-मधून घरच्या व्यक्तींचे नामोल्लेखही आढळतात; आणि आपण जणू कुणाशी तरी मनातलं हितगूज बोलत आहो अशी शैली त्याच्या लिहिण्याला प्राप्त होते. त्यात काहीसा मोघमपणा कुठे आला तर वाचकाने क्षणार्ध थबकून त्यातला नेमका आशय ओळखावा इथ एक दाखला द्यावासा वाटतो जुन्या हिंदी भाषेतल्या पत्रलेखनविषयक तंत्रात पत्राच्या शेवटी "लिखा थोडा, समझना बहुत" असं एक वाक्य लिहिण्याचा प्रघात असे, तसा काहीसा हा प्रकार म्हटला पाहिजे!

असो श्रीमती कमलिनी काटदरे यांच्या अनेक पूर्वप्रकाशित लेखांपैकी काही निवडक लेखाच संकलन प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने वाचकांपुढे ठेवण्याच श्रेय 'इंद्रायणी साहित्य'चे श्री श्यामराव कोपर्डेकर याना आहे मुद्रणप्रक्रियेतील निर्मिति-संपादनाच अवघड काम मुंबईचे ज्येष्ठ पत्रकार श्री रामकृष्ण बाक्रे यानी पेलल आहे या दोघाचे ऋण लेखिका मानेलच पुस्तकाचे यापुढचे भाग्यविधाते म्हणजे सहृदय वाचक, समीक्षक नि विक्रेते त्याच्या प्रतिसादाची वाट आता पाहायची.

लेखिकेच अभिनंदन, पुस्तकाला सदिच्छा!

**वा. ग. तळवलकर**
दि ६-११-१९९३

'शरावती', पत्रकार नगर,
बाळशास्त्री जांभेकर मार्ग,
पुणे ४११ ०५३

# ऋणनिर्देश

पहिल्या-वहिल्या प्रवासाचं ते अप्रूप दूरदेशीच्या अगदी दक्षिण गोलार्धातल्या टोकाच अप्रूप किती! ते कौतुक, खूप दिवस माझं सागणं चालूच होतं भारतातला माणूस असा प्रथम बाहेर पडला म्हणजे बावरूनच जात असावा विलायतला जाऊन आलेल्या माणसाला पाहायला लोक जमत कौतुकच ते! आणि प्रायश्चित्त घेऊन त्याला परत घेणारी कर्मठ माणसं आम्ही

तेव्हा जग इतकं जवळ आलेलं नव्हतं आम्ही दोघं ऑस्ट्रेलियाहून परतल्यावर त्या देशाचं तोंड फाटेपर्यंत वर्णन करत होतो आमचा वायुयानातला प्रवास, आमचं ते टकमक बघणं, स्वच्छ, स्वच्छ रस्त्यावरून चालणं सगळं आक्रीतच होतं ऐकून ऐकून कटाळा आल्यावर आमचे वामनकाका, श्री वा ग तळवलकर (आमच्या ह्यांचे) डॉ मनोहर काटदऱ्यांचे जीवश्च-कंठश्च मित्र) म्हणाले ''वहिनी एकदा सगळं ओळीत लिहून काढा ना एक फाईल करा''- स्फूर्ती येऊन लेखणी हातात घेतली सहा महिन्यात फाइल बंद करून वामनकाकाकडे दिली

१९७६ साली आम्ही ऑस्ट्रेलियात स्थायिक व्हायला म्हणून गेलो चार वर्षं फाईलचं काय सगळंच ओझं काकांच्यावर टाकून मी निवांत होते हे पुस्तक व्हावं अशी त्यांची मनापासून इच्छा होती पुस्तक- प्रवर्तकाचा मान त्यांना द्यायलाच हवा पण औपचारिक आभार मानून मला मोकळं व्हायचं नाही

नव्या लेखकांना हाताला धरून पुढं आणणं हे श्री मुकुंदराव किर्लोस्करांचं संपादकीय कौशल्य माझं हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचनाही त्यांनी दिल्या नि त्यांची आठवण आभार मानण्याइतकी मर्यादित नाही

पुन्हा योग असे जमून यायला लागले प्रा उत्तम कानिटकर, 'एकता' मासिकाचे सहसंपादक यांची भेट होते काय, ते माझं हस्तलिखित वाचतात काय, आत्मीयतेनं वाचन, त्यावर सांगोपांग विचार, नंतर प्रकाशकाचं नाव सुचवतात काय म्हणजे पहा, श्री कोपर्डेकर- काटदरे मंडळीचे चांगले परिचित- पण श्री कानिटकरांचा असा हात लागायचा होता योगायोग संबंध उजळले श्री कानिटकरांचे हार्दिक आभार

'देश कांगारूंचा' ''फाईलवरचं नाव चांगलं आहे हो'' म्हणून श्री कोपर्डेकरांनी मला प्रोत्साहनही दिलं लगेच मूठभर मास चढलं की। कोणत्याही गोष्टीची सांगता व्हायला हवी त्यासाठी श्री रामकृष्ण बाक्रे हवे होते श्री कोपर्डेकरांची भेट घेऊन वेळात वेळ काढून म्हणायलाच हवं, त्यांचेही व्याप पुष्कळ पण 'प्रूफ' पुण्याहून आली ती तपासून दिली पुस्तकाला हे रूप दिलं ह्या बंधुवर्यांनी तसं म्हटलं तरी साहित्यिक भावांचं हे कर्तव्यच होतं आहे त्यांचे आभार मानणं तोंडदेखलच होईल

आकर्षक वेष्टनातलं पुस्तक श्री कोपर्डेकरांनी मला दाखवलं उरी बाळगलेलं स्वप्न साकार झालं वामनकाकांची इच्छा पूर्ण झाली हे समाधान घेऊनच मी ऑस्ट्रेलियाला जात आहे

— कमलिनी काटदरे

# मनोगत

कस कुणास ठाऊक सुरुवातीपासूनच आयुष्याच्या वाटचालीला वेगळी अशीच दिशा मिळायची गाव एकीकडे तर आमचं बिऱ्हाड नेहमी उलट दिशेला व्हायच माणसात मिसळण्यासाठी मन आसुसायचं कुठ तर सैनिकी पेहराव म्हणून आपलीच मंडळी दरवाजे बद करून घ्यायची त्यातून जरा जानपहचान होतीय तो आमच बिऱ्हाड- बाजल उचलायची वेळ यायची सैन्यातली नोकरी नेहमीच अननोन् डेस्टिनेशन कुठे कुटुंब आणायला मज्जाव, कुठे मुलं नकोत, अनमान धपक्यानं अनोळखी दिशेला तोंड करून निघावं लागायच

आता ह्या परदेशगमनाचंही तसंच अमेरिका, युरोप बघायला जग धावतंय अन् आम्ही ऑस्ट्रेलियाला कुठे? आणि खरंच कुठे? माझा माझ्यावरच विश्वास बसेना

"कुठल्या बाई अनोख्या देशात जायचय?" मी काळजीच्या सुरात म्हणतीय, तर,

"मजा आहे की मग, कुणाच्या अगावर न दिसलेली साडी आपणच प्रथम नेसली की कसं वेगळच वाटतं ना? खरं सांगू वहिनी, पहिल्या वाफेचा भात अन् तशी पहिल्या वाफेची साडी — आपण नाही बुवा संधी सोडणार" वन्सच्या विनोदी उत्तराने धीर आला

फार लोकानी न ऐकलेला, न पाहिलेला देशच काय, गावसुद्धा, साधं देऊळ पहायच झाल तरी वेगळ्या ठिकाणच, वर्दळ नसलेल्या पाऊलवाटेन जाव पवनपुत्रासारखं उड्डाण कराव, अन् पुन्हा वेशीवरून गावाची गमत पहात रहाव, आपल्या देशाची वेस ओलांडून कुठे होतो अन् कुठे पोचलो? मग त्याच कैफात तिथल्या वास्तूचा, शिल्पांचा मागोवा घेत घेत कागदावर काळं करत जावं, हाही एक नाद


माझ्य नादान वाचणाऱ्याला सूर सापडावा, लय साधावी, हाती काहीतरी लागाव, ही इच्छा!

— कमलिनी काटदरे

ꕥ ꕥ

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | ऑस्ट्रेलियाकडे झेप | १ |
| २ | सिडनीमधील अर्ध उमललेलं कमळ | ५ |
| ३ | निळ्या डोंगर बहिणी | १० |
| ४ | टोरांगा झू | १३ |
| ५ | कॅनबेरा — एक आखीव-रेखीव राजधानी | १८ |
| ६ | देशाचा खरा खजिना | २३ |
| ७ | गार्डन सिटी मेलबर्न — एक मयसभा | २७ |
| ८ | माउंट गॅम्बियर — एक निसर्ग चमत्कार | ३४ |
| ९ | किरिस्ताँवांची देवळं | ३८ |
| १० | प्रेरणा देणारी धर्ममंदिर | ४३ |
| ११ | ऑस्ट्रेलियातील स्त्री-जीवन | ४८ |
| १२ | लगीनचुडा | ५३ |
| १३ | कुमारी माता आणि बेबी होम्स् | ५९ |
| १४ | सध्याछाया भिवविति हृदया | ६४ |
| १५. | मदिरा-महोत्सव | ७२ |
| १६ | ही तर देशाची धनदौलत | ७६ |
| १७ | जगड्व्याळ वर्ग आणि एक शिक्षणप्रकल्प | ८२ |
| १८ | प्रभूच आगमन, एक साजरा सण नाताळ | ८७ |
| १९, | क्वीन्सलँड, सर्फर्स पॅराडाइज | ९६ |
| २० | प्रवाळ खडकाचा किनारा | १०० |
| २१ | आयर्स रॉक | १०४ |
| २२ | टास्मानिया — एक एकाकी बेट | १०९ |
| २३ | पर्थ | ११७ |
| २४ | ऐका सुवर्णदिवा तुमची कहाणी | १२३ |
| २५ | कागारूच बेट | १३० |
| २६ | माणसान समृद्ध केलेला देश | १३५ |
| २७ | निळी कोजागिरी, पाढर पातं | १४१ |
| २८ | उपसहार — आजचा ऑस्ट्रेलिया | १४७ |



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास ८८६
वा. क्र. ३५५८९
२२।९३।९८
नौपाडा शाखा (स्थलक ...)

# ऑस्ट्रेलियाकडे झेप

अमेरिकेला जायची स्वप्नं रंगवण्याइतके आपण श्रीमंत झालो आहोत असं नुकतंच वाटायला लागलं होतं दिवसाउजेडी बेत करावेत, प्रवासाची पत्रक वाचून न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, नायगराफॉल्स पहायचाच असं वेळापत्रक आखत बसावं पण ह्या दक्षिण गोलार्धातल्या भूखंडावर आपण पोहोचू ही सुतराम कल्पना नव्हती

"अग्गोऽऽबाई ऑस्ट्रेलियाला कुठं जाताय?" शेजीबाई म्हणाल्या "डॉक्टर, एकदोन शहर सोडली तर सार जंगलच आहे हो तिथं अजून! आहे काय पाह्यला?' त्यांच्या यजमानांनी माहिती पुरवली सुशिक्षित मंडळिचंही हेच मत! सारी खात्रीपूर्वक सांगत होती सल्ला देत होती मग मात्र सातासमुद्रापलीकडे जायच? देशाच्या रंगारूपाची अनोखी चित्रं पहाण्यासाठी मन अधारातच चाचपडायला लागल

'इकडे समक्ष येऊन एकदा देश पाहून गेलात की तुम्हाला आमची काळजी वाटणार नाही आणि नव्या नातवाला आजी आजोबा हवेत की' अस सूचक पत्र सिडनीहून मुलान पाठवलं मग काय नव्या दमान गाठोडी बांधायला सुरूवात केली

१९७३, १४ फेब्रु मुंबई पूर्ण जागी व्हायच्या आधीच आम्ही सान्ताक्रुझ विमानतळावर येऊन पोहोचलो होतो स्वित्झर्लंडहून येणाऱ्या स्वीस एअर-लाइननं जायचय मग काय थंडीच्या हिंदोळ्यावर मन

झुलायला लागल मुंबईचा उन्हाळा, उकाडा चुकला म्हणून नातलगाना टुकटुक करण्याइतक बालपण मनाशी झोंबायला लागल जमिनीवरून पाय सुटले विमानाची गती कमी पडावी इतकं मनाचं तारू दौडत सुटलं घोडे दौडत निघाले, रामाचा रथ अयोध्यापुरीला पोचलाही त्या पुराण काळातही मन डोकावून आल 'मनोरथा चल त्या नगरीला'ऽऽ

बँकॉक खाली दिसायला लागल तीन तासात ३५,००० फूट उचीवरून कप्तानसाहेब आम्हाला खाली नेताहेत पोटातल पाणी देखील हालत नाही Welcome to Bangkok म्हणत हवाई सुंदरी हातात ऑर्कीड (Orchid) ची फुल घेऊन स्वागताला पुढे आल्या लग्नाकार्यात दारावर हळदकुंकू देतात त्याची आठवण झाली जांभळे युनिफॉर्म्स, गोल टोप्या त्या बसक्या नाकाचा रुबाब वाढवत होते भाषेचा सांधा जुळत नव्हता पण गोबऱ्या गालात हसू दडवत स्वागताला प्रेमभरी साथ मिळाली त्यानीच सिंगापूरच्या हवाईयानात आम्हाला आणून बसवल

हां हा म्हणता सिंगापूरचा विस्तार डोळ्यात भरायला लागला ट्रॅन्झीट लाऊंजमधे आमची पार्सलं येऊन पडली देखील भिरभिरत्या नजरेनच सिंगापूरचा फेरफटका झाला रात्रीच्या ९ च्या विमानाने सिंगापूर - सिडनी अंतर काटायचं होत पॅसिफिक महासागरावरून जायच होत घड्याळाचे काटे पुढे सरकवायचे होते रात्रीच्या तीन वाजता सूर्याला साक्षी ठेवून आम्ही नाश्ताही उरकला पोटाच घड्याळ मागेच होत अंतराळातच आम्हाला डुलकी लागली होती "विहीणबाईंना तोंड धुवायला पाणी आलंय बरं का?" असं मनोहर म्हणाले म्हणून उजाडलेल समजल मजा वाटतीय

पृथ्वीच्या दक्षिणगोलार्धात आम्ही उतरायला लागलोय खंडाळ्याचा घाट उतरताना काळजी घ्यावी लागते म्हणतात ते आठवल देशापासून १४,००० मैल दूर (हवाई अतर) आलोय तरी 'खंडाळ्याचा घाट तिथ झाडी मोठी दाट' अस मनाने नकळत ताल धरला छे आता मला धरणीमातेची वेगळी लेणी पाहायचीत, सागराचं निळ स्वरूप, पर्वताची लहान मोठी, नवी जुनी शिखर, नद्याचे अनोखे प्रवाह । हिंदी महासागर आणि पॅसिफिक महासागर यांच्या कुशीत दडून राह्यलेला मोठा भूभाग, लहान वयात नावारूपाला येत असलेला मोठा देश, आणि

ध्यानीमनी नसताना आपल पाऊल त्याच्यावर पडणार ह्या विचारावर तरगतच आम्ही सिडनीच्या 'मॅसकॉट' विमानतळावर उतरलो थडी बाजूला सारत सूर्य बराच वरती आलाय तरी गारव्याची मिठी आम्हा मुबईकराना जास्तच आवळत होती

चकचकीत फरशीवर आपलेच चेहरे पहात आम्ही दोघं रुबाबात चाललो होतो कस्टम तपासणीची धाकधूक आत होतीच काळा मसाला, पोळीचा गूळ त्याना हेरॉईन, गाजा, भांग प्रमाणे वाटत अस सुहासच्या (मुलाच्या) मित्रान सांगितलं होतं कस्टम काऊंटपाशी आलो सगळ स्पष्ट खर सांगायच ठरवूनच पुढ झालो तसा बोर्डींग पास भरला होता आणि काय आश्चर्य! "हॅलो डॉक, यू एक्स रेड माय बुलेटवुड इन दि लास्ट वॉर" अस म्हणत कस्टम अधिकारी मनोहरशी चक्क हस्तांदोलन करतोय "येस् आय रिमेम्बर युवर फेस" त्यानी आपल्या स्मरणशक्तीचा निर्वाळा दिला

"तुम्हीच भरल्यात ना बॅग्ज? बोर्डींग पासवर लिहिलत ना?" असं विचारलं तरी पुढच्या माणसानी बॅगज् उघडल्या गूळ चाचपून पाहयला, मसाल्याचा वास घेतला ओळखीची इथं सवलत नाही व कामात कसूर नाही आवडलं मला ते 'सुटले बाई' मी मराठीत म्हणून टाकलं "अग हे काय? 'थँकस्' म्हणायच इथं" मनोहरनी सुधारून घेतल

सुहास, आशा बाहेर उभे होतेच "पट्टे खाद्यावर बांधून घेऊन गाडीत बसावं लागत आई" सुहास म्हणाला

पहिली गोष्ट नजरेत भरली असेल तर साहेबाची स्वच्छता स्वच्छ रस्ते न् रस्त्याला उजळा देत चालणारी गोरी माणस धूम्रपान करण्यात अग्रेसर असलेली ही मंडळी पण सिगरेटचं एक थोटूक देखील कुठे दिसत नव्हत ओठाचा लालभडक रंग त्यांना ओष्ठशलाकेमुळेच माहीत झाला असावा पान आणि पिचकारी नाही ती पिचकाऱ्याची रांगोळी नाहीच इथ! मस्तानीचं सौंदर्य आणि तिच्या गळ्यातून दिसणारा विड्याचा पिंक यांना कसा समजावून सांगायचा? उगीच डोक्यात येऊन गेल माझ्या विचाराच मलाच हसू आल


सिडनी शहरातला हिलस्टेशन सारखा रस्त्याचा चढउतार,

बाकदार वळण, हिरवीगार वनश्री, फुलापानाच्या रगातल्या पार्कलॅन्डवरच्या रागोळ्या मध्ये डोळ्याला गारवा देणारी कारजी शात मोकळे चाकळे रस्ते, धक्के देत भाऊगर्दीत चालणाऱ्या आम्हा भारतीयाना चक्रावून टाकत होते ' धुळीचा कण नाही हवेत, काळ्या बाजाराच प्रदूषण नाही बर का'' सुहास सागत होता

हिरव्यागार गालिच्यांनी झाकलेली अगण, त्याला रंगीबेरगी फुलाचे काठ घराना गुडघ्याइतक्या उचीच कपौंड, कुठे जाईच्या, कुठे रानटी फुलाच्या कमानी तर कुठे गुलाबांच्या ताटव्याचीच भित, ही निसर्गदत्त सौंदर्याची श्रीमती आणि ती जोपासणारी ही माणस!

आम्ही पाच फूट उंचीची कपौंडस, त्या भिंतीवर काचतुकडे बसवतो 'विश्वास' शब्दच आम्ही गमावून बसलोत का? कुठे भारत हजारो मैल दूर मी त्या सिडनीतल्या कुजी-बीचवर उभी आहे हे निळं निळं पाणी पॅसिफिक नावाप्रमाणे हा शांत समुद्र मी डोळे फाडून बघतीय काठावर निर्माल्य नाही, स्वच्छ वाळूवर पाढऱ्या समुद्र फेसाची किनार स्वत लाच चिमटा काढून बघावा, असही मनात येतय नको मग ही निळी समाधी उतरेल!





# सिडनीमधील अर्धे उमललेले कमळ

नव पाहायचं म्हणजे एक नवाच उत्साह अंगात संचारतो

ऑस्ट्रेलियातलं निसर्गरम्य शहर सिडनी जगातल्या निळ्या पाण्याचा सर्वांत मोठा वारसा आपल्याला मिळाला आहे, अशी सिडनीकर बढाई मारत असतात ते खरंच आहे सारं शहरच मुळी समुद्र आणि आकाशाच्या मिठीत इतक पकडल गेलय की सकाळच्या सूर्यकिरणांना शहराच पुसटस चुंबन घेऊन पुढे सरकावं लागतं तर सूर्यास्त निळ्या सागर-क्षितिजातून प्रतीत होतो लाटाच्या पांढऱ्या फेसाची झालर लागलेला हा निळा सागर-किनारा पाहून उत्तम कोंदणात हिरा बसवावा, पण कोंदण जास्त चागलं की हिरा जास्त चागला, असा भ्रम व्हावा डोळे आधाशासारखे टिपायला लागतात

वळसे वळणं घेत भिरभिरत्या नजरेन पहात आम्ही सिडनी ब्रीजवर आलो चार गाड्यांची येणारी-जाणारी रहदारी त्या लाइनीच्या लाबवर गेलेल्या रेघा रात्री दिसाव्यात म्हणून तांबड्या खड्यांचे 'कॅट्स् आईज' बसवलेले अगदी फर्लांगाफर्लांगावर! मध्यावर असलेल जकातनाकं तीस सेंटचा कर, वेग मर्यादित रहावा म्हणून रडार कंट्रोल सार डोळे विस्फारून टाकत होता त्या शिस्तीतून भोंगा न वाजवता चकाकत सूऽऽसूऽऽ करत जात असलेल्या देशी-विदेशी गाड्या श्रीमतीचा एक वेगळाच डौल दाखवत होत्या ब्रीजच्या दोन्ही बाजूनी जाणारे दृश्य,

अदृश्य होत असलेले रेल्वे-मार्ग, पादचाऱ्यासाठी केलेली पण सहसा निर्मनुष्य असलेली पायवाट! ह्यो, तीन माणसामागे एक गाडी असलेल्या ह्या देशात पायवाटेची खर म्हणजे जरूरच नाही

अतिशय सुदर बंदर म्हणून सिडनी जगात नाव कमावून आहेच अन् त्या सौंदर्यांत भर टाकणारा हा ब्रीज' १६९० फूट लांबीची ही एकच कमान रात्री दिव्यांनी उजळून दिसणारी शहराची शान ब्रीजवरून पहावी तर ब्रीज कुठूनही नजर खेचून घेतो नुकताच सिडनी-टॉवर बाधून झालाय कॅप्टन जेम्स् कुक ची बोट १७८७ साली ह्या धक्क्याला लागली 'बॉटनी बे' ला प्रथम जमीन दिसली पृथ्वीच्या दक्षिणगोलार्धात कित्येक वर्षं अज्ञात असलेली ही जमीन, तिच्या पोटात असलेली अमाप सपत्ती, हरतऱ्हेच्या फुलाफळानी बहरून जाणारी झाडं, युकॅलिप्टस्च्या उंच अन् अगणित वृक्षराजींच्या सावलीत, ऊनपावसाचे मर्यादित सुख घेत राह्यलेला हा २,९४४,८६६ चौरस मैलाचा विस्तीर्ण भूभाग तर देशाच्या मध्यावर बिनवारशी पडलेला ओसाड वाळवंटाचा प्रदेश किती वर्षं माणसाची तहान लागून राह्यलाय कोण जाणे!

तीन वर्षांचा खडतर जलप्रवास करण्यासाठी २६८ टनी वजनाच छोट्या शिडाच्या जहाजाच नाव 'एन्डेव्हर' (ENDEVOUR) अस ठेवलं होतं इतकच नव्हे तर 'एन्डेव्हर' नावाने जहाजाची पत्रिकाही माडली होती ज्योतिष जाणकारानी शुभाशुभ ग्रहयोगाची कसून तपासणी करून, जहाजाच प्रस्थान ठेवून - 'एन्डेव्हर' पाण्यात उतरलं होतं

तीन वर्षं खलाशांना धीर देऊन वर आकाश अन् खाली पाणी। पहात जमीन दिसणार ह्या आशेनं, मोठ्या ईर्षेन कॅप्टन कुक प्रवास करत होता तहानभूक, थडी-वारा, ऊनपाऊस, सुसरीमगरी, मोठे जलचर, कितीतरी गोष्टींना तोड द्याव लागल असेल जिद्द बाळगून निघालेली मडळी १३ मे १७८७ ला जमिनीवर उतरली स्वागताला उभ असलेल कांगारूचं कोंडाळं, पाचफूटी माणसाच्या उंचीचा एकेक कांगारू, भाला बूमरँग घेतलेली आदिवासी मडळी काळ्या रंगान भेसूर भासणारी (अर्थात् गोऱ्या साहेबांना) नस भाषेशिवाय तोंड उघडणंही मुष्किल सामना देणही कठीण पण 'साहसे श्री प्रतिवसति' म्हणतात ना, इतकं मोठं साहस केलं, म्हणूनच ब्रिटिशांच्या पदरात एवढा मोठा देश पडला

आपल्या सत्तेखाली आणखी एखादा नवा देश असावा व तो आपण हुडकून काढला याचा सत्ताधीशाना अभिमान न वाटला तरच नवल!

आता ब्रिटिशांना सैन्यांची ठाणी वाढवायची होती कैदखान्यावर आणखी पैसा खर्च करण्याची शासनकर्त्यांची इच्छा नव्हती ह्या बेटावरची परिस्थिती पाहिली अन्नधान्य पिकवण्यासारखं हवापाणी, घरदार बांधण्यासाठी मुबलक लाकूड, वसाहती वसवण्यासाठी असलेल्या, आवश्यक गोष्टी आहेत असं लक्षात आल्यावर १७७३ मध्ये स्त्री-पुरुष गुन्हेगारांचं एक जहाज भरून इकडे आलं इतक्या हिरव्यागार आल्हाददायक वनश्रीजवळ, नावाप्रमाणं शांत असलेला हा समुद्र हे निरभ्र आकाश पाहून कैदीसुद्धा क्षणभर शिक्षा विसरले असतील!

कॅप्टन् जॅक्सननी अकरा शिडाची जहाजं आणली उथळ पाणी दिसेल त्या किनाऱ्या किनाऱ्यानं पुढं सरकत ती जहाजं पोर्ट जॅक्सन्ला (आताचं नाव) थांबली अधिकारी वर्ग प्रथम उतरला या परिसराला लॉर्ड सिडनी हे पहिल्या गव्हर्नराचं नाव म्हणून 'सिडनी' हे नाव दिलं त्याच दिवशी ब्रिटिशाचा 'युनियन जॅक' इथं फडकवला गेला तो दिवस २६ जानेवारी होता ऑस्ट्रेलिया-डे' म्हणून तो दिवस दरवर्षी साजरा करतात भारताचा प्रजासत्ताक-दिन २६ जानेवारीच असावा ह्या योगायोगाची अमळ गमत वाटली तिरंगी ध्वज नजरेसमोर झळकून गेला

समोरच कमळासारखं दिसणारं 'ऑपेरा हाऊस' वास्तुकलेचं हे एक अद्भूत रूप! या शिल्पाचा जनक डोरेन अुटझान हा एक डॅनिश माणूस पिळलेल्या संत्र्याच्या सालीवरून थिएटरच्या बाह्यरूपाची त्याची कल्पना साकार झालेली पाहून स्तिमित व्हायला होतं घराची भिंत आणि छप्पर एकाच तुकड्यात तयार करावं सत्र्याच्या एकेका फोडीत जितक्या पाकळ्या असतात तितकीच माणसं त्यात असावीत! आहे ना विलक्षण कल्पना? त्याचं हे वेड अलौकिक शहाणपणाचं ठरलं

ऑस्ट्रेलियाच्या जमिनीची बरीच जडणघडण झाली सबंध ऑस्ट्रेलियात सिम्फनी ऑर्केस्ट्रा Symphony Orchestra साठी एकही चांगला हॉल नाही अशी हेटाळणी एका इंग्लिश गवयान केली त्याबरोबर ऑस्ट्रेलियन लोक उसळले राजधानी न्यू साऊथ वेल्सची सिडनी थील

मडळी कामाला लागली खुद्द मंत्रिमडळ थिएटर बांधण्याच्या विचारानं पछाडलं गेल त्यानी लगेच १९५५ मधे ऑपेरा हाऊसच्या डिझाईनसाठी सर्व जागतिक वृत्तपत्रातून जाहिरात दिली (वशिलेबाजीन कॉन्ट्रॅक्ट देण हा प्रकार नसावा) मग फ्रान्स इग्लंड, अमेरिका. डेन्मार्क, स्पेन ह्या देशातून वास्तुशास्त्रज्ञाचे डिझाईन्सचे उत्तमउत्तम नकाशे यायला लागले एकूण ३२ देशांतल्या २३३ इंजिनियर्सनी स्पर्धेत भाग घेतला, त्यात हा डॅनिश माणूस 'जोरेन अुटझान' याचा प्लॅन बक्षीसपात्र ठरला

१९६५ ब्रीजच्या समोरच वेनिलाँग पॉईंटवर बांधकामाला सुरुवात झाली मंत्रिमडळ १९६६ साली बदलल त्या लोकानी या थिएटरच्या अवास्तव खर्चाबद्दल व रेंगाळणाऱ्या कामाबद्दल कुरकूर सुरू केली लगेच जोरेननं चालकत्वाचा राजीनामा दिला कलावंताचा राग तो! जगातल एक भव्य ऑपेरा हाऊस उभारणाऱ्या कलावंताची लहर गेली नाही तरी आता थोड देखरेखीच, शेवटचा हात फिरवण्याचं काम राह्यलं होतं ते अुटझानला कंटाळवाण झाल होत

शेवटी ह्या अतिउत्तम शिल्पाची कल्पना, त्याच बक्षिस व दोन वर्षं केलेल्या कामाचा मोबदला मिळून दीड लाख डॉलर्स (१९ कोटी रुपये) अुट्झानला मिळाले कल्पना तसं मोल! काम तस दाम

ऑपेरा हाऊसच हे कमळ अर्ध उमलत, असं हे डिझाइन! सर्व पाकळ्यातून मिळून एक हजार खोल्या, चार हजार प्रेक्षक एकाच वेळी बसून निरनिराळ्या थिएटरमधून वेगवेगळा कार्यक्रम पाहू शकतात गरजेप्रमाणे अद्ययावत यत्रसामग्री, विजेची कळसूत्री सिद्धता हे सगळं अप्रतिम होण्यासाठी वेगवेगळ्या देशातून लागणारा कच्चा माल आणला ह्या कामाला जवळजवळ सतरा एकर जागेइतकी काच लागली आहे अप्रतिम अंबर कलरची फ्रेंच ग्लास, एका चौरस फुटाच्या काचतुकड्याला सोळा डॉलर (१६० ते १७५ रु) या दराने घेतलीय (हे ऐकताच, भारतातला ताजमहाल, खडे बसवलेली किंमतवाली मोलभरी जाळी, ती गुलाब फुल आठवली हम भी कुछ कम् नही हैं हे मनात आलच) हो, आणि हिशोब करायला कॉम्प्यूटरची गरज लागली त्यापूर्वी इमारतीच्या हिशोबनिसाना कॉम्प्यूटर नव्हते वा निघाले नसावेत

बाहेरून संत्र्याची मोठी फोड दाबून हाताने रस काढलेली दिसावी,

त्या फोडी एकाजवळ एक लावून ठेवाव्यात असा बाहेरचा आकार, त्या फोडीत पहिला कॉन्सर्ट-हॉल, कॉन्सर्टस् बाय सिम्फनी हा दुसरा ऑर्केस्ट्रा हॉल, ऑर्गन रिसायटलसाठी रेडिओ रेकॉर्डिंग रूम ती निराळी ऑर्केस्ट्रा रूम, टी व्ही स्टुडिओज वेगळे चॅनेल्स, एक सिने स्टुडिओ सिनेमाथिएटर, एक नाट्यगृह, रंगमच बदलण्याची व्यवस्था - एक खुला - फिरवता येईल असा फर्निचर ठेवलेला, प्रॅक्टिससाठी दुसरा मग प्रदर्शन भरवण्यासाठी हॉल मिटींग्जसाठी कॉन्फरन्ससाठी दोन वेगळे भाषा-यत्राची सोय असलेले हॉल, अशी कितीतरी दालनं, एकातून एक निघणारी वास्तुशास्त्रज्ञांचा कल्पना-विलास दाखवणारी अशी आहेत तीन इजिनियर्सना प्लॅन काढायला दोन वर्षे लागली

या ऑपिरा हाऊसमधे कार्यक्रम चालू असतात तेव्हा सात हजार माणसांची सहज आत वर्दळ असते शिवाय सर्व दालन वातानुकुलित!

दरवर्षी आठलाख डॉलर्स आम्हाला लॉटरीच्या तिकीट-खरेदीतून आमचे नागरिक देत होते लॉटरीची बक्षिसही २५० लाख डॉलर्स इतकी देऊन झाली आहेत ऑपिरा हाऊसचा खर्च आजवर शभर लाख डॉलर्स झालेला आहे असं अध्यक्ष सागत होते

सिडनीच्या निळ्या आकाशाचा दिमाख दिवसा उचलून धरणार व रात्री सागराच्या निळ्या पाण्यात आपलच प्रतिबिंब पहाणारं हे ऑपिरा हाऊस हा ह्या किनाऱ्यावरचा नाट्यचमत्कार आहे बाजूलाच आहे असा वाटणारा सिडनी 'हार्बर ब्रीज' - त्या पुलाच्या कमानी सगळ्यांची नजर खिळवून ठेवतं

खरच कॅप्टन जेम्स कुक्, कॅ फिलिप्स् आदी मडळी स्वर्गातून खाली उतरली तर हा चमत्कार पाहून थक्क होतील आपल्या श्रमाचं लोकांनी चीज केलंय म्हणून नाचायलाही लागतील

राणी एलिझाबेथच्या हस्ते उद्घाटन झालं अशी राणी-प्रेमी मंडळी मायभूमीशी श्रद्धा बाळगून आहेत



# निळ्या डोंगर बहिणी

(''आज 'कट्टुम्बा-हिल्स' पाहायला आपण सर्वांनी सहकुटुंब जायचंय बरं का'' म्हणून मुहासने मोठी ललकारी दिली एक नवविवाहित जोडी अन् आम्ही एक प्रौढ जोडप!) आमच्यापेक्षा आम्हाला नवनव दाखविण्याचा मुलांचा॰ उत्साह जास्त होता ह्या देशात तसे मोठे डोंगर नाहीत सार समुद्रकिनाऱ्याचं सौंदर्य! 'कोसिओको' नावाचा फक्त ७३०८ फूट उचीचा एक पर्वत आहे कुठे आपला हिमालय व कोठे कोसिओको! माझ्या मनातल्या भारताने डोकं वर काढलच! हिमालय तरी कुणी पाहिलाय म्हणा? पण तो हिमागिरी नगाधिराज 'आमचा' आहे असा एक सुप्त अभिमान।

सिडनी शहराच्या पश्चिमेला, साठ मैलावर असलेल्या निळ्या पर्वताच्या रांगा खरच विलोभनीय आहेत आपला निलगिरी डोळ्यापुढे आला 'निळे डोंगर-ताबडी माती' इथे पण आहे की! 'कट्टुम्बा' नावाची पाटी लागली 'जॅमिसॉन' नावाची खोल दरी, अन् १५०० फूट उचीवर ह्या डोंगरांच्या रांगा कॅ फिलिप्स् आदी मंडळींनी देशाचा शोध घेत पायवाटा पाडीत हाही मार्ग शोधून काढला नंतरही पचवीस वर्षे हा भाग अज्ञानच होता १८१३ मधे वॉक्सलॅंड, वेंटवर्थ आणि लॉसन् साहेबांना हा वर येण्याचा रस्ता मिळाला वाटेत लागलेल्या धबधब्याला 'वेंटवर्थ फॉल्स्' हे नाव ठेवलं त्याचं जवळ जवळ पावशतक हा रस्ता


चाचपडण्यातच गेल निळ्या डोंगराची पसरलेली रांग सारखी समोर आडवी येई जॅमिसॉन् दरीला, निळ्या डोंगरांनी जणू विळखाच घातला आहे मधे मधे वादळ वारा पाऊस, थडी ह्यांनी वाळू माती वाहून नेऊन, खडकाचे सुळके उभे केलेत कोबाल्टचा (मिश्रित धातूचे सूक्ष्म कण) झुडुपावर पडलेला थर, त्यावर युकॅलिप्टस्च्या झाडामधून गळणारे निलगिरी तेलाचे थेब, ह्या थेंबातून परावर्तित होणाऱ्या सूर्यकिरणांमुळे बदललेला, विस्मित करणारा हा निळा रग डोंगराचे नाव सार्थ करतो काही स्थानिक मडळी, "उन्हाळ्यांत लागणाऱ्या बुश-फायरमुळे गेल्या पचवीस-तीस वर्षांत हा रग बराच कमी झालाय" अस सागत होती मुळात होता तितका निळा रग आपल्याला पहायला मिळाला नाही म्हणून हळहळ वाटली भराभर ढग जमायला लागले अन् दाट धुक्यानी सगळ्याच कल्पनावर पडदा पडला

प्रवाशासाठी छोट कॅन्टिन व लागूनच अम्पलेल्या टूरिस्ट शॉप्मधे निळ्या डोगरांचे फोटो, ऑस्ट्रेलियाची मीव्हिनिअर्म होती उजव्या बाजूच्या दुकानात लहान मुलासाठी विजेची अनेक प्रकारची खेळणी होती मधे मोठा हॉल, समोरच काचेतून दिसणारी १५०० फूट खोल दरी। दुसऱ्या बाजूला आठ माणसाना बसतां येणारी लाबडी बाक तो चार बाकाचा डबा उतारावरच उभा केला होना "Train going to the valley" असा गाडीच्या कंडक्टरनी आवाज दिला वीस सेंट्ची तिकिट काढून आम्ही बाकावर जाऊन बसलो धाडधाड आवाज करत गाडी उतारावरून खाली चालली खालच्या दरीचा फोटो काढायचा म्हटलं तर आपल्याच पायातल्या बुटांचा फोटो येतो अस सुहास सागत होता हसू आल, खरच शरीराचा अगदी ९० अशाचा कोन झाला होता आता आपण खाली पडणार, एकमेकाच्या डोक्यावर डोकी आपटणार अन् काय आश्चर्य' डबे तसेच मागे ओढायला सुरूवातही झाली दरीच्या तळाच पुसटसं दर्शन, घाबरत घाबरतच आम्ही घेतल, लाकडी डब्याचा धाड धाड आवाज त्या खोलीच्या भयकरपणात भरच घालीत होता आजूबाजूची हिरवी गर्द झाडी भेसूरपणा वाढवीत होती परत डबे खाली घसरले तर? कल्पना करवत नव्हती डबे पहिल्या जाग्यावर आले अन् आम्ही बाहेर पडलो

समोरच 'रोप-वे' वरून जाणारी गाडी दिसली "ह्या गाडीत बसून अर्धाएक मैल गेल की 'थ्री-सिस्टर्स' समोर उभ्या असलेल्या दिसतात, "बर का आई, दादा, घाबरायच नाही पण" सुहासनं बजावून सांगितलं जीवाचा धडा करून 'रोप-वे' च्या डब्यात पाय टाकला १५०० फूट खालची खोल दरी पोटांतही खोल खळगा पाडत होती डब्याची दार बंद झाली बाहेरचं पाहू नये म्हटल तरी काचातून सारं स्पष्ट दिसत होत मुलानी टाऽऽटा म्हणून हात हालवला दोरावरून डब्याचा पाळणा पुढे सरकायला लागला अर्धे-अंतर जीव मुठीत घेऊन गेलो धुकं इतकं दाट झालं की कडक्टर्साहेबांना पुढच काहीच दिसेना आम्ही डोळे फाडून बाहेर बघत होतो परत हे धाडस होणं नव्हत ३५,००० फूट उंचीवरून उडत आल्यावर १५०० फूट उचीला काय घाबरायच म्हणून अवसान आणीत होतो पण छे, अतराळात तरगत, हरीवर हवाला ठेवून निघालेले आम्ही, पाळणा परत ठिकाणावर लागल्यावर 'वासुदेव हाऽऽरी' करून एकदाचे खाली उतरलो पाऊस सुरू झाला होता, थडी कुडकुडायला लावत होती पण " हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा" तोंडात येत होत तरी शब्द थडीमुळे बाहेर पडेनात सुहासनं कॉफी ऑर्डर केलीच होती गरमगरम कॉफीचे घोट पोटात गेले, ऊब उत्पन्न झाली, मग शब्द फुटायला लागले, "अगदी पांचावर धारण बसली ना?" सुहास म्हणाला, "छे रे, भलतच आहे बाबा हे"

बाहेर, ह्या तीन बहिणींच प्रतीक म्हणून खऱ्या पिंगट रंगाच्या दगडाच्या तीन बायका उभ्या केल्या आहेत 'जॅमिसॉन्' दरीच्या त्या टोकाला, कोबाल्टचा थर पडून, वादळवाऱ्याने उभे केलेले तीन डोंगर, खडक होऊन बसलेत निसर्गनिर्मित उभ्या केलेल्या खडकांच्या ह्या तीन मानवी स्त्री-सदृश आकृती बहिणीबहिणीच्या नात्याने एकमेकीला धीर देऊन उभ्या आहेत ऊनपावसाला तोंड देत आहेत खडकात देखील बहिणीचं नात जोडणारा माणूस स्वत च्या जीवनातही बहिणीच्या नात्याला जागून राहिला तर किती बर होईल? ह्या बहिणींपुढे उभं राहून आमची छबीपण आम्ही फोटोत टिपण्याचा त्या धुक्यातही प्रयत्न केला

ꕤ ꕤ



# टोरांगा झू-----

आज 'झू' - प्राणिसंग्रहालय पाह्यला जायचा बेत ठरला "काय रे, आम्हाला लहान मुलांसारखा राणीचा बाग काय दाखवतोस?" असं मी सुहासला विचारलं मग मुंबईच्या राणीचा बाग आठवला त्यात पुष्कळसे रिकामेच असलेले पिंजरे! फक्त माकडांची सुबत्ता- वानरांची वाढती वंशावळ राष्ट्रीय प्राणी मोर पण त्याचच नेमकं दुर्भिक्ष्य! पिसारा फुलवून बसलेल्या जेमतेम एकाच मोराचा प्रपंच! त्याची एकच सहचरी लाडोर, ती पण बिचारी सुकटलेली! हत्तीच्या ढालीमागे झाकून गेलेली ही आमची प्राणिसंपदा! हत्तीच्या अंबारीतून फिरणारे परदेशीय प्रवासी पाहिले की भारताच्या हत्तीएवढ्या (वा सारख्या) वैभवाकडे पाहून मला पण अभिमान वाटत असे आणि म्हणूनच की काय हत्तीच्या तबेल्यांतल्या घाणीकडे कानाडोळा करून आम्ही परत फिरत असू.

"तुम्ही आता मुलं बरं का, आम्ही मोठी माणसं, आम्ही तुम्हाला ऑस्ट्रेलियांतला राणीचा-बाग दाखवणार आहोत" असं सुहासनं म्हटल्यावर मुंबईचा राणीचा बाग तिथेच सोडला आम्ही 'झू' च्या फाटकाशी उतरलो Wild life of Australia, Torango-Zoo' असा बोर्ड वाचला कांगारूचं मोठ्ठं चित्र जणू 'झू' वरची मालकी सांगत होतं! पक्ष्यांचे पिंजरे प्रथम लागले स्वैर संचार करणारे हे प्राणी प्रथम बंदिस्त केले असावेत मूळचे इथलेच रहिवासी म्हणून ओळखले गेलेले ७००

जातीचे पक्षी इथ आहेत काही थोडे आयात केलेले पण ह्याची सगत धरून राहलेले आहेत त्यातले ५३० एक जातीचे पक्षी तर सपूर्णपणे माणसाळलेले आहेत खाण्यापिण्याची पुष्टता पक्ष्याच्या अगावरही दिसत होती त्याच्या विविध तऱ्हा, काही लाब, काही आखूड चोची तर काही काळ्या ताबड्या माना, रगीबेरगी शेपट्या ती नाजूक गोंडस हालचाल सगळच कसं चित्तवेधक!! काळ्या ताबड्या मानेचे, हिरव्यागार रगाचे गाणारे पोपट होते हे इथल्याच पर्वत शिखरावरून विहरत होते म्हणे मोरासारखा 'बेलबर्ड' पक्षी ह्या पोपटाच्याच वशातला आवाजाने पोपटाशी नात असल्याच सिद्ध करीत होता त्याला 'हसणारा ककुबरा' साद घालायचा मैना, साळुंक्या, चिमण्या ह्याचा किलबिलाट चालूच होता अनेक वर्षे एकाकी पडलेल्या ह्या भूभागावर पक्ष्यानी अन् प्राण्यांनी मात्र तग धरलेला होता म्हणायचा चोचीचोचीसाठी चारा इथे तयार होत होता त्याच्या वंशवेली वाढत होत्या अडी उबवण्यासाठी आडोसा बघून घरटी बाधली जात होती झाडांच्या फाद्या पिलांना हिंदकळत होत्या फळाचा सडा पडत होता हजारो तऱ्हेचे पक्षी, प्राणी ह्या निर्मनुष्य देशात सुखाने स्वतंत्रपणे रहात होते मागून माणसान येऊन त्याच्या रगरूपाप्रमाणे त्याची नाव ठेवली व माणसाना बघण्यासाठी, माणसानीच केलेली ही 'झू'ची योजना! त्यांनाही कोंडल्यानतर आमचा हा प्राणी सग्रहालय पाहून त्यानाही प्रथम आश्चर्य वाटलं असेल कोणी सांगाव? खाली डोक करून लोबकळणाऱ्या माकडालाही 'झू' पाह्यला गेलेली माणसं, डोक्यावर का चालताहेत अस वाटत असेल एका व्यगचित्राची आठवण होऊन मग माझं मलाच हसू आल

खरंच हा एवढा मोठा एमू आमच्याकडे पाहतोय् की! राखाडी रंगाचं शरीर त्याची ही हिरवटसर रंगाची अडी उबवायला, त्याला आठ आठवडे अड्यावर बसून रहाव लागत! पुढे जवळ जवळ १८ महिने पिल्ल ह्याच्याच अगावर अस्मतात त्यामुळे ५ फूट उंचीच्या ह्या एमू बाबाच वजन त्या काळात आठएक पौंडांनी कमी होत म्हणे! पाटीवरची माहिती वाचून मी ह्यांना म्हटलं, "आश्चर्यच आहे म्हणजे! अडी उबवण्यापासून सर्व जबाबदारी नर पार पाडतोय वाटतं, हे खर Women's Liberation म्हणायला पाहिजे"

"मादी कुठ समाजकार्य करायला जात असेल, मग तो काय करील बिचारा!" म्हणून ह्यांनी हसत टोमणा दिला एमूबाबाच्या अवतीभोवती

पिल फिरत होती एवढ्यात एमूनी एक आवाज काढून जातवाल्याना इशारा दिला गंमत वाटली

एचिगा पाह्यला 'प्लॅटिपस्' बदकासारखी चोच अन् फताडे पाय! सील सारखी अंगावर लोकर, तर सापासारखी अडी (साप घालतो तशी) हा एक जरा प्राण्याचा चमत्कारिक प्रकारच वाटला It lays eggs and suckles it's young' अस काहीतरी पाटीवर लिहिलं होत 'घटाघटाचे रूप आगळे' खरच त्या विधात्याच्या ह्या विविधतेचं कौतुक वाटल! पाण्यावर उडणारा सीगलज्चा थवा तर पाण्यातले पाढऱ्या बरोबर, काळ्या रंगाचे राजहस! वर्णाने काळे असले तरी ह्या हसाच चालण डौलदार होत! 'चट्ऽऽर चॅटर्' करणारे पाढरे 'कॉकटू' आणि हे देखणे 'लायरबर्ड' (Lyer bird) खूप मोठे करकोचे आणि बुटके बगळे, आमच्याकडे रेशनिंग नाही असच ठासून सागत असावेत मोठमोठे पाण्याचे तलाव केले होते तर पक्ष्यांचे मोठे पिजरे करून खऱ्या मोकळ्या वातावरणात आपल्याला ठेवल आहे अस आम्हाला भासवणारे व त्याना फसवणारे हे पिंजरे - माणसाच्या पक्ष्यावरील प्रेमाची साक्षच देत होते

आता आम्ही कांगारूजवळ आलो

"कागारू रस्त्यावरनं हिंडत असतात सगळं जगल आहे तिथं, त्या ऑस्ट्रेलियांत तुम्ही जाताय?" असं मला भारतात एकादोघांनी विचारलं होत कागारूचे पुढचे दोन पाय अगदी लहान, फक्त आपल्या हातासारखे कोपरापासून हात असावेत असे दिसत मागचे पाय चांगले उंच चालताना मागच्या दोन पायावर व पुढचे तोटके पाय किवा हात म्हणावे, पोटावर धरून चालतात पोटाशी पाय घेऊन दोन मागच्या पायावर, कांगारू आपल अवजड शरीर कस उचलतात कोण जाणे! करडा किंवा लालसर रग, व भुरेभुरे कातडीला चिकटलेले केस असतात सर्वांत मोठा कांगारू, ७ फूट उंच व मागच्या भागाच २०० पौंड वजन असलेले कागारू महाशय (Giant Kangaroo) तेथे अध्यक्षासारखे स्तब्ध उभे होते नराना बकस्, मादीला डोइझ् व बेबी कागारूला जोइ म्हणतात मादीच्या पोटाला चिकटलेल्या पिशवीत दुधाची सोय (स्तनाग्र) असल्यामुळे दीडएक महिन्याचा गर्भ-जीव, एक ग्रॅम वजनाचा, पिशवीत येलो ह्या पिशवीत स्तनाला चिकटून रहातो आठ महिने हे बाळं दूध पीत वाढत असत डोळे उघडले की त्या पिशवीच्या बाहेर तोंड काढत पुन्हा आत जातं इतक्यांत एक पिलू बाहेर आलं न् पाच एक मिनिटानी

पुन्हा आईच्या 'पोट-पिशवीत' जाऊन बसलं एवढंसं गोजिरवाणं कांगारू पाहून गमत वाटली पोटाशी धरून झाडावर उड्या घेत जाणारी वानर-माकड भारतात पाहयली होती. पण हा कांगारूच्या निर्मितीचा प्रकार वेगळाच! त्याच्या नुमबट्, वलबी, रॅट्-कांगारू अशा जाती आहेत तसा फारसा फरक नव्हता सिडनीला एक 'कांगारूच खोरं' आहे तर दक्षिण ऑस्ट्रेलियात 'कांगारू' बेट आहे अशी कळपानी वस्ती करून राहणारे कांगारू व त्यांची स्वतत्र वसाहत - बाकी हा देश पहिला कांगारूचाच!

शेजारच्या पिजऱ्यात- काहीच दिसत नव्हते बाहेर 'कोआला' नांव होते निरखून आत पाहत होतो तर उंच डिंकाच्या झाडाच्या फादीवर हे चिरजीव बसले होते हा दुसरा ऑस्ट्रेलियन रहिवाशी ह्याला 'नेटिव्ह बेअर' म्हणतात खेळातल अस्वल ही त्याचीच प्रतिकृती अगदी मऊमऊ केस, बाळसेदार शरीर, घेतलं तर कोआला पोराप्रमाणे कडेवर बसत अतिशय गरीब प्राणी आहे हा गरीब स्वभावामुळे की भित्रेपणाने हा कोआला (युकॅलिप्टस्) गमच्या झाडाला चिकटतो व वर वर चढत जातो बारीक डोळे व फताडं रबरासारखं नाक, गडद काळ्या रंगाच असतं तसा रंगाने करडा वा पिंगट युकॅलिप्टस्ची पान हेच त्यांचं अन्न सर्व प्रवासी त्याला हात लावत होते कडेवर घेत होते सर्वांशी नात जोडणारा हा लाघवी प्राणी पाहून गंमत वाटली अनेक वर्ष एकलकोंडा राहिलेला प्राणी माणसाचा इतका भुकेला झाला होता की काय? पुन्हा हे प्राणी पाह्यला मिळणार नाहीत म्हणून मागे वळून वळून पाहून घेतले

नवा देश, हे नवे प्राणी, त्यांचे रग, त्याच्या जाती प्रत्येक पिंजऱ्यावरची पाटी वाचायला भाग पाडत होते प्रवासी मंडळींची गर्दी वाढत होती मागं माणसांचे थवे उभे होते पिंजऱ्यांपासून भरभर पुढ सरकायला हवं होत एका पाठोपाठ, एकमेकाना पाठी देऊन उभं असलेलं 'जिराफ कुटुंब' लक्ष वेधून घेत होत काळे पिवळे ठिपक्याचे त्यांचे कपडे, लांबड्या मानाचा ऐटदारपणा, Slim बांधेसूध शरीर, अंगभर पिवळा मोहरी रग, सगळच उठाव देणारं होत फोटो घेण्यासाठी सुहासन कॅमेरा लावून - उभा जिराफ फोटोत सबंध यायला हवा होता जमलं पण ते! आमच्या साडीची डिझाइन्स त्याच्या रंगसगतीपुढे फिकी पडत होती "हं तुम्ही माना अशा उचावू नका" सुहास सांगतोय तर इकडे जपानी मुली, आम्ही साडीतल्या बायका म्हणून "फोटो काढू का?" असं आम्हाला खुणेन


विचारत होत्या क्लिक् केलंही, Thank you'' म्हणून गालांतले डोळे पुन्हा क्लिक् झाले गोबऱ्या गालातच हसण विरल त्या निघूनही गेल्या ''असा काय फोटूचा चेहरा करून उभ्या आहात?''

सुहासन आम्हाला नकळत माझा न् आशाचा फोटो घेतला होता

पाय आता बोलायला लागले होते सापाच्या १४० जाती पहात आम्हीही सरपटत, पाय ओढत यायला लागलो भली मोठी दोन कासव आपल्या भल्या मोठ्या पाठीच ओझ घेऊन सरपटत होती पाताळातले हे प्राणी व त्याच्याच पिछाडीला, त्याच 'काळीमाये'च्या पोटातून वर आलेले हे महान वृक्ष! ३०० फूट उच! इथल्या पुरातन वृक्षांची ही उची-स्वर्लोकाला हात लावणारी! आणि इहलोकाल राहून टीचभर उंचीची आम्ही माणस, हा चमत्कार पाहूनही, आम्ही हे केलं, आम्ही ते केलं हा वृथाभिमान बाळगून आहोत

असा हा ऑस्ट्रेलियातल्या 'झू' चा प्रचंड परिसर! प्राण्यांच्या सुखसोयीसाठी झटणारा इथला नागरिक! विलोव्ट्रीच्या ओथंबलेल्या फांद्या, कृत्रिम तलाव, त्यावरचे छोटे छोटे पूल, रंगीबेरंगी फुलं, मार्गदर्शक चित्रांकित फलक, स्वच्छता, निसर्गाच्या सान्निध्यांतच ठेवलेले हे प्राणी आमच्या 'झू' मधल्या प्राण्यांना हेवा वाटण्याइतकं त्याचं सुखी-जीवन! चार तास कसे गेले समजलं नाही फाटकाकडे नजर लागली होती घरी जायची घाई नव्हतीच समोर पुन्हा सिडनीब्रीजची कमान दूरवर दिसली आपण वेगळ्याच जगात आल्याची जाणीव झाली!

पशु-पक्षी आणि हे प्राणी ह्याचंच केवळ अस्तित्व असलेल्या ह्या देशात फक्त दोनशे वर्षांपूर्वी वस्तीला आलेला मानव, ह्या जीवजातींना शोधून काढतो, त्याची बारशी करतो, लालनपालन करतो, आणि पुन्हा त्यांना निसर्ग सान्निध्यात ठेवून हव तेव्हा पाहण्याचं अनुभवसुख स्वत मिळवत आहे खराच



✻✻

# कॅनबेरा - एक आखीव-रेखीव राजधानी

आज सिडनी सोडायच होत पुन्हा मागे वळून कूजी बीच पाह्यला 'पूर्व समुद्री छटा पसरली रम्य सुवर्णाची कुणी उधळली मूठ नभी ही लाल गुलालाची' बालकवींच्या प्रतिभेत साकारलेल सौंदर्य साक्षात त्याच्या ओळी घेऊनच पुढे उभं ठाकल झुंजूमुजू होतंय वर चद्रकोर पुसट होतीय सिडनीची मंडळी साखरझोपेतच आहेत झोपेतसुद्धा साखर खाणारी ही मडळी भाग्यवानच म्हणायला हवी त्यांच्या सुखाचा हेवा मन नकळत करून गेल

सिडनीच्या पॅरामिटा नदीच्या काठाने कॅनबेराचा रस्ता सुरू झाला पॅरामिटा रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला शृगारलेल्या मांडवातून सजवलेल्या गाड्यांची दुकान, "आपल्या भाडेआळीसारखीच ही गाडी आळी म्हणायची!" अग इथे लिमलेटच्या गोळ्या विकत घ्याव्या अशा गाड्या मिळतात" माझ्या मुलान दिलेल्या सार्थ उपमेच हसू आल म्हणजे 'गजान्त लक्ष्मी' म्हणतात पण इथं गाड्यांनीच लक्ष्मीची पावलं झंकारताहेत म्हणायची

रहाणीमान उच्च असलेला जगातला हा दुसरा देश अमेरिकेनतर ऑस्ट्रेलियाचा नंबर लागलेला आहे कशाची टचाई नाही आबादी आबाद आहे 'हाय वे' नतर 'फ्री-वे' लागला दोनशे मैलाच अंतर आम्ही अडीच तीन तासात तोडल पाढऱ्या निशाणी पट्ट्या अगावर घेऊन डाबरी रस्ते आमच्याबरोबरच ताशी शंभर मैल वेगाने सुसाट धावताहेत कन्ट्रीतली

माणस आत्ता कुठं उठताहेत

कॅनबेऱ्याच्या सीमेपाशी आलो शिशिरातला गारवा जाणवतोय थडीतही फुलाना बहर यावा, पानोपानी मोहर फुलावा आणि तेच वैभव वसंतऋतून उचलून धरावं, सदासर्वकाळ मोहरलेली झाडी, ते फुलारलेले ताटवे, राजधानीच्या वेगळ्या वैभवाची साक्ष पटवून देत होते जगातल्या सुंदर शहरात कॅनबेऱ्याची गणना केली जाते

समुद्र सपाटीपासून दोन हजार फूट उच असलेलं हे एक झुडपाचं मोकळचाकळ रान, बाजूला अस्ताव्यस्त पसरलेल्या टेकड्या, उचसखल जमीन, जगलासारखी वाढलेली वेडीवाकडी झाड, मोकाट पसरलेली माळरान, वळसे-वेलाटीच्या पायवाटा काकडवणारी थडी, अस हे एकाकाळी असलेल निर्मनुष्य बेट। पण ह्या लोकानी त्याच नदनवन केलं

इंग्लडहून 'ओक' ची झाड आणली, 'यारालुमाबे' मधून आणलेली पाईनची तीन लाख रोप व इतर किनीक ही उंच वृक्षराजी थडीला अगावर घेऊन सदा मोहरलेल्या चेहऱ्याने नव्यानव्या वास्तूना जणू आशीर्वादच देत आहे उन्हाळा तसा इथं नाहीच, पण पानाफुलाच्या सतत बदलणाऱ्या रगांनी राजधानी कशी खुलून ताजीतवानी गर्द दिसावी सतत बदलणाऱ्या रगाची किमया शहरातल्या मध्यभागी असलेल्या तळ्यात (कृत्रिम बरं का) प्रतिबिंबित होत रहावी रंगात सुगंध भरावा आणि त्या निसर्गरम्य शांततेत डोळे मिटून तो हुगत रहावा रामराज्यातली अयोध्या अशीच होती उच गोपुर, सोनेरी कळसाचा राजवाडा, बुलुंद दरवाजे, त्यावर चौघड्याची चौकी, वासाच्या पाण्याने भिजलेले राजमार्ग, ती कमलपुष्पानी झाकलेली तळी, ते राजहंस वाचलेला रामायणकाल आठवला नगरवैभव हेच ते असंच असाव

१२ मार्च १९१३ रोजी ह्या शहराचा जन्म झाला त्यावेळच्या गर्व्हनर साहेबांच्या पत्नी लेडी डेनमान ह्याना गावाच बारस करण्याचा मान मिळाला नवीन नाव सुचवणाऱ्या अनेक चिठ्ठ्याचा पाळणा करून डेन्मानबाईंनी एक कार्ड आपल्या नाजूक हाताने उचलून बाहेर काढल आणि स्वत च्या स्वच्छ इंग्लिश आवाजात त्यानी कॅनबेरा हे नाव आमजनतेला वाचून दाखवल पाच हजार प्रेक्षकाच्या साक्षीने ह्या जागेवर राजधानीच्या पायाचा पहिला दगड बसवला गेला घोड्याच्या पहिल्या पलटणीने त्याला पहिली सलामी दिली ह्या नव्या नगरीच्या आखणीसाठी

ठेवलेल्या जागतिक स्पर्धेत एकशेसव्वीस शास्त्रज्ञानी भाग घेतला

वॉल्टर बर्ले ग्रिफीन ह्या अमेरिकन माणसाने काढलेला नकाशा निवडला गेला पण सेकड वर्ल्ड वॉर लगेचच सुरू झाले त्या नवनिर्मितीच्या कल्पनेला चागलाच हादरा बसला १९१३ मधे आखलेल्या राजधानीचं स्वप्न फक्त नकाशावरच राहत की काय अस वाटायला लागल तज्ज्ञाची कमिटी कामाला लागली नव्या शहराच्या उभारणीचा त्यानी चग बांधला निसर्गाच्या अमाप देण्यातून अप्रतिम लेणं उभारण्याचा ध्यास घेतला त्या पराकाष्ठेला पैशाची जोड हवी मनुष्यबळ हव पण आपल्या देशाच्या राजधानीला जगात मानाचं स्थान मिळायला हव म्हणून लोक जिद्दीन कामाला लागले १९२७ साली मेलबर्नहून राजधानी हलवली पण नव्या राजधानीला रेखीवपणा यायला १९६५ साल उजाडलं, स्वप्न साकार करून दाखवलं, जगाला विस्मित केल

राजधानीच्या नकाशाच्या रेघा कागदावर उमटल्या खऱ्या, पण वर्षाला अवघा पंचवीस इंच पाऊस पडणाऱ्या ह्या उजाड माळरानावर पाण्याची व्यवस्था व्हायला हवी हे ओळखून 'थारालुमा' खेड्यातून वहाणाऱ्या 'मोलग्लो' नावाच्या नदीचा प्रवाह ग्रिफीन् साहेबाच्या नजरेन टिपला नदीचं पाणी अडवून, धरण बाधून एक तात्पुरतं तळ निर्माण केलं 'बर्ले ग्रिफीन लेक' अस तळ्याच नाव ठेवल ह्या तळ्याने १७४० एकर जमीन झाकून टाकलीय सातशेतीस मैलाच्या परिसरात गोळा केलेल हे पाणी कुठं पधरा, कुठ पासष्ट फूट खोल आहे तळ्याची रुदी १००० ते ४००० फुटापर्यंत बदलत रहाते तळ्याच्या घेराभोवतीची चक्कर बावीस मैलाची आहे वाढत्या लोकसख्येचा प्रवाह वहाता रहाण्यासाठी ह्या तळ्यावर दोन जुळे पूल बांधले आहेत 'किंग्ज ॲव्हेन्यू ब्रीज', दुसरा 'कॉमनवेल्थ ॲव्हेन्यू ब्रीज' ब्रीजच्या हातकड्यामधले झाकलेले दिवे, पाण्यात पडणारा प्रकाश, पाण्यात प्रतिबिंबित होणार वरच रूप, लोभस निळ निळ आकाश, सारंच अवर्णनीय झालंय ह्या ब्रीजला Illuminating Engineering Society'च मेमोरियल ॲवार्ड मिळालय, नदीच्या पुराने तळ्याच पाणी बेसुमार वाढू नये म्हणून तळ्याला झडपाचे पाच दरवाजे केलेत

कॅनबेरा शहराच्या सौंदर्यावर अधिराज्य गाजवणारा तळ्यात एक

'स्मृतिस्तंभ' उभा आहे ऑस्ट्रेलियन व अमेरिकन लोकांच्या जपानविरोधी उभारलेल्या दुसऱ्या महायुद्धांतली ही विजयनिशाणी तळ्याबाहेरच्या हिरवळीवरच उभारलेल्या ह्या खांबाची उंची २५८ फूट आहे खाबावरच्या पृथ्वी गोलाकारावर एक गरुडपक्षी ह्या उडत्या गरुडाचे वजन ३-४ टन आहे कॅप्टन् जेम्स कुक चा स्मारक स्तभ ह्या विजय स्तभासमोरच आहे पण तळ्यात उभारला आहे त्यातून उडणारा पाण्याचा एकेरी फवारा जवळजवळ विजयस्तभाच्या उंचीपर्यंत पोचतो त्याला 'बर्ले ग्रिफीन वॉटर-जेट' असं नाव देऊन दोघाचा मान, उंची समान असल्याचे जणू घोषीत केलं आहे

'WAR - MEMORIAL' युद्धस्मृतीची ही वास्तू 'एलस्ली' पर्वताच्या पायथ्याशी आहे व पार्लमेंट-हाऊसच्या बरोबर समोर आहे ॲनझॅक-डे (ऑस्ट्रेलिया, न्यूझीलड, ऑर्मस कोअर डे) दिवशी हुतात्मा-स्मरणाची परेड ह्या स्मारकाला मानाचा मुजरा करून निघते १९१७ मधे फ्रान्सच्या रणभूमीवर विसावलेल्या वीराची ही स्मरणगाथा ही वास्तू साभाळून आहे बलिदान केलेल्या ऑस्ट्रेलियन योद्ध्यांची नामावली, त्याच्या अनुक्रमवार फिती, मानचिन्ह, टोप्या, गणवेश शस्त्रास्त्रे अशा अनेक सस्मरणीय वस्तुचा संग्रह पाहायला मिळतो जपानची एक पाणबुडी (Submarine ship) १९४२ मधे दुसऱ्या युद्धात सिडनीच्या बंदरात मिळाली ती जशीच्या तशीच प्रवेशद्वाराजवळच हिरवळीवर ठेवलीय दुसऱ्या बाजूला, प्रवेशद्वाराशीच जपान व अमेरिका ह्याची दोन विमान पॉलीश केलेल्या लाकडी जर्मनीच्या विमानतळावर आपली प्रतिबिंब बघताहेत विमानाची चकाकी ह्या लाकडी जमिनीच्या तकाकीबरोबर स्पर्धा करताहे अर्थात देखभाल वाखाणण्यासारखी आहे

भव्य दारातूनच समोरच्या इमारतीचा उंच गोलघुमट मान वर करूनच बघावा लागतो आदराने मान इथेच लवते अगणाच्या दोन्ही बाजूला कमानी व आत नेणाऱ्या पितळी पायऱ्यावर १०१ पासून ८४९ हुतात्म्यांची नावं कोरलेली, मोझॅकटाईल्सनी सजवलेल्या भिंती, आतलं शात वातावरण, ते गाभीर्य निळसर काचाच्या खिडक्यांनी टिकवून धरलय चित्रकाराची उत्स्फूर्तपणे रेखाटलेली ती युद्धभूमी, त्या युद्धाला निघालेल्या पलटणी, युद्धनौकाची चित्रं आपले पाय खिळवून ठेवतात पहिल्या दालनात चैत्रगौरीसमोर माडावेत असे युद्धभूमीचे अतिभव्य

देखावे, त्यात उभे केलेले वीर पुतळे ती शस्त्रास्त्रांची चकमक, जीवघेणे बॉम्बस, ती विमानाची घर्र घर्र, युद्धभूमीवरची धावपळ, त्या ॲम्ब्युलन्स गाड्या विलक्षण गतीने डोळ्यासमोरून सरकायला लागली अंत करण भरून आलं काय ही सत्तास्पर्धा, हा नवाकोरा डोळ्यांदेखत घडलेला इतिहास अवघा पाऊणशे वर्षांतला!

वैदिक कालापर्यंत मागं जायला नको महाभारताचा काल सांगून भारतावर हक्क सांगणारे आम्ही, छत्रपती शिवाजी आमचाच म्हणून पोवाडे गाणारे आम्ही आमचा इतिहास, आमच तत्त्वज्ञान, आमच्या इतिहासाची पाने सुवर्णाक्षरानी लिहिली आहेत पण आता ती इतिहासाच्या पुस्तकातच राहिली आहेत, विचार न कळत मनात गोंधळ घालतात कधीही, कुठेही मेमोरियल बंद व्हायची वेळ आली आणि इतिहासाची सारीच पान बद करून मी सर्वांबरोबर बाहेर पडले

देश प्रगतिपथावर आहेच आता राजधानीत हायकोर्टाची मोठी इमारत बाधून झालीय नव्या पार्लमेंट हाऊसचं उद्घाटन एलिझाबेथ राणीच्या हस्ते होणार आहे वास्तुशास्त्रातली नवी कलाकृती म्हणून बोट दाखवता येईल अशा दोन्ही इमारती आहेत युनिव्हर्सिटी सायन्स ॲकॅडमी, ॲनाटॉमी इन्स्टिट्यूट, आर्ट गॅलरी अशी प्रगतीची द्योतक चिन्हं, ऑस्ट्रेलियनांना अभिमानाची झाली आहेत

'कॅनबेरा' नावाकडे पुन्हा लक्ष गेल ४९०,००० वर्षांच्या पूर्वीची मडळी (समुद्र बाजूला होताच) जमिनीवर टेकली व त्यानीच त्या आदिवासींनी आपली एक भाषा तयार केली अजून त्यांनीच ठेवलेली बरीच नाव गावाना आजही चालू आहेत तसंच 'कॅनबेरा' म्हणजे एकत्र भेटण्याची जागा, माणसं, नद्या काही, काही ही चुनखडीच्या ह्या लोकानीच प्रथम हेरलं नदीकाठी वस्ती होणं स्वाभाविकच होत त्यानीच ठेवलेलं हे 'कॅनबेरा' नाव पुन्हा चिठ्ठीत निघाव? हो, इग्रजी साहेबांच्या नावाच्या पुष्कळ चिठ्ठ्या होत्या एक चिठ्ठी 'शेक्सपीअर' नावाची होती मनी हसू आलं पुन्हा कॅनबेरा नावावर नव्हे 'कॅन'वर जोर देऊन म्हटलं योगायोगाच शेक्सपीअर वरच्या प्रेमाचं नवल करत राजधानी सोडली



# देशाचा खरा खजिना

राजधानीची उची वाढवणारा, देशाचा खरा खजिना म्हणजे ग्रथालय कॉमनवेल्थ ब्रीजला लागूनच 'नॅशनल लायब्ररी ऑफ ऑस्ट्रेलिया' एक मोठी लक्षवेधी इमारत १९६० साली बाधलेली ही ग्रथालयाची इमारत जितकी देखणी तितकाच आतला ग्रथसंग्रह अत्याधुनिक व देखणा वृत्तपत्र, मासिकं, पाक्षिक सगळ अगदी अद्ययावत् आहे सदर्भ-ग्रंथ सशोधकांना, अभ्यासकाना वेळेवर मिळावेत, एवढच नव्हे तर आवश्यक ते नकाशे, मूळग्रंथाची प्रत व त्यावरून फोटोस्टेट् कॉपीज् लगेच करून घेण्याची मशिन्स इथ आहेत सर्व विषयाच्या ज्ञानामृताचे आणि कलावताच्या चौसष्ट कलामृताचे कलश जणू भरून ठेवलेले आहेत

वाचनालयात जगातल्या सर्व भाषांची पुस्तकं आहेत पण एशियन-ग्रथांच्या निवडीवर भर दिलेला आहे लगेच 'भारतीय भाषातील कोणती पुस्तक आहेत?' असं ऐटीतच मी ग्रंथपालांना विचारल! ग्रंथपालाने आम्हाला खालच्या तळघरात नेल श्रीमद्भगवद्गीता ग्रथपालांनीच (न मागता) प्रथम आणून दाखवली डॉ राधाकृष्णन्, गाधीजी, विनोबा, कालेलकर अशा बऱ्याच भारतीय तत्त्वज्ञाची व काही ललित साहित्याची, हिंदी कथा कादबऱ्या वगैरे बरीच पुस्तक दाखवली, आणखी इतरही बरीच पुस्तक नजरेत भरली इथे मात्र अभिमानाने मान

ताठ झाली! ह्या वाचनालयात दरवर्षी ६५,००० ग्रथाची भर पडत असते १,२९,००० नुसते नकाशेच आहेत ह्या खजिना सर्वांना सदैव खुला आहे टुरिस्टांना फक्त डिपॉझिट्वर व इतराना मोफत टुरिस्ट वाचकांना पत्ता नोंद करून पुस्तक मोफत न्यायला मिळतात पधरा दिवसाच्या मुदतीने जास्तीत जास्त आठ पुस्तक घरी न्यायला मिळतात अशी जुजबी चौकशी आम्ही करून घेतली

आत समोरच खिडकीवर रंगीत काच तुकड्याची डिझाइन्स, रंगाची ती चमत्कृतीपूर्ण सजावट लक्ष वेधून घेत होती हॉलच्या स्वच्छ फरशीवर उमटलेली आमची हालती चालती प्रतिबिब, ह्या लोकांची ही स्वच्छता, घासपूस, पॉलिश कुठे सपतच नाही म्हणायचं पायऱ्या उतरून खाली लॉन्वर आलो बाहेरच्या बाजूला तांब्याच्या एका मोठ्या अखंड तुकड्यात कोरलेल आणखी एक आगळं डिझाइन् - ज्ञानगंगेला नटवणारं कलासौंदर्य, बाहेरचं निसर्गरम्य वातावरण हे सारं ज्ञानतृषार्तांची तहान खासच वाढवणारं वाटल!

Royal Australiam Mint- ४,५७,००० पौंड खर्च करून बाधलेली ही टांकसाळ! खडकांतच पाया खणून काढून वर ही भरभक्कम इमारत उभी केली आहे काचेच्या मोठमोठ्या तावदानातून प्रेक्षकांनी इथलं नाणी पाडण्याचं काम पहाता येतं प्रत्येक विभागाची माहिती त्या विभागाच्या तावदानांवर लिहिलेली असल्यामुळे शातपणे ह्या सुरक्षित जागेची पहाणी करता येते दररोज एक लाख नाणी पाडणारी ही टांकसाळ आणखी २०.००० टन नाण्यांचा पुढच्या वर्षांकरता असलेला साठा बाळगून आहे हे सर्व बदिस्त रहाण्यासाठी ह्या तिजोरीचा नुसता दरवाजा बारा टन वजनाचा आहे। शिवाय धोक्याचा इशारा देणाऱ्या घंटा (Security-alarms) व रात्री मुद्दाम जळत ठेवलेले दिवे, दरवाज्याजवळ असलेले सशस्त्र पहारेकरी, इतक्या बंदिस्त प्रकाशांत नहात असलेली ही टाकसाळ शब्दश चांदीच्या पैशांचा पाऊस पाडीत असते राजधानीच हे एक आवश्यक अग पण आगळ आकर्षण तिच्यावर असलेला ह्या लक्ष्मीचा वरदहस्त काहीतरी आगळं दाखवतो ऑस्ट्रेलियनांच्या घाम गाळण्याचे हे मोल अमोलिक आहे खर!

दक्षिण गोलार्धातली, ऑबझर्व्हेटरी इथे आहे सैनिकी विद्यालय

बाधून झाल आहे नव्या घोडदौडीबरोबर जुन्याच जतन करण्यासाठी म्हणून १८४१ मधल प्रथम इथे आलेल्या वसाहतवाल्यानी बाधलेल जुन्या धाटणीच 'St John Church of England' इथं आहे तर १८७८ पासून १९६२ पर्यंत चालत असलेली Steam Engine ची जुनी गाडी ही एक प्रेक्षणीय वस्तू म्हणून इथे ठेवली आहे प्रवासी वकिलातींच्या इमारती मधे अमेरिकन वकिलातीची इमारत मात्र जास्त भपकेबाज वाटली इतर इमारतींत इटली, बेल्जियम्, मलेशिया, सिंगापूर, जपान, आपआपल्या बाधकामाचे नमुने दाखवीत विसावल्या आहेत भारतीय वकिलातीची इमारत अगदी साधी आणि थोडी अस्वच्छ वाटली अशा ४० वकिलाती आपआपल्या बाधकामाची वेगळी धाटणी दाखवत मोठमोठ्या आवारात, हिरवळीवर स्वत च्या देशाची निशाण फडकावत उभ्या राहून राजधानीतल्या राजकीय मानमरातबाचा वेगळा रग दाखवत आहेत'

आता आम्ही पार्लमेंट-हाऊसपाशी आलो त्या युद्ध-स्मारकाला अभिवादन करत उभी असलेली इमारत, केवळ त्याच वास्तूसाठी उभं केलेलं हे शहर! चार एकर जमिनीवर पसरून बाधलेला हा सरकारी दफ्तरखाना! अवघा पचेचाळीस फूट उच! त्यासमोर उभा केलेला हा पचमजॉर्जचा १४' ९'' इच उंचीचा पुतळा! ऑस्ट्रेलियाच्या राजनिष्ठेची निशाणी!

पायऱ्या चढून वर गेल्यांवर दर्शनीच मोठ राज-दालन (King's-Hall) म्हणून दिवाणखाना, समोरच ब्रिटिश राजकर्त्यांचे फोटो सध्याच्या मत्र्यांचा, विट्लॅम् साहेबांचा फोटो दोन बाजूला आपल्या राजधानीतल्या पार्लमेंट्सारखी लोकसभा, विधानसभेची दालन! इथेही ऑस्ट्रेलियन् लायब्ररीच्या पुस्तकाच प्रदर्शन माडलेल दिसल विशेष म्हणजे 'हाऊस ऑफ लॉर्डस्' आणि 'हाऊस ऑफ कॉमन्स्च्या' हॉलची अगदी सतरंज्या, गालिचे व खुर्च्यांची वेगळी रंगसंगतीची सजावट गहिरा तांबडा रंग सिनेट्साठी व हिरवा रग लोकप्रतिनिधींच्या हॉलसाठी हेही लंडनप्रमाणेच ठरवलेलं आहे ऑस्ट्रेलियातील बीन व काळ लाकूड ह्या सभागृहासाठी वापरलं आहे आपल्या सारख्या प्रेक्षकासाठी गॅलरीज् आहेत सगळ कसं चकाचक आहे १९२७ साली मेलबर्नहून कचेरी इथ आणली सहावे जॉर्ज यांच्या हस्ते उद्घाटन झाल्याचा फलकही

आहे

दुसरे दिवशी पार्लमेंटचं पहिलं सेशन् भरणार होत सर्व देशाच्या वकिलातीची मडळी, (ॲम्बॅसिडर्स) हजेरी लावायला, परस्परांशी ओळखदेख करून घ्यायला निमत्रित केले होते एवढ लाब आल्यासारखं हा समारंभ पाह्यचा योग आला हेही विशेषच! पार्लमेट हाऊसकडे बॅन्ड्चा आवाज झाला खूप गर्दी दिसली म्हणून आम्ही फुलाचे ताटवे भराभर ओलाडून दर्शनी दरवाज्याजवळ आलो समारभ आटोपून वकिलातीची मडळी बाहेर यायला लागली होती देशाच्या राष्ट्र-निशाणावरून, देश व वकिलाती लगेच समजत होत्या आपले भारतीय कमिशनर - ह्या मानमरातबात बाहेर पडणार, म्हणून गाडीच्या आपल्या राष्ट्रध्वजाकडे आमचं लक्ष होतं जपान, जर्मनी, चीन, इंडोनेशिया, थायलड वगैरे गाड्या एकानतर एक पुढे सरकत होत्या तसतशी भारताची गाडी पहाण्याची उत्सुकता वाढत होती गाडी गेटपाशी आली की ड्रायव्हर दरवाजा उघडत असत मग कमिशनर साहेब सपत्निक जणू त्या बॅन्ड्च्या तालावर पावल टाकत वरून खाली उतरून, इतमामाने गाडीत बसत श्री व सौ कृष्णमूर्ती येताहेत म्हणून मोठे डोळे करून आम्ही पहात होतो तिरगी ध्वजाची गाडी पुढे आली आमचा भारतीय पेहराव, माझी साडी बघून, लोक आमच्याकडे पहात असतील असं उगीचच वाटून आम्ही जरा ताठ न् शिस्तीत उभ राह्यलो पायऱ्यांजवळ गाडी थांबली, ड्रायव्हरन दार उघडल, साहेब गाडीत बसले अरे, ही गाडी, भारतातली 'ॲम्बॅसिडार' नव्हे म्हणजे परदेशी गाडीतून भारतीय वकील आले होते काय? प्रत्येक वकिलातीच्या स्वत च्या 'मेक'च्या गाड्या होत्या. न् मग आपली गाडी इथं का नाही? भारतात बाहेरची गाडी आणायला बदी आहे (मन्त्र्याच्या असतात ते सोडून) पण गाडी बाहेर न्यायला बदी आहे का? असं मनाला खटकलं - नव पहाण्याचा उत्साह क्षणभर मावळला

# गार्डन - सिटी-मेलबर्न - 'एक मयसभा'

सकाळचा नाश्ता घेऊन आम्ही कॅनबेरा सोडलं ६४४ किलोमिटर अंतर काटून दुपारी मेलबर्नला पोचायचं होतं सुहासच्या रजेचे दिवस पदरात पाडून घ्यायचे होते थंडगार हवा, दबकत दबकत येणारी कोवळी सूर्यकिरणं, लांबवर पसरलेला साफसुथर रस्ता गाडीची गती वाढवायला मदतच करत होता हां हां म्हणता मेलबर्नच्या 'हाय-वे'ला लागलो

सिग्नलपाशी थांबलेली गाड्यांची रांग पाहून मुंबईची आठवण झाली ट्रॅफिक-जॅम् झाला होता पण तोही शिस्तीत होता आडव्या रस्त्यावरून जाणारी ट्रॅम पाहिली अन् जुन्या गिरगावची आठवण झाली हळूहळू मेलबर्नचा तोंडावळा मुंबईसारखाच भासायला लागला आम्ही नेमके चारच्या सुमारास गावात शिरत होतो शाळा, इकडे ऑफिसेस् सुटण्याच्या आधी अर्धा तास सोडतात, मुलं झूम्-गर्दीत सापडू नयेत म्हणून चांगली वाटली कल्पना, अन् आवडली पण।

आशाच्या मैत्रिणीच्या घरी आलो, तर घरवालीचा शाळकरी मुलगा नुकताच घरी आला होता थंडीचं सावट जमून यायलं लागलं होतं पण नवं पाहण्याचा उत्साह - एवढ्या प्रवासानंतरही दुणावला होता स्वस्थ बसवेना, अंधार पडायच्या आत कॉलनीत चक्कर मारावी असं वाटलं पण कसचं काय, बाहेर बोबडी वळण्याइतकी हवा गार! डोक्यात वारं भरतं म्हणतात पण इथे पायात भरत होतं पाय जड झाले पण

पावसात पळत घर गाठाव तस आम्ही रनिंग करूनच घर गाठल काकडत कुडकुडत जेवण उरकली आणि विजेची ब्लँकेट खालीवर घेऊन झोपलो

मेलबर्न ही पहिली ऑस्ट्रेलियाची राजधानी तेव्हा रूबाब राजधानीचा होता इथे प्रेक्षणीय स्थळ बरीच होती दोन दिवसाच्या मुक्कामात सार उरकायच होत 'रात्र थोडी न् सोंग फार' म्हणतात ना अन् तशी थडीच्या कपड्यानी आमची सोंगं खरच सजली होती सूर्यमहाराजाच्या कृपेची अपेक्षा करत गाडीत बसलो कानटोपी सावरत War Memorial - युद्ध स्मारकाची मोठी ग्रीक बाधणीची इमारत वेगळ्याच वास्तुरचनेच सौंदर्य दाखवत होती २०० फूट उच असलेला इमारतीचा कळस, आणि भारतीय पद्धतीचा घुमटाचा आकार खाली प्रवेशद्वारातच पानाफुलाचं बनवलेलं पण खरं वेळ दाखवणार घड्याळ। काळाची गती दाखवणारे फुलांचे हे नाजूक काटे - केवढा विरोधाभास' फुलाचा फुलोरा, त्याना वाऱ्याने डोलायला लावणाऱ्या उच वृक्षाच्या हिरव्यागार फाद्या, अस हे निसर्ग-वैभव - ऑटम् - ऋतू मागे सारत थंडी येतानाही विलोभनीय दिसत खरच ते नेत्रसुख आम्हालाही मिळतंय

घड्याळापासून जवळच, मुख्य इमारतीच्या डाव्या अगाला मृत सैनिकाचं कलेवर खाद्यावरून आणणारे चार शिपाई आदरपूर्वक खाली माना घालून निघालेत, अशा पाच आकृतींचं एक भव्य स्मारक शिल्प मान उंच करून पहावं लागत होतं ह्या स्मारकाच्या पायथ्याशी एक चौथरा - मध्यभागी थोडी खोलात जळत ठेवलेली 'श्रद्धाज्योत' नतमस्तक करून त्या हुतात्म्याना आम्ही श्रद्धाजली वाहिली

मुख्य इमारतीत, तळमजल्यावर उतरून जायच होतं खाली उतरताच चौथऱ्यावर, पाठीला पाठ लावून उभे असलेले पितापुत्र' देशरक्षणासाठी कामी आलेल्या दोन पिढ्या। गेल्या दोन जागतिक युद्धातल्या योद्ध्याची ही निशाणी। आणि खालीच स्मृतिलेखावर 'Greatei love ates no man' प्रेमाची पूर्ण साक्ष देतंय! प्रत्येकजण त्याच प्रेमादराने लवून पुढे जात होता बाजूच्या भितीवरून योद्ध्यांची गौरवपदक, रिबन्स, इतर मानचिन्हं सर्व काही कोरलेलं पहिल्या मजल्यावर ११६००० ऑस्ट्रेलियन्स सैनिक, 'व्हिक्टोरिया-क्रॉम्म' मिळविलेले होते त्या योद्ध्याची गौरवगाथा, त्याच्या विधवा स्त्रियाची

नोंद प्रशस्तिपत्रकं सर्व व्यवस्थितपणे नोंदलेल होत अगदी वरच्या मजल्यावरून सर्व मेलबर्न शहर, क्रिकेटच भव्य पटागण 'यारा' नदीच रुद पात्र, दूरदूरच्या बागा, झाडाच्या गर्द सावलीतून वाहणारे लहान-मोठे रस्ते - आणि आकाशाला भिडणाऱ्या गगनचुंबी इमारती शहराच्या वाढत्या व्यापारविस्ताराची साक्ष पटवून देत होत्या पुन्हा वरून बाहेरच शिल्प-स्मारक, मृत सैनिकाचा चेहरा, गणवेषातले ते खाली माना घालून असलेले शिपाई, मन हेलावून टाकत होते Anzac Day ची परेड इथे मानवदना देऊन निघायची हे ठरलेलच! खाली हिरवळीवर उभं राहून ते 'बोटॅनिकल गार्डन'चं आवार, नजरेत मावत नव्हतं शब्दानीच दूरचं शिवार हिरवगार म्हणून कौतुक केलं बागेतल्या सर्वांत उंच टेकडीवर - वाऱ्याचे देऊळ - 'मरुत मदिर' बांधलेलं आहे मोकाट वाहणाऱ्या वाऱ्याला पकडून देवळात बदिस्त केलेल इथेच प्रथम पाह्यल हीही गोष्ट आम्हाला त्या झोंबऱ्या अन् गार वाऱ्यावरच सोडून द्यावी लागली. दीडलाख झाडांची रोपं, कलमं, त्या जाती व त्याची इतकी निगा राखणारे माळी धन्य आहे त्याची म्हणून भरपूर श्रेय देऊन निघालो

व्हिक्टोरियन - आर्ट सेटर - मेलबर्न हे व्हिक्टोरिया स्टेटच प्रमुख शहर म्हणून 'नॅशनल गॅलरी ऑफ आर्टस्'ची भव्य इमारत इथे बाधत आहेत १९६८ साली उद्घाटन झालेल ह्या इमारतीचं बांधकाम चालूच होत आतापर्यंत फक्त १३ लाख डॉलर्स खर्च झालेले आहेत १९७० मध्ये एक कलाविद्यालय इथेच चालू केल आहे ५०० फूट उचीचा दर्शनी भाग आणि पन्नास फूट उंच असलेला काचेचा दरवाजा! ह्या काचेवर आतल्या बाजूनी सारखं पाणी पडत असत पाणी कस पडतंय कुठून येतय ह्याचा पत्ता लागत नाही ओल कुठच कस नाही म्हणून हळूच काचेला हात लावून पाह्यला चमत्कार आहे बुवा काहीतरी महाभारतातली 'मयसभा' आठवली "प्रवेशपास काढून आणले चल ना आई" असं सुहासनं म्हटल्यावर तोंडाचा ऑऽऽऽ तसाच राहून चालायला लागलो जिना अजिबात नाही. मोठमोठ्या हॉलमध्ये, वस्तुसग्रहालयाचे विभाग, त्यांचे बोर्डस्, आतली शेल्फ सगळ काचेच्याच कपाटातून माडलेलं पुन्हा पुन्हा दिसणारी मागच्या आरशातली प्रतिबिंबं नजरेला भूल पाडत होती मागपुढ परत परत आपलेच चेहरे दिसत

भारतातल पाचू,हिरे, खडे बसवलेलं मयूर सिंहासन, तो कोहिनूर हिरा, आमच्या वैभवाची साक्ष होती मयूर-सिंहासनही आमचं गेल अन् तो कोहिनूर हिरा जेत्याच्या मुगुटात चमकावा? मयसभेत हिंडताना दुर्योधनाचा सताप झाला मोत्यागणिक राक्षस निघावा तस ती काचेगणिक प्रतिबिंब, पाहून हे काहीतरी वेगळंच समीकरण होऊन डोक वेगळ्याच संभ्रमचक्रात अडकत होतं. आता 'काप गेले न् भोक राह्यलीत' म्हणा! आमची आजी म्हणायची, "सोन-रूपं गेलं, तांब-पितळ गेल, खरं शाश्वत काही राह्यलंच नाही आता काचेच्या भाड्यातला ससार तुमचा --" हो पण ही काचेची किमया तिला कुठ पाह्यला मिळाली होती!

"बर का आई," सुहास मधून मला जागा करत असे "ह्या काचेच्या डोलाऱ्याखाली बाराशे गाड्या पार्क करण्याची सोय केली आहे" साडेसात एकर जमिनीवर चाललेला हा कलाविलास। ह्याच्या उत्तरेकडे तीन तळमजले, एक नाट्यगृह, एक ऑपेरा हाऊस, Consert Hall, एक लेक्चर हॉल बांधले जाणार आहेत रस्त्याच्या खाली ४८० फूट उंच तीन मजली इमारत होणार आहे रेस्टॉरंट, स्टोअर्स, ऑफिसेस् बांधण्यासाठी आणखी ७०,००० डॉलर्स लागतील असं वाटतय् "लागू द्यात"

आपल्या नव्या देशाच हे कलावैभव काचेचं-वास्तुशिल्प जगाच्या नजरेत भराव हेवा वाटावा, असं व्हाव ही सुप्त इच्छा त्यामागे आहेच। डॉलर्सचे रुपये करण्याच मी सोडून दिल गणित कच्च न् आकडे झेपलेही नसते ह्या आर्ट-सेन्टरच्या बरोबर समोर सातव्या किंग एडवर्डच स्मारक आहे स्मारकासमोरच हिरवळीवर मोठ तीस फूट परिघाचं घड्याळ ह्या फुलाच्या घड्याळात सातशे प्रकारची झाडाची पान-फुलं आहेत हे घड्याळ टाऊन्-हॉलच्या घड्याळाबरोबर चालतंय जवळच विद्युत उपकरणांच कपाट आहे बटन दाबल की रेकॉर्ड लागते बिजलीबाई विद्युतघड्याळाची संपूर्ण माहिती देत असतात बागेतल्या पाहण्यासारख्या विशेष वृक्ष-वल्लरींची माहिती, फुलाची नावासहित ओळख करून देतात ही विजेच्या कळीची किमया आणि नियमबद्ध केलेली पानफुलाची रोषणाई! छे. पण आता लक्ष लागेना. पोटाचं घड्याळ जास्त जोरात ठोके द्यायला लागल होतं विजेच्या कळीशिवाय!

'कुमा हाऊस'कडे आलो १८०० सालातलं व्हिक्टोरिया राणीच्या वेळचं एक जुनं घर त्या काळातली घराची बांधणी, राहण्याची पद्धत, ते कपडे, वेगवेगळ्या पद्धतीची फरशाची जमीन, वॉश-बेसीन् नव्हती म्हणून वापरली जाणारी तसराळी, रॉकेलचे दिवे, जुन फर्निचर (पॉलीश केलेल) फ्रेंच आरसे, वेगवेगळ्या देशातल्या उत्तम उत्तम लाकडापासूनच्या केलेल्या वस्तू पण आता Out of fashion झालेल्या, इतकंच! तबेल्यात घोडा-गाडी, बग्गी, तर स्वयपाकघरातला पाटा वरवटा, खलबत्ता सुद्धा होता जुनं जतन केल्याशिवाय इतिहासाची साक्ष कशी देणार? आम्हाला त्यात विशेष काही वाटल नाही

चहाची वेळ झाली होती असच पुढं जाऊन Spring-Vale' उपनगरातल वाचनालय पहायच होत सौ प्रमिलाबाई दातार, एक महाराष्ट्रीयन बाई वाचनालयाच्या प्रमुख कॅटलॉगर होत्या त्यांच्या वेळेला आम्ही वाचनालयाशी पोचलो आपलं माणूस भेटल्याचा आनद दोघींना झाला लगेच त्यानी ग्रथालय, छोट्या शिशुविभागापासून ते ऑफिसपर्यंत दाखवलं वाचनालयातली व्यवस्थित ग्रथ मांडणी पाहून पुस्तकं चाळण्याचा मोह होत होता कान माहिती ऐकत होते पण वाचनालयाची वेळ संपत आली प्रमिलाबाईंच्या घरी जाऊन चहा पोहे खायचे होते दिवस लहान होत चाललाय, हे लक्षात धराव लागत होत. पुन्हा भेटीचं आश्वासन देऊन निघालो

वीस एक मैलावर उंच असलेल्या 'डॅंडीनॉंग' टेकडीवर जायचं होत दोन हजार फूट उच असलेली टेकडी वळसे वळणं घेत, गोल गोल फिरत वरती गेलो वरून दिसणारे झाडीतले नागमोडी रस्ते मार्गदर्शक फलक, दिव्याचा काजव्यासारखा होणारा लुकलुकाट पहायला गमत वाटत होती टेकडीच्या माथ्यावर गोलाकार बांधलेल काचाच्या भिंतींच रेस्टॉरंट पहायचं होतं थंडीनं गारठत चाललेलं मेलबर्न आपण उबेत बसून पहावं असा बेत होता पण इकडे आमच्याबरोबर टेकडीवर चढलेला सूर्य पटकन् खाली जाणार होता दोन मिनिटाच्या अवधीत त्याला कॅमेऱ्यात पकडायचा, अशी थोडी आमची धादल उडाली होती एवढ्यात रेस्टॉरंट बद करून मॅनेजरसाहेब खाली उतरलेही गरम कॉफीची आशा सोडून पोटातली ऊब कवटाळत आम्ही डॅंडीनॉंग टेकडीला रामराम

केला

मेलबर्न हे व्हिक्टोरिया स्टेटच्या राजधानीचं शहर। १८८३ मध्ये पहिली मेलबर्न युनिव्हर्सिटी निघाली प्रसिद्ध 'मोनॅश' युनिव्हर्सिटी इथलीच। विद्यापीठाच्या आवारात सर्व शैक्षणिक विभाग, कला - विज्ञान शास्त्रांच्या अध्ययनाच्या सर्व शाखा विशेष बुद्धीची मुल, सरकारी स्कॉलरशिप्स् बरच इथे शिक्षण घेतात शाळेच शिक्षण मोफत पण सक्तीचं आहे त्यामुळे अनपढ वा अगठाबहाद्दर इथे कोणी नाही मॅट्रिक झाल नाही तरी नोकरीविषयकच्या कामाच वर्षा-दोनवर्षाच शिक्षण घेऊन मुल नोकरी मिळवतात त्यामुळे कामामध्ये पूर्णता, त्याची कार्यक्षमता दिसून येते कुणीही उठाव, कोणतही काम करावं, 'हम सब कुछ करता है' म्हणून चालणार नाही इथे हे तंत्र-शिक्षणाच बाळकडू दिल्यामुळ प्रत्येक घटक आपल काम शिस्तीत व चागलच करतो मालाचा दर्जा उचावतो आणि देशाचा पण।

मोनॅश युनिव्हर्सिटीच्या आवारातच विद्यार्थ्यांच्या मोटारी उभ्या करण्याचा स्टॅंड पाह्यला विद्यार्थिदशेतलं मुलाचं हे ऐश्वर्य पाहून आश्चर्य वाटलं पुण्यातल्या कॉलेजचे सायकल-स्टॅंड आठवले ह्यांच्या ऐश्वर्याची तुलनाच करता येणार नाही पण इथे दारिद्र्याची व्याख्या वेगळीच आहे The poor are those who are fed, clothed and housed at a standard considerably below the normal for an Australian Citizen सेंट्रल हिटींग व स्विमिंग पूल हे अजून चैनीच आहे अस मानतात


आपली स्वत ची छोटी घरं, नवी नवी जोडपीसुद्धा घेऊ शकतात रहायला जागा मिळाली तर लग्न हा प्रश्न इथे नाही उलट घरापुढे छोटी बाग, मागच्या अंगणात फळझाड, त्याची देखभाल ही मंडळी आपल्या तरुण वयात हौशीउमेदीने करतात घरात सर्व विजेची उपकरणे T V, मोटर सर्व, सरकारी कर्जावर Live now and pay later ह्या ह्यांच्या आर्थिक कोष्टकावर घेतात जगण्याचा आनंद मिळवण्याचं हे चांगल तत्त्वज्ञान आहे

ह्या आखीव मेलबर्नमध्ये, आठ कॉलेजेस, मोठी Royal Melbourne Institute आहे विद्येच माहेरघर असलेल्या ह्या मेलबर्नमध्ये खेळाडूंची पण वाण नाही उत्तम खेळ हा एक अभ्यासाचा विषय आहे

'अभ्यास करा' हा मुलामागे अभ्यासाचा धोसरा नाही. खेळात पुढं येणारा, नाव कमावणारा मुलगा मठ्ठ समजला जात नाही. देशाचं नाव राखायला खेळाडूंची मदत होतेच फुटबॉल, सॉकर, रग्बी, ह्या खेळात ते अग्रेसर आहेत कितीक वेळा इथल्या खेळाडूंनी विम्बल्डन्ची चॅम्पियनशीप मिळवली आहे

विविध विषयाच्या अभ्यासाला उत्तम ग्रथालयाची जोड आहे ११ लाख डॉलर्स ह्या इथल्या ग्रथालयावर खर्च केलेले आहेत ६६५ शाळांतून ग्रथालय आहेत बाहेरची मोफत, खेडेगावातली फिरती वाचनालय वेगळीच।

असं हे मेलबर्न, मेलबर्नची ही शैक्षणिक प्रगती हा औद्योगिक विस्तार देशाचं भवितव्य खासच उजळून टाकणारं आहे



# माऊंट गॅम्बीयर, एक निसर्ग चमत्कार

साऊथ ऑस्ट्रेलियातलं मोठ्या टेकडीचं एक छोटं गाव मेलबर्नहून ॲडिलेड्ला जायला निघालो मोटरनं प्रवास केला की देशाचा ग्रामीण परिसर जवळून पाह्यला मिळतो हवं त्या खेड्याशी थांबावं, दूरवर पसरलेली शेळ्यांची कुरण, गलेलठ्ठ शेळ्यामेंढ्या, ती राखणदार कुत्र्यांची मूक करामत पहावी भुकून गाईंना गोठ्यात घालणारी कुत्र्याची दुसरी जात - १२०० फूट उचीवरच्या टेकडीवर गेलेल्या शेळ्या, भुंकणारा कुत्रा, आपल्या भुंकण्याने त्यांना घाबरवून टाकेल कोकरं खाली पडतील, म्हणून ह्या कुत्र्याची नेमणूक फक्त गुरांसाठी, घोड्यांसाठी केलेली - ती मजा पहावी हो, म्हैस मात्र अजिबात दिसली नाही पण ह्या धष्टपुष्ट गाई पाहून मन प्रसन्न व्हायचं उत्तम चीज (cheese) तयार करून निर्यात करणाऱ्या ऑस्ट्रेलियन लोकांची ही धनदौलत!

इतकुसं खेडं असल तरी शेतकऱ्याच्या घरी T V असणार, झोपडीच्या भोवती बाग, दाराशी गुलाबाचे ताटवे असणार गरम पाण्याचे नळ, गॅस, सगळ्या सुखसोई शहरांइतक्याच म्हटल तरी चालेल येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूबद्दल आस्था बाळगणारा शेतकरी पाह्यला की ' कोण पावण कुण्या गावच ?
हंथरलं कांबळ, बसा वाइच'' - कवी यशवंतांच्या ह्या ओळी इथ आठवल्या ऑस्ट्रेलियन माणूस कुठेही भेटला तर Hi म्हणणार, "What

can I do for you?" विचारणार

दिवेलागणीला आम्ही गावात शिरत होतो सगळीकडे जरा शुकशुकाट झाला होता दाट झाडी, वाढत्या काळोखाचा किर्रऽपणा दाखवायला लागली होती थडीची पांघरूणं घेऊन गाव चिडीचुप झालं वाटतं तेवढ्यात कॅरव्हॅन स्टॅन्ड दृष्टीस पडला असे कॅरव्हॅन (प्रवासी घरकुल) डबे इथे भाड्याने मिळतात "बघितलत दादा, हा कॅरव्हॉन स्टँड, प्रवाशासाठी आरामशीर हॉटेल्स आहेतच पण तेवढे पैसे द्यायला नको असले तर मोटेल्स, तेही परवडणार नसेल, तर स्वत च्या गाडीला जोडून नेता येणारा हा प्रवासी डबा! इथे रोजचा चार्ज देऊन कॅरव्हॉन भाड्याने पण मिळते" सुहास सागत होता

परदेशातली ही आधुनिक सुख-साधनं आम्हांला पाहृला मिळावी म्हणून सुहासने प्रवासाची वाहनाची, राहण्याची, सोय-आखणी व्यवस्थित ठरवून ठेवलीय

आम्ही कॅरव्हॅन कंपौंडमध्ये गाडी पार्क केली व एक कॅरव्हॅन ठरवून घेतली लगेच इलेक्ट्रिक कनेक्शन जोडून देतात ही प्रवासी खोली उजळून निघते दिव्यांनी! १ खोलीचा ब्लॉकच म्हणायला हव फ्रीज, छोटासा गॅस, डायनिंग टेबल कम् बेड, आवश्यक असलेली भाडी, प्लेटस्, काटेचमचे, किती आटोपशीर ससार माडता येईल? आणि काय आपण पसारा घालतो, मनात आल कॅरव्हॅन- मोठ्या किचनमध्ये जाऊन दूध आणलं व आमची जेवणाखाण्याची सोय उत्तम झाली

गॅम्बीअर हे क्रेटर-लेकस्‌साठी प्रसिद्ध आहे ती पहाण्याची उत्सुकता होती उजाडल्याशिवाय लेकस्‌चा चमत्कार दिसणार नव्हता कॅरव्हॅनच्या डब्याचे गोडवे गात, डायनिंग टेबलाचा बिछाना करून घेतला "ही क्रेटर-लेकस् कशी फॉर्म झाली असतील रे?" मी विचारलं पण ड्रायव्हिंग करून दमलेला सुहास उत्तर तोंडात ठेवूनच झोपला वाटत!

पृथ्वीच्या पोटातून उद्रेक होऊन बाहेर लाव्हारस येतो काय, आणि त्याच ठिकाणी पुन्हा पाण्याने ती पोकळी भरून जाते काय? धरणीकप झाला की आजी म्हणायची, "शेषराजान डोक हालवलं बरं का, पृथ्वीवर झालेल्या पापकर्माच ओझं त्याला सहन होत नाही पहा" त्याची आठवण आली आम्हाला थोडा भूगोल कळायला लागला पण साध्या साध्या

गोष्टीतूनही, भोळी वेडसर असलेली, कोवळी मन, धार्मिक श्रद्धा, सदाचारच शिकत नव्हती का? मनाला पाय नाही म्हणतात पण (कल्पनेनी) आठवणीच्या परखाला पकडून क्षणात ते भारतात जाऊन आल मग केव्हा झोपेच्या कुशीत विसावल कोण जाणे!

रामप्रहरीच चहा उरकला न् सूर्योदयाच्या आधीच आम्ही क्रेटर लेकच्या काठाशी येऊन उभ राहिलो मळभ आलं होत ढगाशी लपडाव करत सूर्य किंचित बाहेर आला आणि खालच्या लेकचा पाण्याचा रग लगेच डोळ्यात भरला त्या निळ्या तळ्याचं पाणी ६०० फूट खोल आहे कडेच्या भिंतीची उची २७५ फूट आहे इथल पाणी वर्षातून दोनवेळा रंग बदलतं एकदा उन्हाळ्यात, एकदा थंडीत असा निळा रग नोव्हेंबर ते मार्च असतो नंतर स्लेटपाटीसारखा करडा-राखी रग पुन्हा मार्च ते नोव्हेंबरपर्यंत राहतो 'पानी तेरा रग कैसा, जिसमे मिलावें वैसा' ही म्हण इथं खोटी ठरेल ऋतुमानाप्रमाणे झाडापानाची बदलती रूपं पाह्यला मिळतात पण पाण्याचा बदलता रग हा एक निसर्ग-चमत्कारच म्हणावा लागेल अशी चार मोठी छोटी तळी हे माऊट गॅम्बीयरचं भूषण आहे

लेकस् पाहून प्रवास पुढे चालू केला "आता आणखी एक गमत पहा हं!" सुहास म्हणाला "खरंच फार छान आहेत इथल्या टटूला केव्हस" आशाने साथ दिली असं बोलत असतानाच ही मोठी Tantoola Caves ची पाटी दिसली माऊंट गॅम्बीयरच्या जवळच ह्या गुहा आहेत हा दुसरा निसर्ग-चमत्कार!

पृथ्वीच्या पोटातून पाणी वर आलंय हे आपण मानतो पण तसं ते खाली गुहेतून झिरपतंही म्हणे, डोंगराच्या खाली तळी तयार होतात बर्फ वितळून डोंगराखालून नद्या वहायला लागतात पण इथे वर गुहेच्या पृष्ठभागावर पाणी दिसत नाही अन् थेंब-थेंब झिरपणाऱ्या पाण्याच खाली तळही होत नाही

पृथ्वीच्या पोटात वा त्या डोंगराच्या कुशीतल पाणी झिरपून थेंबाथेंबानीं खाली जात व त्याच्या ह्या खालच्या गुहेत, लटकणाऱ्या नळ्या बनून राहिल्यात कॅल्शियम-क्लोराइड व कॅल्शियम हायड्रो-ऑक्साइड ह्या पाण्यातल्या रासायनिक द्रव्यामुळे ह्या नळ्या

बनतात हाताने नळीवर टिचकी मारली तर लोखंडाच्या नळीसारखा खणण् आवाज येतो काळ्या अंधाऱ्या गुहेतल्या ह्या नळ्या पांढऱ्या दुधी रंगामुळे चमकत होत्या गुहेतल्या ह्या ट्यूब-लाईटस् म्हणायच्या असं आम्ही एकमेकांशी बोलत होतो तोच गुहाधिकाऱ्यानी एक बटन दाबलं नळ्या वेगवेगळ्या रंगांनी चमकू लागल्या काही नळ्या जमिनीपर्यंत येऊन चिकटल्या होत्या आकाशात ढगाचे जसे आकार बदलावे तसे आकार नळ्यावर प्रकाश पाडल्यावर दिसत होते जमिनीला टेकलेल्या नळ्या एके ठिकाणी, उमललेल्या फुलाप्रमाणे दिसल्या कुठे त्या नळ्यांना चेहऱ्याचा आकार भासमान होत होता क्षणात दुसऱ्या रंगाचा प्रकाश त्याने टाकला स्टेजवरच्या सजावटीवर मागून लाइट सोडावा, नाचणाऱ्या मुलींच्या पेहरावाचा रंग चटकन् बदलून जावा तसंच हे ही निसर्गनिर्मित पाण्याच्या थेंबाथेंबानं केलेली किमया पुन्हा वेगळ्या रंगाचा खेळ - बदलते प्रकाश-रंग गुहेत भरून असेच राह्यले तर!! दिवे गेले त्या चमत्कारिक नळ्या तशाच लटकत सोडून आम्ही वाकूनच, त्या छोट्या डोंगर दरवाज्यातून हळूहळू चाचपडत बाहेर आलो



# किरिस्ताँवांची देवळं

टंटूला केव्हज् पाहून आम्ही जे निघालो, ते थेट ॲड्लेडला, आमच्या घरी १२॥ वाजता येऊन सुखरूप पोचलो सुहास- आशाला कामाचे वेध लागले होते रजा संपलीय! भारत सोडून आम्हालाही बरेच दिवस झालेत मन भारतातून येणाऱ्या पत्रांची वाट पहायला लागलंय

ह्या श्रीमंत देशात पण संपाचे वारे वाहायला लागलेत पोस्टाचे लोक जादा काम सक्तीच झालं तर करणार नाहीत, खुशीने ते ओव्हरटाईम करायला तयार आहेत अन् ते खुशीत असले तर सिडनीला येऊन पडलेलं टपाल इकडे येईल, मग आम्हांला घरची खुशाली कळेल

अशा वेळेस देवाची आठवण होते म्हणतात ना, तसं माझं चर्चकडे लक्ष गेलय ॲडलेड ही दक्षिण ऑस्ट्रेलियाची राजधानी न् देवाची पण! 'ADELAIDE is known for Churches' क्षेत्राच्या ठिकाणी कशी देवळच देवळं असतात ना, (आता भारतात सगळीकडच देवळ वाढलीत!) रामाच, अंबाबाईच, दत्ताचं, व्यंकटरमणाचं, वेशीबाहेरचा मारुती आहेच! तशी इथे चर्चेस! 'Queen of England' चे चर्च पहिल, प्रथम ब्रिटिश इथे आले तेव्हा त्यानी बांधलं मग कॅथॉलिक्स, प्रॉटेस्टटस् हे दोन मुख्य पंथ व त्यांची देवळ झाली मग पंथ, उपपंथ किती व्हावेत? मेथॉडिस्ट, बाप्टीस्ट, पेस्ब्रेटेरियन, ग्रीक ऑर्थडॉक्स, ल्यूथेरियन्स, ॲगलीकन्स - यादी लांबत जातीय सुधारणामतवादी लोकात पण हा धर्म-गोंधळ आहेच

म्हणायचा Church of Christ वेगळेच! इथेही धर्म-स्वातंत्र्य आहे पण जास्त लोक १०,२०५,००० अँगलिकन्स तर २३६,००० ख्रिश्चन्स, पण ते कुठलाच पथ मानणारे नाहीत।

मी आजोबाबरोबर फिरायला जात होते (त्याची आठवण झाली) पौषातली थंडी म्हणून थडीचा दारूगोळा, पुरा भरून घेतला होता स्वेटर, पायमोजे, बूट, मफलर' पहाटेची झुंजूमुंजूची वेळ, गीतेचा श्लोक आजोबा समजावून सागत होते "काय समजल का कमाबाई?" असं ते मधून विचारायचे डोक्याभोवती गुडाळलेल्या मफलरमधून, ज्ञान कितीसे वरपर्यंत पोचत होते कोण जाणे' पण मायेच्या उबेन काही थोडे कण चिकटून राह्यलेत तेवढेच! शाळकरी माझं वय तेव्हा, मधेच एकदम उच दगडी इमारतीचं चिचोळ शिखर व त्यावरची मोठी फुली दिसली "आजोबा, हे हो काय? फुली कसली काढलीय वर?' मी विचारल

"अगं, अशी चिंचोळ्या शिखराची, वर फुली असलेली सगळी किरिस्तांवांची देवळं त्याच्या येशूची खूण आहे ती" ते म्हणाले ब्रिटिशाचं राज्य होतं तेव्हा त्याचा ख्रिश्चन धर्म प्रत्येकाने स्वीकारावा म्हणून मिशनरी बायका, लाब बाह्याची पांढरी पोलकी, रुंद काठाची आपल्याकडची लुगडी नेसून घराघरातून, चाळीचाळींतून जात असत केव्हा केव्हा गोरी मड्डमही त्याच्याबरोबर यायची मग आमचा मुलींचा घोळका त्यांच्यामागे असायचा, "तुमचा किम्न आणि आमचा ख्रिस्त - सारखेच आहेत बगा" त्याच पुराण सुरू व्हायचं गोऱ्या, निळ्या डोळ्याच्या, लाल ओठांच्या बाईकडे आम्ही पहात उभं राह्यचं मग एकदम, 'पिशवीत घालून त्या तुम्हाला घेऊन जातील बरं का' अस घरी सागितलेलं आठवायच आम्ही तेथून पळ काढायचो आता इथे, (ऑस्ट्रेलियात) फुलीची देवळं मी सारखी पहातीय त्यांचा येशू त्याच्या चर्चमध्ये जाऊन पाह्यचाय। मिसेस् कॉलीन्स बरोबर एकदा गेले

आम्ही मेथॉडिस्ट चर्चमध्ये गेलो आपल्यासारखे, तिन्ही-त्रिकाळ पूजा नाही व भक्ताची दाटी पण नाही चर्चच्या सभोवार स्वच्छ हिरवगार लॉन कडेला हारीने लावलेली नाजूक नाजूक फुलाची किनार हिरवा रंग गारसा डोळ्याला आल्हादकारक वाटत होता मन कस देवळात जायला प्रसन्न झाल होत

मुख्य आणि भव्य अशा दरवाजातून आम्ही आत गेलो गेल्यागेल्याच दोन्ही बाजूंची शाळेसारखी डेस्कस्, साधं पण पॉलिश्ड फर्निचर, स्वच्छता उजळून टाकत होत दरवाज्याच्या अगदी समोर, गुडघ्याइतक्या उचीच स्टेज, मध्यभागी ब्राँझचा जीझस्चा फासावर देतात त्या, हात फळीला बाधून खिळे ठोकलेल्या स्थितीतला पुतळा मागच्या भितीवर मोठी फुली - चकचकीत पितळेची केलेली! चर्चच्या शिखरावरच्या फुलीचं मर्म आता समजल क्रॉसच्या दोन्ही बाजूला - मेणबत्तींची उंच अडकवलेली स्टॅन्डची घर त्यात पिळाच्या डिझाइनच्या मेणबत्त्या धर्मगुरूचा, पोथी उभ राहून सागण्याचा स्टॅन्ड। त्यावर दिवा माईकची व्यवस्था

स्टेजवरच अर्धा कठडा, त्यात छोटे ग्लास अडकवता यावे म्हणून भोकाची पट्टी होती "हे काय गं?" कॉलीन्सला विचारले

"स्पेशल प्रेअर नतर, विशेषत दफनविधीनतर, आप्तेष्ट, मित्रमडळी- 'मृतात्म्यास शांती लाभो' म्हणून प्रार्थनेला जमतात, गुडघे टेकून बसायच, डोळे मिटून एकाग्रतेने प्रार्थना, धर्मगुरू सागतात तीच म्हणायची प्रार्थनेनंतर ह्या छोट्या ग्लासातून वाईन घ्यायची "For the departed souls, to rest in heaven" - तीर्थच म्हणायच हे चमचा दोन चमचे वाइन राहील इतकुसे ग्लास होते ते पुन्हा स्टॅन्डवरच्या पट्टीत अडकावून ठेवायचे आपल्यासारख तळहातावर तीर्थ घेऊन थोड प्यायचं थोड डोळ्याला लावायचं पुन्हा शिंतोडे अंगावर उडवून घ्यायचे हा प्रकार इकडं नाही जीझसला पचामृती-स्नान कुठाय म्हणा इथं? मनातली चक्र फिरत होतीच

ह्या स्टेजच्या खाली, उजव्या बाजूला, एक लाकडी स्टॅन्ड त्यावर तसराळ्यासारख पाण्याच भांडं, स्वच्छ फडक्यान झाकलेल नाव ठेवण्याचा Christening ceremony इथे व्हायचा कपड्यात गुंडाळून आई बाळाला घेऊन येते तिन पुतळ्याकडे तोंड करून उभ राह्यच धर्मगुरू, तसराळ्यातलं मंत्र म्हणून भरलेल, मंतरलेल पाणी बाळाच्या अगावर हात फिरवून बाळाच्या डोळ्याना जपून लावतो 'आयुरारोग्य लाभो' असा त्याच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देतो नतर नाव जाहीर करतात अस बारस होऊन बाळाचं नाव, सरकारी कागदोपत्री लागतं

केरळीय लोक, मुलाची उष्टावण देवळात करतात ते दक्षिणी संगीताचे सूरसुद्धा कानात पडताहेत, असा भास इथ झाला इथे मात्र सर्व विधी शातपणे व्हायचे अगदी लग्नसुद्धा! स्वच्छता आणि शातता पवित्रतेचं, श्रद्धेच वेगळच वलय निर्माण करतात, अस जाणवलं.

देवाच्या अगावर फुलांच्या माळा नाहीत की पायावर फूल वाहण्याचा प्रघात नाही "एवढी सुरेख फुल तुमच्याकडे, अन् हार करीत नाहीत आमच्याकडे सुदर सुदर हार करतो आम्ही" मी न राहवून सांगितल "आमच्याकडे, रविवारी प्रार्थनेच्या दिवशी फुलांचे छान छान फ्लॉवर पॉटस् भरतात हे काम आम्ही कमिटीमेंबर्सच करतो देवळाची साफसफाई रोजची! हीच मंडळी झाडलोटीची कामं करतात" कॉलीन्स म्हणाली नोकरवर्ग, सेवेकरी हा प्रकार इकडे नाहीच

आम्ही वरच्या हॉलमध्ये गेलो धर्मग्रंथाची भरलेली कपाट शेजारीच मोठा पिआनो ठेवलेला प्रार्थनेला सगीताची साथ असते संगीत, वाद्य, वादन ह्यामुळे नवी तरुण पिढी चर्चमध्ये येते असं कॉलीन्सचं म्हणणं वरूनच तिन Confession साठी बसायची जागा दाखवली इथे बसून जीझसच्या पुढे आपल्या पापकृत्याची कबुली द्यायची असते. पोप आतल्या बाजूला बसतो, त्याला त्या पापी माणसाचे फक्त शब्द ऐकू येतात माणूस दिसलाच पाहिजे अस नाही तरीसुद्धा ते एक सिक्रेट म्हणून त्या पापी माणसाचं कथन पोप आपल्याजवळ ठेवतो कोर्टातसुद्धा हे गुपित सागायला हव अशी पोपवर सक्ती नाही एखादा माणूस पोपकडून माफी घेऊन मोकळा होतो माणसाच्या मनाला लागलेली ही पापकृत्याची टोचणी ह्या Confession मुळे कमी होत असेल नाही? नुसत्या गगास्नानापेक्षा! मनात तुलना झालीय

"ह्यापेक्षा मोठमोठी भव्य चर्चेस आहेत अन् त्यांचं कार्यही तस वाखाणण्यासारख आहे आमच्या चर्चमधून 'चॅरिटी-वर्क' सारख चालत ह्या नव्या देशात शाळा, हॉस्पिटल्स ह्याना चर्चच्या फडातून पैसा पुरवला जातो मिशनरी-काम करणारी मडळी खूप आहेत जेव्हा 'क्वीन ऑफ इग्लडचं' चर्चही बाधलेल नव्हतं झाडाखाली जमून प्रार्थना करणाऱ्या मडळींनी फड जमवून, पहिली मदत भारतातल्या दुष्काळग्रस्ताना पाठवली." अस कॉलीन्सन सागितलं

"हो का? छान " म्हणून मी आभारपूर्ण नजरेने तिच्याकडे पाहिल ख्रिश्चन मंडळींनी पाळलेली ही धर्मबंधन व जनता- जनार्दनाची सेवा करण्याची, त्याची 'मिशनरी-कळकळ' वाखाणण्यासारखी आहे कामाची कळकळ अशी पाहिजे नुसत कर्मकांडाचं स्तोम नाही

भारतातही गोव्याला अशी किरिस्तॉवाची देवळ खूप आहेत ख्रिश्चन धर्माचा अभ्यास आणि प्रचारकार्याची दीक्षा देणारी विद्यापीठं आहेत आमची धर्मपीठ काशीला आहेत संस्कृत वेद-विद्या-पठणासाठी वेगळी ज्ञानपीठ आहेत अशी माहिती, मी पण मिसेस् कॉलीन्सला देत होते

मला जास्त पटल, आवडल, तो ह्यांच्या देवळातला साधेपणा सोन्यामोत्यानी हिऱ्यामाणकानी मढवलेल्या मूर्ती नाहीत चांदीचे दरवाजे असलेल्या मंदिराच्या इमारती नाहीत, तरी कलात्मक सौंदर्य भरपूर आहे चर्च मोठ असो अगर छोट, स्वच्छता हीच मंदिराची संपत्ती, शांती हाच मंदिराचा कळस आणि ही जीझसची कुलीन, साकार झालेली मूर्ती, हेच उच्च त्यागाच ध्येयनिष्ठेचं प्रतीक! ध्यानधारणेला गिरिकुटीरात जायची गरजच नाही इतक शांत हे आवार! हा खुला गाभारा!

आपल्या पद्धतीन हात जोडून मी नमस्कार केला कॉलीन्सने तिच्या पद्धतीन! हातात हात घालून आम्ही दोघी चर्चच्या बाहेर आलो आत्म्याची एकात्मता इथं जाणवली!



# प्रेरणा देणारी धर्ममंदिरं

कालच सेन्ट्रल -मिशनचं 'मॉगहन चर्च' पाह्यलं आता ह्यांचा चातुर्मास म्हणजे ख्रिसमसचा महिना डिसेंबर. टी व्ही वर दोन वेळा प्रार्थना, बायबल वाचन त्याच्या टेन कमांडमेंडस्‌ची रोज उजळणी रविवारी खास गुरूकडून प्रवचन सप्त्याला आपल्याकडे वयोवृद्ध मंडळी बसतात ना त्याची आठवण होतीय नियमित चाललेली ही शिस्तबद्ध प्रवचनं, संगीताची साथ, सुरात प्रार्थना म्हणणारी ती शाळकरी मुलांची पहिली रांग पाह्यला कस बरं वाटतय नाही तरी आपल्याव भक्तिगीताचा टेप लावून ऐकायच्या व भारतात असल्याच्या कल्पनेतच समाधान मानायच

समाधान कसलं ते उलट भारताचाच सारखा विचार करत राहून इथ राहण्याचा व नवं पाहण्याची संधी व आनंद आपण गमावून बसतो अस वाटायला लागतं

धर्म म्हणजे तरी काय? काही बोधवचनं, तत्त्वावर उभारलेला समाज जी तत्त्व, जे सुविचार अनंतकाल समाजाला सुखावह होतील समाजाला उचलून धरेल समाजाची उन्नती करेल तो धर्म कालमान, विज्ञान ह्यांच्या प्रगतीने माणसाच्या राहाणीत सुधारणा होतील पण जोपर्यंत माणसाच्या प्रवृत्ती, त्याचे षड्‌रिपू, मायापाश सगळे एकच आहे तोपर्यंत सर्व धर्मांची शिकवण एकच आहे इस्लाम धर्मसुद्धा सांगतो,

"तुमची कर्तव्य पार पाडा, कुटुंबासाठी त्याग करा" कोणताच धर्म, पंथ वाईट मार्गाचा अवलंब करायला सांगत नाही

आम्ही आमचा हिंदुधर्म श्रेष्ठ म्हणतो पण धर्मबंधन डावलून रूढीच स्तोम माजवून अंधश्रद्धेला खतपाणी घालतोय आपला गणेशोत्सव आठवतो गर्बानंतर गुरुनानक जयंती, उत्सवाला महत्त्व देऊन या पैशाचा, कालाचा अपव्यय करतोय मंदिर आम्हाला अपुरी पडायला लागलीत कोपऱ्याकोपऱ्यावर देवळ आणि देवदर्शनाला आलेले व्यापारी स्वरूप मन उद्विग्न करतं

मंदिराचा उद्देश व कार्य जास्त महत्त्वाच आहे सहजच शेजारची मेरी चर्चला जाताना दिसली तिच्या मुलाच्या गंभीर आजारात, तिची फार ओढाताण होत असे एकेका ह्या बाईला मुलाच दुखणं सांभाळून घरकाम करायच, अशा वेळेस मंदिरातली मंडळी मदतीचा हात पुढे करतात चर्चकडून मदतनीस बाई, शिक्षित स्वयंसेविका घरी येते जरूर वाटल्यास हॉस्पिटलची सोय करते मनोव्यथानी आजारी असलेल्या मुलाची आई हतबल होते प्रीस्ट घरी येऊन बाईला धीर देतात डॉक्टराच्या वेळा ठेव" औषध आणून देण ही काम देवळातून चालतात मला जरा आश्चर्य वाटल चर्चमधे जाऊन पहावं असं मनात यायला लागल एक दिवस चक्क मेरीबरोबर गेले

मॉगहनच चर्च आमच्या गावातच ह्या सेन्ट्रल मिशनच्या चर्चच्या नावातच 'दि चर्च इन् ॲक्शन' असा अर्थ आहे भजन आणि नाम-जागर ह्यानीच फक्त देऊळ जागत ठेवायच अस नाही तर एक मंदिर लाखालाखाची दानस्वरुपात उलाढाल करते हे पाहून मी चकित झाले समाज सुस्थिर ठेवायला कोणत्या गोष्टींची जरुरी आहे? आपल्या हिंदू समाजाची धारणाच धर्मनिष्ठेवर आहे धर्मप्रसार मंदिराच्याच द्वारे लोकांच्या अंतःकरणात शिरून व्हायला पाहिजे अफूच्या अमलासारखा आमच्यावर धर्माचा, कर्मकांडाचा अंमल चढला आहे ग्राह्य कोणत, त्याज्य काय हे विचार अंधानुकरणानी, अंधश्रद्धेनी भारून टाकले आहेत ह्या विचाराचा गुंता घेऊनच मी ख्राईस्टच्या देवळात गेले

१८६२ साली स्थापन झालेल हे चर्च हे चर्च-मंदिर बांधून होण्यापूर्वी लोक झाडाखालीच मैदानावर प्रार्थनेला जमत चर्च

बांधण्यासाठी फंड जमायला वेळ लागला नसेल पण 'गरिबांना मदत' ह्या धर्मशिकवणीचा पहिला धडा म्हणून जमलेल्या फंडापैकी त्यांनी भारतातल्या दुष्काळग्रस्त लोकांसाठी मदत पाठवली आमची ती अवस्था अजून आहे

पाश्चात्त्य देशांचे प्रश्न व समस्या वेगळ्या घटस्फोटांचे प्रमाण जास्त, त्यामुळे बेघर झालेली मुलं, व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना त्यामुळे सैरभैर तरुण पिढी, एकाकी जीवन कंठणारी वयोवृद्धांची वाढती संख्या, सर्वांना पैशाची अनुकूलता आहे तरी माणसाचा आधार हवाय, अशीच माणसं समाजाचा पाया विस्कळीत करतात त्यांना आधार देणं, मार्गाला लावणं हा चर्चच्या कामाचा पहिला भाग आहे आपत्तीत सापडलेल्या लोकांना चर्चची घंटा केव्हाही वाजवता येते चर्चनी त्यासाठी सल्लाकेंद्र उघडली आहेत लग्न कसं टिकवावं, काडीमोडानंतर कायदेशीर सल्ला केंद्रातूनच आर्थिक, मानसिक, मुलांचे प्रश्न, वैवाहिक जीवन, ह्या सर्वांचा विचार वेगवेगळ्या पातळीवर करणारी मॅरेज गाईडन्स कोर्ट्स, फॅमिली कौन्सिल्स आहेत लग्न सांधून देण्याचा प्रयत्न होतो मुलांसाठी Child Care सेंटर्स उघडलीत

मुलांचा प्रश्न कोर्टाकडे आहे तोपर्यंत मुलं सांभाळण्याची व्यवस्था चर्च करतं पुन्हा मुलांनी कौटुंबिक वातावरणात रहावं म्हणून सरकार ह्या फॉस्टर-पेरेन्टना भत्ता देत मुलांचा खर्च म्हणा वा त्याला मानधन म्हणा समाज कार्यकर्त्या बायका पुढे होऊन ही जबाबदारी स्वीकारतात

मंदिरातली बॅपटिझम, होली कम्यूनियन, (महानिर्वाणानंतरची विशेष प्रार्थना, ब्रेड-वाईनचा प्रसाद) हे सगळ पद्धतशीर शिस्तीत चालू असत

आपली देवळं डोळ्यांसमोरून हालेनात सिद्धि-विनायकाची आमच्या मुंबईतली रांग दिसायला लागली पंढरपूरची गर्दी आठवतीय त्यावेळेस अडाणी वारकऱ्यांचा भोळा भाव आम्हाला सश्रद्ध बनवत होता आता मात्र सुशिक्षितांची क्षेत्रांच्या ठिकाणी वाढती वर्दळ ते पूजेचे दर, दक्षिणा पूजेसाठी बडव्यांचा लागलेला ससेमिरा, बारीच्या दिवसांत धर्मकांड करवून घेऊन लोकांना लुबाडून, पाप-पुण्याचा घोष करत भाविकांना अफूच्या गोळीचा आणखी एक वळसा देणं नंतर देवळाच्या

कट्ट्यावर पुजाऱ्याच्या मुलानी पान खाऊन थुकत रहाणं, झोपा काढण- तरुण पिढी निष्क्रिय होत चाललीय म्हणायच का? मेरी सध्याकाळच्या क्लासला जाते, "चर्चमधेच!" मी तिला आश्चर्याने विचारले सध्याकाळी ७ ते ९ आर्टस्‌चे क्लासेस चाळीस पैसे देऊन कोणतही काम, वेतकाम, शिवणं, विणणं, पेन्टिंग, पाककला एवढच नव्हे तर वृद्ध मंडळींसाठी कागदाची फुल करण, ख्रिसमस कार्ड्स, बॉऊल्स खेळण हे शिकवणारी मंडळी आपले दोन तास खुषीनं चर्चसाठी देतात ते ४०, ५० सेंटस चर्चला देतात सगळी टेबल्स मुलंमुली, मोठी माणस ह्यानी भरली होती शिकण्याची फी थोडी व चर्चच्या फडात मोठी भर पडत होती

चर्चप्रमुखाशी ओळख झाल्यावर त्यांनी मला भव्य दालनात नेल हिंदू धर्मीय बाईला चर्च दाखवण्याचा त्यांचा उत्साह, धर्मकर्तव्य करत असल्याची जाणीव व जपणूक असावी हॉलच्या कडेच ते मोठ्ठं टेबल मागे भितीवर मोठा क्रॉस त्यावर जिझसचा हातापायांना खिळे मारलेला असा तांब्याचा पुतळा एका बाजूला धर्मगुरूच टेबल, माईक "प्रार्थनेला किती मंडळी जमतात?" मी विचारल "दीडदोनशे लोक येतात हॉलमधे हजार पंधराशे लोक बसण्याची सोय आहे विशेष प्रार्थनेला हॉल भरून जातो प्रार्थनेच्या वेळच ऑर्गन वादन, सगळी साथीची वाद्यं व सगीताचा झणकार नळीनळीतून हॉलभर घुमत राहतो" मिनिस्टर खुषीत येऊन सागत होते बाप्तिस्मा- नाव ठेवायच्या समारंभाला बाळाच्या अगावर पाणी- अर्थात् मंत्र घातलेले- जवळच एका स्टॅन्डवरच्या भाड्यात होत

"हे कोणत पाणी वापरता? मी जरा धीटपणाने विचारल "Ordinary tap water, not Ganges water" प्रीस्ट हसत म्हणाले


समोरच चर्चच एक रेडिओ- प्रक्षेपण केन्द्र, भजनं, भक्तिगीत प्रक्षेपित झाल्यावर जाहिरातीचं उत्पन्न चर्चला येत भूतदयेपोटी फड जमा करण, खेडोपोडी शाळा, हॉस्पिटल्स, बोर्डिंग्ज बाधण वगैरे मोठमोठे प्रकल्प सारखे चालू असतात

९ वाजता क्लासेस संपले हॉलमध्ये स्वच्छ पांढऱ्या शुभ्र मेणबत्त्या, इलेक्ट्रिक दिव्याचा मंद प्रकाश श्रद्धेच निष्ठेच एक वेगळंच वलय हॉलमधे भरून उरल होतं सद्धर्माची शिकवण ह्याला वातावरण असं अनुकूल पाहिजे नुसता भजनांचा आक्रोश, गोंगाट, टाळडफांचा

कडकडाट मन शांतीला घातकच नव्हे काय?

देवळात कामाच्या पाळ्या असतात अगदी झाडण्यापासून ते फुलाचे फ्लॉवर पॉट्स लावण्यापर्यंत पायदळी पडलेली फुलं, माळा दिसल्या नाहीत नकळत मन आपल्या मंदिराशी तुलना करत राही

आपल्या देवळातून अस काही करता येईल का? धर्मकृत्याची काही वेगळी सागड घालता येईल का? धर्मबंधनातून मिळणारी ही प्रेरणा खरी धर्मजागृती करेल काय? धर्मवेड्या व धर्मभोळ्या माणसानी नुसती कथाकीर्तन करून त्यांची आत्मिक उन्नती होत असेल का? सगळ्याच्या वाटचालीला मार्गदर्शन करण, हातभार लावण, हे एकएकट्यानी जपमाळा ओढत बसण्यापेक्षा जास्त समाधानाचं ठरेल का? मदिराची सख्या वाढवणं, देवाची त्याबरोबर आलीच (तेहतीस कोटी देवांची नोंद आहेच), पुन्हा जुन्या मदिराचा जीर्णोद्धार करण, त्यासाठी वेळ, श्रम, भाविकांकडून पैसा काढणं समाधानाच झालय का? आजपर्यंतच्या ह्या कामाची फलश्रुती काय? महिला मडळ व सामाजिक सस्थानी ह्याला आळा घालून मदिराचा सत्कार्यी उपयोग करून घ्यायला काय हरकत आहे? ह्या व अशा विचारांनी मन भाबावून गेल



# ऑस्ट्रेलियातील स्त्री-जीवन

घरची पत्रं आली जीव भाड्यात पडला चर्चेस आतून बाहेरून पाहून झाली शेजारणींशी 'हॅलो, हॅलो' म्हणण्याइतपत ओळख झाली ब्रिटीश मडळी तशी तोलून मापूनच बोलणारी, उगीच चौकशी करणार नाहीत तेव्हा मलाही अघळपघळ बोलण वाढवणं करता येणार नव्हत त्याचे रीतिरिवाज पाळायला हवेतच की

गावाची ओळख करून घ्यायला वर्तमानपत्र हेच साधन उरत

तसं म्हटल तर ऑस्ट्रेलिया हा देशच मुळी अवघा दोनशे वर्षांचा, देशाचं हे रांगतं वय अजूनही ऑस्ट्रेलियनाची १/३ लोकसख्या पचवीस वर्षांच्या आसपास आहे तशा ह्या ऑस्ट्रेलियन भगिनी आपल्याला जास्त जवळच्या आहेत आपल्या हिंदी महासागराला ह्या देशाची अगदी पाठ लागली आहे पाठोपाठच्या बहिणीच म्हणा ना, पण कानामागून आली अन् तिखट झाली तशी ही लहान बहीण आपल्या बरीच पुढे गेलीय

विशीमधे मातृत्व स्वीकारणाऱ्या ह्या माता धीराने पावलं टाकताहेत आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर आहे, तो त्यानी स्वत मिळवला आहे परिस्थितीला तोड देऊन नवख्या देशात त्यानी पाय रोवले आहेत नाहीतर स्त्री ही इथूनतिथून सारखीच राधा वाढा, ऊष्टी काढा, घर हीच तिची कर्मभूमी, चूल हेच तिच कार्यक्षेत्र व मुलं हाताचा पाळणा करून वाढवत असलेला ऑस्ट्रेलियन घटक, कधी बापाला आव्हान देऊन एकटीनं मुल

वाढवण्याची तिची धमक, त्यानी स्थापन केलेल्या सघटना

पहिल्याच आठवड्यात पेपरमधे, ''घरी राहाण्यासाठी सरकारने आम्हाला पस्तीस डॉलर्स भत्ता द्यावा मुलासाठी क्रेशेस काढण्यापेक्षा हा खर्च सरकारला कमी पडेल मुलांना आईच प्रेमळ सरक्षण मिळेल बाई घरी राह्यली तर चांगले ऑस्ट्रेलियन नागरिक तयार करू शकेल घराबाहेर जाऊन नोकरी करणं व ती सरकारन देण, हे दोन्ही प्रश्न सुटतील ''

हे एका मातेच पत्र तर मॅटर्निटी लीव्ह सारखी पॅटर्निटी लीव्ह द्यावी अस दुसरीच पत्र होत हो, पुरुषाना गृहशिक्षणाबरोबर बाल संगोपन, अगदी लंगोट्या बदलण्याची काम पण करता यायला हवी असं दुसरीचं पत्र होत

७५ साली 'वुईमेन्स लीबचे, स्त्री- मुक्ती आंदोलनाचे नगारे वाजायला लागले ऑस्ट्रेलियाचे पतप्रधान मि. व्हिटलॅम यांनी स्त्रियाचे प्रश्न, मागण्या कळण्यासाठी एका 'स्त्री' ची नेमणूक केल्याचे समजले चारशे अर्जांमधून उच्चशिक्षित अशा मिस रीडबाईची निवड झाली 'वुईमेन्स लीबच्या' सभा त्यांनी अगदी खेडोपाडी जाऊन घेतल्या सभेत त्या म्हणाल्या, ''स्त्रीकडे बघण्याची समाजाची दृष्टीच बदलायला हवी स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून मानायला हव मग ती अशिक्षित, गरीब, घटस्फोटित, नोकरी करणारी असो वा नसो पुरुष राजकारणावर चर्चा करताना स्त्री आल्याबरोबर का हो थांबतात?''

अरे, म्हणजे बायकांची अक्कल चुलीपुरती असं इथही समजतात तर? चटकन् माजघराच्या उबऱ्याच्या आत उभी राहणारी आमची आई आठवली मिस रीडबाई पुढे म्हणतात, ''कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियाच्या गरजा, पगारातील फरक, ट्रेड युनियनमधे स्त्रियाना मानाच स्थान, सर्व ठिकाणी आम्हा स्त्रियांना समान सधी या सर्व बाबींची मी जरूर दाद लावून घेणार आहे'' या आवेशपूर्ण भाषणाचा शेवट करताना त्या हळू आवाजात म्हणाल्या, ''हे सर्व केव्हा करता येईल, स्त्रिया बोलायच्या थाबल्या म्हणजे'' भाषणाचा हा विनोदी शेवट मला आवडला

गार्गी, मैत्रेयींची नाव डोक्यात घोळायला लागली त्यासाठी त्यांना कळून घेण्यासाठी मला बरच, हजारो वर्षे माग जायला हव पण

ऑस्ट्रेलियाचा इतिहास तसा नवाच आहे

१७८८ मधे कॅ जेम्स कुकने, सिडनी बेटाचा शोध लावला ब्रिटिश गुन्हेगाराना हद्दपारीची शिक्षा म्हणून टास्मानिया बेटावर तुरुंग बांधले गेले पधराशे कैदी इथे आणले त्यात १९९ स्त्रिया होत्या 'ब्रेड चोरून खाल्ला' अशा क्षुल्लक क्षुल्लक गुन्ह्यांना, भलत्याच कडक शिक्षा म्हणायच्या कैद्यात स्त्रियाच प्रमाण ३ १ असं होतं उद्याच्या ऑस्ट्रेलियन मातेला प्रथम वेशाव्यवसायच करावा लागला आदिवासी स्त्रियाची ह्यातच वर्णी लागली जीवन-मरणाचा प्रश्न होता पन्नास टक्के मुल बेवारशी म्हणून जन्मली व्यवस्था करायलाच हवी होती अर्थात ते काम स्त्रियाच्या अगावर पडल १८०६ मधे तीनशेसाठ जोडप्यांचे असे ससार लागी लागले ब्रिटिश संस्कृतीचे लोण आल होत ह्या कोऱ्या जमिनीवरही ठसे नवे उमटणार होते 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, तीच जगाते उद्धारी' ह्याचा साक्षात प्रत्यय इथे आला

१८३० मधे चागल्या विवाहित जोडप्याच्यातली पहिली गौर महिला ऑस्ट्रेलियन नागरिक म्हणून तिला नैनिक सामाजिक अधिकार मिळाले हेच महिलांच्या प्रगतीच पहिलं पाऊल ह्या भूमीवर रोवल गेल

१८३१ मधे दुसरं जहाज- नवऱ्या मुलीचं जहाज आलं अस लोक म्हणत श्री कॅरोलिन चिन्नरोम यांना पाच पौंड सरकारी कर्ज मिळाल हातात पैसा असल्याशिवाय बायका काय करणार? तेथे अधिष्ठान पाहिजे भगवंताचे, ह्या श्रद्धेने मेरी मॅककिलॉप कळकळीने कामाला लागल्या प्रार्थनेला झाडाखाली माणस जमवत, पै, पैसा, फड जमवून होई

स्त्रियानी युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवला स्वत च्या उन्नतीचे मार्ग त्यानी बरोबर ओळखले स्त्रियांना स्वत ची मालमत्ता असावी म्हणून प्रॉपर्टी ॲक्ट करून घेतला घटस्फोटानतर स्त्रियांना मुलाचा ताबा, गर्भपाताचा कायदा करून १८९२ मधे मतदानाचा हक्क मिळवला १९२१ मधे त्यांनी ऑ वुइमेन्स नॅशनल लीग काढलं रोमॉ मिचेल ह्या पहिल्या स्त्री जज्ज झाल्या 'बेबी बोनस ॲक्ट' करून प्रत्येक मुलामागे प्रत्येक दोन डॉलर्स व प्रसूतिपूर्व स्त्रीला ३० डॉलर भत्ता ठरवून घेतला देशाच्या भावी पिढीची काळजी घेणं, त्यामागे देशाच्या ऐक्याची केवढी भावना त्यांनी जोपासली

नू-प्रवेश

अशी सारखी घोडदौड करत असताना १९७१ मधे त्यानी सिंगल मदर आणि तिचं मूल ह्यासाठी एक कौन्सिल स्थापन केल कुमारी मातांकडे कोणी तुच्छतेने पहात नाही "हॉस्पिटलच्या फॉर्मवरच "तुम्ही मूल ठेवणार आहात का? बेबी होम्समधे द्यायच का?" असा खुला प्रश्न असतो बापाचं नाव विचारलं जात नाही कधी ते जोडपं पुढे आपलं मूल घेऊन जातही

असं ऐकतांना, वाचतांना प्रथम मला धक्के बसत असत धर्मात बरेच पथ आहेत कॅथॉलिक पंथाचा गर्भपाताला विरोध आहे फॅमिली प्लॅनिंग सेंटर्स आहेत कुटुंब त्रिकोणावर ह्याचा जोर नाही कमी लोकसंख्या असलेल्या देशात 'पोराच लेंढार' हा अवमानित- शब्द प्रयोग नाही पहिल्या बाळंतपणाचा सर्व खर्च आई- वडिलानीच करायचा अस नाही

आपल्याकडे लग्नकार्यावर जबर खर्च करून, पहिल्या वर्षाचे बारा सण, मगळागौरी, डोहाळजेवण, ह्या भानगडी नाहीतच व्यक्तिस्वातंत्र्य असल्यामुळे लहान वयात मुलंमुली लग्न करतात तेव्हा प्रौढ कुमारिकेचा प्रश्न नाही अशा प्रश्नांची गल्लत मनात होत राह्यची

स्वतःचं नशीब घडवणाऱ्या ह्या स्त्रियानी आता चागलंच बस्तान बसवलं आहे आपला आवाज उठविण्याची ताकद मिळवली आहे संतति-नियमनावरच्या साधनांवरचा लक्झरी टॅक्स उठवण्याचा प्रयत्न चालला आहे समलिंगी एकत्र राहण्याने 'एडस्' रोगाचा प्रादुर्भाव होतो त्यांनी सरकारने ह्यावर बदी घालावी असा ठराव आणलाय

पुरुष मंडळी दुसऱ्या महायुद्धात युद्धावर गेली तेव्हा कारखाने, खाणकाम, खाटीकखाने, प्रेस, वाहतूक- व्यवस्था, अशी काम जबाबदारीने अंगावर घेऊन पार पाडलीत अर्थात् सक्तीचे शिक्षण असल्यामुळे निरक्षर कोणीच नाही उच्चशिक्षित स्त्रिया कोणतही काम अंगावर घ्यायला तयार आहेत कामावर प्रतिष्ठा अवलबून नाही आता कॉम्प्युटर सारख्या तांत्रिक शिक्षणावर त्याचा भर आहे दुसऱ्या युद्धात लष्कर भरतीच्या वेळेस स्त्रियानी कमिशन्स घेतली आहेत रॉयल एअर फोर्समधे ८६ स्त्रिया, पायलट- लायसेन्स मिळवण्यासाठी त्याची धडपड चालू आहे

ऑस्ट्रेलियन बहिणींची ही प्रगतीची वाटचाल पाहताना आपले

संस्कार, आपली सस्कृती व त्याची, संस्कृती ह्यात किती तफावत आहे त्याचा हा मजेशीर किस्सा

१९७४, ७५ साली ऑस्ट्रेलियात नव्या नव्या देशाची माणस यायला लागली तिथल्या रहिवाशाना आमच्याबद्दल कुतूहल असायच आमच्या शेजारणीबाईने- मिसेस कॉलीन्स- आम्हाला चहाच आमत्रण दिल नेमका त्या दिवशी माझा वडपौर्णिमेचा उपवास भारतापासून चौदा हजार (हवेतल अतर) मैल लांब येऊन ह्या प्रगत देशातल्या मैत्रिणींत मिसळायला हवं होतं पण उपवास मोडण्याची कल्पना पटत नव्हती टेबलावर केकस्, कटलेट्स, काही मांसाहारी पदार्थ, प्लेटस् भरभरून ठेवल्या होत्या फळ खूप होती इटालियन्स ग्रीक, जर्मन, लेटेव्हियन अशा बऱ्याच देशांच्या बायका आलेल्या होत्या

मी अर्थातच मला प्लेट नको, 'माझा फास्टिग डे' आहे असं म्हटलं 'कशासाठी हा फास्टिंग डे? का?' वगैरे प्रश्न सुरू झाले साडी, कुकू हा त्याच्या दृष्टीने वेगळाच पोशाख होता सर्वांच्या नजरा माझ्याकडे वळल्या

"आम्ही हा उपवास नवऱ्यासाठी करतो," अस मी म्हणतीय तोच "नवरा तुमच्यासाठी कोणत्या तारखेला उपवास करतो?" एकीनं विचारल "इंडियात घटस्फोट होत नाहीत ना ग?" दुसरी म्हणाली दुसऱ्या नवऱ्याशी पटेलच अस कोणी सांगितलंय? अम्म म्हणायच संसारात पटवून घ्यायला लागतं, वगैरे आईपासूनची शिकवण, बायकानी पड खायला लागते वगैरे बुरसट तत्त्वज्ञान अस पहिल्या भेटीतच त्याना सागायला नको आणि ते पटवून तरी कस देणार? भाषेची सबब होतीच म्हणून मी गप्प बसले

सर्वच गोष्टींना चांगल म्हणायचं छान छान पार्टी झाली "हौ नाईस ग्लॅड टू मीट यू, सी यू" अस म्हणून आम्ही एकमेकींचा निरोप घेतला

⁂ ⁂

# लगीन चुडा

ऑस्ट्रेलियातल्या स्त्री-जीवनाची तोंडओळख व्हायला लागली पण संस्कृतीच द्वद, विचारांचा गोंधळ उडायला लागला

देशासारखा वेष घेऊन माणसांत मिसळून जाता येईल थड हवेमुळे वेष तसा बराच बदलावा लागलाय तर खूप कपडे घालूनही आपल भारतीय मन जुन्याच विचारानी लडबडलेल आहे भारतीय सस्कृतीचा डागोरा पिटत, जुन्या रूढींना कवटाळून धर्माच स्तोम माजवून, 'पतिव्रता' 'पतिव्रता' म्हणून आम्ही पुरुषांच्या गुलाम होऊन राह्यलोत की काय? 'पति हा देवची ललनाना' हेच धृपद आम्ही गात आहोत का?'

धर्माच्या नावाखाली दडपून गेलेल्या पतिव्रताचं मूक रुदन पाहून आम्हाला मुळी लग्नच करायच नाही, 'सगळे मेले नवरे पोत्यात घालून नदीत बुडवून टाकले पाहिजेत' इथपर्यंत मुलींची मजल गेली होती आपल्या आईच दु ख पाहून आर्थिक परावलंबन नष्ट करायच्या मागे, मुली पुढे सरसावल्या बापाचा ससार चालवायला लागलेली मुलगी भावाच्या शिक्षणाला, चैनीला पैसा पुरवणारी धाकट्या बहिणींचं लग्न आधी करून देऊन स्वत च सुख असीम त्यागाच्या भावनेत बुडवूनही प्रौढ कुमारिका म्हणून समाजाच्या चौकटी नजरेत खटकायला लागली

स्वत.चा ससार असावा, आपल्या कुशीत कुरळ्या केसाचं गोजिरवाण बाळ असाव, त्याच्या मिटलेल्या मुठीतला आपल्या भाग्याचा

ठेवा त्या चिमुकल्या डोळ्यांत पहात बसाव, अशी स्वप्नं तीही उराशी बाळगत नसेल कशावरून?

सतीला पतीवाचुनी देव नाही,
असो नित्य चित्ती तुझ्या भावनाही,
मणाची बिडी बोलती हा विवाह
परी जाण तो अमृताचा प्रवाह ।

ह्याच आई-आजीचा उपदेश सतत कानावर पडणारा मंत्र पटवून घेऊन मुलगी संसाराला लागली जोडीदाराचा सूर तंतोतंत नाही जमला तरी पडतं घेण्याच, पटवून घ्यायंच बाळकडूच तिला मिळालेलं असायच मुलांची जोपासना हेच कर्तव्य आहे अस मानून, दोघंही पतिपत्नी कुटुबसंस्था आजही साभाळून आहेत हे भारतातलं चित्र डोळ्यापुढ तरळून गेलं

इकडची नवी विचारसरणी 'त्याग ही कुचबणा आहे', व्यक्ति-स्वातंत्र्याला बाध आणणाऱ्या ह्या बंधनाला बांधून घ्यायच नाही प्रत्येकाच्या आयुष्याचा मार्गच ज्याच्या त्याच्या आवडीनिवडींवर अवलबून आहे संयम, त्याग, तडजोड यांपेक्षा घटस्फोट मिळणं सुलभ आहे आणि घटस्फोटाच्या मागे लागलेली इकडची मंडळी पाहिली की भारतीयांच्या रक्तात भिनलेली सस्कृती त्यांना अजून डावलता येत नाही आणि तेच बरं आहे असं ह्या प्रगत देशात राहिल्यावर लक्षात येत

इथे मागच्या आठवड्यात घटस्फोटांच्या एक हजार अर्जांची नोंद आहे अमेरिकेत एक लाखाची, म्हणजे साधंसुध लग्न एक अपवाद म्हणून दाखवता येईल अस अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सांगतात हे भयकर प्रचंड आकडे, समाजापुढे येणारे नवे नवे प्रश्न, भावी समाज, कोणीकडे चाललाय समजेनास होतंय व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य देणाऱ्या मडळींनी ह्याची दखल घेतली नव्हती करेनात का दर आठवड्याला काडीमोड आणि पुन्हा लग्न पण घटस्फोटिताच्या मुलांवर होणारा परिणाम आता प्रकर्षाने जाणवायला लागला आहे ती मुलं, ड्रग्‌ॲडिक्टस्, नशाबाज, गुड, लहान वयात होतात निराधार झाल्यामुळे चुकलेल्या कोकराप्रमाणे कुठेही कशीही निष्क्रिय हुंदडायला लागतात समाजघातक ठरतात मग घटस्फोटाची, व्यक्तिस्वातंत्र्याची ही किंमत समाजाला भारी पडते, असं आता शास्त्रज्ञ

बोलून दाखवताहेत

एकदा कोर्टाचा देखावा (चित्ररूप) पेपरमध्ये पाह्यला हातातली वेडिंग-रिंग काढून घेऊन स्वत शीच हसत असलेली तरुणी- तिचा रिंग हातात घालतानाचा आनंद, उत्साह, तसच सुख काढतानाही असाव, ही कल्पनाच मनाला पटत नव्हती तर दुसऱ्या बाजूला 'किती वेळ थांबाव लागणार?' म्हणून प्रश्नांकित चेहरा करून एक तरुण उभा होता कोणत्याच तत्त्वावर विश्वास नसल्यामुळे बांधलेली ही लग्नगाठ सोडण्याचं सुखदु.ख फक्त आर्थिक व्यवहाराच्या मोजमापावर इथे सुटणार म्हणायचं

घटस्फोटाची संख्या इतकी का वाढते हा विचार मला मतवायला लागला The Women on the verge of Divorce' हे पुस्तक हाती लागलं लेखिकेचं म्हणणं, विशीतल्या मुलामुलींची लग्न ही केवळ प्रेमाचा आभास व शारीरिक आकर्षणानी होतात (लैंगिक स्वातंत्र्य इथे आहेच ) आईवडिलाना सोडून स्वत च घर माडण, आर्थिक प्रश्नावर बेबनाव होण, ओघानेच येत ह्या लहान जोडप्यांचे विवाह व मुल म्हणजे एका बेबीने दुसरी बेबी वाढवण्यासारखेच विशीतला हा घटस्फोट, ते टीचभर पोर मुलीच आयुष्य बरबाद करत मग व्यक्तिस्वातंत्र्याचा आनंद किती अल्पकाळाचा ठरला?

पंचवीस ते तीस वयाच्या गटात, मुल झाल्यावर बाई घरात अडकून राह्यते पुरुषाच्या पबमधे खेपा वाढतात, घरात एकाकी वाटून ती जोडीदार शोधायच्या मागे लागते घटस्फोटाच्या कायद्यानी कीस काढलाय विवाहाची फेरतपासणी होते काळ बदलताना, पदवीधर, करिअर मुलींना घरी नुसत बसायला आवडेनासं झाल म्हणजे स्वत च्या व्यक्तिमत्त्वाची जपणूक करताना आपल्या ससाराची तमा बाळगायला हवी हा विचार मागे पडून पुन्हा सघर्ष व घटस्फोटात रूपांतर!

विभक्त कुटुंबातून आलेली मुलं-मुली, मोकळेपणी कुणाशीच बोलू शकत नाहीत स्वत केलेला प्रेमविवाह मोडायची वेळ आली तरी आईबाबांना सागायची लाज वाटते कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी इथे मॅरेज कौन्सिल तयार आहेतच घटस्फोट मुलांची ओढ, त्यांचा ताबा मिळवण, वेगळ राहण ह्यामुळे मनोव्यथाचे विकार वाढतात अस हे दुष्टचक्र चालूच रहात अविश्वास, एकाकीपणा आणि मद्य हे ह्या चक्राला

वगण ठरत

घटस्फोटाची तयारी झाल्यावर आईबापानी मुलाना खुल्लमखुल्ला सागून द्यावं नव्या बाबाची ओळख आईनेच स्वत च मुलाना करून द्यावी घरी येणारी मैत्रीण, लवकरच तुमची आई होणार आहे असं बाबांनी सागावं घटस्फोट मिळाल्यानंतर बापाने मुलाला दर आठवड्याला जाऊन भेटावं, वगैरे बऱ्याच गोष्टींची चर्चा घरात चालते मुलाना आजी-आजोबा असं जवळच मायेच कुणीच घरात नसत घरातल तग वातावरण मुलाना हवालदिल करत मुलांच्या पुढच्या वैवाहिक जीवनावर ह्याची सावली पडल्यास नवल नाही पुन्हा हे जीवन, असमाधानी लग्न, लैंगिक स्वातत्र्य हेच चालू राहाणार अशी भीती समाजशास्त्रज्ञाना वाटतीय

विवाहानंतर घटस्फोट नको, त्या कटकटी नकोत म्हणून लग्नाशिवाय एकत्र राहणं चांगल, अशी पंचविशीच्या आतली मुलं-मुली एकत्र राहतात मग गर्भपाताचा आकडा शिगेला पोचतो लग्न हे स्त्रीच्या सरक्षणासाठी पण पुरुषाला कायदेशीर सरक्षण मिळत नाही आर्थिक भार उचलताना त्याला जीव नकोसा होतो स्त्री मिळवती झाली आहे तेव्हा तिच्याकडून पुरुषाला अर्धा वाटा मिळायला हवा अशी त्यांची मागणी आहे घटस्फोटानतर स्वत ची रांगती खेळती मुल बायकोने हक्कांनी नेणं हे पुरुषाला बेचैन करतं असं 'The Equal Rights for Fathers' नावाच्या २० संस्थेचे सभासद म्हणतात अशी लग्नं भाडणाचा पवित्रा घेऊनच उभ्या राह्यलेल्या जोडप्याना नैराश्य, विफलता, निष्क्रिय बनवतात

अशा ह्या व्यक्तिस्वातत्र्य मानणाऱ्या 'परमिसिव्ह सोसायटीला' पाश्चिमात्य देशात आता देशाचे घटक तयार होण्यासाठी, सुखी लग्न होण्यासाठी कायदे करण्याची जरूर भासायला लागलीय चर्चलाही न मानणाऱ्या नव्या पिढीला, धर्मबधनाकडे कसे वळवावे, लग्नसस्थेची पवित्रता कशी जपावी, असं सुधारणावादी चर्चेस आहेत काही तत्त्वज्ञानी त्याचा पुरस्कार करताहेत तर मि इलिकॉट ॲटर्नी जनरल म्हणतात, "ह्या गोष्टीला सुबत्ता कारण आहे चागली इतिहासकालीन विवाह सस्था गुणवत्तेत श्रेष्ठ ठरेल नी पुन्हा केव्हा अमलात येईल ते खरे"

'मॅरेज कौन्सिलनी', फॅमिली कोर्टानी आपली कामगिरी चोख

बजावून, आमच्या साऊथ ऑस्ट्रेलियात ८,५७६ अर्जांची गेल्या वर्षी ह्या कोर्टाने चुटकीसरशी दखल घेतलीय तज्ज्ञ, शिक्षित, डॉक्टर, वकील, वैचारिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक, कायदेशीरपणे केसेस विंचरून काढतातही शेवटी मुलाचा धागा तोडण हे कठीण होऊन बसत

विवाह-सस्थेच अस हे विदारक चित्र आहे भावनेची बैठक प्रेमाचा पाया असा डळमळीत असावा पिढ्यान्‌पिढ्याच स्वास्थ्य असं धोक्यात असावं, हे सुधारणेच फळ नव्या युगातला माणूस भोगतोय का? सपन्न देशातील पिढी 'हिप्पी संप्रदायी' व्हावी हा एक दैवदुर्विलासच नव्हे काय?

"आमच्या वेळेस घटस्फोटांचं प्रमाण एवढं नव्हत" अस एका मैत्रिणीची आजी सांगत होती आम्ही स्त्रीवर तो एक डाग आहे अस समजत नव्हतो पण मुलींचे हाल व्हायचे मुलासाठी आता सरकारी भत्ता मिळायला लागला मुलींना कायद्याने घटस्फोट मिळेपर्यंत सरकार सेपरेशन अलाऊन्स द्यायला लागलय मुलीपण शिकायला लागल्या पैसे मिळवायला लागल्या परंतु घटस्फोट घेऊच नयेत अस त्याच्या बोलण्यात आल नाही

अस ऐकल्यावर आमचे सस्कार वेगळे आहेत इथल्या ऑस्ट्रेलियन बायका आम्हाला, आमच्या सस्कृतीला वाईट म्हणत नाहीत तर

असं पाहिल्यावर हिंदु-विवाह सस्थेची धर्मबंधन फार विचारपूर्वक केलेली आहेत भारतातील अडाणी, अशिक्षित तशीच सुशिक्षित मडळीही बधनं मानताहेत हे चागल आहे असं वाटत

नष्टे, मृते, पतिते क्लीबे अशी सबळ कारण पुनर्विवाहाला समती देत होती धर्मानी तो क्लीबे विवाह मान्य केला होता स्त्रीने मन मारून कुचबत रहावं असं पूर्वीही सांगितलेल नव्हतं विवाह-विधीवर श्रद्धा, एकमेकांवर निष्ठापूर्वक प्रेम, ससारासाठी सयम, त्याग, जोडीदाराशी तडजोडवृत्ती ह्या पाच तत्त्वांचं भरपूर खतपाणी लग्नापूर्वीच आईने मुलामुलींच्या मनावर शिपडून सुसंस्काराची मशागत केलेली असते असा व्रताचा लगीनचुडा मुलीला घातला जातो

आपल्याकडचं ककण बांधणं, ससपदी, लाजाहोम वगैरे विधी ह्या लोकाना कसे समजावून सांगणार? त्यामुळे काही घटस्फोट टळतील का? संख्या कमी होईल का? असेही विचार डोक्यात घोळ घालत

राहतात

त्यापेक्षा पाश्चात्त्य देशांच अनुकरण करण्याकडे आपला कल अजूनही आहे त्याचा धसका बसतो व्यक्तिस्वातंत्र्य आम्हाला हव आहे आपल्याकडे घटस्फोटित स्त्रीला सरक्षण देण्यासाठी पुष्कळ सुधारणा, कायद्याची बंधन, सवलती देताहेत पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या अफाट कल्पना समाजाला घातक ठरत आहेत व सपन्न असलेल्या सरकारी खजिन्यालाही कसं महाग पडत चाललय प्रामाणिकपणाने करदाते इथ सुद्धा ह्या घटस्फोटिताना भत्ता देणाऱ्या सरकारविरूद्ध ओरडा करताहेत आपल्याकडे हे परवडणारं नाही

तेव्हा व्यक्तिस्वातत्र्याला प्रोत्साहन देऊन अनिर्बंध जगण्याच्या विचाराला जास्त चालना देतील का? कायदा आपल्या बाजूचा आहे म्हटल्यावर तडजोडीची पडत घ्यायची दोघाना कधीच जरूरी पडणार नाही ह्या नव्या भूमिकेवरून होणारे वादविवाद मुलांच्या मनावर कोणते सस्कार होतील? आपल्याकडची कुटुंबसंस्था विस्कळीत होईल का? असे बरेच प्रश्न मनावर आघात करत राहतात

# कुमारी माता आणि बेबीहोम्स्

महाभारतांतली इ स पूर्व ३००० वर्षांपूर्वीची, कुमारी माता कुंती अजून समोर उभी राहते मृत्युंजय कर्णाचं आयुष्य डागाळलेलं राह्यलं जन्माचं गूढ न समजल्यान, जन्मभर पोरका राहिलेला कर्ण, कुंतीच्या आयुष्याचं झालेलं महाभारत, वर, शाप, उःशाप पुराणातली वांगी पुराणात राहिली म्हटलं तरी इथे त्या मृत्युंजय कादंबरीतली पान पुन्हा डोळ्यापुढे फडफडायला लागली

आज जेनीबरोबर बेबी-होम्स् पहायला जायचं होत 'कुमारी माता' म्हटल्यावर, आपल्या डोक्यात कशी चक्रं फिरायला लागतात आपल्याकडच्या ऑर्फनेजेस सारखीच, 'बेबी होम्स' अस मनात आलच अन् पंढरपूरचा अनाथाश्रम आठवला कचऱ्याच्या कुंडीशी मिळालेल मूल, देवळाच्या दारात फडक्यात गुडाळून ठेवलेली मुलगी पाळण्यात मूल ठेवून, घंटा वाजवून जाणारी आई, घंटेबरोबर ऑफिसमध्ये लागणारा लाल दिवा, दिवा लागलेला पहाताच आपलं तोंड अंधारात झाकायला निघालेली माता-सगळ आठवायला लागल। एका विधवेवर, माता होण्याचा आलेला प्रसंग म्युनिसिपल दवाखान्यात तिला आणली होती डॉक्टरनी मोठ्या मिनतवारीन मायलेकराचा जीव बचावला होता पण तिन जे तोंडावर पांघरूण घेतलं होत ते काढायच नाही ह्या निर्धारान! मुलाच्या बापातही ते काढण्याच सामर्थ्य नव्हत!

अशी मुलं पुढं ऑर्फनेजमध्ये सांभाळतात म्हणून पंढरपूरची वाटचाल करणारे आईबाप, काम बिनबोभाट व्हावं, आपलं बाळही वाढावं म्हणून ऑर्फनेजमध्ये मूल सोडून जाणाऱ्या बालविधवा आडविहीर जवळ करणाऱ्या बायका किती भयंकर प्रसंगाला बाईला तोंड द्यावं लागायचं पुरुष नामानिराळा राह्यचा म्हणून, काहीच कळत नसतानाही पुरुषजातीचा राग यायचा पण पंढरपुरातच फक्त, त्या वेळेस असलेला अनाथाश्रम, पाहुण्यांना दाखवण्याचं काम आम्हा बहिणींकडे असायचं शाळेत येणाऱ्या आश्रमातल्या मुली तेथे भेटायच्या आईवडिलांची नावं त्यांना माहीत नसायची गुप्त ठेवलेली नावं अन् त्यावर चर्चा करत घरी येणारे पाहुणे, काळाच्या ओघात त्या कल्पना मागे सारल्या ब्रह्महत्त्येच्या पापाची चित्रगुप्तही नोंद करेनासा झाला मी इथे ऑस्ट्रेलियात आणि पंढरपूरचा अनाथाश्रम डोळ्यापुढून हालत नव्हता इतक्यात दाराची घंटा वाजली अरे, जेनी आलीच आम्ही दोघी 'बेबी होम्स' पाह्यला निघालो

जेनी सोशल-वर्कर असल्यामुळे तिला चांगलं ओळखतात होमच्या दारातच मेट्रनबाई आमच्या स्वागताला उभ्या होत्या सुरुवातीला पाच एक मुलांना घेऊन चालू केलेली होमची इमारत प्रथम तिनं दाखवली तेव्हाची समाजाची विचारधारा आपल्यासारखी असेल असं उगीचच मला वाटलं! ह्या होम्सना आता सरकारी अनुदान मिळतंय प्रत्येक मुलामागे आठवड्याला २ डॉलर (२० रु) भत्ता असतो ऑस्ट्रेलियन नागरिक म्हणून जन्मापासून असं सरकार काळजी घेत असतं 'अन्न-वस्त्र-निवारा' ह्यासाठी मुलांना मोर्चा काढायला नको चटकन् हा विचार येऊन गेला खरा!

प्रथम अगदी छोट्या बाळांच्या विभागापाशी आलो अगदी १० दिवसांतली मुलं एका निर्जंतुक खोलीत मच्छरदाणीच्या पाळण्यात ठेवली होती परदेशी बाई पाह्यला येणार म्हणून पाळणे जरा अलीकडे ओढून ठेवले होते "ह्या मुलांना देवी वगैरे इथंच काढाव्या लागत असतील?" "आमच्याकडे देवी काढाव्याच लागत नाहीत" असं मेट्रनबाईंचं माझ्या प्रश्नाला उत्तर एकताच मला आश्चर्याचा धक्काच बसला स्वच्छता आणि स्वच्छतेची इतकी कसून जोपासना रोगराईचं निर्मूलनच करते म्हणायची!

पुढच्या खोलीत सहा महिने ते एक वर्षाची मुलं काही डुलणाऱ्या

रॅकवर, काही कारपेटवर टीथिंगची चावी चघळत असलेली, काही रांगत असलेली होती गोरा रंग, गुलाबी गाल आणि ते सतेज बाळसं मूल उचलून घ्यावस वाटायचं जातिधर्माचा फरक नव्हता अनाथ वाटायच कारण नव्हतं लहान वयाच्याच मुली त्याची देखभाल करत होत्या दोन ते चार वर्षांची मुलं बाहेर उन्हात वाळूच्या ढिगाऱ्यावर खेळत होती रंगीबेरंगी स्वेटर्स, बूट पायमोजे घालून गोरी-गुबरी मुलं हिरवळीवर धावत होती धावता धावता पडत होती भाडत होती पण सर्वांच्याच तब्येतीतला सतेज निरोगीपणा उठून दिसत होता

"इथ मुलांना केव्हा आणतात?" मनात उचंबळणारा प्रश्न बाहेर आलाच मेट्रनबाई काही सागत होत्या "पण ही कुमारी मातेची मुलं आहेत नाही का?" हा ओठावर आलेला प्रश्न मी मनातच ठेवला माझ्याच मनात कुठंतरी टोचल्यासारखं होत होत मेट्रनबाई बोलत होत्या, "हॉस्पिटलमध्ये नाव नोंदवतानाच ह्या मुली फॉर्मस भरून देतात" 'मिस' अस चक्क लिहितात 'मुलं' साभाळणार, का बेबीहोम्समध्ये पोचवायच? असे फॉर्ममध्ये प्रश्न असतात त्या प्रियकराच न् तिच बिनसलं तर ह्या मुली स्वत पैसे मिळवायला लागल्यावर मुलाला इथून घेऊनही जातात'

इथ लग्नापूर्वीच स्वत च मूल साभाळण्याची लाज वाटायच काहीच कारण नसतं उलट मोठ आव्हान स्वीकारून मुलं सांभाळणाऱ्या कुमारी माताच्या मुलाखती मी ह्यांच्या 'स्त्री' (Woman) मासिकात वाचल्याचं आठवलं मेट्रनबाई मोकळेपणान सांगायला लागल्या "अस होऊ नये म्हणून त्या काळजी घेतात पण 'टीनअेज्' असत (वय वेडं असतं ना) होतं असं पण मुली फसतात, फसवल्या जातात अस मात्र त्या म्हणत नव्हत्या

बोलत बोलत आम्ही पुढ चाललो होतो मानसिक विकृतीची एकदोन मुलं खुर्चीत डोलत बसली होती "Oh, poor thing" म्हणून मेट्रनबाईंनी त्याच्या गालाला हात लावून पापा घेतला पुढच्या खोलीत मुलाचे कपडे वेगवेगळ्या कप्प्यात ठेवण्याच काम चालल होत दुधाचे डबे कपन्या मोफत पुरवतात बिस्किटं, लोणी, फळ, चीज, भरलेली होती कपाट अनाथाश्रमात एवढा सकस अन् भरपूर आहार! हो, पण हा अनाथाश्रम नव्हताच मुळी! कामं करणाऱ्या बायकाचा एकच पेहराव

त्यामुळं मालक नोकर भेद नव्हता काही ऐच्छिक काम करणाऱ्या होत्या

नंतर आम्ही छोट्या हॉलमध्ये आलो बाक पाह्यल्यावर तो प्रार्थनेचा हॉल आहे हे लक्षात आलंच जीझसचा मोठा पुतळा न् क्रॉस् भिंतीवर लावला होता "धर्मगुरू दर रविवारी प्रार्थना सांगायला येतात" जेनी म्हणाली, थोडंस्स लॉन् सोडल्यावर एक लांबच लांब हॉल दिसला तिथ गरोदर मुलींची राहाण्याची व्यवस्था आहे तिकडे जायच नव्हत एकतर त्या मुलींना आवडत नसाव व बऱ्याचजणी कामावर गेल्या होत्या

"आपणहून ह्या मुली येतात का?" माझ्या हिंदू मनान भीतभीतच हा चौकसपणा दाखवलाच मेट्रनबाई तशा वयस्कच होत्या त्याच्या काळी हे इतकं राजरोस नव्हत अजूनही काम बिनबोभाट व्हाव म्हणून दूरच्या खेड्यांतून मुली येतात अशा मुलींच्या आईवडिलांना कमंसच वाटत असे पण मुलीची सुखरूप सुटका व्हावी त्या दोघाना घरं करून राह्यला आर्थिक स्थैर्य यायला हवं म्हणून आईवडील मदतही करतात, पण जरा दुरून (काही झाल तरी मातृत्व त्याज्य नसत, त्या तस मानत नाहीत)

अशा मुलींना आपल्या घरी मधून मधून आणणं हे एक जेनीच समाजकार्यच आहे मुली थोड्या लहान अपसेट झालेल्या असतात आईवडील थोडे रागावलेले असतात त्याना घरी असं ऑन्टीकड आलेलं बर वाटत आई-वडिलांना त्रास देण्यापेक्षा, होममधे राहाण अर्थार्जन करणं त्या पसत करतात "इथे त्याची नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते त्या कामासाठी सोशल - वर्कर्स पुढे येतात त्याना डॉक्टराकडे वेळच्या वेळी घेऊन जातात" स्त्रीन स्त्रीच्या दु खाची अशी जाण ठेवलेली पाहून बर वाटल मेट्रनबाईंना एकीकडे मान हलवून हं, ह म्हणत होते

मेट्रनबाईंच्या खोलीत 'चहा-केकस्' चा पाहुणचार झाला "आपल्याकडे अशी होम्स आहेत कां?" बाईंनी मला विचारल मी 'हो' म्हटलं पण कुमारी माता होणं आमच्या समाजाला मुळीच मान्य नाही आम्ही तसे प्रतिगामीच लोक आहोत हे फार लाजिरवाण समजतात अस मी त्याना समजावून सागत होते

"मग? टीन अेज्ची, तरुण मुल-मुली एकमेकान मिसळतच नसतील? तेव्हा लग्न कशी जमतात?" मोठ्या आश्चर्यानं ती एकामागून एक प्रश्न विचारत होती

"आमच्याकडे आईवडील बहुतेक स्थल पाहून लग्न जमवतात"

"अस्स?" म्हणून जास्तच आश्चर्यानं ती माझ्याकडे पाहायला लागली "कुणी मुलीन, स्वत जमवल तर पालक समती देतात का?"

"हो देतात तशी" असं मी तिला उत्तर देऊन टाकल तिला कुठं सागत बसू की जात, कऱ्हाडे-कोकणस्थ भेद, भाषा, रगरूपाच, खानदान बाळबोध, सुधारक आर्थिक विषमता, गोत्र मगळ--- इथ आल्यावर मीच चक्रावून गेले कितीतरी आडदाडे, वेलाट्या आमच्या लग्न जमविण्यात असतात त्यानंतर मग वधूवर पसती नकोच ते समजावून सांगणं! तस थोडम्सं वाचून, आपली सस्कृती, आपण पाळत असलेल्या जुन्या परपरा, धर्मबधन (धर्म-अंधत्व आलेल आहेच) वगैरेंमुळे ते आपल्याबद्दल आदर बाळगून आहेत त्याच्या कल्पनेला धक्का कशाला द्या? म्हणून मी पण मग विषय बदलला ती लगेच "व्हेरी नाइस्" म्हणायला तयार होतीच बर मी तरी मातृत्व का लपवायच हे कस पटवून देणार? माझाही गोंधळच गोधळ उडाला होता "थँक यू" म्हणून निरोप घेतला

जेनीबरोबर गाडीत बसले पण पाश्चात्त्याचा हा विशाल दृष्टिकोण अन् आमची जुनीपुराणी नीतिमत्ता, कशाला मोल जास्त द्यावं? हा विचार करण्यासारखाच प्रश्न आहे! परदेशीय सुधारलेल्या देशांतला हा स्वैराचार! त्यांनी मान्य केलेल हे लैंगिक स्वातंत्र्य त्यांना कुठं नेणार आहे? नीतिमूल्य आम्ही त्यांना शिकवायला हवी का? मातृत्वाची ही जपणूक पाहिल्यावर आपण करत असलेली त्यांची अवहेलना, विटबना, बाळाच्या गळ्याला नख लावणारी आम्हीच तयार केलेली माता, उपेक्षणीयच ठरेल का? आमची नीतिमूल्य उपेक्षणीय ठरतील?

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदूष्यंति कुलस्त्रिय
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकर ॥

गीतेतल्या ह्या श्लोकाचीच आठवण झाली चागल्या प्रजोत्पादनासाठी काही बधन पाळायला नकोत का? (इथ सयम कुणी कुणाला कुठं घालायचा?)

अशा अनंत विचाराच्या हेलकाव्यांनी माझ मन भोवंडून गेल जेनीनी गाडीला ब्रेक लावला 'टाऽ टा, थँक् यू म्हणत तिचा निरोप घेतला

# संध्याछाया भिवविती हृदया

ॲडलेडमधे 'सीनियर सिटिझनस् सप्ताह' साजरा होत आहे ही आजच्या पेपरमधील ठळक अक्षरांतील शीर्षक! म्हातारे कसला सप्ताह साजरा करताहेत? म्हणजे इथे 'सध्याछाया भिवविती हृदया' असं काव्य नाही, नाटक नाही, 'म्हातारा' असा सूर नाही शब्दपण नाही ह्या सप्ताह 'ज्येष्ठ नागरिकांना 'चिअरअप' करण्यासाठी साजरा करायचा योगायोगाने त्याच आठवड्यात मी वृद्धाश्रम 'Homes for the Aged' पाहणार होते

सकाळचा नाश्ता आटोपून बाहेर डोकावते तोच आमच्या शेजारीणबाई 'हॅऽऽलो' करत आल्या वय ६५ हं अगदी टुणटुणीत म्हातारी- अगोऽबाई म्हातारं म्हणायच नाही त्याना! विसरलेच "Oh I can manage myself We are young still" अस मोनाबाई खात्रीपूर्वक सागत होत्या 'Bowling club' मधे चाललेल्या मैत्रिणींची तिनं गाडी दाखविली 'Hi' म्हणून झालं ह्या म्हाताऱ्या मडळींसाठी इथे 'बाऊलिंग क्लब्स' आहेत नोकरीचा शेवटचा दिवस झाला की मडळी इकडे वळणारच वयाच्या ६५ व्या वर्षी चेंडूफळीन खेळतात हं! ह्या क्लबच्या इमारती छान आहेत हिरवगार लॉन्मधे पन्हाळीसारख्या पट्ट्या, एका पन्हाळीच्या टोकाला स्टम्पस्‌सारखी लहान करेली, लहानपणी बाबांबरोबर व्यायाम करताना आमचा दादा तेवढी करेली फिरवत असे ती आठवली (बॉलस् दुसऱ्या टोकाच्या हाताने ढकलतात बॉलनी स्टॅम्पस् पडल्यावर

मार्कस् मोजतात असा काहीतरी खेळ पाहून माझा अंदाज झाला) नुसत्या बैठ्या खेळापेक्षा उघड्या हवेवरचा हा व्यायाम त्याना बरा वाटतो हा त्यांचा वयस्क उत्साह, तो युनिफॉर्म ड्रेस- मोठी मजा दिसते वार्षिक गॅदरिंग्ज होतात, अन् मंडळी मोठी खुषीत असतात!

बागेत काम करणारी वृद्ध मडळी पाहिली की आम्ही दोघं बोलायला पुढं जायचं, त्याना अस बोलायला कुणी आलं की फार आवडत दोन-तीन पिढ्यांच्या मागच्या गोष्टी ऐकायला इथ कुणाला रिकामा वेळ आहे? पण एकेकटी राहणारी कुठे दोन्ही डोकी म्हातारी असतात, हळूहळू आपली सर्व काम करतात आठवड्याचं मार्केटिंग करतील तर कुणी दुपारी (जास्त बायकाच) बिंगोल, (एक जुगार) हाउसी हाउसी खेळायला जाऊन बसतील! सिनेमाचं वेड वयाप्रमाणे कमी झालेल असतं आणि कुणाला जास्त असलच तर त्याना सिनेमाचं, गाण्याचं, करमणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमाच निम्मं तिकीट असत वैद्यकीय मदतसुद्धा निम्म्या दरात! [illegible] लाडच होतात इथे म्हणायचे! घरी एकएकटी राहणारी मंडळी, डॉक्टरांच्या भेटी- वेळा ठरवून घेतात दर महिन्याला डॉक्टरांची व्हिजिट झालीच पाहिजे चेक-अप् करून घेण्यासाठी, अन् ती वेळ त्या कसोशीने पाळतात "माझं काय आता, मला नको ती टॉनिक् अन् औषध!" अस त्यांचं नाही, म्हणूनच त्या हसत हसत शंभरी गाठतात

हीच वयोवृद्ध मंडळी जेवण बनवणं होईनास झालं की 'Meals on wheels' ह्या संस्थेकडे नाव नोंदवतात ह्या ज्येष्ठ नागरिकांना जेवण पुरविण्यासाठी (निम्म्या दरात) इथ प्रत्येक विभागात एकेक स्वयंपाकघर आहे समाजकार्य करणाऱ्या बायका हे काम आळीपाळीने करतात स्वत च्या गाडीतून एक समाजसेविका चार घरी चार डबे घेऊन येते जरूर असेल तर तीच जेवायला वाढते डिशेस धुणं, बिछाना नीट करणं, [illegible] ही त्याची समाजसेवा। बाहेरचं कुठलंही जेवण चागल असेल का? अशी शका घ्यायचं कारण नाही 'भेसळ' हा शब्दच इथ ऐकू येत नाही शब्दश अन्नात माती कालवण आम्ही करतो औषधात पाणी आम्ही मिसळतो आणि इतर कितीतरी अव्वल दर्जाची मिसळामिसळ आम्ही करत असतो हे इथ प्रत्येक बाबतीत सारखं जाणवत, लक्षात येतं!

अशा ह्या स्वतंत्र एकेकट्या राहणाऱ्या मंडळींना तसं मुलांवर अवलंबून राहावं लागत नाही शनिवार- रविवार मुलं भेटायला येतात तेव्हा आणतात काही डब्यांतून पण पैशाच परावलंबन नाही इथ सरकारी पेन्शन मुळी बायकांना साठाव्या वर्षी व पुरुषांना ६५ व्या वर्षी चालू होतं बायका सरकारी नोकरी करत नसल्या तरी! आणि पेन्शन किती तर पंधरवड्याला ६० डॉलर (६०० रुपये) मुलाकडे, सुनेशी पटत नाही, मुलींकडे राहायला ओशाळवाणं वाटत ह्या मुळी विचारच नाही इथे। एकमेकांकडे कधीतरी जाऊन भेटणं, (पार्ट्यांना तरुण मंडळीत नाही) पण मुलानातवंडाचे वाढदिवस- फादर्स- डे, मदर्स- डे साजरे करतात तेव्हा जाणं वेगळ अशा फादर्स-डे, मदर्स-डे ला भेटी (presents) देण्याच वेगळ कौतुक असतं फुलाचा गुच्छ, आई, आजीला एक पांढर फूल देण्याची प्रथा पाळतात पण आपल्यासारखे गळ्यात गळे, पायात पाय अडकलेले अस्मा लोळघोळ नाही। मुलमुली स्वत:च्या डॅडी- मम्मींना त्रास देणार नाहीत थोडे दिवस आहेत त्याचे, एन्जॉय करू दे त्याना, असं तरुण लोकांचं म्हणणं असत तेव्हा असं हलकफुलकं फुलपाखरांसारखं आयुष्य ज्येष्ठ मंडळी मजेत घालवत असतात

वाईट मनात आलंच' अगदी एकटं राहाणं, मोठ्ठ घर, बाहेर ओसाड वाटणारा बगीचा, रस्त्यानं चिटपाखरू नाही रात्री-बेरात्री काही झालं, लागलं तर? तीही व्यवस्था आहे! अगदी जरूरीच्या वेळेस त्याचं म्हणणं लोकांना ऐकायलाच पाहिजे म्हणून काही मंडळींनी आपल्या घराबाहेर अलार्म- रेड- लाईट सिग्नल्स् बसवलेले आहेत बेल बसवली आहे अगदी मृत्यूची चाहूल लागली, जीव कासावीस व्हायला लागला, 'एकटा जीव सदाशिव' होण्यापूर्वी, घरातच बिछान्यावर निजूनच त्यांनी बटन दाबायचं म्हणे' शेजारच्या मंडळींना अलार्म- लाईट व बेलवरून समजत, मग पाच मिनिटात ॲम्ब्युलन्स येऊन त्याना हॉस्पिटलमधे पोचवते अशी वेळ येऊ नये म्हणून वृद्धाश्रमात नाव नोंदवण्यासाठी 'क्यू' लागलेत इथ' हो, वेळ कुणाला सांगून येतेय? पण स्वर्गसोपानाच्या आखीव रस्त्याची ही ओळख मजेदार आहे असं वाटलं कॉलीन्स्च्या गाडीचा हॉर्न वाजला ती मला वृद्धाश्रम दाखवायला घेऊन जायला आलीय

शंभरएक लोकांसाठी बांधलेला हा वृद्धाश्रम! इमारतीच्या सभोवती

हिरवे लॉन, फुलझाडाचे ताटवे नवनवतीच्या उत्साहाने फुलले होते प्रत्येक खोलीच्या खिडकीवर छोट्या छोट्या कुंड्या, तशाच छोट्या फुलानी झाकून गेल्या होत्या निसर्गाच चिरतरूण रुप अस नजरेत भरून रहाव अन् वयाचा विसर पडावा ही कल्पना त्यामागे असावी काही वयस्क मडळी आपल्या दमानं बाहेर बाहेर शतपावली करीत होती आश्रमाच्या पहिल्या दारातच कॉलेज- हॉस्टेलसारखा एक फलक, त्यावर वृद्धांना आलेली पत्रे, वाढदिवसाची शुभेच्छा कार्डस् अडकावून ठेवली होती शेजारीच दुसरा बोर्ड त्यावर चार करमणुकीचे कार्यक्रम लावलेले शाळेने बसवलेले मुलांचे कार्यक्रम इथ मोफत करून दाखवणार होते बाजूच्या छोट्या कपाटात टी कोझीज्, कागदी फुलांचे गुच्छ, फ्लॉवर पॉटस्, पायमोजे, गलोती, गोधड्या अशा ह्या ज्येष्ठ मडळींनीच केलेल्या वस्तू ठेवलेल्या होत्या, विक्रीसाठी "ह्या सप्ताहातच होम्स्च्या लोकानी केलेल्या अशा कलावस्तूंचे प्रदर्शन गावातल्या मोठमोठ्या स्टोअर्समधून मांडतात ना? आणि थरथरत्या हातानी, मावळत्या मनानी केलेल्या वस्तू खरच प्रेक्षणीय असतात ना?" अस मी विलीला विचारल, "त्या स्वस्तही असतात ह कमलिनी-" मिसेस कॉलीन्स म्हणाली, आपल्या ह्या होम्सम्पाठी त्या पैसा जमवतात त्याच्या आश्रमातल्या बायका स्टॉलवर बसतात पाहल्यास का? कॉलीन्स हसत म्हणाली, "इतक्या व्यवस्थित पावडर- कुंकू, कुकू नाही, लिपस्टिक लावून ठेवणीतल्या हॅटस्, फ्रॉक्सला मॅचिग अशा घालून नवजीवनातल्या जुन्या छदाचा आनंद पुन्हा लुटीत असतात ग्बऱ्या! मिसेस कॉलीन्सला मला इतकं सार सांगता येईना

"मी, कालच शॉपिंग् सेंटर मधे हे प्रदर्शन पाहलय, ह्या सर्वजणी अगदी खुषीत दिसत होत्या ग काम पण छान होत त्यांच।" मी म्हटल, "अग ह्यातून त्याना पॉकिटमनी पण मिळवता येतो अन् ह्या सप्ताहाची वाट पहात, वर्षभर अस आवडीच पण प्रदर्शनात ठेवण्यासारख काम मोठ्या उत्साहाने त्या करीत राहतात" कॉलीन्स सांगत होती

जरा पुढे येतो तोच तिची आई सामोरी आली मागच्या आठवड्यात विलीनं व तिच्या बहिणीन, आईला घरी नेऊन तिचा नव्वद वर्षाचा वाढदिवस साग्र-सगीत साजरा केला होता

"Oh Dear,"म्हणून मम्मीजीनं मला मिठीच मारली! हाताला मी

तिला धरून नेण्याऐवजी तिनंच माझा हात धरलान् दुसऱ्या हातात काठी होती, आपल्या खोलीत नेलं १०'x१०' ची छोटी खोली, जोडूनच बाथरूम सडास, छोटस स्टूल मोरीत होत म्हातारपणी एकट्याला बसण उठणं जमत नाही म्हणून हाताला येतील अशी विजेची बटन्स त्यावर लाल, हिरवा रग, चिठ्ठ्या, बटन्स कसली ओळखता यावी म्हणून, लक्षात न राहिल्यास घोटाळा होऊ नये, शॉवर, गरम पाणी, गार पाणी, कॉल बेल- आता कस करू रे रामा? हा आवाज नाही बाहेरच्या खोलीत अगदी ड्रेसिंग- टेबल, त्यावर प्रसाधनाची साधनं, सेंटस्। फ्लॉवर पॉटस्, बाजूला दुसऱ्या टेबलावर इलेक्ट्रिक किटली, चहा पुड्या, साखर, कॉफी होती "काय हवीय का कॉफी?" म्हणून म्हातारीन विचारलही "Thank you" म्हणून हाताने नको म्हटलं स्वत च्या खोलीत T V , फोन (स्वत चा) ठेवता येतो 'आम्हाला काय करायचय आता हे?' म्हणून निरसलेला सूर नाही वाचायची पुस्तकं होती लायब्ररीची गाडी इथेही येते मोठ्या टाइपच रीडर्स- डायजेस्ट सुद्धा तिथे होतं "दर रविवारी धर्मगुरू एक तास प्रवचन प्रार्थना सागायला दोन्ही वेळेला येतात" अस म्हणतच काठी हातात घेऊन, त्या प्रार्थनेचा हॉल दाखवायला निघाल्या जेवणाचा हॉल, स्वत ची जेवणाची खुर्ची त्यांनी दाखवली मधून समाजकार्यकर्त्या, होम्स्ची व्यवस्था बघण्यासाठी हिंडत होत्या

होम च्या मुख्य बाईची बिली (कॉलीन्सचं हे पहिल नाव) ने ओळख करून दिली "आमच्याकडे एकत्र कुटुंबपद्धती आहे म्हणून अशी वृद्धासाठी- होम्स अजून इतकी नाहीत" असं मी काहीतरी बोलायला हव म्हणून बोलले त्यावर "Oh Nice!"म्हणून तिन मामुली स्मित केल ही मडळी दुसऱ्याला वाईट म्हणणार नाहीत व आमचच जास्त चागलं म्हणून शिकवायलाही लागणार नाहीत ती पण आमच्याबरोबर निघाली होमला जोडून असलेलं एक नर्सिंग होम तिनं दाखवलं २५ एक बेडच छोट हॉस्पिटल्च होत ते सिंगल, डब्बल रूम्स वर-खाली करता येणाऱ्या कॉटस्, स्वच्छ चादरी, डिझाइन्सचे उशींचे अभ्रे, खिडक्याचे जाळीचे- पडदे, त्या झालरी, रंगीत फुलांनी भरघोस भरलेल्या फुलदाण्या- सगळ कसं ताज टवटवीत। ह्या ज्येष्ठ नागरिकाना प्रवासाच्या अतापर्यंतही प्रसन्न वाटायला हव, ह्यावर जास्त कटाक्ष। झोपून कटाळा आला तर

तिला धरून नेण्याऐवजी तिनंच माझा हात धरलान् दुसऱ्या हातात काठी होती, आपल्या खोलीत नेल १०'x१०' ची छोटी खोली, जोडूनच बाथरूम संडास, छोटंस स्टूल मोरीत होतं म्हातारपणी एकट्याला बसणं उठणं जमत नाही म्हणून हाताला येतील अशी विजेची बटन्स त्यावर लाल, हिरवा रग, चिठ्ठ्या, बटन्स कसली ओळखता यावी म्हणून, लक्षात न राहिल्यास घोटाळा होऊ नये, शॉवर, गरम पाणी, गार पाणी, कॉल बेल- आता कस करू रे रामा? हा आवाज नाही बाहेरच्या खोलीत अगदी ड्रेसिंग- टेबल, त्यावर प्रसाधनांची साधन, सेटस्! फ्लॉवर पॉटस्, बाजूला दुसऱ्या टेबलावर इलेक्ट्रिक किटली चहा पुड्या, साखर, कॉफी होती 'काय हवीय का कॉफी?'' म्हणून म्हातारीनं विचारलही "Thank you" म्हणून हाताने नको म्हटलं स्वत च्या खोलीत T V , फोन (स्वत चा) ठेवता येतो 'आम्हाला काय करायचय आता हे? म्हणून निरसलेला सूर नाही वाचायची पुस्तक होती लायब्ररीची गाडी इथेही येते मोठ्या टाइपच रीडर्स- डायजेस्ट सुद्धा तिथे होत "दर रविवारी धर्मगुरू एक तास प्रवचन प्रार्थना सागायला दोन्ही वेळेला येतात" असं म्हणतच काठी हातात घेऊन, त्या प्रार्थनेचा हॉल दाखवायला निघाल्या जेवणाचा हॉल, स्वत ची जेवणाची खुर्ची त्यानी दाखवली मधून समाजकार्यकर्त्या, होम्स्ची व्यवस्था बघण्यासाठी हिंडत होत्या

होम च्या मुख्य बाईची, बिली (कॉलीन्सच हे पहिल नाव) ने ओळख करून दिली "आमच्याकडे एकत्र कुटुबपद्धती आहे म्हणून अशी वृद्धासाठी- होम्स अजून इतकी नाहीत" अस मी काहीतरी बोलायला हव म्हणून बोलले त्यावर "Oh Nice!"म्हणून तिनं मामुली स्मित केलं ही मंडळी दुसऱ्याला वाईट म्हणणार नाहीत व आमचंच जास्त चांगलं म्हणून शिकवायलाही लागणार नाहीत ती पण आमच्याबरोबर निघाली होमला जोडून असलेलं एक नर्सिंग होम तिनं दाखवल २५ एक बेडच छोटं हॉस्पिटलच होत ते सिंगल डब्बल रूम्स वर-खाली करता येणाऱ्या कॉटस्, स्वच्छ चादरी, डिझाइन्सचे उशींचे अभ्रे, खिडक्यांचे जाळीचे- पडदे, त्या झालरी, रगीत फुलानी भरघोस भरलेल्या फुलदाण्या- सगळं कस ताज टवटवीत! ह्या ज्येष्ठ नागरिकाना प्रवासाच्या अंतापर्यंतही प्रसन्न वाटायला हवं, ह्यावर जास्त कटाक्ष' झोपून कटाळा आला तर

बसायला प्रत्येक खोलीत आराम- खुर्ची होती स्वतःच्या आराम- खोलीचा कंटाळा आला तर बाहेरच्या बाजूला बसायला कॉमन- हॉल गुबगुबीत कोच, खुर्च्या- काही मंडळी उन्हाच्या तिरपेला बसून, पेपर डोळ्यांशी धरून वाचत होती कानाच्या बॅटऱ्या सावरत, बोलत होती, हळू हळूच!

भेटायला येणाऱ्या मंडळींसाठी वेगळा हॉल ४ वाजले होते तेव्हा कुणाची सून, मुलगा, नातवंड भेटायला आलेली दिसत होती थोडा वेळ बोलून, आजीशी हस्तांदोलन करून, नातवंडं एकेक पापा देऊन घरी जाणार होती अन् आजी- आजोबा पुन्हा एकटेच बसणार होते बिलीने ओळख करून दिलेल्या मंडळींशी, तिच्या आईच्या मैत्रिणींशी थोडं थोडं बोलून, थोडं हसून 'Cheer-up' करून आम्ही परत घरी यायला निघालो बिलीच्या आईनी मिठी मारून, किस घेऊन आम्हाला 'बाय' म्हटलं

मन तिथच घोटाळत राह्यलं ह्या म्हाताऱ्या मंडळींना घर, मुलं, नातवंडं सोडून राहणं एकटं-एकटं वाटत नसेल का? आपल्या घरी अगदी लोळागोळा होऊन अंथरुणावर पडलेली माणसं, वरचं बोलावणं येत नाही म्हणून दिवस मोजणारी, चिडचिड करणारी, कटकट लावणारी, पण कर्तव्य म्हणून त्याची काळजी घेणारी मुलं, सुना-भोवताली नातवंडाची किलबिल, अशी घरातच राहणारी मंडळी जास्त सुखी असतील का? का ह्या आश्रमांत आरामात, मजेत राहणारी मंडळी जास्त सुखी असतील? इथं एकटेपणाचं केवढं भूत भोवती पिंगा घालत असेल! दिवस जाता जात नसेल रामनामाची माळ पुढं सरकत नसेल ज्या घरात आयुष्य काढलं, भलेबुरे दिवस पाह्यले, एकमेकांच्या संगतीत सुखदुःखाच्या गोष्टी केल्या, सणवार, मुलामुलींचे लग्नसमारंभ, नातवंडाच्या मुंजी, लेकीचं माहेरपण, सुनेची धुसपूस, भाड्याला भाडी लागत होती पण तीही गोड किणकिण होती लटका राग होता मायेपोटी लगेच विरघळत होता नातवंडांना आता कडेवर घेववत नव्हतं पण अंथरुणाशी बसून, आजी गोष्ट सांग म्हणून अंगाअंगाशी करणारी ती मुलं, नवं नातवंड शेजारी ठेवून कामाला गेलेली सूनबाई, अुगी अुगी करत हातानी थोपटणाऱ्या, ओव्या म्हणणाऱ्या आजी आयुष्याचं सार्थक झालय म्हणत त्या बालजीवाला कुरवाळत, 'ब्रह्मांडाचा आनंद इथेच

साठवला आहे,' म्हणून समाधानाचे सुस्कारे टाकत ह्या मायापाशातून कस रे सुटायच बाबा म्हणून जपाची माळ पुढं ओढणारे आजी- आजोबा जरा जास्तच सुखी असतील का? हे इथल पाहून अस मनात येत

"ह्यांना एकटेपणा जाणवत असेल का ग?' तिला विचारलच म्हणून तर अशी होम्स, समवयस्क मंडळींची एकत्र राह्यची ही सोय" ती चटकन् म्हणाली मग माझ्याच डोक्यात आलं त्यांची मुलं १४, १५ वर्षांपासूनच बाहेर राह्यला तयार असतात मुलाबाळांची लफडी, काही धाम्ती, त्याच त्याच्यामागे काही लग्न, शिक्षण नसतच तिशीनंतर ससार सपतोच मग पुढंही त्यांना एकटेपण जाणवायच कारण नाही अन् हो, बिलीच म्हणण म्हातारी माणसं तरूण मडळींच्या ससारात लुडबूड करतात

"आमची आई दुपारची घरी जाऊन, बेसिनमधे असली तर क्रॉकरी धुते, नाहीतर अंगणातलं गवत काढीत बसते" बिली म्हणाली

"बरोबर आहे ग, पन्नास वर्षं ती त्या घरात राह्यलीय आपल्या वास्तूची ओढ वेगळीच असते" थोड बोलण मनातच घोटाळलं- वास्तू वगैरे तिला समजेल की नाही कोण जाणे! बिली म्हणाली, "लिनी, अग घरात कोणी नसतं, आम्ही कामावर गेल्यावर हिला काही झालं तर?" हा प्रश्न होताच! "म्हाताऱ्या मडळींना मुलांची कटकट कुठे सहन होते? तरूण मंडळी स्वत च्या हिंमतीवर संसार उभे करतात, तेव्हा त्यांची लुडबूड हवी कशाला? आणि म्हातारी मंडळीपण मोकळेपणाने, स्वतंत्र लहरीला येईल तशी राहतातच की ह्या होम्समधे!"

खरंच बिलीच म्हणणंही बरोबर आहे आम्ही परत परत त्याच मायापाशात गुरफटून घेतो आता सगळं आवरलं पाहिजे मद, मोह, मत्सर, माया सगळं सोडून, उरलेल आयुष्य देवपूजेत 'हरी हरी' म्हणत घालवावं शक्य असेल त्यांनी काशीयात्रेला निघावं नाहीतर मृत्यूची वाट पहात हातपाय गाळून बसायच, आणि मग नैराश्याच झापड, एक उदासीन वलय भोवती उभ करून घरात अडगळ होऊन राह्यच, परलोकाचा विचार करत- जो दिसणार नाही तो- असा आमच्या वाट्याचा वृद्धापकाल डोक्यात घोळत राह्यला!



# मदिरा - महोत्सव

साऊथ ऑस्ट्रेलियातल्या बरोझा खोऱ्यात 'मदिरा- महोत्सवाचा' अपूर्व सोहळा- चार दिवसांचे दणदणीत कार्यक्रम- अस आजच्या पेपरचं विशेष मोठं शीर्षक अन् त्याला जोडलेली मदिरा- अकाची पुरवणी!

“प्यायल्यावर कम्पले मेले कार्यक्रम करणार? कोण पाहाणार? अन् ते कुणाला समजणार? आम जनतेला महोत्सवासाठी आमत्रण आहे, म्हणजे सगळेच पिसाट पिणार!” माझी शंका मी बोलून दाखविली

“अग जेवताना सुद्धा इथं पाणी पीत नाहीत, असा काय काकूबाईसारखा तुझा 'आ ऽऽ' झालाय?” सुहासने माझ्याकडे पहात विचारल

“सबध दक्षिण ऑस्ट्रेलिया आज मद्याचा पहिला पेला ओठाला लावण्यापूर्वी बरोझा व्हॅलीतल्या मळेकऱ्यांना शुभेच्छा प्रगट करणार आहे” आशा म्हणाली

दोन हजार एकर जमिनीवर द्राक्षांचे मळे फुलवून सबंध ऑस्ट्रेलियात, दारूनिर्मितीचा उच्चांक गाठणारे, बरोझा व्हॅलीतले मळेकरी व नागरिक बरोझा व्हलीचा - 'नुरपूटा' नगरीत एकविसावा महोत्सव साजरा करणार आहेत मर्व रस्ते फुलांनी, गुढ्यापताकानी सजविणार आहेत जर्मन वाद्याचे स्वर-संगीत उत्सवाला अखंड साथ देणार आहे दिव्याच्या झगझगाटाने बरोझा खोरे नुसते उजळून निघाले आहे मदिरा निर्माण करणारी ही अद्भुत नगरी, आपला अपूर्व इतिहास, जर्मनाकडून

घेतलेला मुळीचा वारसा आणि स्वत च पणाला लावलेले आपले कौशल्य, आज आपल्या राष्ट्राला, नव्हे जगाला मोठ्या अभिमानाने दाखवीत आहे

ह्यापूर्वी साठहजार मंडळींनी ह्या महोत्सवाच्या दिवसांत बरोझा खोऱ्याला भेट दिली होती द्राक्षार्काची चव प्रत्येकाला चाखायला मिळालीच पाहिजे ह्यावर उत्सव-कमिटीतल्या लोकांचा विशेष कटाक्ष होता तीन दिवस उत्तम खान्याची व्यवस्था केली होती अर्थात जेवणाबरोबर पाणी पिण्याची गरज भासू नये ह्याची काळजी घेतली होती आणि आश्चर्य (माझ्या पुरते तरी) म्हणजे एक स्त्रीच त्या उत्सव कमिटीची सेक्रेटरी होती

बरोझा खोर हे ॲडलेड (द ऑस्ट्रेलियाची राजधानी) पासून फक्त चाळीस मैलावर आहे खोऱ्याच्या दोन्ही बाजूला एकरोगणती पसरलेले, द्राक्षाचे मळे खोरं नुसत मधु-मधुरावासानी भरून टाकतात आपल्या मिरच्याच्या झाडाच्या उचीइतकी ही द्राक्षाची झाड, झुडप म्हणा हवा तर, काळ्या पाढऱ्या, अजिरी, द्राक्षांच्या वेगवेगळ्या रगछटानी भरलेल्या भरगच्च घडानी, ती भलीभक्कम मुळ झाकून टाकलीत मानवाच्या कष्टाच्या फळाचा हा फळबहार शब्दश इथे भूमिभार होईल की काय अशी भीती वाटते काळ्याभोर जमिनीवर पहुडलेले हे द्राक्षाचे हिरवे, जाभळे घड स्तिमित करतात

उत्सवाला काय इथ नेहमीच फ्री-वाइन-टेस्टिंग चालू अमत सभोवार पसरलेल्या खोऱ्याच्या मध्यभागी एका छोट्या इमारतीच्या दारांवर चित्रित केलेले द्राक्षाचे घड, मद्य-चषकाची विविध चित्र, काऊंटरच्या मागे भरून ठेवलेल्या, अनेक तऱ्हानी बनवलेल्या, लाल छटा छटाच्या अनेक रंगीत मद्यांच्या बाटल्या, फक्त द्राक्षांपासून बनवलेली ही मदिरा पिण्याआधीच अशी धुंद करते! उमर खय्याम, त्याची ती मद्याची सुरई नजरेसमोर आली, आणि वाटल खय्यामसाहेब इथं येऊन बसले अमते तर---तर अजून कितीतरी काव्यनिर्मिती झाली असती!

बरोझा खोऱ्याचा चाळीस वर्षांपूर्वीचा घेतलेला मूक चित्रपट आणि द्राक्षार्क काढणाऱ्या आद्य मडळींच्या आजोबाच्या मुलाखती, हा पहिल्या दिवशीचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी ह्या नुरीपुटा गावातल्या प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा ते थेट इमारतीच्या प्रवेशद्वारापर्यंत मद्याचे चषक घेऊन, येणाऱ्या मडळींना मद्य द्यायला सारी स्वयंसेवक मंडळी सज्ज राहणार

होती बॅन्ड वादनाच्या तालावर उत्सवप्रिय, उत्साही पाहुण्यानी रस्त्यावर फेर धरून नाचण्यासाठी, चौकाचौकातून कुठे बॅण्ड्सच्या तर कुठे ऑर्केस्ट्रा सगीताची व्यवस्था केली जाणार होती

बौद्धिक प्रश्नोत्तर-स्पर्धा, वेषभूषा स्पर्धा अन् मुख्य म्हणजे - खोऱ्यात जाऊन द्राक्षं तोडून टोपली भरून आणण्याची स्पर्धा, तर पटापट छोट्या ट्रेमधली नजरेनं द्राक्षं मोजण्याची स्पर्धा, अशा अभिनव स्पर्धा योजून त्यासाठी आकर्षक बक्षिस ठेवलीत पाच मैल चालण्याची स्पर्धा होती दारूच्या ओढीन चालणारे की मद्यपानानतर पाय ओढत चालत जाणारेत कुणास ठाऊक! हे सगळ सत्य आहे असं मनाला पटतच नव्हत दारूबद्दल आम्ही काही वेगळाच शक बाळगून आहोत पण इथं ह्या स्पर्धेत ८० स्पर्धक होते ह्या स्पर्धेच, जत्रेच प्रमुख आकर्षण म्हणजे शेवटच्या दिवशी निरपुटा गावातून निघणारे बेचाळीस चालते बोलते देखावे अर्थात् मदिरा बहाराच्या अपूर्व वर्णनाचे काही फक्त द्राक्षांनी बनवले होते, फुलानी सजवले होते त्या फ्लोटस्च्या आघाडीवर राहण्याचा मान जर्मन सगीत वाजवणाऱ्या पथकाला दिला होता

हलकेच हिंदोळणारे स्वर ह्या चालत्या देखाव्याला हाताला धरून पुढे नेणार आहेत तर ह्या फुलारलेल्या मद्य-सुरईच्या मिरवणुकीतून, येणाऱ्या वऱ्हाडी पाहुण्यांना ताजी द्राक्षं वाटणार आहेत ही साग्रसंगीत मिरवणूक मुख्य मैदानात येऊन जगविख्यात अशा मुद्दाम उभ्या केलेल्या साठ फूट उंचीच्या रंगीत स्तभापाशी येऊन थाबणार आहे मि टॉम्-मॉरीसन् ह्यांना हा कीर्ती-स्तभ, उभारण्याची स्फूर्ती झाली आजूबाजूच्या जिल्ह्यांतील साठ, पासष्ठ मुलींनी हा स्तभ रंगीत कापडांनी, माळानी व द्राक्षांच्या घवघवीत घडानी लपेटून टाकला आहे मुली रगीबेरगी कपडे घालून, ह्या स्तंभाभोवती फेर धरून मदिरा सोहळ्याची गाणी म्हणणार आहेत

इथेच शेजारी ३० स्के फूट उंचीचं स्टेज केलं आहे हो, उत्सवाचे उद्घाटन मागच्या वर्षीच्या मदिरा-राणी (Wine Queen) च्या हस्ते होणार आहे गेल्या वर्षी अमेरिकेत निवडून आलेल्या मदिरा-राणीला- मिस् लिंडा फॉक्स हिला मुख्य पाहुण्या म्हणून पाचारण केलं आहे तिच वय वर्षे अठरा! मद्याच्या फेसानी भरून उचंबळणारा पेला, ती प्रथम ओठाला लावणार आहे नंतर ह्यावर्षी निवड झालेल्या ह्या महोत्सवाच्या

महाराणीला - ओपल्चे खडे बसवलेला मुगूट व कमरपट्टा मिळणार आहे ते अलकार मागच्या वर्षीच्या मदिरा-राणीने नव्या राणीला घालायचे असा प्रघात आहे हा मदिरोत्सव ह्या उत्सवमूर्तीला 'वाईन-क्वीन'ला घेऊन चर्चमधे नेऊन ईश्वरसाक्ष पुरा होणार आहे

दोनहजार प्रकारची मद्य ह्या देशात तयार केली जातात त्यात हे द्राक्षार्क ही द्राक्षाना योग्य असलेली जमीन आणि अभ्यासपूर्ण केलेली वाइन, बाजारातल्या मागणीचा अग्रक्रम मिळवून बसली आहे ऑस्ट्रेलियातल्या सर्व स्टेटमधून द्राक्षाचे मळे आहेत द्राक्षार्क काढणाऱ्या वाइनरीज मधून दरवर्षी १० एक टन द्राक्ष तरी क्रश केली जातात मळेवाल्याची सख्या नुसत्या दक्षिण ऑस्ट्रेलियातच पाऊणशेच्या वर आहे बहुतेक सस्था, वाइनरीजमधून द्राक्षार्क-काढण्याचे शिक्षण-क्रम चालवतात

काळ्या, पाढऱ्या, लाल व अंजिरी रगाच्या द्राक्षापासून मदिरेला मिळणारे आकर्षक रंग, त्यावर केल्या जाणाऱ्या शास्त्रीय व नैसर्गिक प्रक्रिया - इथपासून मद्य कस घ्याव, केव्हा कोणतं मद्य घ्याव कोणत्या चषकातून घ्यावं, घरी मद्य कस करावं, त्याची शास्त्रीय माहिती पुरविणाऱ्या ह्या मि लस् इव्हॉन्सच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभही होणार आहे ५२८ पानाच्या सचित्र पुस्तकाची किंमत त्या महोत्सवात फक्त ७ ५० डॉ आहे

गेल्या वर्षी महोत्सवाचं उत्पन्नही तसच झालं चार हजार बाटल्या जुन्या मुरलेल्या मद्याच्या लिलावासाठी ठेवल्या होत्या १८९३ साली बनवलेल्या बारा बाटल्यांची किंमत ५१० डॉ आली व इतर बाटल्यांच्या किंमती ७१ डॉ पासून ७,७८४ डॉ पर्यंत वाढत गेल्या पण हा सगळा फायद्याचा पैसा, बरोझा खोऱ्यातील विकास कार्यासाठी देऊन टाकला गेला

त्यानंतर मेजवानीचं जेवण, 'ॲन गॉस्टन' हॉस्पिटलच्या बायकानी बनविलं होत स्पेशल जर्मन सूप, मद्यांतच शिजवलेल्या मासाच्या रुचकर पाककृती, फ्रेंच पद्धतीची सॅलडस्, वर ऑस्ट्रेलियन चीज व क्रीमचं सुशोभन, स्ट्रॉबेरीचं पुडिंग, बदाम बियानी नटवलेल, हव असल्यास नेहमीचं व्हॅनिला आइस्क्रीम, भरपूर असं स्वादपूर्ण जेवण अन् पुन्हा ब्रॅन्डीत बुडवलेल्या स्ट्रॉबेरीज, सुपारी म्हणून मुखशुद्धीसाठी तोंडात

टाकायला ठेवल्या आहेत जेवणाचा दर फक्त २० डॉ हा भोजन विभागाचा फायदा अर्थातच हॉस्पिटलसाठी दिला जाईल त्या भोजनकमिटीच्या अध्यक्षाबाई, ही १६०१ पौंडाची केक इथेच खोऱ्यातल्या-जुन्या म्हणजे १९२४ सालच्या लाकडी सरपणाच्या भट्टीत केलीय म्हणून आवर्जून सांगताहेत खाद्यपेयाच्या त्या रसभरीत वर्णनानं तोंडाला पाणी सुटत होतं मदिरा-महोत्सवांत मदिराक्षींचा हा उत्साह! त्या स्त्रिया धूम्रपानाप्रमाण मद्यपानात पुरुषांच्या बरोबरीन। अर्थात् मर्यादा ठेवून करीत आहेत मदिरा, मदिराक्षीचा तसा काहीच अनुचित प्रकार दिसला नाही

कुठे ही मडळी? व दारूबदी करण्यासाठी आदर्श समाज रचनेच्या मागे लागलेली आमची मंडळी? दारूबदीसाठी दारूड्याचा जाळलेला तो राक्षस, ते ठिकठिकाणी केलेले भेसूर पुतळे, लोकशिक्षणासाठी आयोजित केलेले कीर्तनापासून तमाशापर्यंतचे कार्यक्रम नाटक, सिनेमे गाणी, पोवाडे, ते अगदी गणेशोत्सवातले कार्यक्रम आठवले इतके करूनही नंतर झालेला गावठी दारूचा प्रम्भार, मृत्युमुखी पडलेल्याचे प्रसिद्ध होणारे भयानक आकडे। दारूच्या बाटल्या पोटाशी लपवून गर्भवतीच सोंग घेऊन जाणाऱ्या बायका आठवल्या कुठली बीज आम्ही पेरली! लहान पोराटोरांचा दारूच्या बाटल्या नेण्यासाठी उपयोग करून आम्ही कोणती सस्कृती जोपासली? अशिक्षित वर्गाला कोणत विचारधन आम्ही दान केल?

आतां आटोक्याबाहेर गेलेल हे दारूबदीचं भूत माकडाच्या हातात कोलित देऊन, आगी लावण्याइतकं ते थैमान घालत राह्यलय! यादव मदोन्मत्त झाले व ते मदिरापानाने बेहोष झाल्यावर स्वत श्रीकृष्णाने सोन्याची द्वारका समुद्रात बुडवून टाकली, अस काहीतरी डोक्यात घोळायला लागलं मन सुन्न झाल हा आमच्यातला जमीन-अस्मानाचा फरक! दारू पिण्याचा, ती बनविण्याचा, ती निर्यात करून उत्तम मद्यकर्ते म्हणून मान मिळविण्याचा त्या पेयातूनच राष्ट्राचे ऐश्वर्य वाढवण्याचा, आणि पुन्हा त्याच उत्साहाने, अभिमानाने मद्यमहोत्सव साजरा करून घटकाभर धुद झालेले हे लोक यशस्वी झाले अन् आम्ही मात्र हरलोच।

# ही तर देशाची धनदौलत!

मागच्या आठवड्यात इथ सूर्यदर्शन झालच नाही पाऊस, पूर आणि तुफानी वादळं, हवेत वाढत जाणारा गारवा- नव्हे कडाक्याची थंडी थोडं कटाळवाणं व्हायला लागल होतं त्यातच टी व्ही वर भारतातला पाऊस नेहमीप्रमाणेच गगेचा पूर, ब्रह्मपुत्रेच प्रचड पात्र अन् त्यामुळे लोकांची उडालेली दैन्यावस्था दाखवत होते हवाई जहाजातून अन्नाची पाकिट टाकताहेत लोक धावताहेत- मग मत्र्याची हवाई-पहाणी झाली पाऊस नाही म्हणून आलेले दुष्काळ, तो ओरडा, लगेच दोन वर्षांत वरुणाचा वर्षाव, पाणी, पाणी म्हणून ओरडा! आल तस पाणी वाहून गेल आम्ही कोरडे ते कोरडेच राह्यलो! Nehru's India म्हणून मागे अर्धा तास टी व्ही वर फिल्म दाखवली होती पुन्हा भिकारी, फूटपाथवर राहणारी माणस, उकिरडा उचकणारी नागडी-उघडी मुलं, जगाच्या नजरेसमोर भारताच हे रूप! हे सारं पुन्हा पुन्हा जाणवतंय म्हणजे कालच आम्ही शेतकी प्रदर्शन पाह्यला गेलो होतो व ते पाहिल्याचं समाधान वाटल 'रॉयल-ॲडलेड- शो' ची तिकीट काढून आत गेलो आपल्याकडच्या जत्रेसारखी खेळण्याची, खाण्यापिण्याची खूप दुकान दोन्ही बाजूला होती मधे मोठमोठे हॉल्स, दूध व दुग्धोत्पादनापासून केलेले पदार्थ हवं त्या वेळेला हवं तेव्हा थड दूध इथे, कागदाच्या डब्यातून मिळत दुधाचे कागदी डबे पाहून गमत वाटली लोण्याची १०० ग्रॅम

पासूनची पाकिट मिळतात. चार गॅलन डब्याएवढे चीजचे प्रचंड गोल चौकोनी गोळे चौकांत मध्यभागी माडून ठेवले होते हरएक प्रकारचे चीज आहे क्रीम मलईचे भरलेले डबे, खऱ्या दुधाचं आइस्क्रीम, तोंडाला सकाळी सकाळी थंडीतही पाणी सुटत होतं 'ऑस्ट्रेलियन् हनी-वीक' चालू होता हॉलच्या मध्यभागी मधाच्या बाटल्याना बसायचा मान मिळाला होता मधाच्या रगाने आकर्षित करत होता काउंटरवरच्या माणसाच मधाळ बोलण, "मिळतो की महाबळेश्वरला मध" असं म्हणून माझ्या चिकट स्वभावाला प्रोत्साहन दिल गेल नाहीतरी इथून का आपण तो घेऊन जाणार आहोत? काहीतरीच तुमच!' म्हणून मी मान हलवली चीज चघळत आम्ही पुढे निघालो

गाईचे गोठे आले गाय तशी ठेगडी-ठुसकी वाटली पण गोमाता दुधाला भरपूर पिगट अन् काळ्या रगाची कुठ पाठीवर काळे धब्बे असलेली ही जात म्हैस खरच मी इथे अजिबात पाहिली नाही म्हणून तिच्या बसून राहण्याच्या आळशीपणाचा 'गुण' इथे आला नसावा शेतकऱ्यांची कुटुबच मागे बाधलेल्या गाळ्यामधून उतरली होती गाईचे गोठे संपवून आम्ही बैलांच्या विभागात आलो बापरे! त्याचा दणकटपणा आणि त्याच्या झुंजींच्या शर्यती शक्तिसामर्थ्याला आव्हान देणारे प्रदर्शनीय बैल होते २,५६८ डॉ किंमतीला विकला गेलेला बैल न् तत्सम जाती त्या जनावरांची हे लोक घेत असलेली काळजी, शेतीचा पाया भक्कम करणारी ही माणसं खरीच कष्टाळू जातीची होती ह्या गोधनाच जेवढ्या अपूर्वाईनं रक्षण करतात, तितक्याच काळजीने हे लोक डुकरांचीही देखभाल करतात मोतिया रंगाच गाईएवढं लांब व उंच डुक्कर! जात डुकराचीच त्याची घाण येत होतीच इतक्या पोसलेल्या डुकराचं मांस खाणारी मडळी तशाच रंगाची अन् तितक्याच ताकदीची असली तर नवल नाही

पुढे शेळ्यामेंढ्यांचे गोठे लागले हा ऑस्ट्रेलियन दौलतीचा मोठा खजिना लोकरीने लगडलेल्या अन् त्या लोकरीच्या ओझ्यांनीच वाकलेल्या गलेलठ्ठ मेंढ्याचे नाक-डोळे जरा निरखूनच पहावे लागत होते या प्रदर्शनात 'मरीनो' नावाचा मेढा पहिल्या क्रमांकाचा ठरला होता लिलाव केल्यावर त्याची किंमत ३६,००० डॉ होऊन तो विकला गेला

मेंढ्याची उत्तम पैदास्य करण्यासाठी मेंढा खरेदी करणाऱ्या त्या श्रीमंत धनगराची काल टी व्ही वर मुलाखत घेतली होती इथे कुठलाही धंदा प्रतिष्ठेच्या आड येत नाही प्रतिष्ठा प्रामाणिक कष्टांवर ठरविली जावी अन् त्याच मोल आणि कौतुक अस व्हाव! काहीतरी शिकण्यासारख आहे अस वाटलं

कुत्रा हा त्यांचा लाडका प्राणी! आपआपल्या मालकिणी बरोबर, गरम कपडे अगावर घालून मोटारीतून ऐटीत कुत्रे ग्राऊडवर येत होते त्याची परेड स्पर्धा होणार होती त्याच मला एवढं कौतुक नव्हत म्हणून Zoo च्या विभागातले कागारू न् कोआला हे राष्ट्रीय प्राणी पाहून पुढे निघालो

प्रदर्शनात एक मोठा विभाग-मेंढीच्या अंगावरची लोकर कशी व किती लवकर काढली जाते, हे दाखवीत होते त्या मेंढ्याच्या अगावर असा लोकरीचा कोट पुन्हा वर्षाच्या आत तयार होतो लगेच शेजारच्या स्टेजवर उत्तम लोकरीचे कपडे घालून मुल मुली मॉडेल्स स्टेजवर येऊन गेली पार्श्वसगीताच्या तालावर ऐटीत चालत जाणारी ही पिढी देशाच्या प्रगतीसाठी आत्मविश्वास्पान पावलं टाकीत आहेत अस वाटल! आकर्षक जाहिरात करण्याच त्याचं कसब प्रत्येक ठिकाणी दिसून येत होतं पण ती नुसती टिमकी नव्हे बर का, चागला माल उत्पादन करण्याची तितकीच जबर चढाओढ असते जगात पहिला नंबर मिळवणारी ऑस्ट्रेलियाची लोकर तितक्या मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात दूध- दुभत्याचे पदार्थ देखील पण गिऱ्हाइकाला कसं फसवावं, किती लुबाडाव, कशाची भेसळ करावी, हा आणि असला विचार करायला ह्यांना वेळच मिळत नसावा किंवा ऑस्ट्रेलियन् लोकावर तसे सस्कारच झाले नसावेत!

परेड्स पहाण्याची वेळ झाली म्हणून परेड-ग्राऊंडवर आलो मोटर, सायकल अडथळ्याच्या शर्यती पाहिल्या एक मोटर गोलाकार फिरत आली तिला दोर बाधून, त्या दोरीच्या वरच्या टोकाला एक मोठी नायलॉन्ची पण जाड कापडाची, वटवाघळाच्या आकाराची कापलेली कापडी झूल तसाच पंखाचा आकार छत्रीला दिला होता भरधाव धावणारी मोटर आमच्या समोरून गेली मोटरला बाधलेल्या घेरावरच्या छत्रीच्या दाड्यावरच्या काठीला लोंबकळत असलेला माणूस, त्या छत्रीत पंखासारखे हात पसरून अडकलेला दिसला बघता बघता मोटारीचा

वेग वाढला अन् मोटारीपासून दोर बाजूला झाला नुसता हवेत तो माणूस पक्ष्यासारखे पख हालवून तीन मिनिट उडत होता Sky-gliding करून हळूहळू तो माणूस मध्यगोलात उतरलाही (अशा तऱ्हेचे स्काय-ग्लाइडिंग श्री मुंडकर यांनी केल्याच वाचल) 'माणसाला पंख असते तर' ह्या प्रो माट्याच्या शाळेतल्या धड्याची आठवण झाली भलतीच साहस-प्रेमी माणसं म्हणायची ही! खरच जिवाची पर्वा करणारा वेगळाच कोणी आहे आपण फक्त शरीराची अवास्तव, फाजील काळजी वाहत असतो

७ ते ८, १० ते १२ अशा वयाचे मुलाचे गट, घोड्याच्या वेगवेगळ्या चालींच्या स्पर्धा चालल्या होत्या आईबापाची जास्त काळजी किंवा वेडी माया त्याच्या आड येत नसावी त्या लहान कोवळ्या वयाच्या मुलाकडे पाहून मलाच कसंसच होत होतं प्रथमोपचाराच्या पेट्या घेऊन हिंडणारे छोटे स्काऊटस्, ॲम्ब्युलन्स जागोजागी उभ्या होत्या मुलांच्या साहसाची काळजी त्वरित घेतली जाणार होती उत्साहाला उधाण आल होत प्रेक्षकवर्ग तसाच थंडीवाऱ्यात उभं राहून हे पाहणार होता तीन-चार वर्षांची मुल प्रथम हत्तीवर बसून डुलत डुलत गेली हत्तीला इथ पहिला मान मिळाला होता उमदेपणाचा डौल दाखवत, रंगीत खोगीर, डोक्यावर तुरे लावून घोडे गेले गाई, बैल मिरवत गेले बैलांच्या अंगावर आपल्या इकडच्या सारख्या झुली होत्या

शेतीवरचे टांगे, चकचकीत रंगवलेले त्यात बसलेलं गोऱ्या मालकाचं कुटुंब, मुलाबाळांचा काफिला हसत प्रेक्षकांना हातवारे, हॅलो, हॅलो म्हणत चालला होता घोड्यावरून एकट्या जाणाऱ्या बायका तर घोड्याचा स्वत.चा टांगा चालवणारे आजी-आजोबा - 'यदा अमाप पीक निघालय बया' ह्या विजयानंदात परेड-ग्राऊंडवर दोन फेऱ्या मारून गेले आजच्या प्रदर्शनात मिरवण्याचा त्याचा मान होता खूष होती मडली! सरकारला लेव्ही घालायचीच, धान्याची पोती लपवायची आहेत ही चिता चेहऱ्यावर दिसत नव्हती

चहाची वेळ होत आली पण आम्ही 'फळांचा रस 'प्या' पाटी ह्या विभागापुढे आलो होतो सत्रे, मोसबी, अननस, ओले, जरदाळू, काळी लाल द्राक्षं याचा रस वेगवेगळ्या यत्रातून बाहेर काचेच्या मोठमोठ्या

भाड्यात पडत होता पाणी घातल असेल अशी शका घ्यायच कारण नव्हत रस गार ठेवण्यासाठी फ्रीज होते कोणता रस घ्यावा मोठा विचार पडला ओल्या जरदाळूचा व द्राक्षाचा असे दोन ग्लास भरून घेतले सारखा असा पौष्टिक खुराक! 'तुप खाऊन रूप पहाव' म्हणतो आपण, पण 'रस पिऊन रसरशीतपणा पहावा अशी म्हण इथ म्हणायला हवी लोक पाणी पीतच नाही म्हणतात, त्यामुळे त्याची कांती अशी असावी! आणि आम्ही फक्त रक्ताच पाणी करून अगात पाणी आहे आमच्या, म्हणून फुशारकी मारतो झाल!

धान्य-विभागाच्या दालनाच्या दर्शनी दरवाज्यावर 'Own our Good Earth' अशी पाटी होती एक मोठ्ठ स्टेज केलं होत त्यावर मोठे तीन लाकडी पट्ट्याचे बदाम आकार केले होते एका बदामात वरून धान्याचा पाऊस वर्षाव होत होता एका बदामात गहू, डाळी, मका असे कप्पे करून धान्य भरलेलं होतं एका बदामाच्या आकारात भाज्या, फळं सुकामेवा, अस तीन कप्प्यात भरलं होतं भाज्या आणि फळ कशी टिकवतात म्हणून त्याची लोणची, जॅम, जेली अशा बाटल्या भरून त्या सुंदर सुदर बाटल्याची बदामाभोवती किनार केली होती सफरचंद मागच्या वर्षीचीच, पण झाडावरची तोडून आणून ढीग घालावा अशी रसरशीत दिसत होती. त्यावर पहुडलेले द्राक्षांचे घड, तर मनूका, मोठे वाकलेले बदाम, जरदाळू भरलेल्या बरण्यांची शेवटी बदामला किनार खरच दृष्टी निघत नव्हती सगळंच कसं पोसलेलं कसदार जमिनीतून काढलेला दमदार माल डोळे तृप्त होत होते ऑस्ट्रेलियाची हीच खरी धनदौलत!


'बरोझा' खोऱ्यातल्या द्राक्षार्कांचा वेगळाच हॉल होता साऊथ ऑस्ट्रेलियातली बरोझा व्हॅलीची वाइन प्रसिद्ध आहे जर्मनांनी इथं येऊन ह्या वेगवेगळ्या मद्यार्कांत नबर मारलेला आहे वाइन 'फ्री-टेस्टींग'ला देत होते त्या व्हॅलीची चित्र, आकर्षक मद्य-चषक, ती माडणी धुंद करणारी होती मद्यबदी करणारा आमचा देश अन् मद्यनिर्यात करून लाखो डॉलर्सनी पैसे मिळवणारा ह्याचा देश! जमीन-अस्मानाचा फरक इथ मूळ-विचारातच पडलाय

गहू अन् गव्हाच्या जाती, यामधे ऑस्ट्रेलिया अग्रेसर आहे हा

केशरी मका, दानेदाने पर लिखा है खानेवालोका नाम म्हणून खाणाऱ्याच्या भाग्याच, किंवा देणाऱ्याच्या दातृत्त्वाचं कौतुक करण्यापेक्षा, मातीच्या कणाकणातून धान्य पिकवणाऱ्या ह्या शेतकऱ्याचच कौतुक करायला हवं!

आपल्यासारखी फिरती चक्र होती, पण 'जाएंट-व्हील'ला मागे सारणाऱ्या लाकडी पट्ट्यांतून-केलेल्या मोठ्या गोलाकारांतून फिरणाऱ्या, भलताच वेग घेऊन, धावणाऱ्या मोटर गाड्या भयकर होत्या 'Space-Ride' अशा पाट्या लावून, तिकीट लावून, खेळ ठेवलेले होते मुलाचे पाय पाळण्यात हललेले दिसायला. बघायला यांना वेळच नाही एक महिन्याच मूल छोट्या बाबागाडीत ठेवून त्यांच्याही नजरेला भिडणारे हे साहस गोल जवळच्या उभ्या असलेल्या त्याच्या छोट्या आया, आपल्या दुसऱ्या मुलाला आणखीनच वेगळ्या चक्रव्यूहांत सोडून स्वस्थ उभ्या होत्या तेव्हा पुढच्या पिढीची प्रजा मगळावर राह्यला गेली तर नवल नाही

बाहेर अधार चागलाच झाला होता बिजलीच्या-नळ्यांचा झगझगाट त्याला झाकून टाकत होता पाय बोलायला लागले होते नुसत पाहण्याचीही ताकद आमच्यात राहू नये? दृष्टीच्या आटोक्यातल नव्हतच ते! अन् ती वरखाली होणारी, गोल गोल फिरणारी चक्र, तितक्याच चकचकीत दिव्याचा प्रकाश-चक्रातून आम्ही थोडे चक्रावूनच बाहेर पडलो



भाड्यात पडत होता पाणी घातल अस्मेल अशी शंका घ्यायच कारण नव्हत रस गार ठेवण्यासाठी फ्रीज होते कोणता रस घ्यावा मोठा विचार पडला ओल्या जरदाळूचा व द्राक्षाचा असे दोन ग्लास भरून घेतले म्हारखा असा पौष्टिक खुराक! 'तुप खाऊन रूप पहाव' म्हणतो आपण, पण 'रस पिऊन रसरशीतपणा पहावा अशी म्हण इथं म्हणायला हवी लोक पाणी पीतच नाही म्हणतात त्यामुळे त्यांची कांती अशी असावी! आणि आम्ही फक्त रक्ताच पाणी करून अंगात पाणी आहे आमच्या, म्हणून फुशारकी मारतो झालं!

धान्य-विभागाच्या दालनाच्या दर्शनी दरवाज्यावर 'Own our Good Earth' अशी पाटी होती एक मोठ्ठ स्टेज केलं होत त्यावर मोठे तीन लाकडी पट्ट्याचे बदाम आकार केले होते एका बदामात वरून धान्याचा पाऊस वर्षाव होत होता एका बदामात गहू, डाळी, मका अस्मे कप्पे करून धान्य भरलेलं होत एका बदामाच्या आकारात भाज्या, फळ, सुकामेवा, अस तीन कप्प्यांत भरलं होतं भाज्या आणि फळ कशी टिकवतात म्हणून त्याची लोणची, जॅम, जेली अशा बाटल्या भरून त्या सुदर सुदर बाटल्यांची बदामाभोवती किनार केली होती सफरचद मागच्या वर्षीचीच, पण झाडावरची तोडून आणून ढीग घालावा अशी रसरशीत दिसत होती. त्यावर पहुडलेले द्राक्षाचे घड, तर मनूका, मोठे वाकलेले बदाम, जरदाळू भरलेल्या बरण्याची शेवटी बदामला किनार खरंच दृष्टी निघत नव्हती सगळंच कसं पोसलेलं कसदार जमिनीतून काढलेला दमदार माल डोळे तृप्त होत होते ऑस्ट्रेलियाची हीच खरी धनदौलत!


'बरोझा' खोऱ्यातल्या द्राक्षार्काचा वेगळाच हॉल होता साऊथ ऑस्ट्रेलियातली बरोझा व्हॅलीची वाइन प्रसिद्ध आहे जर्मनांनी इथं येऊन ह्या वेगवेगळ्या मद्यार्कात नबर मारलेला आहे वाइन 'फ्री-टेस्टींग'ला देत होते त्या व्हॅलीची चित्र, आकर्षक मद्य-चषक, ती मांडणी धुंद करणारी होती मद्यबदी करणारा आमचा देश अन् मद्यनिर्यात करून लाखो डॉलर्सनी पैसे मिळवणारा ह्यांचा देश! जमीन-अस्मानाचा फरक इथ मूळ-विचारातच पडलाय

गहू अन् गव्हाच्या जाती, यामधे ऑस्ट्रेलिया अग्रेसर आहे हा

केशरी मका, दानेदाने पर लिखा है खानेवालोंका नाम म्हणून खाणाऱ्याच्या भाग्याच, किंवा देणाऱ्याच्या दातृत्त्वाच कौतुक करण्यापेक्षा, मातीच्या कणाकणातून धान्य पिकवणाऱ्या ह्या शेतकऱ्याचंच कौतुक करायला हव!

आपल्यासारखी फिरती चक्र होती, पण 'जाएट-व्हील'ला मागे सारणाऱ्या लाकडी पट्ट्यांतून-केलेल्या. मोठ्या गोलाकारांतून फिरणाऱ्या. भलताच वेग घेऊन, धावणाऱ्या मोटर गाड्या भयकर होत्या 'Space-Ride' अशा पाट्या लावून, तिकीट लावून, खेळ ठेवलेले होते मुलाचे पाय पाळण्यात हललेले दिसायला बघायला यांना वेळच नाही एक महिन्याच मूल छोट्या बाबागाडीत ठेवून त्याच्याही नजरेला भिडणारे हे साहस गोल जवळच्या उभ्या असलेल्या त्याच्या छोट्या आया आपल्या दुसऱ्या मुलाला आणखीनच वेगळ्या चक्रव्यूहांत सोडून स्वस्थ उभ्या होत्या तेव्हा पुढच्या पिढीची प्रजा मगळावर राह्यला गेली तर नवल नाही

बाहेर अधार चागलाच झाला होता बिजलीच्या-नळ्याचा झगझगाट त्याला झाकून टाकत होता पाय बोलायला लागले होते नुसत पाहण्याचीही ताकद आमच्यांत राहू नये? दृष्टीच्या आटोक्यातल नव्हतंच ते! अन् ती वरखाली होणारी, गोल गोल फिरणारी चक्र, तितक्याच चकचकीत दिव्याचा प्रकाश-चक्रातून आम्ही थोडे चक्रावूनच बाहेर पडलो



# जगड्व्याळ वर्ग आणि एक शिक्षण प्रकल्प

क्वीन्सलंडहून आम्ही परत आलो जास्त करून देशाचा मधला भाग मेंढवाड्यांनीच व्यापलेला आहे एकरोगणती पसरलेली कुरण, कुरणाच्या टोकाला असलेली मेंढपाळाची एकएकटी घर ! ह्या धनगराच्या घराशेजारी असलेला एक रेडिओचा खांब, ह्याच तारेवरून शिक्षकांचे शब्द येतात, अन् मेंढवाड्यातला हा मुलगा इथूनच वर्गात आपली हजेरी लावतो! हे एक आश्चर्यच आहे म्हणायच

गावातल्या शाळेच्या स्टुडिओत ह्या ॲशबाई, कॅटलॉग समोर ठेवून, दहाचे ठोके पडण्याची वाट पाहताहेत ह्या लहानशा खोलीत बसून हजारो मैलांच्या परिसरातले शाळेचे वर्ग चालवणार आहेत "हॅलो, गुड मॉर्निंग बॉइज ॲन्ड गर्ल्स" दहाचे ठोके सपताच बाईंनी मुलांची हजेरी घ्यायला सुरुवात केली "एस् मॅडम" असे मुलाचे आवाज येऊ लागले हवेतून येणारे हे आवाज बाईंच्या ओळखीचे झाले होते आता सर्व वर्ग समोर आहे अस समजून ॲशबाईंनी एक कविता म्हणून दाखवली "आता कोण म्हणून दाखवणार?" असं बाईंनी विचारताच पाच-सहा आवाज, किलबिल सुरू झाली "बाई मी, बाई मी प्रथम" अस ऐकून मुल जणू आपल्यासमोर बोटच नाचवत आहेत अस टीचरला वाटतय

लगेच ह्या छोट्या ॲनने खेड्यातल्या आपल्या घरातूनच, आपल्या टेबलाजवळच वॉकी टॉकी (Walki-Talki)च बटण दाबलं व कविता

म्हणायला सुरुवातही केली सर्वांनी ती शातपणे ऐकली "पुढचा भाग, बाई जोना म्हणेल" म्हणून ॲनने स्वत च आपल बटन बद केल "व्हेरी गुड गर्ल!" म्हणून ॲशबाईंनी तिला शाबासकी दिली ॲननी अगर जोनाने बाईंना पाहिलं नव्हत एकमेकींनाही। केव्हा पाह्यला मिळेल ह्याची शाश्वती नव्हती, पण जणू काही एका डेस्कवर, एका वर्गात बसलेल्या ह्या मुलींचे आवाज ऐकत, ॲशबाई पाच तास शाळेचा हा वर्ग चालवणार होत्या

तस पाह्यलं तर ॲन् ही एक खेडवळ मुलगी तशीच जोना आपले आईबाप अन् ह्या हजारो मेंढ्या या पलीकडचं जग तिन कधी पाह्यलेलच नाही कधी पाह्यला मिळेल ह्याची कल्पना नाही अशी पाच वर्षांपासून बारा वर्षांपर्यंतची मुल हे हवेतून येणारे शिक्षकाचे, वर्गमित्राचे आवाज ऐकण्यासाठी, सकाळचे दहा वाजण्याची वाट पाहत बसलेली असतात दूरदूरवर बसलेल्या ह्या मेंढपाळाच्या वस्तीतली ही मुल, त्यांच्यासाठी शाळा चालवण्याचा हा एक यशस्वी ठरलेला प्रयोग! अशी तेरा केद्र आहेत व सहस्रावधी मैलावर शाळेच अस जाळ विणलेलं आहे

ह्या हवेतून शाळा चालविण्याची कल्पना मिसेस् मॅक्बेथ बाईंची पोस्टाद्वारे (Correspondance) शिक्षण देणाऱ्या संस्थेतून त्या निवृत्त झाल्या होत्या एकदा सहज त्या ॲलम्स्प्रिंगला आल्या व शेतावरचे आपल्या विद्यार्थ्यांचे पत्ते काढून त्या मेंढपाळाच्या घरी भेटायला गेल्या बाई आलेल्या कळल्यावर ती मेंढपाळांची मुलं पार बुजून गेली कोणी लांब शेतावर निघून गेली, तर कोणी घराच्या मागे, गवताच्या गजीआड लपून बसली परक्या पाहुण्यासमोर विशेषत· शिक्षकासमोर मुल यायला तयार होईनात शेवटी पालकानी आपली दिलगिरी प्रदर्शित केली मिसेस् मॅक्बेथबाई नाखुश झाल्या पोस्टाद्वारे शिक्षणात हा एक मोठा दोष राहतोय, हे त्यांच्या लक्षात आल जन्मापासून दहा बारा वर्षांची होईपर्यंत ह्या मुलानी इतर माणस, दुसरी मुलंसुद्धा पाहिलेलीच नसतात तेव्हा ह्यांना समवयस्क मुलांची गाठ घालून द्यायला हवी मित्र-मैत्रिणी करून द्यायला हवेत. पण ते कस जमवावं? हजारो मैलाच रान तुडवून कोण कुणाकडे कसं जाणार? ह्या विचाराने मॅक्बेथबाईंची झोप उडाली

साउथ ऑस्ट्रेलियात, दूरवरच्या खेड्यांतून वैद्यकीय मदत

पोचवण्यासाठी, डॉक्टर्सना तातडीच बोलावण पाठविण्यासाठी Two Ways Radio बसवलेले आहेत तसे शाळेच्या वर्गासाठी बसवावेत ही कल्पना त्याना सुचली त्यानी लगेच मेडिकल सर्व्हिसच्या डायरेक्टरला व शाळेच्या हेडमास्तराना ती सांगितली ती मंडळीही लगेच मोठ्या उत्साहाने कामाला लागली अवघ्या पाच वर्षांत ह्या कल्पनेला मूर्तस्वरूप आल।

पोस्टमास्टर जनरलकडून परवाने, आणि आपल्या मुलाच्या शिक्षणात रस घेणारे, हे वस्तीवर राहणारे मेंढपाळ सर्वांचच सहकार्य मिळाल अलाइस-स्प्रिंगच्या पोस्टाद्वारे शिक्षण देणाऱ्या शाळेचं रूपातर लगेच एका स्टुडिओत झाल आणि दोन मैलावरच्या Flying Doctors च्या बेस-ट्रान्समिटरला ताराही जोडल्या गेल्या

आठ जून १९५१ ला जगातल्या ह्या पहिल्या प्रायोगिक शाळेला सुरुवात झाली पहिली सूचना "आम्ही अलाइस स्प्रिंगच्या शाळेमधून बोलत आहोत वीस शिक्षक, इथून ह्या स्टुडिओमधून तुमचे वर्ग घेणार आहेत तुम्हाला तुमच्या मुलाच नाव असं वायरलेसवरून शाळेत घालता येईल फ्लाइंग-डॉक्टरचे रेडिओ-सेट ज्या वस्तीवर नसतील त्याना फक्त १४० डॉलर (१४६० रु) भरून हा सेट विकत घेता येईल अगर १८ डॉलर वार्षिक भाड्याने मिळेल त्याला फक्त दोनच on and off चे एक आणि एक Send off चे बटनं अशी ती राहतील तरीसुद्धा ह्या छोट्यामोठ्या मुलाचे आवाज एकमेकांना ऐकायला येतील ही मुलं एकमेकाना पाहू शकणार नाहीत, तरी पण आवाजाची ओळख नाव सागण्यापूर्वीच पटायला लागेल

पोर्ट-ऑगस्ता इथे ह्या शाळेची सुरुवात सुस्वर ऑर्केस्ट्राने झाली सर्वांना छान स्पष्ट ऐकू आल्याची खात्री पटवून घेतली आता ह्या शाळेची इतकी प्रगती झालीय की नाट्यप्रयोग पाहण्याची हवाईदृष्टी ह्या मुलांना मिळालेली आहे शेकडो मैल अंतरावरून ह्या छोट्या नट-नटी स्टेज-पडद्याशिवाय नाटक करून दाखवितात आठवडाभर रंगभूषा वेशभूषा ह्याची तयारी करत असतात इथ कोणी कुणाचे ड्रेसेस पाहू शकत नाहीत तरीपण ही छोटी मुल आपली रुझ-लिपस्टिक, आपले परीचे पख, कोणी कोल्ह्याचे शेपूट लावून देण्यासाठी आईच्यामागे सारखी

पोचवण्यासाठी, डॉक्टर्सना तातडीच बोलावण पाठविण्यासाठी Two Ways Radio बसवलेले आहेत तसे शाळेच्या वर्गांसाठी बसवावेत ही कल्पना त्याना सुचली त्यानी लगेच मेडिकल सर्व्हिसच्या डायरेक्टरला व शाळेच्या हेडमास्तराना ती सागितली ती मडळीही लगेच मोठ्या उत्साहाने कामाला लागली अवघ्या पाच वर्षांत ह्या कल्पनेला मूर्तस्वरूप आलं!

पोस्टमास्टर जनरलकडून परवाने, आणि आपल्या मुलांच्या शिक्षणात रस घेणारे, हे वस्तीवर राहणारे मेंढपाळ सर्वांचच महकार्य मिळाल अलाइस-स्प्रिंगच्या पोस्टाद्वारे शिक्षण देणाऱ्या शाळेच रूपांतर लगेच एका स्टुडिओत झाल आणि दोन मैलांवरच्या Flying Doctors च्या बेस-ट्रान्समिटरला ताराही जोडल्या गेल्या

आठ जून १९५१ ला जगातल्या ह्या पहिल्या प्रायोगिक शाळेला सुरुवात झाली पहिली सूचना "आम्ही अलाइस स्प्रिंगच्या शाळेमधून बोलत आहोत वीस शिक्षक, इथून ह्या स्टुडिओमधून तुमचे वर्ग घेणार आहेत तुम्हाला तुमच्या मुलाच नाव असं वायरलेसवरून शाळेत घालता येईल फ्लाइग-डॉक्टरचे रेडिओ-सेट ज्या वस्तीवर नसतील, त्याना फक्त १४० डॉलर (१४६० रु) भरून हा सेट विकत घेता येईल अगर १८ डॉलर वार्षिक भाड्याने मिळेल त्याला फक्त दोनच on and off चे एक आणि एक Send off चे बटन अशी ती राहतील तरीसुद्धा ह्या छोट्यामोठ्या मुलांचे आवाज एकमेकांना ऐकायला येतील ही मुलं एकमेकांना पाहू शकणार नाहीत, तरी पण आवाजाची ओळख नाव सांगण्यापूर्वीच पटायला लागेल

पोर्ट-ऑगस्ता इथे ह्या शाळेची सुरुवात सुस्वर ऑर्केस्ट्राने झाली सर्वांना छान स्पष्ट ऐकू आल्याची खात्री पटवून घेतली आता ह्या शाळेची इतकी प्रगती झालीय की नाट्यप्रयोग पाहण्याची हवाईदृष्टी ह्या मुलांना मिळालेली आहे शेकडो मैल अतरावरून ह्या छोट्या नट-नटी स्टेज-पडद्याशिवाय नाटक करून दाखवितात आठवडाभर रंगभूषा, वेशभूषा ह्याची तयारी करत असतात इथ कोणी कुणाचे ड्रेसेस पाहू शकत नाहीत तरीपण ही छोटी मुलं आपली रुझ-लिपस्टिक आपले परीचे पख, कोणी कोल्ह्याचे शेपूट लावून देण्यासाठी आईच्यामागे सारखी

घाई करत असतात दहा वाजता जणू खरंच स्टेजचा पडदा उघडणार आहे! पण ती मुल मात्र उतावीळ होतात अगदी।

प्रथम शिक्षक नाटकाच्या रगमचाच, मुलाच्या नावाबरोबर त्याच्या वेषभूषेचं रसभरीत वर्णन करतात मुलांच्या दृष्टीसमोर जसच्या तस स्टेज उभ करतात

बरोबर दहा वाजता पहिली घटा होते आपले शिक्षक, आपल्या शाळेतली सर्व मुल आपल्याम्समोर बसलेली आहेत, अशा कल्पनेने मुल आपली भाषणं एकाग्रतेने, भूमिकेशी समरस होऊन, अगदी अभिनयासहित नाटकातल्या आपल्या भूमिका वठवण्याची काळजी घेतात एखादी छोटी मुलगी, प्रेक्षकांसमोर असल्यासारखी बुजते, लाजते, माइकमधून अ--अंऽऽऽ असे आवाज येतात टीचर पुन्हा तिला धीर देऊन बक्-अप् करतात त्या शब्दांनीच शिक्षक आपली पाठ थोपटताहेत अस तिला वाटत मग नाटक अस रगत जात अन् शिक्षकाच्या श्रमाच अभूतपूर्व स्वागत व सार्थक इथ होत।

असच स्वत पूर्ण रंगून जाऊन मॅक्बेथ्बाई सागत होत्या "कांगारूच्या देशातही ही आमची मुल, पण ह्या दूर वाळवटाच्या प्रदेशात, त्याच्याही पलीकडे लाब राहणाऱ्या मुलाना कागारू एखादवेळेस पाह्यलाही मिळालेला नम्सतो एकदा स्टुडिओतल्या ह्या वर्गांतून एका जगप्रसिद्ध गायकान कांगारूच गाणं म्हणून मुलाना ऐकवल दूर दुरून ऐकू येणारे ते पसतीचे हुंकार, ते बालिश शब्द, त्यामागची उत्सुकता, त्या कोवळ्या चेहऱ्यावरचे कोवळे भाव कसे दिसताहेत, त्या गोड आवाजातला हूं हू म्हणून येणारा आवाज गायकाच्या डोळ्याच्या कडा ओल्या करून गेला"

"आता मात्र", त्या पुढे म्हणाल्या, "हीच खेडवळ वाटणारी धनगराची मुल, आपल्या पालकाबरोबर बाजाराच्या दिवशी शाळेच्या स्टुडिओत येऊन बसतात शिक्षकांनाही हे बेबीसिटरचं काम करायला आवडत मग चेहरा आणि आवाज ह्याची सगत लावली जाते मोठे विद्यार्थी शिक्षकाच्या फोटोने कॅमेरे भरून घेतात घरच्या माइकसमोर त्याचे फोटो लावून ठेवतात हे मुलाच नि स्पृह प्रेम शिक्षकानाही, आपल्या विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी शेकडो मैल जीपमधून प्रवास करायला लावतात

अशी ही खेडी आहेत की तिथे जीप पोहोचू शकली नाही ५९

वर्षांची एक शिक्षिका आपल्या मुलाना भेटण्यासाठी ३८ मैल चालतही गेलेली आहे वाळवटातून उन्हाच्या झळा अग भाजून काढतात, कधी बोचरी थडी अंगाला चावे घेत असते केव्हा पायवाटा, गुराच्या पाऊलखुणाही बुजून गेलेल्या असतात पण मुलाच्या प्रत्यक्ष भेटींनी, पालकांच्या प्रेमळ घरगुती स्वागताने त्यांचा श्रमपरिहार होतो " आता

"आता काही केंद्रांतून गॅदरिंग्ज होतात ह्या 'get together' साठी वर्षं वर्षं मुलं आपली नावं नोंदून ठेवतात हजार पधराशे मैलांवरून आलेली प्रथमच एकमेकांना भेटणारी मुलं दूरदूर उभी राहतात पण ऐकलेल्या आवाजाची ओळख लगेच पटते मग अगदी खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम रगत जातो "

अस समरस होऊन बऱ्याच गोष्टी मॅक्बेथबाई म्गागत होत्या तिचेही डोळे मधूनमधून ओलावत होते कृतकृत्य झाल्याचे ते आनंदाश्रूच म्हणायला हवे!

अस हे एकमेकाना न पाहता, आवाजाने हवेतून उत्पन्न केलेल हे भावनात्मक ऐक्य! गुरुशिष्याचं प्रेम जास्त दृढ करीत असाव आमच्याकडेही पुन्हा कृष्ण-सांदिपनीचे असे साक्षरता-आश्रम सुरू करता येणार नाहीत का?

मॅक्बेथबाईचं बोलणं जणू साक्षरता प्रसाराचा नवा मत्रच देऊन गेलं

卐 卐



# प्रभूचं आगमन, एक साजरा सण नाताळ

आम्हाला इथं राहण्याचा परवाना आणखी तीन महिने वाढवून मिळाला तसे देशाचे, पाहुण्यासाठी नियम कडक आहेत भारतासारखं 'आव जाव घर तुम्हारा' असं नाही

नाताळ अगदी तोंडाशी आला आहे 'आला नाताळ नाताळ' म्हणून नाताळाच्या तुताऱ्या वाजू लागल्या आहेत भारतात साहेबांच राज्य होत तेव्हा शाळेला भरपूर १५ दिवस सुटी असायची, पण "बाटग्याचा तो सण!" "आपला नाही काही" असं आईनं म्हटल्याच आठवतय म्हणून आम्ही ह्या सणापासून दूरच राह्यलो होतो आता मात्र त्याच्याच देशात त्यांचा सण जवळून पहायचा योग आला आहे योगायोगाची गंमत वाटली

खिश्चन लोकांचं हे बर आहे त्यांचा नाताळ हाच एक मोठ्ठा वार्षिक सण आपल्यासारखे धर्म-परंपरा म्हणून सणाचा ससेमिरा मागे नाही नाहीतरी सारखे सण-उत्सव करून त्यांच महत्त्व राहत नाही व इतर काही करायला उसतच मिळत नाही 'Wish you merry Christmas and happy new year' ह्या शुभेच्छानी सुरुवात होणारा हा सण सर्वांच भल चिंतण्यासाठीच! कोणी कोणाचा हेवादावा न करता, सणाचा आनंद सर्वांनी लुटावा रावापासून रकापर्यंत, आबालवृद्धाना भेट-वस्तूंसह शुभेच्छा द्याव्यात प्रेझेंटवाचून कुणी विन्मुख राहू नये ह्या व अशाच

योजना इथे सण-सगीनाची लय साधत राहतात आम्ही दक्षिण गोलार्धात आहोत तेव्हा ऋतुचक्र जरा उलटच फिरतय अगदी भारतात, डिसेंबरला थडी असते तेव्हा इकडे उन्हाळा सुरू होतो बर्फावरून येणारी फादर ख्रिसमस्ची गाडी इथे चक्क कापूस पसरून आणावी लागेल मलाच माझ्या कल्पनेच हसू आल थंड हवेतली, इग्लंड-अमेरिकेसारखी X-mas ची सूपस्, स्पेशल 'हॉट-प्लम्-पुडिंग' इथ अगदी पद्धत म्हणून खातात पण फुकून फुकून खाव लागत म्हणे एवढंच नव्हेतर जूनमध्ये गुलाबी थडी सुरू झाली की इथ ख्रिसमस साजरा करावा की काय असाही सूर दरवर्षी निघतो आपल्याकडे गणपतिउत्सव भाद्रपदात व गजाननाचा जन्म माघात म्हणून माघ महिन्यात उत्सव करणारी मडळी आहेतच की! तसलाच हा प्रकार!

ऑस्ट्रलियात, आता डिसेबरमधे थंडीचे उबदार पांघरूण काढाव लागतं सौम्य ग्रीष्माच्या हवेला ख्रिसमस-ट्री चा गारवा पुरेसा होतो डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात शाळेतून नाताळचे प्रोग्रॅम्स धूमधडाक्याने सुरू होतात ख्रिसमस-ट्री करणं व त्याची सजावट हा त्यातला मोठा भाग तोरणं, चकचकीत गोळे, झिरमिरत्या मण्याच्या माळा, फुगे, छोटी छोटी फादर-ख्रिसमसची बाहुली भेटवस्तूंची रगीत पार्सल आणि ती दुकानांची सजावट तासन्तास उभं राहून पाहण्यासारखी असते मोठ्या मेणबत्त्यानी खरेदीला धार्मिकतेचं, पावित्र्याच एक वेगळच तेज चढतं एका साध्या मेणबत्तीची भेट तशीच मोलाची मानली जाते

नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात 'सान्ता-क्लाज्, फादर ख्रिसमस गावात येतो इथल्या मोठ्या 'जॉन मार्टिन्स' स्टोअरमध्ये त्याची स्थापना होते सबध ऑस्ट्रेलियात सान्ता-क्लाजच्या आगमनाची ही मिरवणूक फार वाखाणली जाते ॲडलेड्मधली ही मिरवणूक म्हणजे एक चालता बोलता सोहळा समारभ एक छोटी मुलगी ख्रिसमस-क्वीन म्हणून निवडलीय तसच सिझनसाठी 'फादर' हवा आहे अशी पेपरमध्ये, ऑक्टोबरमधेच जाहिरात आलेली असते महिनाभर ह्या फादरला वेष चढवून स्टोअरमधे बसण्याची ड्यूटी असते म्हणे मिरवणूक पाह्यला अर्थातच सुहासनं आम्हाला फूटपाथवर खुर्च्या टाकून बसायची योग्य ठिकाणची जागा निवडलीय

एकामागून एक फ्लोटस्-चालते-बोलते देखावे यायला सुरुवात झाली सुरुवातीला लाल युनिफॉर्ममधल बॅन्डच पथक, नतर 'ख्रिसमस् १९८०' चे फलक हातात धरून, त्या बॅन्डच्या तालानी सथपणे चालत येणाऱ्या निळ्या फ्रॉकमधल्या मुली पऱ्याच साऱ्या जणू, लयीत पावल टाकत होत्या सिन्ड्रेलाच्या गोष्टींपासून स्पेस-रॅकेट चद्रावरचा माणूस स्काय-लॅब अशी देखाव्याची निवड एकापेक्षा एक सरस देखावा। अतिउत्तम कापडांचे पेहराव, रगसगतीचा तो साधलेला मेळ, काहीतरी अप्रतिम सुदर स्वर्गीय, इद्राच्या राज्यातलीच एक अनोखी मिरवणूक, मोठ्या राजरस्त्यावरून चाललीय। हे एक स्वप्न की सत्य असा क्षणभर सभ्रम पडला डोळे तृप्तीत पाहत होते चालत्या चित्राबरोबर आपणही तरळत पुढे सरकतो फादर ख्रिसमस्‌ची गाडी येते त्याला घेऊन येणारी X-mas Queen आपला घोळदार फ्रॉक सावरतीय पाठीवरची परीची पिस डोक्यावरचा सोनेरी मुकूट असं ते राणीचं रूपडं मोठं लोभसवाण दिसतंय, पाच वर्षांच वय, चालत बोलतं आनद-धन घेऊन, उत्साहाची बरसात करत निघालय तर फादर ख्रिसमसचा ताबडा पोशाख, त्यावर रूळणारी पाढरी शुभ्र दाढी बर्फावरून चालणारी रेन-डियरची ती जोडी-गाडीचे सोनेरी लगाम, हरणाच्या डोळ्यांतली चपळता आणि हे बॅन्डचे सूर गाण्याच्या शब्दांबरोबर कानात घुमायला लागतात

"जिगल बेल, जिगल बेल, जिगल ऑल द वे, सान्ताक्लॉज इज कमिग अलाँग, रायडिंग ऑन द स्ले हे, जिगल बेल -- हेऽ"

तो ठेका, बारीक बेल्‌चा तो किणकिण आवाज अगदी कानाशी घुमतोय, आपल्याही ओठावर शब्द घोळत राहतात एक आगळंच वातावरण निर्माण होतय

एलिझाबेथकालीन पोशाख घालून काही हौशी जोडपी मिरवणुकीत मिरवितात, पूर्वीच्या व्हिक्टोरिया गाडीची (बग्गी) अगदी छोटी प्रतिकृती आत बसलेली चित्रविचित्र पोशाखातली बालचमू, छोट्या/ मोठ्या एक चाकी तीनचाकी सायकली, विदूषकांच बेलाट्या कोलाट्या घेत चालण लहान मुलांना मनापासून आवडत" रस्त्याच्या दुतर्फा माणसाची ही गर्दी। वरती बाल्कनी, गच्च्या माणसानी झाकून टाकल्यात चागली २।-२॥ तास चालणारी मिरवणूक माणसाना अगदी खिळवून ठेवते लहान

गोबऱ्या गोबऱ्या गालाची गुटगुटीत मुलं अगदी बेहोष होऊन गेलीत इथे खराच 'आनदाचे डोही, आनद तरग असं शब्दश झालंय हाच सान्ताक्लाज ख्रिसमसच्या रात्री आपल्या घरी येणार, चिमणीच्या झरोक्यातून खाली उतरणार आपल प्रेझेंट आणून देणार ह्या आनदातच मुलं घरी परततात खरंच सान्ताक्लाज्च्या मागच्या गाडीत ढिगानी प्रेझेटस् भरलेली दिसताहेत की!

जॉन-मार्टीन्स्च्या डिपार्टमेंटलच्या भव्य स्टोअर्सपाशी मिरवणुकीचं विसर्जन होत सान्ताचा पापा घ्यायला, द्यायला मुलाची झुबड उडते आमच्या मोठ्या मनाला लहानपण चिकटत- सान्ताला हात हलवून- त्याच्या आशीर्वादाचा हात हलला लगेच बर वाटतं फादर-ख्रिसमसचा ४ फूट उच पुतळा स्टोअरच्या दर्शनी दारावर बसवलेला आहेच महिनाभर आधी सणाच प्रस्थान अस बसवून होत गावात आता उत्साहाला उधाण आलेलं आहे भावनांनी भरलेली व भारावून टाकणारी नाताळची भेट-कार्डच मला दुकानाशी खिळवून ठेवतात आपल्या आप्तसुहृदाची भेट किन्येक वर्षात झालेली नसते पुढ केव्हा होईल हेही माहीत नसतं, पण वर्षातून एकदाच स्मृतिपूर्वक पाठवलेली ही भेट-कार्ड पुष्कळ काही सागून जातात हे खर!

नाताळ म्हणजे ना, ऽताळ, नाचण, बेताल वागण असे शब्द जुळवून आपण त्याच्या सणाच्या कल्पनेला धुडकावून लावतो आमच्या [illegible] त्यापलीकडच काही पहायला तयारच नसतो आज जगात ख्रिश्चनधर्मीय बहुसंख्येने आहेत. प्रचार आणि प्रसार तसा झालेला आहे गतानुगतिक परंपरेप्रमाणे आज हजारो वर्षे ते लोक हा सण साजरा करत आहेत. त्याच्याही पद्धती देशोदेशी, थोड्याफार फरकाने रूढ झालेल्या आहेत स्कॅनडेव्हियन व इतर बाल्टिक राष्ट्रांतले लोक सणाची सुरुवात डिसेंबरच्या पहिल्या रविवारी एक मेणबत्ती लावून करतात प्रत्येक घराच्या दारालाच प्लॅस्टिकची [illegible] मेणबत्ती ठेवलेली असते प्रभू येशूच्या जन्मवेळच्या उजेडाचे प्रतीक म्हणून एक 'स्टार' दारात टागतात हाच तारा पथिक पाथस्थाला सन्मानदर्शक ठरावा हा हेतू. डिसें १३ तारखेला हे लोक 'सेंट लुसिया डे' पाळतात उगवत्या सूर्याला वदन करून घरची मोठी मुलगी, केशर,

जायफळ घालून कॉफी व स्पेशल बन्स तयार करते डोक्यावर मेणबत्त्याचा मुगूट घालून कॉफीचा ट्रे आपल्या आईवडिलाना प्रथम नेऊन देते

घरबसल्या टी व्ही वर असे रोज कार्यक्रम पहायला मिळत होते सकाळी सिडनीच्या मोठ्या चर्चमधली प्रार्थना व बायबल वाचन व्हायच धर्मगुरूंच पोथी वाचन अगदी 'ससाहा'सारख वाटतंय नाहीतरी बायबल हातात धरायची कधी बुद्धी झालीच नव्हती इथ मात्र, डॉक्टराच्या वेटिंगरूममधेही बायबल ठेवलेल असत व हे अस सारख कानावर पडतय कॅरोल्सची गाणी चालू आहेत मेणबत्त्या हातात घेऊन लोक भक्तिगीतं म्हणत रस्त्यानं, सध्याकाळी जातात मेणबत्तीच्या उजेडाने अधार उजळून टाकतात हे एक नामसंकीर्तन व ह्या दिंड्या पढरपूरच्या वारीची आठवण करून देतात

युक्रेनियन लोक ग्रेगेरीयन कॅलेन्डरप्रमाणे सण करतात तर पोलडमधे ४ डिसेंबरला सणाची सुरुवात होते पहिला दिवस 'सेंट बार्बरा डे' असतो चौकात बिगुलवादकांचे पथक जमून कॅरोल्सची गाणी म्हणतात पोलडमधे ६०० ग्रूप्स कॅरोल्स म्हणणारे आहेत ख्राइस्टचा 'तारा' आकाशात उगवला की त्याला ख्रिसमस इव्ह म्हणतात हे लोक जेवायच्या टेबलाशी घरातल्या मृतात्म्यांसाठी एक खुर्चा वगळतात गवतांनी टेबलाचे पाय सुशोभित करतात घराच्या चारी कोपऱ्यांत लसणाचे कांदे ठेवण ही आरोग्यवर्धक परंपरा पाळतात जिझस्च्या जन्मापूर्वी सहा दिवस उपासही करतात शाकाहारी जेवण घेतात टी व्ही वर ऐकतोय सारं अस्सल मासाहारी माणसाच्या ह्या धर्मवेड्या कल्पनातं आश्चर्य वाटतं उपासाच्या शिंगाड्याच्या पुऱ्या कराव्यात तसा त्यांचा ब्रेड पण वेगळा असतो तीन मेणबत्त्या टेबलावर मध्यभागी ठेवतात गव्हाच्या लोंब्यासहित एक फाटा आणून कापऱ्यात उभा करतात हाच समारभाचा मूळ-पुरुष सर्वांना आशीर्वाद द्यायला येतो अशी ह्याची समजूत आहे घरचा कर्ता पुरुष गोड खिरीचा एक चमचा भरून घेऊन सर्वांसह जीझस्च स्वागत करतो व मध्यरात्रीनंतर सर्वजण प्रार्थनेला चर्चमध्ये जातात

इथल्या सणाची पद्धत सागायला मेरीडिथ शेजारी होतीच

तिच्याही दाराला ती कडी, मेणबत्ती, वर स्टार सगळी सजावट झाली होती "२५ डिसेंबर हा ख्राइस्टच्या जन्मानतरचा, सणाचा मुख्य दिवस म्हणून आम्ही साजरा करतो माझी जरा गडबडच आहे गं फॅमिली-डिनर माझ्याकडे आहे माझी आई, आजी, पपा व 'केन'कडची माणस लचला यायचीत'' असं सागत होती

सहकुटूब जेवण अस वर्षातून करायच अशी प्रथा आहे हा जेवणाचा बेत म्हणजे 'टर्की कोंबडी हवीच जेवणाची सुरुवात विशेष मद्यान व्हायची मग ख्रि सूप, ख्रि पुडिंग असा 'नाताळी' बेत हे लोक पण अतिथीसाठी खुर्ची राखून ठेवतात पाढऱ्याशुभ्र टेबलक्लॉथवर गवताची एक पेंडी ठेवतात तीच जीझसच्या जन्मस्थानच्या गोठ्यातल्या गवताची आठवण म्हणतात जेवणानतर प्रत्येक व्यक्ती पेंडीतला एक फडा ओढून काढते ज्याची गवताची फाटी लांब निघेल तो दीर्घायुषी समजला जातो समजुतीचे सागाडे असे जतन केले जातात तर? म्हणजे माणूस जन्ममृत्यूच्या दारात असा भित्रा कोणावर तरी अवलंबून आहे!

हंगेरीचा नाताळ आज टी व्ही वर आहे हगेरीमध्ये सान्ताक्लाज करत नाहीत एक छोटा जीझस, एक देवदूत व पऱ्या मुलांना प्रेझेंटस् वाटण्यासाठी घरोघरी येतात छोट्या जीझसला 'मिकुलास' म्हणतात हा मिकुलास ६ डिसेंबरलाच गावात येतो ही सर्व मडळी घरी येण्याची मुलंमुली वाटच पाहत असतात त्याच्या आगमनाची खूण म्हणून घटा वाजवली जाते दारात लॉनवर बसलेली मंडळी दारात लावलेल्या X-mas ट्रीच्या झिरमिरत्या प्रकाशात घरात येतात कॅरोल्सची गाणी म्हणायला सुरुवात होते पूर्वापार पद्धतीप्रमाणे जीझसचा जन्मकाळचा देखावा X-mas ट्रीच्या बुंध्याजवळ मांडलेला असतो हा छोटा मिकुलास गावात येतो तेव्हा 'सेंट निकोलस डे' मानतात इटालियन लोक बॉक्सिंग-डे ला 'सेंट स्टिफेन्स डे' करतात, म्हणजे साधुसंतांच्या पुण्यतिथ्या, तुकाराम-बीज, सत नामदेवाची पुण्यतिथी पाश्चात्त्य देशातही आहे

जीझससारख्या सत्पुरुषाला हालहाल करून मारलं होत म्हणून २४ डिसेंबरला 'शोक दिन' (Mourning-Day) समजतात साऱ्या चर्चमधून सारख्या प्रार्थना चालू असतात सध्याकाळी येशूच्या जन्माची तयारी सुरू होते सारंगाच्या शाळेत मुलानी केलेला जन्मसोहळा मी

कालच पाह्यला तरी आज मेरीडिथबरोबर चर्चमध्ये जायचं ठरवलय त्याशिवाय सणाची सागता कशी होईल?

'चर्च ऑफ इग्लड' च्या नव्या इमारतीत हा सोहळा होणार होता प्रार्थना सुरूच आहेत चर्चचं बाहेरच आवारदेखील भक्तगणांनी भरून गेलंय आम्ही दोघी Please, excuse me म्हणत वाट काढत आत आलोय धर्मगुरू स्टेजवर उभे राहून श्लोक वाचून अर्थ सांगताहेत एक गवताची टोपली (पाळणाच इकडचा हा) स्टेजवर ठेवलीय पडदा बाजूला होतो जोसेफ मेरीला घेऊन गोठ्यात आला आहे गोठ्यात शेळ्या-मेंढ्या, गुरढोरं, रात्रीच विसाव्याला येऊन उभ राह्यलेल एक गाढव सन्नाट शांतता पसरलीय रात्रीचा अंधार दाटला आहे काळोखामुळे भीती भरून येतीय फक्त एका मेणबत्तीचा हलता प्रकाश वाऱ्याशी झगडत साथ देत आहे

"ह्याच वेळेस देशात अराजक माजलं आहे न्यायाची चाड राह्यली नाही सत्याला वाली नाही" धर्मगुरू कथेचा धागा उलगडून पुन्हा उचलून धरताहेत "कोणीतरी सत्पुरुष अवतरणार आहे धर्मसस्थापनार्थाय सभवामि युगे युगे", "बोला, पुडलिकवरदा"ची इथ आठवण झाली बाजूला नजर टाकली बरेचजण डोळे मिटून एकाग्रतेने कथा ऐकताहेत सुटाबुटातली माणसं रूमाल डोक्यावर घालून तटस्थपणे उभी आहेत शांतिदूताच्या आगमनापूर्वीची शांतता वातावरण निर्मितीला अगदी पोषक आहे टाळ, मृदुग व नामगजर असा काहीच कल्ला नाही आम्ही देवाला ओरडूनच का आळवतो, कुणास ठाऊक!

"सभवामि युगे युगे हे त्याच वचन तो प्रभू येशू खर करून दाखवणार आहे कथा पुढे सरकत होती" ज्या जीझसनी, लोकांना सत्याच मोल, शेजाऱ्यावर प्रेम करा हा साधा माणुसकीधर्माचा आचार सांगितला, सर्वधर्मसमभावाने पहा हे शिकवल, परमेश्वरावर श्रद्धा ठेवा, हे शिकवलं लोकाचा हृदयपालट करावा म्हणून स्वत च्या प्राणांचं मोल दिल तोच पुरुष पुन्हा जन्म घेऊन यावा, ह्याच पुनर्जन्माच्या सुखवेदना मेरीला होताहेत स्वत ची कूस उजवल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर उमटला आहे देवदूत, यक्ष-किन्नर, अप्सरा, स्वर्गातून पुष्पवृष्टी करताहेत ह्याचवेळेस आकाशात, एक दिव्य तेजोमय तारा, बाळाच्या, सत्पुरुषाचा

अवतार झाल्याची, आगमनाची वर्दी साऱ्या जगाला देण्यासाठी उगवला आहे हाच प्रकाशकिरण आज पुन्हा लोकांना चकित करतोय लोकांच्या नजरा वर खिळून राह्यल्या मी मान वर करून पाहिलं

"पॅलेस्टाइनमध्ये हा तारा, लोकाना प्रथम दिसला कोणीतरी जगातला अज्ञान-अंधार दूर करणारा आता जन्मला आहे हाच आपली दु.ख दूर करणार म्हणून लोक त्या ताऱ्याच्या दिशेकडे तोंड करून प्रार्थना म्हणत मार्ग काढत सारीकडूनचा जनसमुदाय हे अप्रूप पहायला गोठ्याजवळ आलाय मेरीच- ह्या जगन्मातेच कौतुक अपार आहे लोक आनंदातिशयाने बाळाच्या टोपलीला हात तरी लावावा म्हणून पुढे पुढे सरसावत आहेत ते बालरूप मेरीची कूस धन्य करून गेलय" कथेकऱ्यानी उत्तरार्ध रंगवून सांगितला- लोकाची तंद्री लागली होती सर्वजण नतमस्तक झाले होते दर्शन घ्यायला स्टेजवर जायची क्यू लावायची गरज नव्हती अंत करण कानाशी येऊन भिडलं होत सार हृदयाच्या गाभाऱ्यात साठवलं गेलं

वातावरणातला तणाव नाहीसा होऊन प्रसन्नता भरून राह्यलीय आपल्यासारखच आरतीच तबक फिरवताहेत तबकात पै-पैसा टाकून लोक मनोभावे हात जोडून अर्थात् त्याच्या पद्धतीनं, प्रसाद घेताहेत सत्कार्याला आज तरी हातभार लावत आहेत सत्पुरुषाच्या शिकवणीचे हे सस्कार, त्याच्या जन्मापासून, सोपस्कारासहित प्रात्यक्षिक करून असे दरवर्षी होत आहेत पारपरिक श्रद्धेला असा उजाळा मोठ्या उत्साहाने दिला जातो

त्या शात शिस्तीच्या देवळातून लोक बाहेर पडायला लागलेत वार्षिक धर्मऋण देऊन झालय चांगल असाव, चांगलं रहावं, वागाव, सगळ आम्ही प्रतिवर्षी अस प्रात्यक्षिक करून शिकतोय शिकण्याचा आव तरी आणतोय पण त्यावरची निष्ठा, ती भोळी श्रद्धा ते पापपुण्याचं भय नकळत ओसरत चाललय का चाललय हे मात्र समजत नाही

"Wish you Merry Christmas and Happy New Year" म्हणून मेरीडीथ निरोप द्यायला लागली रात्रीचे दोन वाजून गेले होते तशी मी भावसमाधीतून जागी झाले


दुसरे दिवशी २५ डिसेंबरला सर्वांचं गुड-मॉर्निंग, X-mas च्या

शुभेच्छा देऊनच होत  भेटवस्तूंची खैरात होते  बद केलेलं पॅक उघडणं हा एक वेगळा आनद  झाकलेला भविष्यकाळ असाच अगम्य असला तरी तो आनंद देणारा ठरो  ह्या सदिच्छा देण्याघेण्यात, आनदात नव्या वर्षाचं स्वागत होत

"नव वर्ष तुम्हा-आम्हाला सुखाच जावो! सर्वांना सद्बुद्धी देणार ठरो" हीच त्या जीझस ख्राइस्टची प्रार्थना करत १९७९ सालाला आम्ही निरोप दिला

(प्रकाशित - लोकप्रभा साप्ताहिक (आला नाताळ नाताळ) ता  २० डिसें १९८० )






# क्वीन्सलँड, सर्फरस् पॅराडाईज

वर्षातून एकदा सुट्टीवर जायचं हे आपण मानतो, आपल्याला जमत नाही हे सोडून द्या इथले लोक शनिवार-रविवारची सुट्टी घरात बसून फुकट घालवणार नाहीत बागेवर प्रेम करणारी ही माणस बगिचाची मशागत करतील पण ज्या आठवड्यात लेबर-डे, ऑलिम्पिक-डे, हॉर्स रेसिंग डे सुट्टी येईल ती सुट्टी शनिवार-रविवारच्या सुट्टीला जोडून लाँग-वीक-एन्ड करतील मग काय? आठवड्याचे चार दिवस भरपेट काम करून ही मडळी आपल्या गाड्या काढून आऊटिंगला बाहेर पडतील सपूर्ण आराम, भरपूर मजा करण्यासाठी ही सरकारी सवलत आहे

स्वत च्या गाडीला कॅरव्हॅन (फिरत घरच ते) जोडून कुठेतरी डोंगर उतरणीला वा नदीकाठी जाऊन राहतील काही मंडळी स्वत चे तबू ठोकून कंट्रीलाईफची मजा लुटतील थंडीचा देश असून मोकळ्या हवेवर जाण्याचं ह्याना फार बुवा प्रेम उलट आम्ही मुबईची माणसं आपल घर बर अन् आपण बर म्हणणार कोण जातोय त्या भाऊगर्दीत घाणीशिवाय घराबाहेर आहे तरी काय?

इथे घराबाहेर तशीच आकर्षण आहेत कामाचा शीण जाऊन कामात पुन्हा उत्साह वाटावा ही ही बाजू लक्षात घेऊन ती ठिकाणं, त्या जागा अशा साफसुथर ठेवतात आम्ही तर काय सुट्टीवरच आलोय आता नाताळच्या सुट्ट्या चालू आहेत तेव्हा क्वीन्सलँडला जायच ठरल ह्या स्टेटस्ला 'सन्-शाईन-स्टेट' म्हणतात तर समुद्र किनारा

'गोल्ड-कोस्ट' म्हणतात जललहरींवरचा स्वर्ग, 'सफरर्स पॅराडॉईज' ही गौरव-नाव मनाला ओढ लावणारी आहेत

क्वीन्सलँडच्या वाटेवर, डोंगराच्या विळख्यात विसावलेली गावं, त्यातून डोकावणारी छोटी छोटी बगलीवजा घरं, मधूनच नाटँग नदीचा झुळझुळणारा नृत्यझंकार, सुखावलेल्या मनानी डोळे भरून पहावं, केव्हा डोंगर चक्क आडवा येतो, तर लगेच चकाकत निघालेली, चकाकत चाललेली खालच्या झाडीत लपलेली रस्त्याची नागमोड, बाजूला पसरलेले हिरवेगार तृणांकुराचे गालिचे, गाडीतून उतरून घटकाभर लोळत रहावं, डोंगराचा उन्माद, पिकल्या पीचेसचा वास, मातीचा हिरवा-गर्भ-गंध, हरखून टाकणारी, उधळून दिलेली ही संपत्ती इथ कुपण कुठ आणि कुणी घालावी? खालच्या दरीचं वेगळच गुपित प्रियकराला भेटायला जायची वाट नदीला दाखवून द्यायच काम तिचंच त्याच प्रेमनिष्ठेने करतीय काय? डोंगर दरडीचा आडोसा घेऊन लपत छपत आपल्या प्रेमिकाला भेटायला जाण्यासाठी निघालेली नदी आपला झुळझुळता पदर सावरत निघालीय लाजतीय, मधेच मुरकतीय, पहिली भेट अशी थोडी चोरून, लपून छपून घ्यायची असते नाही का? तिची चोरटी चाल मी निरखत चाललीय हे तिला कुठ माहीत आहे? त्या मीलन-धुंदीच्या अधीरतेनं माझ्याकडे लक्ष द्यायला तिला तरी सवड कुठंय?

गोल्ड-कोस्टच्या बीचच्या बाजूने आम्ही चाललोय निळ्याशार समुद्राचा तळ, सोनेरी वाळूने झळाळून निघालेला दिसतो पाहुण्याचे स्वागत करायला सहस्र लाटा पुढे सरसावताहेत भरतीची वेळ गाठली खर म्हणजे भरती-ओहोटी हा नित्यक्रम त्यात नवलाई ती काय? पण सागरभरती पहायचा कुणाला कधी कटाळा आलाय? चढती वाढती लाटाची उंची, आपल्याला जणू खेळायला बोलावते भूतकाळावर पडदा पडतो हीऽहीऽ वर्तमानकाळाची लाटही ओसरणार असते भविष्याचा क्षणभर विसर पडतो पाय पाण्याकडे ओढ घेतात अरे, ही लहानशीच लाट आहे छे ही दुसरीऽ तिथेच विरून गेली. तिन का अवसान गाळलं? मला भ्याली की काय? अरे हीऽही मोऽऽठी लाट म्हणतेय या मजा लुटा पायावरचा ताबा सुटला, ते हळूहळू पुढे चाललेत की! गार पाण्याचा स्पर्श सुखावून जातो रश्मीचा दाह जाणवेनासा होतो ही ही लाट ही

पुन्हा मोऽऽठ्ठी आली, पायाला वेढून गुडघ्यापर्यंत लाट भिजवून गेली मी मागे मागे जाणाऱ्या लाटा, ते फेसाळ पारदर्शक पाण्याच अमृत, पुन्हा मला आत आत बोलावत एक, दोन, तीन डोंगर उंचीच्या लाटा समुद्र मथनातून पुढे येताहेत मी खाली वाकून बघतीय सोनेरी वाळू पायाखालून सरकतीय खसखशीपेक्षा बारीक असलेला सोन्याच्या लगडीचा चुरा इथे कोणी टाकलाय असा? मूठभर घरी घेऊन जावा देता किती घेशील दो कराने असं झालंय

अरे, हाताची मूठ दाबून भरून घेतली तर बोटाच्या फटी-फटीतून ही घसरून घरंगळत चाललीय अस होणार हे मी मोहाच्या धुंदीफुंदीत पार विसरून गेले म्हणजे हा अथाग जलाशय आपल्याबरोबर हे सोनेरी वैभव घेऊन जाणार तर? म्हणजे सोन्याचं आमिष दाखवून हा रत्नाकर मला फसवतोय तर! पुन्हा 'न्यायची ना तुला वाळू?' समुद्राचा तोच आवाज तोच प्रश्न जणू माझा पाठलाग करतोय रिकामी झोळी घेऊन पाय रुतणाऱ्या वाळूतून मी पाय काढत ओढत चालल्येय

रंगीत झालरींच्या छत्र्यांच्या छायेखाली बसलेली माणस, बीच-लाईफ एन्जॉय करताहेत काही कमीत कमी कपडे घालून बॉडी टॅन करताहेत डोळ्याला काळा चष्मा लावून, मधून मधून थर्मासमधली कॉफी पिताहेत लहानगी सन्-हॅट डोक्यावर घालून, काळा चष्मा नाकावर सावरत, गोरी-गोबरी मुलं कोकोकोलाच्या बाटल्या हातात घेऊन हुंदडताहेत फळ्यांना दोर बाधून, फेसाळ लाटाचा उन्माद वरच्यावर झेलून घेणारे हे 'सरफरर्स' अगावर खाऱ्या तुषाराचा मारा घेत, इतक्या वेगाने पुढेपुढे, उच उच लाटाचे डोंगर पायाखाली टाकत अलगद चढतात, खाली उतरतात पाहणाऱ्याला भयचकित करणारे हे खरच आयुष्याबद्दल बेपर्वा आहेत की हा बेहद्द आनद लुटण्यासाठी जीव झोकून देताहेत? हा आनदाचा ठेवा बरोबर घेऊन जाण्यासाठी बदलणाऱ्या ऑटम-ऋतूची वाट पहात असतात अगातली थंडी घालवण्यासाठी क्वीन्सलँडला गर्दी होते

लहान मुल फळ्यावर उभ राहून सागर-खेळाच साहस करतात ते पाहून माझ्या पोटात गोळा येई त्या फळीसुद्धा पोर उलटा सुलटा होऊन, लाटेच्या जबड्यात गडप झालेला दिसायचा तर क्षणार्धात फेस आमच्या पायाशी टाकून लाट पार मागे ओसरून गेलेली असायची फेस पवित्रतेची ग्वाही देतोय समुद्र पोटात काहीच ठेवत नाही म्हणतात

ह्या गोल्ड कोस्टला शोभणारी डोंगरपायथ्याशी असलेली गोल्डन लीफची रुंद पिवळसर पानाची, पिवळ्या धमक रंगाच्या फुलमोहरानी लगडलेली बॅटल्-ट्रीज 'समसमा सयोग की जाहला' म्हणायला लावतात क्वीन्सलँड जवळचे स्फटिकासारखे स्वच्छ पाण्याचे झरे, धबधबे बगीचे, आणि कबरलीन गावातली 'BIRD SANCTURY' सगळच लक्षात राहण्यासारखं आहे हजारो जातींचे पक्षी, आपल्या चित्रविचित्र रगाची भर टाकून, वेगवेगळ्या आवाजांनी खुशी दाखवताहेत ''कोण चितारी कसा रगवी पक्ष्याची दुनिया?'' कविता ओठावर घोळत राहते

समोर दिसणारा हा 'मरीना-मिराज' (Marina Mirage) स्वत च्या बोटी घेऊन येणाऱ्या प्रवाशांसाठी बोटी, मचवे उभे करण्यासाठी आखून ठेवलेली ही गोल्ड कोस्टची एक बाजू ह्या बाजारपेठेच नाव, व तशाच बोटीच्या आकाराचा हा मरीना मिराज 'शॉपिग हॉल' इमारतीवरचा डोम (Dome) बोटीच्या शिडासुद्धा केलेल ते शिल्प- प्रवासी आकर्षण करताना आपल्या गोल्ड-कोस्टच सौंदर्य खुलवायला ते विसरत नाहीत

भारतासारखी उष्ण हवा म्हणून इथे आबा पिकतो केळी, पपई, ताडामाडाची उच झाड पुष्कळ दिवसांनी पाहिली हो, पण क्वीन्सलडचा आबा दक्षिण ऑस्ट्रेलियात आणून दिला नाही एक सडका आंबा आढी नासवतो म्हणतात तर एखाद किडीच धान्य-बीज साऱ्या जमिनीचं वाटोळ करील म्हणून ह्या लोकाच हे डोळ्यात तेल घालून जपणं आबे अगदी तपासून आणतात खाजगीरीत्या एकही आबा आणून देत नाहीत

इथे कुणाला हवाय हा आबा? रत्नागिरी, देवगडचा राजा हापूस खाल्लेली आम्ही माणसं असला पायरीसारखा दिसणारा आबा खातोय होय? हे बाहेर म्हणायला, पण हा एकदीड डॉलरला एक आबा आमच्या बापजाद्यांनी सुद्धा खाल्ला नाही असं सागतो हा परवडतोय कुणाला मिजास बादशहाची बाळगून आहोत!

मावळत्या सूर्याची सोनेरी कड, सोनेरी किनाऱ्याच्या पाण्यावर पालथ्या लाल रगाच्या धडासारखी दिसतीय सगळच वैभव संध्या-रगांनी पुन्हा उजळून दिसतंय वर चवथीचा चांद आणि वाढत्या चंद्रकलेबरोबर पुन्हा सागर-लहरींचं नृत्य सुरू होईल न थकणारा जलधी सोनेरी वाळू मुठीनी चुरमुडत हा गोल्डन कोस्ट थकलेल्या पायांनी भारवलेल्या मनानी आम्ही पुन्हा तिथेच बसलो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. प्रवास ५८८
क्र. २८७८४
२२।१२।९७
शाखा (स्थळ प्रत)

# प्रवाळ खडकाचा किनारा

इथल सर्वांत मोठ्ठ आकर्षण म्हणजे 'कोरल्स-बीच' 'पोवळ्याचे किनारे' शब्दश समुद्रात खसखस पिकलीय! ते खम्पखशीचे दाणे तऱ्हेतऱ्हेचे रग व चमत्कारिक आकार घेऊन वर उठावेत, महासागराचं रूप काजव्यांच्या लुकलुकण्यान प्रकाशित रहावं, त्या खसखशीच्या रगीत दाण्याना, त्या उजेडानी उजळून टाकाव, जगाचे डोळे दिपून जावेत, असा हा प्रवाळाचा किनारा नजर टाकताच मन बेभान झाल ज्ञानेश्वराच्या साहित्यालंकारासाठी हा इथे उपमाचा खच पडलाय! कशा तऱ्हेने, किती व कोणते अलकार घालून ज्ञानेश्वरांनी हा रत्नाकर सजवला असता? "देव हा 'स्त्री'च असला पाहिजे म्हणूनच त्याला हिरेमाणकाच्या, पाचूजडावाच्या आभरणाच इतकं प्रेम दिसतंय" अस एक प्रवासी रॉबीन डॉनहॉर्न म्हणतो खरच, लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे ही कोरल्स-गार्डन बघून श्वास रोखून धरला जातो माझाही एक क्षण आवढा गिळायचा राहिला, का नाडीचा ठोकाही थांबला, समजल नाही

हा कोरल्स-बीच - ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्याचा एक कोपरा २००० कि मी दूरवर पपुआ गिनीपर्यंत पसरलेला छोटी छोटी सत्तेचाळीस बेटं अशा किनाऱ्या-किनाऱ्याला आहेत प्रवाळ खडकांच्या शेकडोवारी जातींमध्ये इद्रधनुष्याचे रग, चित्रविचित्र आकार, कुठ माणसाचा आभास उत्पन्न करतात, आकाशातले ढग चकवतात ना, तस

इथ होतय हजारो कासवांच्या पाठी अशाच रंगछटांनी झाकल्या गेल्या आहेत माशाच्या पधराशेएक जाती! अशा नवनवीन रगांनी नटल्यात सुळकन् इकडून तिकडे जाणाऱ्या मासोळ्यांच्या अंगावरचा रग असा काही चमकायचा, की हिरेजडित अलंकारानी नटलेल्या मत्स्यललना ठुमकत मुरकत घाईगर्दीनं कुठे निघाल्यात बुवा? हे मोठे मत्स्यराज, देवाचा पहिला अवतार ह्या दरबारी डौलाने मागून चाललेत पण! ह्या प्राण्यांना प्रवाळाचा गुण नाही पण वाण लागलाय खरा' आणि स्वसरक्षणासाठी त्यांनी तो आनंदान पत्करला असावा

मुंगीनी हत्तीला हैराण करावं तसं एक सूक्ष्म किडा, पॉलिपस, एक किडा तो काय, पण त्यानी महासागराचा १५०० मैल किनारा व्यापून टाकावा? त्या किड्याच्या उत्पत्तीतून होणाऱ्या कॅल्शियमच्या स्त्रावातून १०,००० वर्षांत तयार झालेले हे प्रवाळाचे अगणित खडक. त्याला अगणित छिद्रं, अगणित अडी, सतत चाललेली ही उत्पत्तीची क्रिया! पाणशास्त्रज्ञाना नुसता खजिना सापडल्यासारख झालंय त्याच्या धैर्याला, ज्ञानलालसेला एक आव्हानच मिळालय

ह्या एवढ्याशा किड्यांच्या अणकुचीदार घरशिखरांची, त्या तीक्ष्ण, भल्याभक्कम खडकांची, कॅप्टन कुकला, स्वत च्या छोट्या 'Endevour' जहाजाला, धोक्याचा भाग म्हणून सतत काळजी घ्यावी लागत होती त्यानतर १८ व्या शतकात पोर्तुगीज, डच, फ्रेंच ह्या लोकाना ह्या समुद्रकिनाऱ्यांच तेवढंच आकर्षण वाटल ह्या खडकाखाली तेल, इतर काही भूगर्भातील खनिज मिळतील म्हणून बरीच मडळी दूरदूरच्या देशांतून इथे आली व्यापाऱ्यांचा धंदेवाईक दृष्टिकोण, इतक्या सुंदर कोरल्सचा सत्यानाश म्हणून ऑस्ट्रेलियातली मंडळी पुढे सरसावली आमचा, 'ह्या बेटावर हक्क आहे, ती आमची आहेत आम्ही इतर कोणालाच अतिक्रमण करू देणार नाही' त्यानी अस ठासून सागितल ह्या बीचच्या, हक्क व सरक्षणासाठी त्यानी The Barrier Reef Marine Park Authority अशी सस्था स्थापन केली अगदी अलीकडे म्हणजे १९८० मध्ये युनेस्कोने, 'जागतिक सौंदर्य स्थळ- एक आश्चर्य' म्हणून ह्या कोरल्स बीचच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली आहे

ह्या कोरल्स खडकाचा मूळ गाभा शभर मीटर जाडीचा आहे

कुठे तो जमिनीपासून २४० कि मी आत आहे तर कुठे १६ कि मी अतरावर आहे वादळवारा, कडक सूर्यप्रकाश ह्या गोष्टी ह्या जीवजिवाणूंना हानिकारक आहेत म्हणून हे पॉलीप्स किडे पाण्याच्या पृष्ठभागावर कधीच येत नाहीत त्याचा विस्तार, पाण्याचा एक थर अगावर ठेवून होत असतो पाण्यातला पाणजीवांचा हा हलता 'म्युझियमच' म्हणावं अस वाटत


काचेचा तळ असलेल्या बोटीतून आपण फिरून येतो, तेव्हा मंत्रमुग्ध होतो ह्या निसर्गनिर्मितीच्या अद्‌भुत सौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेता यावा म्हणून इथल्या लोकांनी ही केलेली चोख व्यवस्था, मजेशीर आहे पोवळ्यांचे, रत्नपाचूंचे, हिऱ्यामाणकाचे ढीग हाताने पसरावेत, नवरत्नांचा साज गळ्यात घालून पहावा असा क्षणभर मोह होतो वरचा सूर्यप्रकाश ह्या बोटीच्या काचेच्या तळातून परावर्तित होतो तो चमचमाट वेगळाच तर रात्रीच्या वेळेस तारागणातून आपण फिरतोय, सहज मूठभर तारका बचकेत घ्याव्यात, असा वाटणारा तो दिव्याचा लखलखाट वेगळाच तर, तम ठरवताच येणार नाही

ह्या एवढ्याशा जीवाना हात लावायचा, छे, ते मात्र शक्य होत नाही हे सारे जागृतावस्थेत आहेत शेपटीवर पाय पडला तर नागान फडा काढावा, विचवान नांगी मारावी, असं ह्यांच आत्मरक्षण भयंकर आहे तस जहरी विष, ह्यातल्या पिंगट, पिवळसर रंगाचे प्रवाळ बाळगून आहेत म्हणे काही ठिकाणी ह्या छोट्या प्राण्यांनी आपल्या घरकुलांचा फुलोरा फुलवला आहे निवडुंगासारखी भासणारी व निवडुंगातूनच उगवणारी अनाकलनीय फुलं ते अवर्णनीय रंग, ते तुरे, तांबडे-पिवळे, निळे-जांभळे, रंगसंगतीच ज्ञान ह्याना पण आहे तर!

माणसाने मारे बॅरीअर्-रीफ् च्या संरक्षणाची योजना आखली पण ते प्रवाळ पीक कमी करण्याचं सामर्थ्य माणसात नाही निसर्गाचे हे काम सथ गतीने पण अगदी अव्याहत चालल आहे देवाची करणी म्हणून गप्पच बसायच की काय!

क्वीन्सलॅंडची ट्रीप काढण्याच सार्थक झाल असा हा प्रवाळ-किनारा पाहून वाटलं, ह्या राणीच्या नावाची राणीच्या मालकीची जमीन राणीच्या जागेजवळ हा नवरत्नाचा खजिना असण उचितच आहे म्हणाना! क्वीन्सलॅंड पासून अवघं ७५ कि मी दूर आहे ही कोरल्स-पार्क! हॉटेल

मोटेल्सची व्यवस्था आहेच पण आता काश्मीरसारखी फिरती बोट-घर बाधण्याची योजनाही आहे त्याचबरोबर प्रवाळ-खडकांना धक्का व नासधूस न व्हावी ह्याची तितकीच काळजी घेताहेत भरपूर नेत्रसुख मिळाल्याच समाधान बरेच दिवस टिकणारही होईल अस वाटतंय



# आयर्स रॉक (Aryes Rock)

भारतात परत जायचे दिवस हळूहळू जवळ येत चालले, अजून काय पहायचं राहिलय? कुठ जाणं शक्य आहे असा विचार करत होतो "आयर्स रॉक पहायचा राह्यलाय दादा तुमचा" सुहास म्हणाला "हा एक जगप्रसिद्ध रॉक आहे, जाऊ या ना पाह्यला" आशा म्हणाली "आपल्या देशातही रॉक्स् आहेत ना दगडधोंड्याच्या आपल्या देशात म्हणूनच कणखरपणा आहे हैद्राबादला जाताना केवढाले दगड, दगडांचे ढीगच्या ढीग असतात नाही का हो?" मी म्हटलं "आपण मोठ्या पत्थरातच पत्थराने बांधलेलं एक घर पाहिलं होत नाही?" मी त्यांना आठवण करून देत होते "अग, हैद्राबादच्या त्या वेळच्या गव्हर्नराचा बंगला होता तो त्यांनी चहाला बोलावलं होत कॉन्फरन्सच्या साऱ्या लोकांना छोटासा म्युझियम मांडला होता बघ आशा" ह्यांच्याही स्मृती जाग्या झाल्या

"खरच सुहास, हैद्राबादच्या बाजूला प्लॉट घेण्यापेक्षा असा एक मोठा दगडच विकत घ्यावा असं वाटल मला त्यांच्या घराच्या, अनायासे झालेल्या पत्थराच्या ओबडधोबड भिंती, ते दगडातले कोनाडे इतकं सगळ नॅचरल व आर्टिस्टिक वाटत होत बघ" ही बोलणी इथंच थांबली

माझ्या मनातले दगड हालेनात दगडांचा हा भार जमिनीला पेलवतो तरी कसा? कुठे भुसभुशीत जमीन खणून खाण मिळते तर

कुठं असा पत्थर, की जागचाही हलू नये? कुठे मातीचे डोंगर वृक्षभार घेऊन उभे तर कुठे दगडांच्या दरडी, उच भिती भूभागाच्या वाटणी करून मोकळ्या होतात, देशाच्या सीमा ठरवल्या जातात जम्मू-काश्मीर प्रवासातली एका बाजूला सारखी लागलेली उचच्या उंच भिंत डोळ्यांसमोर उभी राह्यली पलीकड दुसर जग! इथ ऑस्ट्रेलियाची खाण-जमीन व दगडाचा पर्वत व दगडाचा असा एकसघी डोंगर असावा म्हणजे निसर्गाने, त्या कोणी परमेश्वराने आपली भूगर्भातली तशीच, भूमीवरची सर्व सपत्ती सर्वांना सारखी वाटून दिलीय! मग दगडवाटणीत विषमता कशी आहे? आयर्स रॉक पाहण्यापूर्वीच विचाराच चक्र न विचारता अस फिरत गेल

ऑस्ट्रेलियाचा 'नॉर्दर्न टेरिटरी' (Northern Territory) हा मधला भाग रूक्ष वाळवंट आहे ऑस्ट्रेलियाचा काळजाचा भाग मृतवत् आहे अस कुणीसं हे वाळवंट पाहून म्हटलही आहे देशाचा हा मध्यवर्ती भाग भयानक एकाकी, गडद लालसर, कावेच्या रगाच वाळवट व रखरखीतपणानं माणसाला सारखं पाणी पाणी करायला लावणारा आहे अस भूगोलाच्या पुस्तकात देऊन शिकवल जातं अशी तक्रार एक लेखक, भूगर्भशास्त्रज्ञ करतो पाऊस ह्या भागात अगदी कमी ८ ते १० इंच पडतो इतकंच तरीसुद्धा ह्या भुरभूर पडणाऱ्या पावसाने काही वनस्पती तग धरून आहेत काही जीवजिवाणू प्राणी इथं जगतातही म्हणून काही हवामानशास्त्रज्ञ ह्याला वाळवंट म्हणायला तयार नाहीत ह्या भयकर उष्ण हवेत दुष्काळी भागात वाढणारी झाड आहेत तव्हा वाळवट जाग आह अस भूगर्भशास्त्रज्ञ ठासून सागतात

वाळवंटाच्या बाजूनी पर्वताच्या रांगा आहेत पुरातन काळच्या वाळवंटातल्या ह्या डोंगरदेवाना 'अलाइस-स्प्रिंग' ह्या गावातून जाव लागतं प्रथम मॅकडोवेल आणि मस्ग्रेव्ह पर्वत लागतात मोटारयुग आल्यानंतर लोकांना इथं येणंजाणं सुकर झालं इथली सिझनची थंड हवा (जूनपासून पुढे) घेतात हे मोठमोठे दगड, दगडाच्या दरडीतून पत्थरावर उमटलेले युगायुगाचे थर आपला पुरातनपणा सिद्ध करतात हवेत उडता यायला लागल्यावर आता वेगवेगळ्या ग्रहावरचं जग पहायला माणूस धडपडत आहे तर समुद्रसपाटीखाली जाऊन डायनोसॉर प्राण्याच्या

पाऊलखुणा तपासून पहात आहे अलाइस-स्प्रिग पासून २५० मैल साऊथ-वेस्ट ला पिटरमन पर्वताची राग आहे ह्या पर्वतराजींच्या शेवटी जगातला सुप्रसिद्ध असा मोठा एकसंघी दगडाचा खडक आहे हाच तो आयर्स-रॉक गारगोट्याच्या खड्याचे एकत्र जमलेले, एकावर एक चिकटून बसलेले हे थर स्तिमित करतात ह्याची शिखर-उची (तस शिखर नाहीच आहे समुद्रसपाटीपासून २,८०० फूट आणि लबवर्तुळाकार रुदी, १ १४३ फूट समोरच्या फलकावर वाचली ६ मैल घेराचा परीघ असलेला हा प्रचंड, काळपट लाल विटकरी रगाचा हा लाबट गोल खडक मोठी टोपी पालथी ठेवल्यासारखा दिसतो

आम्ही ११ वाजता इथे येऊन पोचलो सूर्याची किरण डोळ्यावर घेऊन बसकण घालून बसलेला हा खडक आता एका मोठ्या डोमसारखा दिसत होता फिरत्या किरणामुळे होणारा खडकाचा रगपालट फोटोत टिपण्यासारखा वाटला मागचं एनॅमलच्या रंगाचं निळं आकाश हा खडक आणखी मागं सरकवीत आहे अस ते प्रचड रूप पाहून सारख मनात येत होत त्या आयर्स-रॉक च्या दैवताला - उन्हात प्रदक्षिणा घालण शक्य नव्हतं पुळ्य च्या · गणपतीच्या डोंगराला समोरच्या अथाग पसरलेल्या समुद्राकडे बघत ऊनसावलीतून, चढउतारावरून गप्पा मारत आम्ही दोन दोन प्रदक्षिणा घातल्या होत्या, त्याची इथ आठवण झाली डोंगराना दैवत मानणारी मडळी आम्ही! पुळ्याचा डोंगर पासगालाही पुरणार नाही असा हा आयर्स-रॉक, किती युग असा देवासारखा उभा आहे कोण जाणे! माणसाची शक्ती त्याला हलवायला असमर्थ ठरली आहे, पण हा अजस्त्र खडक चढून जाण्याच रेकॉर्ड-ब्रेक फक्त १४ मि १६ सेकदांत केल्याची नोंद आहे

इथून जवळच असलेल्या 'मटिगुलाना'च्या डोंगराजवळचे पाण्याचे झरे जनावरांना मोठ आकर्षण आहेत झऱ्यावर पाणी प्यायला, तांबड्या-विटकरी केसांच्या कांगारूंचे कळप, शहामृगाच्या जोड्या येतात, घटकाभर बसतात, पुन्हा आल्या रस्त्याने जातात

आम्ही थर्मासमधील गार कॉफी घेतली दिवस उतरणीला लागला होता, पुन्हा आयर्स-रॉकजवळ आलो फक्त त्या खडकाच्या सोबतीत राहणाऱ्या आदिवासी लोकानी खडकावर चित्रं कोरली आहेत त्यावरून

कित्येक युगापूर्वीची पुराण-पुरुषांची विचारसरणी, ते अनादी काळातल त्यांनी उरी बाळगलेलं स्वप्न इथं दृग्गोचर होतं ह्या चित्ररेखाची इतिहास सशोधकाना मोठी मेजवानी आहे कालांतराने ती पुराणकाला पुसट होत जाईल की काय, अशी भीती आहे सूर्याच्या संध्याकिरणानी आयर्स-रॉक आता पार सारा सोनेरी झालाय आहे खरा प्रेक्षणीय आयर्स रॉक। डोळ्यानी कबुली दिली

देशाच हे आगळ रूप पहात निघालो हे एक हौशी प्रवाशाना पहाण्याच ठिकाण होईल, म्हणून त्याची जाहिरात करून देशाच्या उत्पन्नात भर कशी पडेल ह्यावर हे लोक लक्ष ठेवून आहेत आपली टिमकी वाजवून पोळी पिकवायची ही एक कला आहे त्यासाठी प्रवासाची साधनं, प्रवाशाच्या सुखसोई, ते सगळ अगदी चोख काम करणार नुसतं दुसऱ्याच्या पोळीवरच तूप खायच, अस नाही


भारतातली कितीतरी प्रेक्षणीय स्थळ जीर्णावस्थेला पोचली आहेत जुनं नाहीस होत चाललय व नव आम्ही काही उभारू शकत नाही साधी शकराच्या देवळाभोवती तळी नौकाविहाराला योग्य करून आजूबाजूला सौंदर्य पहावं, दुसऱ्यांना बोलावून दाखवावं हे नाहीच, पण सगळा कचरा, निर्माल्य, धुणपाणी करून आम्ही ती बुजवायला आणलीत त्या साचलेल्या घाण पाण्यात, त्या तळ्यात आम्ही गणपती विसर्जन करतो सारसबागेचं त्या गणपतीभोवतीचं तळ, त्या चालणाऱ्या नावा इंग्रजी राजवटीत होत्या - असं एका चित्रकारानं काढलेलं चित्र आम्हांला टास्मानियात पहायला मिळाल होत 'टास्मानियात पेशव्याचे पुणे', पाहून अभिमानान मान ताठ झाली होती त्या चित्रकारानं सारस-तळ्याच सौंदर्य टिपल होत ती दृष्टी आम्हाला नाही आमची हिंदूभूमी एकेकाळी सुवर्णभूमी होती, सौंदर्यसपन्न होती, सोन्याची द्वारका होती हे सागायची आता लाज वाटायला लागली आहे तरीसुद्धा, केशराच पोतं झाडलं तरी वाया जात नाही म्हणतात - तसं अवशेषात्मक राहिलेला प्राचीन भारत पहायला हौशी प्रवाशी मडळी येतातच

पण त्या मंडळींना खोट्या चंदनाच्या वस्तू, संगमरवरी ताजमहाल म्हणून सगजिऱ्याचा दगडी ताजमहाल गळ्यात बाधणारे व्यापारी आहेत खोट्या ऊदकाड्या, सुगधी उदबत्त्या म्हणून विकणारी पोर टुरिस्ट बस

भोवती झुम्मड उडवून देऊन हातोहात फसवणारी, फसवण्यातच हातखडा असलेली आम्ही मडळी तात्पुरता पैसा व कायमचा बदलौकीक कमावत आहोत तेच आमच्या अगवळणी पडत चाललय, का आम्ही बुद्धिपुरस्सर करत आहोत? परदेशाचे दौरे करून, इम्पोर्टेड माल आणण्याखेरीज आम्ही काहीच शिकणार नाही का? त्याचं चांगल केव्हा घेणार? देशाचं भलं केव्हा करणार? अस काहीतरी डोक्यात भरकटत राहतं

त्या आयर्स-रॉक जवळच्या शांत सौंदर्याचा निरोप घेतला सूर्यकिरणाचा सरता खेळ, ओसाड डोगर शिखरांचे बदलते रंग, त्या वाळवंटावरची दूरवर पसरलेली काळी मखमाली पडछाया मागं टाकून आम्ही परतीच्या मार्गाला लागलो

प्रकाशित - मनोहर ६-१२ जून १९८२ साप्ताहिक मनोहर



# टास्मानिया - एक एकाकी बेट

जलमय सृष्टीत कुठूनतरी कोणालातरी दिसलेला हा एक मातीचा ठिपका! चद्रावर जाऊन माणसाला विज्ञानप्राप्तीचा आनंद झाला असेल पण निसर्ग चमत्काराचे कौतुक पहायला माणसाला खालीच याव लागेल ह्या निसर्गशक्तीशी सामना देत, धरणीमातेच्या पाठीवर गगनचुंबी इमारती उभारणाऱ्या माणसाचं अलौकिक बुद्धिवैभव आज ह्या एकाकी बेटावर साक्षात् साकार झालं आहे

आम्हाला ॲड्लेडहून मेलबर्नला जावं लागल विमानतळावर हे छोटसं प्लेन, टास्मानियाला जाण्यासाठी उभंच होत समुद्रावरून ४८० मैल अतर आडवं जायची ही पहिलीच वेळ, भारतातून लंकेला जायची कधी वेळ आली नाही आता मी ऽऽ इथे ऽ म्हणेपर्यंत जमिनीचा ठिपका जवळ यायला लागला कॅप्टनसाहेबांना आमच्या सारखीच उतरण्याची घाई झालीय वाटत खालच्या हिरव्यागार रानावर तादुळाचे दाणे पडलेत, अन् ते असे हलताहेत काय! अस म्हणतीयऽ तोऽ हवाई जहाजाचे पाय खाली टेकले, अरे, ते हलणारे तांदुळाचे दाणे नव्हते, पाढऱ्या शुभ्र लोकरींनी लदडलेल्या मेंढ्या त्या! कशी कल्पना डोक्यात घुसली होती पहा

दक्षिण गोलार्धातल्या दक्षिण टोकावर माझे पाय टेकतील अस कधी स्वप्नातही आलं नव्हत दक्षिणेकडे पाय करू नयेत; ती यम-दिशा

आहे एवढं मनावर बिंबलेलं होत, पण आता दक्षिण टोक सागराच्या पार अनतत्वाला चिकटून असलेल, प्रत्यक्षात पहात, त्यावरच पाय रोवून आम्ही उभे आहोत की! खडकावर आपटणाऱ्या सागर-लाटा पाहून, खडक ही धरणीची बळकट हाड आहेत हे वाचलेल प्रत्ययास आल निसर्गाच्या वैभवसपदेचे वर्णन करताना जपानी लेखक म्हणतो, पूर्वेकडचा माणूस निसर्गाशी एकात्मता दाखवतो, हिरव्यागार गवताचा रग आत्म्याच्या अमरत्वाचा आहे प्लमचा वसंतबहार शौर्य खुलवतो तर पाण्याचा पडता प्रवाह, कधी दिसणारा कधी न दिसणारा (गुप्त प्रवाह) 'जीवन-मरण-पुन्हा जीवन' ह्याचा प्रत्यक्ष दाखला आहे अशा कल्पना रगवताना तो पुढे ठामपणे म्हणतो, ''पाश्चिमात्य मडळी मात्र निसर्गशक्तींशी सामना देताना ह्या वैभवाला कमी लेखतात, आम्ही पूर्वेकडची माणस निसर्गापुढे नतमस्तक होतो, एवढंच नव्हे तर स्वत-ला त्याचाच एक अगभूत भाग समजतो '

लॉनसेस्टन्‌चा, विमानतळ हा टास्मानियाचा दिंडी दरवाजा आहे टूरच्या बस ड्रायव्हरनी स्वागत केलं 'टमार' नदीच्या काठाने बस चाललीय तुरळक वस्तीच हे हरभर गाव हरिद्वारची आठवण करून देतय, ही निसर्गाची पार्श्वभूमी समाधि-साधनेला उद्युक्त करणारी आहे टेकडीवर मोर लांडोरची जोडी दिसली ते इंडियातून इम्पोर्ट केलेत म्हणे, तर 'एटली-हाऊस' नॅशनल म्युझियममध्ये चक्क पुण्याच्या पर्वतीचे (चित्रात) दर्शन झाल १८१९ साली बांधलेला हा म्युझियम्! एन्टली हे कलकत्त्यातल्या उपनगराच नाव तिथेच राहलेल्या एका इंग्रजी सोजिरानी ऑस्ट्रेलिया हे खंड, स्वत इथं स्थायिक होण्यासाठी निवडले व तिथून टास्मानियात येऊन त्यानी खूप मालमत्ता केली ह्या भागाला, आपल्या घराला हे अस 'एन्टली' भारतातल्या गावाचंच नाव दिल त्याच्या ह्या सग्रहासाठी पुण्याच्या पर्वतीच चित्र निवडलं गेलं, ह्याचं नकळत मोठं समाधान वाटल सारस बागेतला गणपती व बाजूच्या तळ्यात चक्क नावा चाललेल्या दिसत होत्या चित्रात तारीख होती १८०० मधली

बसमधून टूर घेतली असल्यामुळे, देशाचे अंतरग पाह्याला मिळत होत शेतीभातीचे मळे, पानाफुलांच्या जाती, झाडाची जथाबळ, मूळ

रहिवासी मार्सुपिअल प्राण्यांची वशावळ, पक्ष्यापक्ष्याचे वेगळेपण, आडव्या येणाऱ्या लहानमोठ्या नद्या, मागच्या डोंगराच्या रागा, तर कुठे लाब क्षितिजाला टेकलेली माळरानं, शेळ्यामेढ्यांचे अगणित कळप, काही म्हणून काही दडून राहत नाही, आपण जणू नव्या भूमीशी मैत्री करून तिच्याशी मोकळ्या चाकळ्या गप्पा मारत चाललोय असं वाटत होतं

१६४२ साली 'एबल टासमन' (Abel Tasman) ह्या डच खलाशानं ह्या निर्जन बेटावर उतरण्याचं धाडस केल 'Van Diemen's Land' हे बेटाला नाव दिल बाळ मोठ होताना पहाण्यात कसा आईचा आनंद सामावलेला असतो, तसच देशाची जडणघडण करतानाही कर्त्याच्या आनदाला उधाण येत असेल पोटात सामावलेलं दगडमातीचे हे अदृश्य स्वरूप, कुठे ज्वालामुखीची धगधगती आग-दरी, कुठे बर्फाने झाकलेले डोंगरमाथे तर खाली, बर्फाचा गारपणा घेऊन बेफाटपणे वाहणाऱ्या नद्या, त्या खळखळाटाने पाथस्थाला वाट दाखवण्याच काम चोखपणे केलं असेल हळूहळू सगळच कस उलगडत गेल असेल

ऑस्ट्रेलियाच्या पायथ्याशी, असलेल बदामाच्या आकाराएवढ छोटंस हे बेट, अगदी भारताजवळच्या सिलोन बेटाची आठवण करून देतं हिंदी महासागर आणि पॅसिफिक समुद्राच्या पृष्ठभागावर येऊन विसावलेल हे बेट फक्त १८० मैल लाब x १८५ मैल रुद आहे २६,३८३ स्केअर मैल क्षेत्रफळ पण वृक्षराजी किती दाटीवाटीने बसल्यासारखी दिसतीय झाडांचे हे अगडबंब बुधे आपल वय चोरून ठेवू शकत नाहीत लाखो वर्षांची ही झाडं व टास्मानियाचे हे पर्वत, आल्पस् व आपल्या हिमालयपर्वतावरही दादागिरीचा हक्क सागण्याइतके जुने आहेत अस वनस्पतिशास्त्रज्ञ सागतात नद्या देशाच्या उभारणीला हातभार लावण्याइतक्या मोठ्या आणि भरपूर पाण्याच्या आहेत ऑस्ट्रेलियातले बरेच हायड्रो-इलेक्ट्रीक पॉवर प्रॉजेक्टस् ह्या त्यांच्या छोट्या स्टेटस्मधे आहेत तसच सोन, चादी, ताब, जस्त, शिसं ह्या धातूपासून कोळसा चुनखडीपर्यंत साऱ्या सपत्तीची भूगर्भात साठवण होती किती वर्षं ही धनसपदा अज्ञात होती कोण जाणे मोठमोठे लालमातीचे डोंगर व ताब्याच्या ह्या चकचकीत वस्तू पाहून माणसाने निसर्गाचं हे केवढ आव्हान झेलून दाखवलंय अस मनात येतं

संध्याकाळी आम्ही होबार्टला पोचलो राजधानीचं वैभव घेऊन हे शहर डरवेंट नदीच्या काठावर उभ आहे शहरावर माऊंट वेलिंग्टन्ची सावली आहे नदीवरच्या ब्रीजनी हे शहर पूर्वकिनाऱ्याला जोडलेलं आहे ब्रीजचं नावही 'टासमन ब्रीज' जवळच्याच हुनान खोऱ्यातला, सफरचंदाचा बहार बस् ड्रायव्हर वर्णन करून सांगत होता 'इथल्या सफरचदाची निर्यात जगातल्या फळबाजारात होते' टास्मानियाचा इतिहास, भूगोल त्याच्या तोंडात होता ड्रायव्हर टास्मानियातच जन्मलेला साहजिकच त्याच्या कॉमेन्ट्रीला मायभूमीच्या प्रेमाची झालर लागली होती

शहरापासून १२७१ मीटर उच असलेल्या माऊंट वेलिंग्टन् पर्वतावर उभं राहिल्यावर डरवेंट नदीच खोर ११० मैल दूरपर्यंतचा टास्मानियाचा आसमत, तो पूर्वकिनारा स्पष्ट दिसतोय वार इतके भयकर सुसाट सुटलय की माणूस स्थिर उभ रहाणं शक्य नाही. 'सूर्य आणि वारा' ह्याच्या श्रेष्ठत्वाबद्दलची भाडणाची गोष्ट, शाळेत दुसरीच्या धड्यात होती इथ वाराच श्रेष्ठ म्हणण्याची वेळ आलीय दरीत डोकावून पहाणं म्हणजे स्वत ला लोटून देणं आहे म्हणून तोंड वळवली शब्दश वाऱ्याला पाठ देऊन, एकमेकाना सावरत, पावसाचे धावरे थेंब अंगावर घेत कुडकुडत, दरीत ढकलतो गेलो नाहीत ह्या समाधानात आम्ही बसमध्ये येऊन बसलो

आता 'जुनं होबार्ट' शहरातून बस जातीय एका पगू माणसान मॉडिल करून उभं केलेल इंग्लिश "ट्यूडर खेडं" पहायला खाली उतरलो अशाच एका पंगू माणसानं, आपलं पगुत्व विसरण्यासाठी ह्या विवक्षित छंदाच्या ध्यासान केलेलं हे स्तिमित करणारं मॉडिल आदर्श व अद्ययावत खेड्याची त्याची त्यावेळची ही कल्पना ! थोड्याच अतरावर इथल्या एका आदिवासी माणसाच्या नादिष्टपणान उभा केलेला जुन्या पुराण्या वस्तुचा म्युझियम पाह्यला भला मोठा ३० x ५० चा हॉल भरून जाईल इतक्या जुन्या वस्तूचा साठा - ज्याला अगदी 'जंक' (junk) म्हणता येईल - अडगळ पण त्यात १८०० सालातल शिवणाचं मशिन, धुण्याची जुनी साधन, तिथं आपल्यासारखीच 'घंगाळं' होती सोनार - लोहार कामाच्या पुरातन भट्ट्या त्याजवळ बसवलेली मातीची माणसं, त्याचे वरखाली होणारे हात, तो फुगलेला भाता विजेच्या सहाय्याने दोन्ही मॉडिल्स्

चागली हालती डोलती केली होती 'ट्यूडर खेडं' उजळून निघत होत 'प्रवासी-आकर्षण' म्हणून दोन्ही ठिकाणी टूरिस्ट बसेस उभ्या होत्या इतकी वर्षं त्याची देखभाल घेतली जात होती

होबार्टला नदी मागे ठेवून, आम्ही 'कॅसीनोआ' परिसरात आलो अद्ययावत पद्धतीनं बाधलेल हे जुगार-घर, २१ व्या मजल्यावरच फिरत रेस्टॉरट, सगळी थाटणी अमेरिकेच्या इमारतींची स्पर्धा करत होती. दिवेलागणीला पाण्यात पडलेलं कॅसिनोकम हॉटेल्सच प्रतिबिंब, इमारतीच्या काचांवरचा झुकत्या सूर्य-किरणांचा खेळ, त्या मागेच अधुक झालेल्या उच डरवेंट-पर्वताच्या रागा, दूरवर दिसणाऱ्या टासमृन - ब्रीजच्या कमानी, आजूबाजूची नवी नवी घरं हे एक एकाकी बेट होत हे पार विसरून जायला होतं आम्ही सारे जुगार-नगरीत गेलो नव पाहण्याची ओढ माणसाला नेहमीच वेडं करते हेच खरं! ही तर जुगारी-दुनिया। पहिल्याच दालनातले हरतऱ्हेचे जुगारी-खेळ पाहून हरखून गेलो आता फार वेळ तिथ द्यायचा नव्हता, ही भेट रात्रीसाठी राखून ठेवली होती नाहीतर आमचा वेडा महमद व्हायला वेळ लागला नसता सध्याकाळीच डिनर आटोपून पुन्हा दाखल झालो जुगार आणि हस्तरेषातलं भविष्य - सारखाच खेळ सारखीच ओढ हस्तसामुद्रिकाची ओळख व्हायचा अवकाश की आपला हात पुढे होतो अज्ञात भविष्यकाळ कळून घ्यावासा वाटतो तस कॅसिनोत गेलं की नाण पटकन् हातातून निसटतं भविष्यकाळातील धनाची बरसात इथंच होईल, कुणी सागावं? पण अर्ध्यारात्रीच, होबार्ट-डिस्कोचे स्वर कानावर दणादण आपटत असतानाच आम्ही तेथून उठलो वरच फिरत भोजनगृह कॉफीचे घुटके घेत - भोवती सरकत जाणारं होबार्ट शहर, ती रंगरंगीली दुनिया पहात होतो 'नर करणी करे तो एकाकी बेट भी ऐसा गजबजता हो जाता है' - मनातल्या हिंदी वाक्याचं हसू बाहेर फुटल

दुसऱ्या दिवशी होबार्ट ब्रीजवरून आम्ही 'सोरेल'गावी आलो फिलिप्स, कुक ह्या मंडळींना सिडनी बदर दिसण्यापूर्वीच १२८ वर्षं इथली ही छोटी बेट खलाशांना दिसली होती इंग्लडहून हद्दपार केलेल्या गुन्हेगाराना ठेवण्यासाठी ही बेटं निवडली गेली एकदम भयानक रूपान बेट झाकळून गेलं सहासहा महिने बोटीचा प्रवास करत अज्ञात ठिकाणी

जायला निघालेली माणस, आपल्या आयुष्याचा पट इथे कसा माडणार होती? अन्नपाण्याचा प्रश्न इथ कसा सोडवणार होती? अथांग भरलेल्या खाऱ्या जलाशयाकडे बघून तहान कशी भागवणार होती? जीवनमरणाशी लढा पाठीवर वळ उठेपर्यंत फटके खाऊन कसा देणार होती? स्वातंत्र्यवीर सावरकराची अंदमान बेटावरची काळ्या पाण्याची शिक्षा, --- इथं जागी झाली

पोर्ट-आर्थर हे नाव गाइडनी घेतल व इतिहासावरचा पडदा बाजूला सारला गेला १८३० मधे आर्थर साहेबानी गुन्हेगाराकडूनच त्या तुरुगाच्या बराकी बाधून घेतल्या १८०० कैदी इथं उतरवले गेले चारी बाजूनी डोंगर, गर्द झाडींनी झाकलेल हे बेट, जगाचं तोड दाखवणारा एकच दरवाजा आणि तो म्हणजे बोट लागलेला वाकडा तिकडा जमिनीचा ठिसूळ किनारा! आजूबाजूच्या डोंगराना खिंडी पाडून समुद्राच्या लाटा आत घुसत होत्या, कडेकपारी पाण्याच्या मारानं गुळगुळीत झाल्या होत्या हजारो वर्षे निळावतीचा असा खडकाशी सामना चाललेला असावा ४०० फूट खोल आणि १२०० फूट रुदीचा खड्डा पोटासारखा, खडकात दिसत होता पाण्याच्या मारानं फोडलेल्या एका खडकाला सैतानाच स्वयपाक घर (Devils' Kitchen) अस नाव दिलंय हीच भयानक निसर्गाशी भयावह ओळख आणि मागे ती बंदीशाळा'

आम्ही ऑर्थर जेलपाशी उतरलो कैदखान्याची ओळख आता फिल्ममधून करून देणार होते हातबेड्या घालून आणलेले कैदी, तो त्याचा वेष, ती लाचारी, ते खगलेपण, काहींच्या हातबेड्या, काम करणाऱ्याच्या नुसत्याच पायबेड्या --- त्या दणदणीत साखळ्या आणि सापळ्यासारखा झालेला देह -- सगळंच माणुसकीचं, क्रौर्याचं एक भेसूर चित्र - पुढे सरकत होत एक अठरा वर्षांचा मुलगा - गुन्हेगार चोरीच्या आरोपाखाली त्याला इथ हद्दपारीची शिक्षा भोगायला आणलं होतं तुरुंगात कंटाळून, वैतागून, अधिकाऱ्यांची नजर चुकवून तो तुरुंगाबाहेर सटकला एका मेलेल्या कागारूची कातडी पांघरून तो आडोश्याला बसला अधिकाऱ्याना पत्ता लागताच कुत्र्याची परेड त्याच्या अगावर सोडली, कुत्र्यानी आपली हाडं चघळण्यापेक्षा शिक्षा परवडली असा विचार करून तो अगावरच कातड फेकून बाहेर आला क्षमायाचना

करूनही त्याला सात वर्षं शिक्षा भोगावी लागली लोहाराचं काम त्याला शिकावं लागलं शेतीच्या अवजारापासून स्वत च्या बेड्या व तुरुंगाची कुलपंही ह्या कैद्याच्या कडूनच घडवली गेली लोखंड वाकवणारे कितीक हात, घाव घालून जायबंद झाले असतील कित्येक गुन्हेगार ह्या भकास तुरुंगात पुरले गेले असतील पुढे शिक्षेत सुधारणा म्हणून त्यांना त्याच्या आवडीची कामं, छंद पुरवून घेण्यासाठी साधनं देत असत त्यातूनच चित्रकार, ड्राफ्टसमन, इंजिनियर्स, लोहार, सुतार असे कारागीर तयार झाले हेच गुन्हेगार, ज्याचं रक्त, घाम आणि अश्रू देशाच्या पायाभरणीच्या कामी आले हे सारं फिल्ममधे दाखवलं

'Jail for an Empire', ३७ वर्षांच्या आपल्या हयातीत ३०,००० गुन्हेगाराना आपल्या पोटाशी बाळगून होतं त्या भयंकर आठवणीच्या साठा बरोबर घेऊन ते हे कैदी-घर १८७७ साली झुडुपांच्या आगीने भस्मसात केलं वा करून टाकलं कोणे एकेकाळी कैद्यांच्या बेड्याचं संगीत, तो साखळ्याचा खणखणाट हवेत भरून राहत असे आता ती इमारतींच्या शिखरावरची गार्डची जागा, ते ॲसलम्, ते हॉस्पिटल निशाणी मात्र शिल्लक आहे त्याच आवारात एक चर्च शंभर-एक वर्षाच्या जुन्या काळखुणा घेऊन उभं आहे ह्या पोर्ट ऑर्थरच्या इतिहासाचा दैवी दाखला! चर्चचं डिझाइनही 'मॅसन' नावाच्या गुन्हेगारानेच केलं आहे एके काळी आम्ही गुन्हेगार होतो ह्याची लोकाना लाज न वाटता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र उभं केलं हे ते जगाला सांगताहेत अभिमानाने सांगण्याइतका देश ऐश्वर्यसंपन्न झाला आहे हेही खरं आहे ऑस्ट्रेलियन बाळाचे पाय प्रथम टास्मानियाच्या पाळण्यात दिसले असं बेटाचा इतिहास सांगतो


पोर्ट ऑर्थर जवळच असलेलं 'इगलहॉक-नेक' (Eaglehawk-Neck) पाहिलं इगलहॉक, ऑस्ट्रेलियन गरुड, ह्या गरुडाच्या मानेइतका रुंदीचा जमिनीचा निमुळता भाग, पुढे चिंचोळा होत गेलेला, नंतर समुद्रात घुसलेला आहे चोहोबाजूंनी पाणी आहे इथून ह्या गरुडाच्या मानेवरून कैद्यानी निसटून जाऊ नये म्हणून ह्या इगलहॉक्च्या मानेभोवती पहारा करायला कुत्र्याची रांग सतत जागती ठेवत असत इथून निसटून ह्या अथांग सागरात जीव लोटून द्यायचा - बाऽऽप रे! आपल्याला कल्पना

करवत नाही कैद्याना शिक्षा किती कडक व जीवघेणी वाटत असावी काय हे तुरुंग। पाताळ लोक म्हणतात तो हाच की काय? असं मनात आलं

रिकामे तुरुंग, भरल्या मनाने मागे टाकून आम्ही 'बर्नी' गावाशी आलो जवळच्याच डेव्हिल्स-पार्कमध्ये टास्मानियन लांडगा पाहिला तो जबडा, ते दात, ते क्रूर डोळे, लाडग्याची झेप म्हणतात ना तसा त्यांनी घेतलेला पवित्रा -- पुन्हा एक भेसूर ठसा हळूवार झालेल्या मनावर उमटवून गेला रात्री मुक्कामाला क्वीन्सलंडला पोचायचं होत घाटातून भयकर वेडी वाकडी वळणं घेत २ तासानी आम्ही त्या डोंगरात दडलेल्या गावात पोहचलो मोटेल्समधे गरम पाण्याची व गरम हवेची सोय होती थंडी गुंडाळून घेतली गेली बाजूचे डोंगर धुक्याने झाकून गेले, डोळे झाकले गेलेलं समजलं नाही

सकाळ होताच गाव कामाला लागल ४,५०० वस्तीचं हे खेडगावं पण इथे आणवलेली अवाढव्य यत्रसामग्री ह्या डोंगरदऱ्याना दहशत द्यायला पुरेशी ठरली म्हणूनच एकाकी बेटानी केलेल पूर्वदिव्य व उज्ज्वल भवितव्य हातात हात घालून चाललय इंग्रज, फ्रेंच, डच माणसानी मोठ्या ईर्षेनं ह्या बेटाचा पूर्व-पश्चिम किनारा, दक्षिणोत्तर सीमा रेषा, सार धुडाळून काढल त्याचा कामाचा आवाका प्रथमपासून दाडगा, तेव्हाच ह्या अनोख्या डोगर-दऱ्याभोवती, नदीच्या काठांनी लहानमोठी शहर उभी राहिली 'टासमन्' ह्या डच खलाशाच नाव देऊन बेटाचं बारसंही केलंय

आता टासमनला ह्या बेटावर आणून सोडल तर त्यालाच ह्या एकाकी बेटाची ओळख पटेल की नाही कोण जाणे अशी माझ्या मीच विचाराशी खेळत पुन्हा पुन्हा मागे वळून पहात, आम्ही परतीच्या मार्गाने लॉनसेस्टनला येऊन पोचलोही



# पर्थ...

हा आमच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा। परतीच्या प्रवासाची तयारी करायला लागलो मुलाना सोडून, लांब जायच म्हणून मन उदास व्हायच तर भारतात जायच, आपल्या आप्तेष्टाना भेटायचंच ही ओढ पण लागली होती मायभूमीच प्रेम अस दूर आल्यावर जास्त जाणवत 'सागरा प्राण तळमळला, ने परत मातृभूमीला' ह्या सावरकराच्या ओळी ओठावर खिळल्या होत्या मुलं राहण्याचा आग्रह करत होती सुखदु:खाच एक वेगळ सावट भोवती साचून राहिल हा देश, हा सौंदर्याचा ठेवा परत पाह्यला मिळेल का? आवडत खेळणं जसं लहान मुलांनी सोडू नये, आवडलेली साडी, पुन पुन्हा हातात घ्यावी, बजेटात बसत नाही म्हणून खाली ठेवावी, अस काहीतरी मन धरसोड करत राहिलय

ॲडलेड पासून पर्थ १३०० मैल २॥ तासात इथल्या 'ॲनसेट' च्या हवाईयानातून इथे येऊन पोचलोही आम्ही पाणावलेल्या डोळ्यांनी पहाताना ॲडलेडचा परिसर पुसट होत होत गेला आम्ही दोघ बोलण्याच्या मन स्थितीत नव्हतोच

पर्थला विमान टेकल सहप्रवाशाबरोबर बाहेर आलो इथ हाताला धरून न्यायला मुल नव्हती बस-टूर्स स्वत च घेऊन, राहिलेला देशाचा भाग पाहून घ्यायचा होता पण आज कोणतीच टूर जमणार नव्हती आता दिवस तसा उतरणीला लागला होता हॉटेलच्या बगीच्यात बसून

टूरिस्ट-गाइडवरून पर्थ निरखत होते

पर्थ ही पश्चिम ऑस्ट्रेलियाची राजधानी फुलांची पश्चिम म्हणून पर्थ प्रसिद्ध आहे ६००० फुलाच्या जातीतली ८० टक्के रोप इथे आहेत म्हणे वसत ऋतूतला, हा फुलाचा बहर, स्वच्छ सूर्यप्रकाश व गाणारे पक्षी पाहण्यासाठी प्रवासी मडळींची झुम्मड उडते पश्चिम ऑस्ट्रेलियातील लोकाना - पश्चिम दिशा सोडवत नाही म्हणतात इथल्याच निळ्या आकाशातून येणारा स्वच्छ सूर्यप्रकाश ती क्ष-किरणं आपल्या हाडाना बळकट करतात अशी त्याची खात्री झालेली आहे ऑक्टोबर महिना इथे फुलाचा सिझन म्हणजे काश्मीरसारखच। पानाफुलाची सजावट, डोंगराडोंगरावरून पसरलेले रगीबेरगी फुलांचे गालिचे हवेतून उडताना पहावेत, तर डोंगरावरून खाली, उतरताना नजरेने मनसोक्त रग लुटावेत, पुन्हा पुन्हा पहाण्याची ओढ लागावी असा हा शब्द-फुलोरा। ह, फुलांच्या गालिच्यांना धक्का लागू नये म्हणून की काय पण इथली युकॅलिप्टसची 'कारी' जातीची झाडं नव्हे, अजस्त्र-वृक्ष, दीडदीडशे फूट उच खोड वाढल्यानतर पानं फुटलेली ही मडळी सबंध दक्षिण-गोलार्धात उंचीत नंबर मारून आहेत एक साथ, एका उंचीत असलेले हे वृक्ष आपल्या शाही रुबाबाने लक्ष वेधून घेतात. मान वर करून पाहिल अंधारात दूरवर नजर टाकली, (तर पुढचं वाक्य), सकाळी सकाळी धुक्यात लपलेली ही वृक्षराजी अंगाला राख फासलेल्या सन्याशाप्रमाणे दिसते

समोरच स्वॉन-नदी (Swan-River) वरचा 'किनारा' गावाला जोडणारा ब्रीज, हायवे- वरच्या दिव्यानी उजळून निघालाय पर्थ गावच मुळी हंस नदीच्या भोवती वसलेल आहे नदीची लहर साभाळून, तिच्या नागमोडी वळणावरून ब्रीज, बागा करण, शहराची नक्षी वाढवण ते काम हेच लोक करू जाणे आम्ही मात्र नदीच नाव घेऊन तिच्यात एक बुचुकळी मारणार आमच्या पापकर्माचा भार व घाण तिला वाहून न्यायला सागणार आता अष्टमीचा चंद्र भोवतीच्या हिरवळीवर प्रकाश टाकायला लागला होता दाट हिरव्यागार गालिच्यावर पडून लोळाव, चांदण्यारात्री, तारांगणाच सौंदर्य पहाव अस मनात येत होतं. पण थडी चादण्याला जास्तच बिलगायला लागली चादण्याचा मोह सोडून खोलीत झोपायला जाव लागल

सकाळी पहिली टूर-बस घेतली हे ॲलबनी गाव, १८२६ मध्ये, म्हणजे अलीकडेचं म्हणायचं मेजर एडमंड लॉक्यर इथे आला व त्याने ब्रिटिशांचा पाय इथे रोवला ही रेसिडेन्सीची जुनी इमारत, १८३१ मध्ये रिचर्ड-स्पेन्सरनी दगडी रंगाची कौल इंग्लडहून इथे आणली इथेच मेजर एडमड साहेबाच स्मारक उभारलंय इतिहासाचा दाखला द्यायला त्या इमारती पुरेशा आहेत आणि 'विलो-ट्री' (Willow-Tree) ची रोपं अशीच प्रवास करून इथ आली आहेत पहिलं रोप, नेपोलियन बोनापार्टच्या थडग्या शेजारच आहे सगळे ऑस्ट्रेलियातल्या विलो-ट्री चे मूळ पुरुष, ह्या स्ट्रॉबेरी टेकडीवरचे आहेत युरोपियन रीतिरिवाज खेड्यापाड्यांतून अजून पाळतात लॉर्ड नेल्सन्‌च्या पत्नीचे, कलाकुसरीच्या एम्ब्रायडरी कामाचे नमुने अजून काही घरातून दिसतात

'पेट्रिक-तल्यार' म्युझियममध्ये दृष्टीची पकड घेणारे अनेक इतिहासकालीन फोटो, जुनी हत्यारे, आर्टिफॅक्टस् वसाहतींचा काळ साकार करतात त्याचबरोबर जुनी, कैद्यांनीच बाधलेली ही कारागृहाची इमारत। माणुसकीच, की, कडक शिस्तीचं, हे अबोल रूप' १५० वर्षांपूर्वीच्या कैद्याच हृद्गत ह्या भिंतीनी जवळ बाळगल असेल का? मनातला प्रश्न मनातच ठेवून मी, पुढ निघाले 'Desert Mounted Corps Memorial' जवळ आलो ऑस्ट्रेलिया व न्यूझीलडची सैनिकी जहाजं, एक दोन नाहीत ९७ जहाज, गॅलीपोलिच्या युद्धात व त्यातील दुर्दैवी माणसं रणागणावर कामी आली त्यांच हे स्मारक इजिप्तमध्ये बांधल होत म्हणे पण सुएझ-कालव्याच्या वादात त्याची बरीच मोडतोड झाली होती ऑस्ट्रेलियन लोकानी आपल्या देशबाधवांचं हे स्मारक-शिल्प-महत्प्रयासाने ते पुन्हा डागडुजी करून भव्य स्वरूपात इथं उभ केलंय बंदूक हातात घेऊन घोड्याला टाच मारून निघालेला शिपाईगडी त्याच्या नजरेतली नी तडफ, शिल्पातही जिवंतपणा भरून उरली आहे त्याच्या शेजारी घोड्याचा लगाम खेचून निघालेला दुसरा एक सैनिक, देशप्रेमान भारलेले ते योद्धे नव्या पिढीला खासच प्रोत्साहन देत राहतील आतापर्यंत पाहिलेली प्रत्येक ठिकाणची युद्ध-स्मारक अशी बोलकी आहेत

अलबनी गावापासून सोळा कि मि वर एक निसर्ग चमत्कार पहाण्यासाठी बसमधून खाली उतरलो हजारो-लाखो वर्षे धडका घेऊन

देऊन, दगड-दरडोवरचे मातीचे थर धुवून काढून ह्या दक्षिण समुद्राची एक मोठी लाट शेवटी ही उंच भलीभक्कम दगडी-भित फोडून आत घुसली पचवीस एक मीटर दूर पाण्याचा फवारा असा सूंऽऽसू आवाज करत उडत असतो पत्थराला पाझर फोडणारा नव्हे; फत्तराची शकलं उडवणारा। दगड-दरडीला फोडून काढणारा हा जलौघ श्रेष्ठच म्हणायला हवा ह्या कापलेल्या डोंगरात झालेली दरी, आणि त्याच्या समोरच दगडी पुलाखालून वाहणारं पाणी तो आपोआप तयार झालेला बीच, प्रवासी-प्रेक्षणीय ठिकाण म्हणून टूरिस्ट खात्यानं नोंदून घेतल आहे पाण्याच्या सपासप् लागणाऱ्या लाटांच्या मारानी झिजून अशाच एका खडकाचा, कुत्र्याच्या तोंडासारखा आकार झालेला आहे कुत्रा जसा काही धापा टाकतोय असं वाटतंय।

समुद्राचा हा इकडे धिंगाणा, तर इकडे आत घुसलेलं तेच पाणी किती शांत स्वरूप धारण करून ब्रिजखाली खेळत राहिलंय त्या पाण्यात बदकाचा डबक् डबक् आवाज येतोय तेवढाच! मासे बिचारे त्या शांत लाटेवर वरखाली होताहेत सागराच रौद्र स्वरूप हाताच्या अंतरावर आहे ह्याची त्या बिचाऱ्या बदक मंडळीना कल्पनाही नसेल

आता आमची टूर-बस बिचेसच्या बाजूनी धावतीय पांढऱ्या शुभ्र वाळूचा समुद्रकिनारा आणि फेस घेऊन उडणाऱ्या तुषारांचा पांढरा रंग, काठावर आपटणाऱ्या फेसाळ पांढऱ्या लाटा, शुभ्रपणाची जणू स्पर्धाच लागली होती सगळेच समुद्रकिनारे कसे स्वच्छ ठेवले होते 'सागरे सर्व तीर्थानि' म्हणून केलेली हीच खरी पूजा! तर देशाचं रक्षण करणाऱ्या ह्या सागराच्या सीमा-रेषा, हात जोडून नमस्कार करण्यापेक्षा, इथ सैनिकी-सलामच करावा - असं काहीतरी वेगळच डोक्यात आलं

एक 'एमू 'EMU' पॉइंट' लागला एमू हा इतका मोठा प्राणी आहे की शहामृगानतर ह्यांचा जगात दुसरा नंबर आहे १०० पौंड वजनांच ओझ बाळगूनही, छोटे अंग झाकण्यापुरते पंख पाघरून हा ताशी तीस मैल वेगाने धावू शकतो बस ड्रायव्हरला ही माहिती पण तोंडपाठ होती, एमू आणि कांगारू जवळ सारख्याच उंचीचे, ५ फूटी, राखी रंगातही तस्म साम्य, चुलत घराणं असाव, 'माणसं जमली की कुठूनतरी आमचं नात निघतंच', अस थोडसं पाघळून आम्ही सांगतोच (मागून भांडतो)

तोच पिंड-स्वभाव इथं उसळून बाहेर आला ते जाऊ दे, पण ह्या एमूला, ऑस्ट्रेलियाच्या सरकारी कागदोपत्रावरच्या इमारतीवरच्या राजचिन्हात, कांगारूबरोबर बसायचा मोठा मान मिळाला आहे एमूच्या वसाहतीची ही जागा एक 'पिकनिक् स्पॉट' म्हणून आहे भेळपुरी खाल्लेल्या कागदाचे कपटे कुठेच दिसले नाहीत

आतरराष्ट्रीय-स्पर्धेसाठी 'गोल्फ' ची दोन एकर जागा कोवळ्या तृणाकुराच्या रंगानी झाकून गेलेली होती 'रॉयल-सेलिंग क्लब'ची पाटी दिसली माणसांच्या मजा करण्याच्या कल्पनेत खेळांचा भाग बराच दिसतोय म्हणायचा मधेच 'बॉटल-ब्रश' नावासारखीच ब्रशची झाडं, आपल्या लाल रंगानं उठून दिसत होती डेन्मार्क गावातून बाहेर निघालो झाडीत लपलेल्या नद्या, त्या छोट्या नदीच्या पात्रात पडलेल आकाश तुकड्याचं प्रतिबिंब काठावरची रहिवाशी झाडांची गर्दी, काठावरची टुमदार छोटी हिरव्या अगणाची घरं, सगळंच विलोभनीय वाटलं असा गावाचा रंगभरा 'मूड' आवडला "ह्या छोट्या नद्यांतून बोट घेऊन चक्कर मारून येता येईल" ड्रायव्हरनी आवर्जून सांगितल बरेच प्रवासी निघाले नुसत बसून राहण्यापेक्षा, आम्हीही बोटीची तिकिट काढली नदीची सहल 'कोडाय्-कॅनॉल' ची आठवण करून देत होती भर दुपारचा, बारा वाजताचा हवेतला तो गारवा संतप्त सूर्याला जणू हिणवत होता

आता जठराग्नी चांगलाच जागा झाला होता अर्धा मैल आलो नसू एवढ्यात "Have a good Lunch" म्हणून ड्रायव्हरनं गाडी थांबवली व समोरच्या डोंगरातल्या 'कॅफे' कडे बोट दाखवलं उच 'कारी' झाडं इथे दिसली बाजूच्या ४६ मिटर खोल दरीचं हे आगळं वैभव! वॉलपोल गाव सोडून माऊंट बार्करला आलो

पुन्हा हाय-वे ला गाडी लागली अलबनीपासून फक्त ५० कि.मि आम्ही आलोत माऊंट बार्करला एका बाजूला उच वृक्षाचे शेंडे व दुसऱ्या बाजूला पिवळ्या धमक फुलानी झाकलेल्या 'स्टर्लिंग' टेकड्याच्या रांगा, जणू वृक्षाचे जथे खालच्या टेकड्यावर नजर ठेवून आहेत आता पहा, त्याना इथच निसर्ग-चित्र रेखांकित करण्याची लहर आली माझ्याच टांचण-वहीवर ते चित्र उतरलंय 'शब्दरेखा --- रंगरेखा' - कुठेतरी भावगीतातले हे शब्द पुन्हा असे कागदावर उतरले "सारख काय लिहीत

देऊन, दगड-दरडीवरचे मातीचे थर धुवून काढून ह्या दक्षिण समुद्राची एक मोठी लाट शेवटी ही उंच भलीभक्कम दगडी-भित फोडून आत घुसली पंचवीस एक मीटर दूर पाण्याचा फवारा असा सूंऽऽसूं आवाज करत उडत असतो पत्थराला पाझर फोडणारा नव्हे, फत्तराची शकल उडवणारा! दगड-दरडीला फोडून काढणारा हा जलौघ श्रेष्ठच म्हणायला हवा ह्या कापलेल्या डोंगरात झालेली दरी, आणि त्याच्या समोरच दगडी पुलाखालून वाहणारं पाणी - तो आपोआप तयार झालेला बीच, प्रवासी-प्रेक्षणीय ठिकाण म्हणून टूरिस्ट खात्यान नोंदून घेतल आहे पाण्याच्या सपासप् लागणाऱ्या लाटांच्या मारांनी झिजून अशाच एका खडकाचा, कुत्र्याच्या तोंडासारखा आकार झालेला आहे कुत्रा जसा काही धापा टाकतोय असं वाटतय!

समुद्राचा हा इकडे धिंगाणा, तर इकडे आत घुसलेल तेच पाणी किती शात स्वरूप धारण करून ब्रिजखाली खेळत राहिलय त्या पाण्यात बदकांचा डबक् डबक् आवाज येतोय तेवढाच! मासे बिचारे त्या शांत लाटेवर वरखाली होताहेन सागराचं रौद्र स्वरूप हाताच्या अतरावर आहे ह्याची त्या बिचाऱ्या बदक मंडळींना कल्पनाही नसेल

आता आमची टूर-बस बिचेसच्या बाजूनी धावतीय पांढऱ्या शुभ्र वाळूचा समुद्रकिनारा आणि फेस घेऊन उडणाऱ्या तुषाराचा पाढरा रग, काठावर आपटणाऱ्या फेसाळ पाढऱ्या लाटा, शुभ्रपणाची जणू स्पर्धाच लागली होती सगळेच समुद्रकिनारे कसे स्वच्छ ठेवले होते 'सागरे सर्व तीर्थांनि' म्हणून केलेली हीच खरी पूजा! तर देशाच रक्षण करणाऱ्या ह्या सागराच्या सीमा-रेषा, हात जोडून नमस्कार करण्यापेक्षा, इथं सैनिकी-सलामच करावा - असं काहीतरी वेगळंच डोक्यात आल

एक 'एमू 'EMU' पॉइंट' लागला एमू हा इतका मोठा प्राणी आहे की शहामृगानतर ह्याचा जगात दुसरा नंबर आहे १०० पौंड वजनाच ओझं बाळगूनही, छोटे अग झाकण्यापुरते पंख पाघरून हा ताशी तीस मैल वेगाने धावू शकतो. बस ड्रायव्हरला ही माहिती पण तोंडपाठ होती, एमू आणि कागारू जवळ सारख्याच उंचीचे, ५ फूटी, राखी रंगातही तस साम्य, चुलत घराणं असावं, 'माणस जमली की कुठूनतरी आमच नात निघतच', अस थोडसं पाघळून आम्ही सांगतोच - (मागून भाडतो)

तोच पिंड-स्वभाव इथं उसळून बाहेर आला. ते जाऊ दे, पण ह्या एमूला, ऑस्ट्रेलियाच्या सरकारी कागदोपत्रांवरच्या, इमारतीवरच्या राजचिन्हात, कांगारूबरोबर बसायचा मोठा मान मिळाला आहे. एमूच्या वसाहतीची ही जागा एक 'पिकनिक् स्पॉट' म्हणून आहे. भेळपुरी खाल्लेल्या कागदाचे कपटे कुठेच दिसले नाहीत.

आंतरराष्ट्रीय-स्पर्धेसाठी 'गोल्फ' ची दोन एकर जागा कोवळ्या तृणांकुरांच्या रंगानी झाकून गेलेली होती. 'रॉयल-सेलिंग क्लब'ची पाटी दिसली. माणसाच्या मजा करण्याच्या कल्पनेत खेळाचा भाग बराच दिसतोय म्हणायचा. मधेच 'बॉटल-ब्रश' नावासारखीच ब्रशची झाड, आपल्या लाल रंगानं उठून दिसत होती. डेन्मार्क गावातून बाहेर निघालो. झाडीत लपलेल्या नद्या, त्या छोट्या नदीच्या पात्रात पडलेलं आकाश तुकड्याचं प्रतिबिंब, काठावरची रहिवाशी झाडांची गर्दी, काठावरची टुमदार छोटी हिरव्या अंगणाची घरं, सगळंच विलोभनीय वाटलं. असा गावाचा रंगभरा 'मूड' आवडला. "ह्या छोट्या नद्यातून बोट घेऊन चक्कर मारून येता येईल" ड्रायव्हरनी आवर्जून सांगितलं. बरेच प्रवासी निघाले. नुसत बसून राहण्यापेक्षा, आम्हीही बोटीची तिकिट काढली. नदीची सहल 'कोडाय्-कॅनॉल' ची आठवण करून देत होती. भर दुपारचा, बारा वाजताचा हवेतला तो गारवा सतत सूर्याला जणू हिणवत होता.

आता जठराग्नी चांगलाच जागा झाला होता. अर्धा मैल आलो नसू एवढ्यात "Have a good Lunch" म्हणून ड्रायव्हरनं गाडी थांबवली व समोरच्या डोंगरातल्या 'कॅफे' कडे बोट दाखवलं. उंच 'कारी' झाडं इथे दिसली. बाजूच्या ४६ मिटर खोल दरीचं हे आगळं वैभव! वॉलपोल गाव सोडून माऊंट बार्करला आलो.

पुन्हा हाय-वे ला गाडी लागली. अलबनीपासून फक्त ५० कि.मि. आम्ही आलोत. माऊंट बार्करला एका बाजूला उंच वृक्षांचे शेंडे व दुसऱ्या बाजूला पिवळ्या धमक फुलांनी झाकलेल्या 'स्टर्लिंग' टेकड्यांच्या रांगा, जणू वृक्षांचे जथे खालच्या टेकड्यांवर नजर ठेवून आहेत. आता पहा, त्यांना इथंच निसर्ग-चित्र रेखांकित करण्याची लहर आली. माझ्याच टांचण-वहीवर ते चित्र उतरलंय. 'शब्दरेखा --- रंगरेखा' - कुठेतरी भावगीतातले हे शब्द पुन्हा असे कागदावर उतरले. "सारखं काय लिहीत

बसतेस गं, जरा मान वर करून हे आधी पोटभर बघून घे'' असं हे म्हणायचे ''अहो, पण पुन्हा भूक लागली तर हे टिपलेलं वाचून ताट वाढून घेता येईल ना''

''ही बेबंध वाढलेली झाडी, ती उंची, टेलिव्हिजन मास्टरची १२५ मि उंची थिटी पाडतात'' तोंडासमोर माइक धरून ड्रायव्हर कम् कॉमेन्टेटर मधून अशी वाक्य फेकायचा लक्षात ठेवण्यासारखं वाक्य वाटलं, बाहेर नजर लावून ती उंची, ते शेंडे, दृष्टीत मावून घेण्याचा पुन्हा प्रयत्न केला

गावच्या म्युझियमची इमारत समोर आली जवळच कैद्याकडून बांधून घेतलेली तुरुंग-कोठडी, त्यानाच डांबून ठेवण्यासाठी केलेली' आता इथं पोलिस-स्टेशन झालय हे ऐतिहासिक सेंट-बेरबर्गच चर्च - डगरटन् कुटुंबाचं हे खाजगी देऊळ आहे त्यांच्या परवानगीशिवाय कोणाला प्रवेश नाही ही दर्शनी पाटी वाचली

द्राक्षाचे मळे नवीनच लावलेले आहेत, पण द्राक्ष बरेच वेळा बक्षिसपात्र ठरली आहेत माणसाच्या बुद्धिमत्तेच्या ऐश्वर्यापेक्षा निसर्गवैभव लक्षणीय आहे

हे समोरच 'पुरेकप' तळं, पोरोनोग्रुप-पार्क (आदिवासींनी दिलेली ही नावं आहेत) ५७० फूट उंचीचा कॅसल-रॉक, खडकातून वर आलेला वृक्ष, तर 'बॉब-प्रिझन-ट्री' - म्हणून प्रसिद्ध आहे वृक्ष आपल्या केवढ्या-थोरल्या बुध्यात, गुहेसारखे दरवाजे, ५ फूट उंचीचे पाडून आहे जमिनीवर असलेला ह्या दांडगा बुधा, जमिनीच्या पोटातला किती मोठा भाग व्यापून असेल! कल्पना करवत नाही सगळंच प्रचंड।

एप्रिलमधे इथं 'सन-फेस्टिव्हल' होतो गाडीत कोणीस म्हणालं, म्हणजे आमची रथसप्तमीची सूर्य नारायणाची पूजा आली 'Festival of Pearls' ब्रूम गावात ऑगस्टमधे साजरा करतात ऑस्ट्रेलियातले स्थानिक लोक सांगत होते १८६५ साली आलेले मेंढपाळ १४०० एक मेंढ्या आणून, इथं आपलं नशिब काढणार होते पण इथलं गवत त्या शेळ्यामेंढ्याना मानवलं नाही ह्या समुद्रातली ऑइस्टर माशाच्या शिंपा, मोती घेऊन येतात असं ह्या मंडळींच्या लक्षात आलं माणसं, पाणबुडे समुद्राकडे धावले व हे ब्रूम गाव मोतीपट्टीचा किनारा म्हणून ओळखलं जायला लागलं अर्थात 'ब्रूम' हे गव्हर्नरचं नाव घेऊन जन्मलं ✱✱

# ऐका सुवर्णदेवा तुमची कहाणी

ब्रूम खेड्यातच मोटेलमध्ये आमची रहायची व्यवस्था केली होती मुक्कामाच्या ठिकाणी केव्हा आलो समजलंच नाही आमची, खोलीची किल्ली ड्रायव्हरनं आणून दिली प्रवासाचा शीण गरम पाण्याच्या स्नानाने गेला गरम गरम पाण्याची आंघोळ ह्या थंडीवर चांगला उतारा असतो आठ वाजता रात्रीचं जेवण उरकलं ऊबदार बिछाना वाट पहात होता सकाळपासून सध्याकाळपर्यंत नुस्त पाहून पाहून डोळे शिणले होते मोत्याच पाणी ओघळून जात होत निद्रादेवीची माळ कशी, व केव्हा गळ्यात पडली आठवतच नाही

'सोन्यासारखा देश त्यात मोती-पट्टीचा किनारा' हे वाक्य तोंडात घेऊनच जाग आली 'वक्रतुड महाकाय' म्हटलं 'ह्या देशाचा उत्कर्ष होऊ दे, ह्या लोकाच भल होऊ दे आणि त्याचा प्रामाणिकपणा असाच टिकून राहू दे' ही प्रार्थना केली सुसस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांची, सत्य, 'सत्यमेव जयते' वचनं पाठ आहेत 'खोट कधी बोलू नये, चोरी कधी करू नये' (आता बिगरीच्या पुस्तकात आहे की नाही कोण जाणे) हे पाठ करत आमची पिढी वाढली पण सत्याच्या सुसस्कृतीच्या रुळावरून चालणाऱ्या आमच्या गाडीचा कुठला आटा कुठे ढिला झालाय? आम्ही सुवर्णभूमीची वाट लावून टाकलीय भूमिगत, भूमिभूत संपत्तीचा अव्हेर, अवहेलना झालीय चोची तितका चारा देव

देतो, म्हणून त्याची, देवाचीच, आम्ही परीक्षा पहातोय

दुष्काळ पडतो, महापूर येतो, आम्ही नुसते पहात राहतो, द ऑस्ट्रेलियात पहिलं चर्च तेव्हा स्थापन झालं नव्हतं, तेव्हा झाडाखाली बसून लोकांनी प्रार्थना केली होती गरीब देशांतल्या लोकाना मदतीचा हात द्यायचा हीच 'जनता जनार्दनाची सेवा' ह्या जाणिवेतून अगदी पहिला जमलेला निधी, ह्या लोकांनी भारताला पाठवला अस वाचलेलं इथ आठवलं आमच्या दान - दातृत्वाच्या कथा पुराण पुस्तकात राहिल्या व हात पसरायची आता सवय लागून गेलीय आम्हालाच'

''झालं का नाही तुझ? आपली ब्रेकफास्ट व्हायचीय हॉलकडे लोक निघाली पहा,'' खिडकीकडे तोंड करून हे म्हणत होते मी खडबडून जागी झाले नाश्ता उरकून टूर बसनी पुढ जायचं होतं स्वेटर्स, गॉगल्स, पर्स, पेन, सगळ्या गोष्टी आठवणीने बॅगेत टाकल्या

'गुड-मार्निंग' म्हणून एलिझाबेथनी आमच्याकडे पाहून स्मित केलं ह्या ट्रीपमध्ये नावाच्या राणीची संगत मिळाली होती तोंडाची घडी बिघडू न देणारे इंग्रज, पण रीतिरिवाज काटेकोरपणे पाळतात सहप्रवाश्यांत बरेचसे ऑस्ट्रेलियन होते त्यांना माणसाची भूक आहे आपल्या देशात बरीच माणस आता दूरदूरच्या देशांतून येतात तेव्हा तोंडभर बोलणं पोटभर हसण, 'Hi mate' म्हणून मित्राच नातं जोडण - त्यांना हव असतं आमच्याकड पहाण्यासारखं, दाखवण्यासारख खूप आहे, त्याचा अभिमान त्यामागे आहेच

ब्रेकफास्टच्या हॉलमधली टापटीप सकाळच्या प्रसन्नतेत भर टाकते आत जाता क्षणीच, समोरच्याच टेबलावरचे फळांच्या रसाचे ग्लासेस, शेजारीच कॉर्नफ्लेक्स चुरमुरे (Rice-Bubbles) याची पाकिटं, त्याच्याजवळ फळाच्या फोडींच्या बशा, साखर (हवी तेवढी) दुधाची भरलेली मोठी भांडी (Jugs) पाहूनच मन तृप्त व्हाव, पोट भरून जावं, अशी ती उपास सोडण्याची जय्यत तयारी!

हे हलकस खाण सुरू केल्यावर टोस्ट, अंडी, बेकन अशा गरमगरम पदार्थांच्या बशा पुढे येतात आता फ्राय, बॉइल्ड, ऑमलेट असा हवा तो प्रकार मागून घेता येतो सुट्टीवर आलेली मडळी खाण्यात अळंटळ करीत नाहीत टोस्टच्या बशा पुन्हा येतात जॅम् मारमलेड्ची

भांडी टेबलावरच असतात कॉफीच्या दोन तीन कपाबरोबर टोस्टचा फडशा पडत असतो पुन्हा १०॥ वाजता कॉफी घ्यायची यांची पद्धत आहे नंतर १ वाजता लंच, तोपर्यंतच्या पोटाची भर करून घ्यायची असते उपास, एकादशी, ह्याच्याकडे नाहीच देवाची पूजा, प्रार्थना! भरल्या पोटानं, आत्मारामाची खरी पूजा, तृप्ती, मग ध्यानधारणेतील एकाग्रता यांना जमत असावी, न पटण्यासारख यात काहीच नव्हत

आम्ही खाऊ म्हटलं तरी इतकं खाणं शक्य नव्हतं. लहानपणी सारख वाभर खाण असायच, तसं जास्त खाल्ल तर 'पोट आहे का अक्कलकोट?' म्हणून आजी ओरडत असे सगळं कस प्रमाणात हवं हे शिक्षण त्यामुळे पोट न् ताकद, आमच्या मुलांची प्रमाणातच राहिलीय वाटतं एक कप कॉफीचा संपवून बाहेर आलो

टूर-बसचं हे बर असत मोटेलच्या दारात बस् उभी असते मंडळी बसकडे यायला लागली होती ८॥ च शार्प-टाइम दिल होतं 'हॅलो', 'हॅलो', 'गुड-मॉर्निंग डिअर' म्हणून एकमेकांना हलकस स्मित बहाल केल बायकाचा ग्रूप थोडा वेगळा झाला, आज घातलेल्या कपड्यांची दखल घेऊन एकमेकींना 'हाऊ-नाइस - ब्युटीफूल' म्हणून झाल इथ तेवढ्यात भागत नाही कपड्याला हात लावून सूतपोत बघणं होत खरेदी कुठची ही चौकशी होते माझी साडी, त्यांना नवाच विषय बोलायला व्हायचा साडीच्या काठपदराच कौतुक मी पण मग तोंडभर करून घ्यायची स्वेटर अगावर घातलेला नव्हता तेव्हा बुट्ट्याबुट्ट्याचा, कधी टोपपदर त्या मागे वळून वळून बघायच्या मग अर्थातच माझी कॉलर ताठ व्हायची

ड्रायव्हर साहेबानी गाडीचा दरवाजा उघडला "Hi, Good-Morning, Have a nice day" म्हणून सर्वांना विश (Wish) केलं प्रत्येक टूरच्या सुरुवातीला प्रत्येकानं एक सीट मागं जायच ह्या नियमाप्रमाणे मडळी स्थानापन्न झाली अशी सीट बदलण्यात मजा येते नव्या जागेवर बसल्यासारखं वाटत व मागच्या माणसाना रोटेशनप्रमाणे पुढं यायला मिळत

"आता आपण फिट्झरॉय नदी ओलांडून डर्बीला (एक गाव) जाणार आहोत डर्बीला मोठ्या प्रमाणात गोठलेले बीफ-मास भरून डबे

# कांगारूचे बेट

कांगारूचे बेट इथं साऊथ ऑस्ट्रेलियात, आमच्या गावापासून फक्त दोनशे मैल इतकच दूर, तरी पाहण्याचा योग यायला सहा-सात वर्षे लागली मुबईचा माणूस काश्मीरची सहल करून येईल पण एलिफन्टा-केव्हज पहायला जाण जमलेल नसत तसच काहीसं आमच झालं

ॲडलेडहून एस् टी बसन पोर्ट जर्विसला आलो इथून नदीतून पंधरा-वीस कि मि गेल की आम्ही कागारू बेटावर पोचणार होतो आणि वाऱ्याच्या जे अगात आल, पावसाची धार सरळ पडेना गार गार पाण्याचे शिंतोडे अंगावर घेत कसेबसे समुद्रफेरीमधे जाऊन बसलो पण बोटीला स्थिरपणा कसा तो राहीना अशी जोरजोरात बोट हलायडुलायला लागली नदीत खळबळ उडाली लाटा बोटीच्या कडेवर आपटत, अगासरशी जाताहेत असं वाटायला लागल वादळवाऱ्याबरोबर ह्या नदीने मनावर घेऊन धुमाकूळ घातला असता तर फेरीचा एकच घास व्हायला वेळ नव्हता निघते वेळी चागलं सूर्यदर्शन झाल होतं निसर्गाची लहर फिरली, काळोखून येतय म्हणता म्हणता सूर्याला मेघानी पार झाकून टाकल तसं ऑस्ट्रेलिया एक मोठं बेटच समुद्राच्या विळख्यात गुडाळलेली जमीन कुठवर किती कोरडी रहावी हे सगळं जलनिधीच्या मर्जीवर

बोटीमधे मिळणारा नाश्ता पार गुडाळून ठेवावा लागला थडीनं सगळ्यांची बोबडीच वळायला लागली

"ऑस्ट्रेलियात गेल्याबरोबर कांगारूची चित्रं पाठव हं आम्हाला!" असं भाच्चेमंडळींनी बजावून सांगितल होत ते आठवल म्हणून इथे आल्यावर रस्त्यावर कुठे कांगारू दिसतात का हे मी आजूबाजूला बघत होते "भारतात हत्ती रस्त्यावरून चालतात का?" अस ऑस्ट्रेलियन मुलानी विचारल तेव्हा मला हसू आल होतं आणि तसा प्रश्न कुणाला न विचारता मी पण गुपचूपपणे कांगारू बघत होते!

आता विज्ञानाने जग पुष्कळच जवळ आलय कांगारूच बेट मला समोर दिसायला लागलंय हे छोट बेट मैथ्यू फ्लिंडर्स नावाच्या खलाशाला प्रथम दिसलं ऑस्ट्रेलियाला निघालेली माणस, जमीन दिसली न् दिसली की शीड खाली मोडून हातपाय मोकळे करायला उतरत १८०२ सालानंतर ह्या कांगारू बेटावरची वस्ती चार हजारापर्यंत गेली आता पटीपटीने वाढतीय पुष्कळ नद्या ह्या बेटाच्या अवतीभोवती वेढे घेऊन समुद्राला मिळाल्या त्यांतलीच ही मोठी नदी, आम्ही आलो ती, 'अमेरिकन-रिव्हर' म्हणून ओळखली जाते कांगारू आयलंडच पहिल नाव 'किंग्जकोट' अस होत साहस करायला गेलेली माणसं त्याच्या आठवणी सांगताना रंगून जातात मॅथ्यू फ्लिंडर्सच सांगतो - "एक टॉर्च घेऊन आम्ही एका खडकावर उभे होतो चालत चढत बरेच वर आलो होतो अंधार व्हायला लागला - खडकाचा पायथा नेमका कुणीकडे आहे?", हे पहा तिकडे, तीच पायवाट म्हणून टॉर्चचा प्रकाश झोत खालपर्यंत टाकण्याच्या नादात आमचा तो मित्र मागे मागे सरकत गेला 'धड धप्प्' असा मोठा आवाज आला - तो पाण्यात पडल्याचाच हा आवाज, आमच्या लक्षात आल, मागे वळून पहाणं अशक्यच - नंतर काही करता येणंही शक्य नव्हतं दीर्घ उसासे टाकून आम्ही खडकावरच लवंडलो रात्र तशीच काढायला हवी होती"

मॅथ्यू फ्लिंडर्सन बेटाचं नाव का बदलल हे लिहून ठेवलंय "भयंकर वारा सुटला, दिशा ओळखता येईनात बोट शीड अंगावर घेऊन थांबलीच समोर मोठा खडक दिसला, तिथपर्यंत कसेबसे पोचलो पुढे कांगारू दिसले पण आमच्या येण्याची त्यांनी काहीच दखल घेतली

नाही आरडाओरड नाही आवाज नाही आमच्याबद्दल त्यांची काय कल्पना झाली कुणास ठाऊक माझे सारे लोक पार दमून गेले होते आमच्या जवळच्या ताज्या अन्नाचा साठा संपला होता मग कांगारूच्या मासाची आम्ही मेजवानी केली मोठ्या दमाने लोकानी कागारूच कातडं सोलण मास चिरणं, शिजवणं सगळं खुषीन चालल होत (जठराग्नी पेटल्यावर जीवो जीवस्य जीवनम् होणारच की) कांगारूंना कृतज्ञता दाखवण्यासाठी आम्ही बेटाच नाव "कांगारूचं बेट" ठेवल इथं माणस राहत असल्याच्या काहीच खुणा दिसल्या नाहीत"

हे कागारूच बेट अवघ १४० कि मि लाब आणि ५० कि मी रुदीचं आहे दोन तासानी बेटाच्या किनाऱ्यावर उतरलो वाऱ्यान आपलं रौद्र स्वरूप इतक बदलल की तासापूर्वी त्यानं एवढा धिगाणा घातला होता हे सांगूनही खर वाटणार नाही आता बेटावर हिंडायला गारवा होताच, पण मजा वाटायला लागली आमची पोटपूजा आटोपली कांगारू आजूबाजूला हिंडत होते खाण्याच्या वासाने ते जवळ येतील अशी भीती प्रथम वाटली पण कांगारू तसा गरीब प्राणी सर्वांनीच त्याच्या अंगावरून हात फिरवून पाहिला

मऊ राखाडी रगाचं अंग, हरणासारखं नाजूक चिंचोळं तोंड, उंची उभं राहिल्यावर फक्त चार फूट जाएट कागारू पाच साडेपाच फूट उच असतात कागारूचे पुढचे पाय लांडे, कोपरापासून आपले हात दिसतात तेवढेच लांब ह्या झुडुपाच्या देशात उन्हाळ्यात आगी लागतात, तेव्हा ते त्या त्याच्या उचीएवढ्या झुडपांवरून उड्या मारत पळत राहतात पुढचे पाय पोटाशी धरायची त्यांना सवय लागली असावी म्हणून ते लांडे, असे लहान राहिले असावेत मागचे पाय उंच त्यामुळे कुले उच दिसतात बसल्यावर पाय फारच बारीक दिसतात धुडासारख मागचं शरीर पुढे सरकवायला त्याना त्यांच्या लाब दणदणीत शेपटीचा उपयोग होतो

काही कागारूंचा रग गडद पिंगा, त्यांना रेड-कागारू म्हणतात बुगबटू, वलबी, रॅट कागारू अशा त्याच्याच जातीतले प्रकार आहेत मादीच्या पोटाला बाहेरच्या अगाला, खाली पोटाशी चिकटलेली एक पिशवी असते बाळ जन्मत च तीस चाळीस दिवसाचं ते आगठ्याएवढं

पोर उपजत बुद्धीनेच ह्या पोटाच्या पिशवीत जाऊन बसत अवघ १ औंस वजनाच पिशवीतच स्तनाग्र असतात दूध पिऊनच बाळ वाढत असत डोळे चागले उघडले की तोंड बाहेर काढून बघतं, जरा खुट्ट आवाज झाला की बाहेर आलेल आठ नऊ महिन्याच पोर पुन्हा ह्या पिशवीत जात माकडिणीचं पोरं पोटाला चिकटतं व माकडीण पोर घेऊनच उड्या मारते ह्याची आठवण झाली

मादी कागारूला 'डोझ' व ह्या पिलवाल्या आईला 'जोई' कांगारू म्हणतात नराला 'बकस' बाळ पोटात असलेली जोई ""' अगावरून हात फिरवून घेते आई नुसती जवळ उभी राहते ह्याच ब्राणं साधं गवत - जवळजवळ बारा महिने त्याना हिरव गवत मिळ खातानाच ते जमिनीतला दमटचिबटपणा शोषून घेतात म्हणून त्याना फारस पाणी लागत नसाव

मोठा उंच एमूही इथे दिसला अस फ्लिडर्स सांगतो पण कोआला दिसला नाही तेव्हा 'एमू आणि कांगारू' ह्यानाच देशाची निशाणी म्हणून सरकारी कागदपत्रावर बसण्याचा मान मिळाला आपल्याला महाराजासारखा कागारू ऑस्ट्रेलियाच्या क्वॉन्टास िमानाच्या शेपटीवर आहेच की

ट्री-कागारू म्हणून एक जात आहे त्याना 'ब्लू-फ्लायर्स' म्हणतात ताशी तीस मैल म्हणजे ग्रे हाऊड कुत्र्यासारखा त्याचा पळण्याचा वेग आहे झाडावर चढण्याची कला त्याच्या पूर्वजाकडून त्यानी घेतली असावी

अशा १२० जातींची माहिती झाडावर पाट्या टागून लावून ठेवली होती प्राणी सग्रहालय कागारूचंच होईल तर साऱ्या ऑस्ट्रेलियाभर ह्या जाती पसरलेल्या आहेत म्हणूनच ऑस्ट्रेलिया म्हटलं की कागारू समोर उभा राहतो


कागारूच्या बेटावरची सातशे प्रकारची जुनी झाडं अजून हरीभरी रग घेऊन उभी आहेत मग मॅथ्यू फ्लिंडर्सनी पाहिलेल्या टेकड्या आम्ही पण वर चढून आलो, टेकडीवर गुहासारखे, खडकाचेच आकार बनलेत खडक फोडायला किती पाणी आतून वाहून गेलं असेल दगडाच्याच प्रचड कमानी झाल्या होत्या इथे कुणा वास्तुशास्त्रज्ञाची कल्पना चा ली?

वादळ-वाऱ्यानी जमवलेली वाळू, मातीचे थर मधे घेऊन, खाऱ्या पाण्यान हे सिमेंट कस्म कालवलं गेल असेल मिश्रणाचं प्रमाण काय होत? सगळ कल्पनाशक्तीच्या पलीकडचंच।

आता रश्मीराजाचा कडक हात पाठीवरून फिरायला लागला दगडाच्या कमानीन गार वाटत होतं फोटो घेणं झाल सील माशाना ऊन आवडतं म्हणे ते पहायला सील बे वर आलो

खरंच आपलं प्रचंड शरीर साभाळत मऊ कातडीचे ते मोठेमोठे दोन सील प्राणी - वाळूवर लोळत होते रग काळसर राखाडी एक बोट पाठीकडे लावले तर त्याना काय कळणार आहे, एवढी चरबी अगावर, इकडून इकडे वळेपर्यंत --- म्हणून जरा पुढे गेलो तर सील अंगावर खेकसल्यासारखा आला की! 'पाणसिंहच' ते। चपळपणा किती पण? ज्याचं त्याला शरीर जड वाटत नम्यावं समुद्रातला हा आद्य जलचर - पृथ्वीच्या केंद्रबिंदूच्या पोटाजवळच फक्त दिसतो म्हणतात सीलची जोडी अशी इथे पहायला मिळाली गोलार्धात आम्ही खालपर्यंत आलोच होतो

अशी ही जुन्याची नवी नवलाई पुराण पण अपूर्व असं राहिलेलं, जुन्या जगातल नव्या काळाबरोबरच 'प्रवासी आकर्षण'' होऊन राहिलंय आपल्या पुरानन देशात कितीतरी चिजा दडून राहिलेल्या असतील त्याही 'प्रवासी-आकर्षण' असं नाव घेऊन दाखवता येतील पण त्यांची देखभाल करायला हवी मात्र



# माणसानं समृद्ध केलेला देश

असा ह्या ऑस्ट्रेलिया झुडुपाचा देश! जगातलं सर्वांत जुनं व मोठं बेट। भूगर्भशास्त्रज्ञाच म्हणण, हा जमिनीचा मोठा तुकडा म्हणजेच गोंडवनाचा भाग, भारतापासून वेगळा झालेला, पूर्वी द आफ्रिका द अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अटार्क्टिका सगळा एकसंध भूभाग होता कोणे एके काळी पाण्याने मधे मुसंडी मारली आणि हिंदी महासागर व पॅसिफीक महासागराच्या कुशीत हे बेट दडून राहिलं पण ह्या बेटाच पोट, जुन्या (पूर्ण) भारताच्या दुप्पट क्षेत्रफळाएवढं! लोकसंख्या अवघी १ कोटी ७६ लक्ष माणसं देशाच्या मानाने मूठभर वाटावी इतकी पण आकाशाला गवसणी घालण्याचा त्यांचा उत्साह! अमेरिकेसारख्या प्रगत आणि प्रचंड देशाचा कित्ता गिरवत जाणाऱ्या ह्या ऑस्ट्रेलियन मंडळींची मान ताठ आहे आम्ही ऑस्ट्रेलियन असं सागून जगाची नजर खिळवून ठेवताहेत अवघ्या शंभरदीडशे वर्षांतल्या त्याच्या दमदार वाटचालीचा, देशांतून हिंडताना थोडासा मागोवा घ्यायला मिळाला

१८८० नतर समुद्रकिनाऱ्यावर पसरत गेलेली ही मनुष्यवस्ती सोडली तर ऑस्ट्रेलिया म्हणजे ओसाड वाळवंटाचा प्रदेश डोंगरकपारीच्या आडोशाला असलेली आदिवासी मडळी आणि मेंढ्या हेच पहिले देशाचे राखणदार! Koala कोआला नावाचा भला गुबगुबीत प्राणी डिंकाच्या झाडाला चिकटून बसलेला! हे प्रचड पुरातन वृक्ष

भूगर्भातून वर येताना सगतीलाच जणू ह्या प्राण्यांना घेऊन आले की काय न कळे आणि ह्या झुडपांतून, बाळाला पोटाच्या पिशवीत घेऊन, वावरणारा कांगारू! जमिनीच्या कोवळ्या वयात जन्माला आलेल्या त्या प्रजेने, (प्राणी व माणस, म्हणे इथे प्रथम सरपटतच) आपल्या पाठीन आकाश वर उचलत नेलं नंतर त्यान हातात काठी घेऊन ते वरवर ढकलत नेलं त्या भूभागाच्या उत्पत्तीची मानवाची ही कल्पना मजेशीरच वाटतीय

अशा त्या निर्मनुष्य बेटावर देवाने दडवून ठेवलेली सपत्ती म्हणजे १८८० नंतर शुद्ध कसाचे सोने हाती लागले लक्ष्मीने लोकांना खराच हात दिला म्हणायला हरकत नाही १९२० मधे ह्या लक्ष्मीच्या मागे शब्दश लागलेला एक लिस्टर साहेब वाळवट तुडवत कसा कोणीकडे गेला त्याचा पत्ता पुन्हा कधीच कुठे लागला नाही म्हणतात मग हळूहळू लोखड तांबे, झिंक, शिसं, ॲसबेस्टॉस, इलमिनाइट असं सगळ विपुल प्रमाणात देशाच्या नॉर्थ-इस्टच्या प्रदेशात मिळायला लागलं तरी कष्टाच खत-पाणी त्याला द्यायला हवं होतं आमची उमेद, हे ह्यांना आव्हानच होतं ईर्षा उन्नतीच्या खुणाकडे डोळे लावून होती आम्ही घडत होतो, देश घडवत होतो 'असं सागणारे आजोबा, पणजोबा पुस्तकातून भेटतात.

आजोबा म्हणतात, "तसे आम्ही पहिले मेंढपाळच! काम तेच केलं अठराव्या शतकाच्या मध्यात काय, १९ व्या शतकाच्या सरूवातीपर्यंत अन्नाची भ्रांत होती थंडी कडाक्याची व उन्हं रखरखीत-नदीच्या कडेकडेने चालायच तबू ठोकून रात्र पडली की मुक्काम करायचा पोत्यातूनच गुरगुटून झोपायचं, एक टबलर, एक तवा, असलेच तर दोन कपडे - त्याच पोत्यात सकाळी भरायचे व काट्याकुटक्या गोळा करत, लाकूडतोडीच, सरकारी काही काम मिळालं - तर - एक पाव, एखादा मांसाचा तुकडा मिळायचा - चहा काटक्यावरच करायचा वाटेत घर केलेली कच्ची तट्ट्याची बर का, ती माणसं आम्हाला साखर, लोणी, जॅम द्यायची, देव त्यांच भलं करो!" आजोबा उसासा टाकतात "आमचेच भाईबधू (ब्रिटिश) आम्हाला थोडे उपेक्षेने वागवत होत ते बऱ्याकरता म्हणतात ना त्यामुळेच आम्ही आमच्या पायावर लवकर उभे राहिलो पहिल्या १००-१५० वर्षांत, देशाच्या अशा एकाकी आयुष्यात

बंड, रक्तपात असं काही झालं नाही जगापासून अलिप्त असलेला आमचा देश तसा सुदैवीच म्हणायला पाहिजे, म्हणूनच आम्हाला स्वतःची प्रगती करून घ्यायला सवड मिळाली ''

प्रथम आम्ही सर्वजण एकविचाराचेच होतो सर्वांना अन्न-धान्य, निवारा ह्याची जरुरी होती एक मोठ्ठं कुटुंब असावं अशा आमच्यामध्ये आत्मीयता, आपलेपणा उत्पन्न झाला आपल्याला मिळालेल्या जमिनीच भवितव्य आपण घडवणार आहोत अन् त्याचबरोबर व त्यावरच आमच भवितव्य सर्वस्वी अवलंबून आहे हे आम्हाला पटलेलं होतं पण देशात अवघा २७'' पाऊस, तोही थंडी भरपूर घेऊन यायचा दोन दोन (२०००) हजार मैल लांब वहात, लपत छपत समुद्राला मिळणाऱ्या नद्या दिसल्या, २७ धरणं आम्ही बांधली हट्टी नद्यांना वळण लावून दिलं मग २ लाख एकर जमीन पाण्याखाली आली एक हजार प्रकारच्या गव्हाची लागवड करण्यासाठी बरेच प्रयोग केले गव्हाचे उत्पन्न देशात ५०० लाख डॉलर्सचे झाले १९५० पासून कामाला लागल्यावर ६० लाख लोकांच्या खाण्याची सोय झाली गुरांची पैदास आम्ही केली पण मेंढ्याची लोकर ही आम्हाला देवाने दिलेली देणगी। सोन्याचा वास बाहेरच्या देशांत दरवळला आणि त्या वासावर बरीच मंडळी- चिनी, जपानी, अमेरिकन्स्, जर्मन- आमच्या देशात घुसली पण पुढे तिच आमचा माल घेणारी गिऱ्हाईकं ठरली '' आजोबांना दम लागला

''१९४२ सालचं युद्ध आमच्या दाराशी येऊन ठेपलं बलाढ्य राष्ट्राचा तो एक खेळ होता ह्या आमच्या कोरल बीच जवळ आलेल्या जपान्यांना अमेरिकनांनी हुसकावून लावलं व ऑस्ट्रेलिया हे एक 'पॅसिफिक्-राष्ट्र' आहे असं जाहीर केलं मग आमचे लोक खडबडून जागे झाले''- पुन्हा पुन्हा मोठ्या आवेशाने आजोबा सांगत रहातात - सांगताना त्यांची दमछाक होतीय पण डोळ्यातली अभिमानाची चमक बरच काही सांगत राहते ''हवाईमार्गाने जग आमच्या जास्त जवळ आल्यासारखं वाटायला लागलं आम्ही डगमगलो नाही भूतकाळ मागे टाकून वर्तमानकाळाची पावलं समजावून घेत, आम्ही ऑस्ट्रेलियन, भविष्यकाळाची उज्ज्वल स्वप्नं उराशी बाळगून ती रंगवत होतो ''

अशी इतिहास घडवणारी, देश उभा करणारी ही मंडळी! आम्हांला

भारत देशही आयता मिळाला व स्वातन्त्र्यही! नुसता सस्कृतीचा डांगोरा पिटत राहिलो अधश्रद्धा फार बोकाळलीय आम्ही धर्मकर्म जपतोय म्हणूनच समाधान मानून राहतोय त्यामुळे निष्क्रियता फोफावत चाललीय, भारताचं चित्रं असं मधून डोळ्यांपुढे येत उदास करत

ग्रथालयाची तीच सुबत्ता! पुस्तकाचा समोर खच पडलाय जिथे तिथे त्या ज्ञानगगेच्या पाणपोया भरून वहाताहेत खेडोपाडी आजारी, वृद्ध-बयस्क मंडळींसाठी ही पाण्याची भरली मोट, ट्रकमधून दाराशी येते त्याच्या जडणीघडणीची पुस्तकं हातात यायची, वाचायला खूप मिळालं प्रथम ८०० व नतर १,६०,००० कैदी गुन्हेगार व वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया अशी २ जहाज भरून माणस आली त्या वाया गेलेल्या माणसानीच हे एक प्रगतिशील कायदे मानून राहणार लोकशाही राष्ट्र निर्माण केलं "The behaviour of parents seemed to act as a warning rather than as an example" असं एक लेखक लिहितो

शेतीमालाच उत्पादन व दुधाचा धंदा, त्याची वाढ, नव्या कल्पना कष्टाने राबवल्या दूध-चीज ह्या कामाला उशिरा सुरुवात करूनही आज त्यांचा देश धंद्यात अग्रेसर आहे मास, बीफ, मटन बर्फागारात ठेवून ते बोटीने लडनला पाठवून ते चौपट भाव कमवायला लागले आहेत १८७९ च्या प्रगती तक्त्यावर, ते एक लाख टन गाईचे मांस परदेशी पाठवतात वर्षाला ४० टक्के वार्षिक उत्पादन-वाढ हा त्याचा वेग आहे

पाचशे प्रकारची निलगिरीची, कारी जातीची झाड इतकी आहेत की ती झाड विद्युतसहाय्याने कापण्यात ते तरबेज आहेत पहिला नबर त्या स्पर्धेत मिळवला आहे आता लाकडापासून कागद करण्याचे त्यांनी कारखाने काढलेत पाढरा शुभ्र कागद त्याच्या स्वच्छ शुद्ध वर्तनाची ग्वाही देतो

दुसऱ्या महायुद्धापूर्वी त्यानी कच्चे लोखंड, पोलाद, कच्ची लोकर ह्याची इतकी पैदास केली की जगाला स्वस्त भावाने देऊन देशाला प्रसिद्धी मिळवली पण युद्धामुळे त्याना तयार माल मिळण्याची पचाईत झाली परावलंबी होणं व हातचा माल गमावून बसणं, हे त्याना महाग पडायला लागलं स्वतःच लोक कामाला लागले मोटारीचे सुटे पार्टस् बाहेर इंग्लंडला पाठवण्यापेक्षा तिथेच कारखाने काढले ४६,००० लोक

कामाला भिडले आता 'ऑस्ट्रेलियन होल्डन' गाडी ऑस्ट्रेलियन माणसांसारखीच 'दणकट' म्हणून नाव मिळवून आहे गुणांवर नाव कमवायच हा त्यांचा बाणा आहे नुसत्या निर्जीव यन्त्राचीच गोष्ट नाही तर ऑस्ट्रेलियाहून उत्तम मरीनो मेंढे चागल्या जातीच्या उत्पत्तीसाठी मागवले जातात मशिनप्रमाणे चालणारे माणसाचे हात पाहून भविष्य सांगायला ज्योतिष्याची इथे गरज नाही मेंढ्याची लोकर काढण्याची मशिन्स व त्याचे कसबी हात, त्यामुळे लोकरीचा धागाही जगात 'उत्तम धागा' समजला जातो १९७९-८० मध्ये ५,६ लाख जिवंत मेंढे ऑस्ट्रेलियाने बाहेर पाठवले आहेत अवाढव्य देश आणि लोकसंख्या ह्यांचं व्यस्त प्रमाण आहे, म्हणूनच हे यश त्याना मिळवता आल काय अशी शंका येते अचबाही वाटतो लोकसख्या थोडी म्हणूनच प्रगती केली, करता आलीय अस म्हणून आपण पळवाट काढू पाहिजे तर'

राष्ट्रीय नीती ही काही वेगळीच चीज आहे त्याचं मोल राखणं हा राष्ट्रीय धर्म व हेच सस्कार! ही जाणीव असण हे काही निराळ आहे देशाची भाषा व पेहराव एक, निरक्षर कोणी नाही १५ वर्षापर्यंत मोफत सक्तीचे शिक्षण आहे तरी पदव्या मिळविण्याचा अट्टहास नाही छोट्या-मोठ्या शिक्षणक्रमातून हव्या त्या उद्योगधंद्याचे विशेष शिक्षण घेता येते शिक्षणावर मोठेपणा मानतात पण कामावर प्रतिष्ठा अवलंबून नाही काम करण्यात कमीपणा नाही डॉक्टर होणारी मुल, नाताळच्या सुट्टीत हॉस्पिटलमधे फरशा पुसायचंही काम करतात कष्ट करण्यात कसूर नाही 'पाट्या टाकायच्या' असं नाही प्रामाणिकपणा रक्तात आहे त्यामुळे 'भेसळ' हा शब्द नाही हे सगळ खरच आहे की आपल्या भेसळ मनाला चिमटा काढून पहावा की काय असं मनात आल्यावाचून राहत नाही आठवड्याला पगार व आठवड्याचा बाजार असा खुल्लमखुल्ला व्यवहार आहे

प्राप्तीकर भरपूर आहे पण त्याचा मोबदला मिळतोय स्वच्छ रस्ते सुखसोईंची घरं, घरबांधणीला सरकारचा हातभार, म्हातारपणी, स्त्री-पुरुषांना, नोकरी न करणाऱ्यानाही ६०,६५ वयानंतर पेन्शन त्यामुळे जीवन सुरक्षित आहे, स्वास्थ्य आहे

आरामशीर राहणी, अन्नधान्याची समृद्धी व समाधान ह्यामुळे

वेगवेगळ्या खेळात, फूट-बॉल जास्त - मंडळी प्रावीण्य मिळवून आहेत कोणत्याही खेळाच पद्धतशीर शिक्षण ८, १० व्या वर्षापासून दिल जात, जगात माझ्या देशाचं नाव दुमदुमल पाहिजे ही तळमळ, कोणत्याही कामात तसच खेळात परिपूर्णता (Perfection) मिळविण्याच दांडग वेड' सरकार ही वेड जोपासत असतं हेही नवलच

'Endeavour Ship' 'प्रयत्नांची पराकाष्ठा' हेच कुकच्या पहिल्या जहाजाचे नाव' कापडाची शिड लावून इग्लंडहून निघत खलाशांचे ते पोशाख, उच काळ्या टोप्या घातलेले ते गोरे अधिकारी, ग्रहगोलाचे नकाशे बरोबर घेऊन मुहूर्ताला प्रस्थान ठेवून निघतात - माना उंच करून करून जमीन दिसते का बघताहेत ही कोण अन् कसली माणस आली म्हणून लगोटी लावलेली काळ्या रगांनी रापलेली आदिवासी मंडळी, लाकडी भाले, दगड हातात घेऊन सामोरी येतात जमिनीवर उतरल्याचा आनद क्षणभरच टिकतो समोरच्या सकटाला तोंड कस देणार? खुणेच्या भाषेन काय काय म्हणून बोलायच, हाही बाका प्रसंग, मी तिथच भिऊन बिचकून उभी राहते थंडी अगाला झोबतीय नुसती अर्ध्या चड्ड्या घातलेल्या गोऱ्या ६ जाच्या रांगा डोळ्यासमोरून जातात - मधेच निळ्याशार समुद्राच्या फेसाळ लाटा, सृष्टीचं सुस वैभव दाखवायला आतुर झालेल्या दिसताहेत मलाही बोलावताहेत मीही त्या मडळींबरोबर त्या एकाकी बेटावर उभी आहे इथल चिटपाखरू देखील माझ्या ओळखीचं नाही मला ह्यांची भाषा समजणार कशी? खाडकन् बुटाचा आवाज झाला बोटीवरच्या कप्तानाने 'युनियन जॅक' हं, हे ब्रिटिशांच निशाण वरती फडकवल - बरोबरच आणलं होतं वाटतं सोजिरानी, त्या कैद्यांनी खाडकन् मोठ्ठा सॅल्यूट ठोकला देशाभिमान, रोमरोमात भिनलेले देशप्रेम अस साकारल

ती २६ जानेवारी होती! मागच्या गजबजलेल्या सिडनी शहराचा क्षणभर विसरच पडला होता - कुठतरी मायभूमीपासून त्या आर्यावर्तापासून दूर आल्याची बोच जाणवली मी हे काय पहातीय -

लाड्या चड्ड्या घालून आलेले कैदी (टास्मानियाचा तुरुंग साक्षीदार आहेच) आपल्या प्रगत देशाची निशाणी अपार कष्टाच हे प्रतीक मागे ठेवून ते काळाच्या पडद्याआड गेले

# निळी कोजागिरी, पांढरं पातं

कोजागिरीचा कल्लोळ शांत झाला आम्ही मूठभर मराठी माणसानी कालच कोजागिरी साजरी केली चादणं दुधाबरोबर पिऊन घेतलं होत पुन्हा ऑस्ट्रेलियात कोजागिरी होणं नव्हत साखरझोपेतून जाग आलीय आता सरत्यारात्री पश्चिमेकडे चंद्र कललाय पूर्ण प्रकाशानं अजूनही झळकतोय बाल्कनीतच बसावं वाटतय चंद्राला एकटं सोडून जाववत नाही समोरच्या समुद्रावर पसरलेला पातळ चादीचा कागद कोणी काढून नेला तर? सारी सागर-सपत्ती उघडी पडेल - हे काऽय ऽ मचवे भरभरून ह्या चांदीच्या मासोळ्या बाहेर आणल्याच की ह्या गोऱ्या, कोळ्यानी! ते त्याचं जीवन आहे कालची कोजागिरीची रात्र पर्वणीच होती त्यांना ह्या चद्रानेच त्यांना आधी खजिना दाखवला सागराला उधाण आणून कोळ्याच काम सोपं केल आता फक्त वर पातळ चादीची चादर पसरून चादोमामा घरी चाललेत उद्या पुन्हा येण्यासाठी!

हो, पण हे सगळं चंदेरी वैभव सोडून आम्हीही गावाकडे परतणार आहोत दोन दिवसानी सिडनीला जायच होत तिथून एअर-इंडियाचं जम्बो-जहाज आम्हाला भारतात नेणार होतं चद्राच निस्तेजपण पाह्यला नको म्हणून चटकन् गॅलरीतून आत आले

ऑस्ट्रेलिया हा नवा देश पाहिल्याच अमाप कौतुक मी स्वत च्या मनाशी घोळवत बसले होते किती गंमती-जमती आपल्या लोकांना

सांगायच्या याची मनाशी सारखी जुळवणी चालली होती वाटेत हाँगकाँग पाहून भारतात जायचं म्हणून आनंदाचं नव जाळ त्याबरोबर विणलं जात होत चीन-जपानच्या संस्कृतीला जोडणार गावाच गमतीच नाव कानाशी गोड गुणगुण करायला लागल जगातली मोठी व खुली बाजारपेठ म्हणून यात्रेकरूच आकर्षण, झालेलं देशाचं रूप मनाला अधिकच भुरळ घालत होत

सिडनीला भाचीच्या घरी नाश्ता केला "मावशी, आईला, आम्ही अगदी मजेत खुशाल आहोत म्हणून सांगा आणि हो, एकच वस्तू आईला द्यायची आहे ती न्याल ना मावशी ? लाडिकपणान बोलत शशीने एक बॉक्स पुढे केला

"एवढंच ना नेईन की, दे इकडे" अस म्हणतच ते छोट पार्सल मी हातातल्या लाबट पर्समध्ये ठेवलं ९ ३० ला विमानतळावर पोचायच होत बॅगा केव्हाच डिकीमध्ये ठेवून झाल्या होत्या "बर, बर, होऽ होऽ" करत निघालोही आम्ही

'मॅसकॉट्' विमानतळावर आलो बी ओ ए सी च जम्बो जेटचं धूड फलाटाला लागलेल होत इकडे माझ्या पोटात गोळा आला होता नातवाचे छोटे हात गळ्यातून काढून खाली उतरावयाच जीवावर आल होतं सुहास-आशा पुन्हा पुन्हा हात हालवत होते पाणावल्या डोळ्यानी मीही निरोप देत होते १४,००० मैल लांब पुन्हा येण्याची सुतराम् शक्यता नव्हती मायेचे पाश दूर सारायला हवेत - क्यू पुढे सरकत होता

कस्टम तपासणीचे सोपस्कार व्हायचे होते शरीराला चिकटून काही हिरे, माणकं, धातूंची शस्त्रास्त्र वगैरे आहेत का, या चाचणीसाठी इलेक्ट्रॉनिक डिटेक्टरची एक पट्टी माझ्या अंगाभोवती फिरवली आमच्या जवळ मेल काय असणार, म्हणून थोड्या ऐटीतच पुढं पाऊल उचलते तोच टर्रटर्रऽऽ असा अलार्मचा आवाज झाला लोकाच्या नजरा माझ्याकडे वळल्या "मे आय सी युवर पर्स मॅडम प्लीज " म्हणून त्या अधिकाऱ्यानी माझी पर्स मागून घेतली तरी माझ्या डोक्यात प्रकाश पडला नाही शशीन दिलेला बॉक्स त्यानी बाहेर काढून घेतला आम्हाला थांबायला सांगितल हा, किचन-नाइफ शशीन आईसाठी दिलेला "पण त्यात किनई

मावशी, गमत एवढीच आहे की, भाजी कापून पात आत सरकवल की बाहेर काढताना पुन्हा चक्क धार होते पात्याला'' शशीचे शब्द अगदी कानावर पडताहेत असं वाटल ''किचन-नाइफ हो शशीन दिलाय आईसाठी तो पर्समध्ये होता'' मी याच्या कानाशी कुजबुजले त्यानी चक्क कपाळावर हात मारून घेतला

पाच मिनिटं झाली, दहा झाली, सगळे उतारू विमानात बसलेही आम्ही दोघच धरून आणलेल्या कैद्याप्रमाणे बाहेर लाऊंजमध्ये बसलो होतो ''यस् मॅडम, यू वुडल गेट द रिसीट ऑफ युवर पॅकिज फ्रॉम दि सिक्युरिटी ऑफीस'' कस्टम अधिकारी म्हणाला 'सिक्युरिटी' शब्द ऐकून यानी डोळे मोठे करून माझ्याकडे पाह्यलं विमान सुटायची वेळ होत आली तसा जीव जास्तच वरखाली व्हायला लागला सामान चढवले गेले होते आम्ही शब्दश हात चोळत बसलो होतो रिसीट मिळून सिक्युरिटीकडून परवानगी मिळेपर्यंत आम्ही विमानात बसूही शकत नव्हतो पार्सलावर पाणी सोडाव लागेल अस वाटल पण 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडित' अस पुटपुटत होते तेवढ्यात ''यू कॅन बोर्ड दि प्लेन'' अस कुणीस सागत आल भराभर पावलं उचलली व सुखासनावर येऊन बसलो सुखाला थोडी नाइफची धार जाणवत होती स्टुअर्ट, चॉकलेट, गोळ्याचा ट्रे घेऊन आला 'आमच पॅकिट आल का हो?'' मी विचारत्येय तर बेटा लगेच ''आय होप लेडी यू वोन्ट किल अस'' म्हणाला! पुन्हा लोकांच्या नजरा आमच्याकडे कॉरीडरमधून माणस इकडून तिकडे (येरझारा) जाण्याच्या मिषाने, मला पाहून जात

''पाकीट नाही मिळाल तर शुभाताईला, शशीच्या आईला 'नाइफच' वर्णन करू नुसत!' अस मी म्हणाले यानी डोळ्यानी दरडावून चूप राहण्याची खूण केली 'जे जे होईल ते ते पहावे' म्हणून तुकाराम महाराजाची मदत घेतली चॉकलेटनी तोंडाला चव येईना उलट ''काय बाई आहे, चक्क चॉकलेट खातीय'' म्हणून कुणीस कुजबुजलंही जागेवर बसूनच सहप्रवाशाकडे नजर टाकली काही कुठेच प्रतिसाद नाही नजरा फिरल्या चक्क! सिनेमाचा मोठा स्क्रीन भितीसारखा पुढे येत होता खिडकीजवळच्या सीटस् रिकाम्या दिसल्या म्हणून हवाई सुदरीला

विचारून खिडकीशी बसलो स्टुअर्टनी बदललेली जागा हेरून घेतली मीही पार्सल आणून हा केव्हा देतो म्हणून माझही त्याच्यावर लक्ष!

घर्ऽऽ घर्ऽऽऽऽ जम्बोचे पखे फिरायला लागले एवढ्यात कस्टम ऑफीसर, सिक्युरिटी गार्डस्, घाईघाईने प्लेनमध्ये आले जरा मोठ्या आवाजातच "हू इज द लेडी वुइथ दि नाइफ?" असं विचारत माझ्या रोखाने पहात, भराभर यायला लागले मागे दोन स्टुअर्डस्, दोन हवाईसुदरी सिडनीचा पोलिस, बाजूची मडळी चक्क निरखून पाह्यला लागली मीही चागलीच घाबरून गेले पात्याची धार डोळ्यापुढे चमकायला लागली हे काय लचाड माग लागलं? मोठ्या आवाजात "गिव्ह मी युवर ॲड्रेसेस" माझ्या ऑस्ट्रेलियातल्या मुलाचा, हाँगकाँगचा, भारताचा सर्व पत्ते त्यानी लिहून घेतले दोघाचे पासपोर्ट तपासून पाह्यले "माझ्या दादल्याचं नाव विचारणारा तू रे मेला कोण? पुरं पैस देऊनशान तिकटं घेतली नाऽऽरे बाबा!" हाही विनोद आठवून हसूही एकीकडं येत होतं इकडे साऱ्या विमानात घबराट उत्पन्न झाली होती 'ध' चा 'मा' करणाऱ्या आनदीबाईसारख माझ चित्रच तयार झालं होत तुमच पार्सल, विमान हाँगकाँगला लॅन्ड झाल्यावर मिळेल असं काहीसं पुटपुटत मडळी आली तशी तावातावाने निघून गेली आम्ही दोघानी त्याच नावही विचारलं नाही म्हणजे बघा, माल आमचा, आम्हीच चोरासारखे बसलो न् तो साऽव ठरला!

गरूडांनी एकदाची गगनात झेप घेतली पोटात पाय घेऊन पखात वारा भरून ते ढगांचे ढीग छाटायला लागलं सिनेमाची वेळ झाली म्हणून कानाला बटण आणून दिली तोंडाला बटन लागलच होतं तीन तास झाले कटाळा आला वातानुकूलित हवामानामध्येही अंग आबून आल होत "काय हो प्रवास, कटाळा आला, सिनेमा दाखवला तो खून, मारामारी दरोड्यांचा, का नाही प्लेन 'हायजॅक' करू?" हायजॅक शब्द ऐकून हे घाबरलेच माझ्या हातात किचन-नाइफही नव्हता तरी "अग काय बडबडतेस हे? आणि ते सुद्धा इग्रजीत?" हे मराठीत ओरडले "आता हायजॅकला मराठी शब्द काय हो?' मी विचारले "पुन्हा तेच बोलू नकोस बघू आता त्याचा संशय बळावला म्हणजे खाली उतरलाच लगेच शांघायच्च्या जेलमध्ये ते आपल्याला ठेवतील काळ्या रगाचं

शिक्कामोर्तब झालय एक साडीवाली बाई म्हणून उल्लेख होणार आतरराष्ट्रीय सिक्युरिटी धोक्यात म्हणून किती मोठी केस होईल काही कल्पना आहे का तुला?'' ह्याचीही घाबरगुंडी उडाली होती

''अय्याऽऽहो, भलतच प्रकरण होऊन बसलंय म्हणायचं तरीच सगळे जीव मुठीत घेऊन माझ्याकडे पाहताहेत! आया मुलाना माझ्या बाजूला येऊ देत नाहीत मगाशी एक मुलगा 'ए व्हिच' (witch) म्हणून पुटपुटत शेजारून पळत गेला 'ए ब्लॅक किलर' म्हणून मागची माणस हळूहळू बोलत होती

''या 'किचन-नाइफ'नी, मी मेलं हायजॅकींग काय करणार हो?''

''बघ, परत तो शब्द उच्चारलास तेवढा शब्द विमानातून उतरेपर्यंत उच्चारू नकोस'' हे काकुळतीला येऊन म्हणाले अजून कितीतरी तास तोंडाला कुलूप लावून काढायचे होते तोंड फाटेपर्यंत बोलणारी आम्ही माणस पण आता प्रसंगोपात विनोदही करता येत नव्हता, की पोट धरून हसता येत नव्हतं 'हायजॅकींग' शब्द टाळ्याला जीभ लावून मध्ये दाबून धरला पण मनाच्या झडपा वरखाली होत होत्या कॉकपीटमध्ये जाऊन पायलटला समजावून सागाव असही मनात येत होतं पण इथ वेड्याच्या इस्पितळातल्यासारखी माझी स्थिती झाली होती घटकेत टॉय-पिस्तुलन 'हायजॅकिंग'चा दम भरल्यावर पायलटचा एक ठोका काळजाशी थांबला होता ह्या गोष्टीची आठवण झाली तर एन्टबी विमानतळावरची सत्यकथा डोळ्यासमोर साकार झाली वातावरणातला तगपणा, हाँगकाँग जवळ यायला लागल तसा जरा सैल झाला होता पुन्हा डोळ्यापुढे भीतीचे काजवे चमकायला लागले कसल्या इटरव्ह्यूला तोंड द्यावं लागतंय म्हणून ह्याचा चेहरा पडला होता विमानाची चाक जमिनीला केव्हा लागली हे कळलंही नाही विचार-वावड्या वरच्यावर उडाल्या, 'हुश्श' झाल!

यकश्चित् किचन-नाइफ म्हणजे विळी ती काय? बोथट विळ्या वापरणारी आम्ही माणसं! पण बी ओ ए सी च्या जम्बोजेट्ला हादरवणारा हा हायजॅकींगचा धक्का केवढा! (आम्हा हायजॅकरला पण बसला)

हाँगकाँगला सर्वांत शेवटी आम्हाला खाली उतरवल रात्रीचे ९॥ झाले होते पार्सल मिळायला दहा वाजून गेले चिनी चिवचिवाट सुरू

झाला बसून बसून पाय अवघडले होते "आता एअरइंडियात पाय मोकळे करून बैस बर" अस म्हणून हाताला धरून एकमेकाना ओढतच आम्ही 'कैटाक' विमानतळावरून सूऽबाल्या केल एअर-इंडियाच प्लेन गाठलं

※ ※



# उपसंहार - आजचा ऑस्ट्रेलिया

नव्यान देश पाहताना मला कौतुक वाटत होतच पुष्कळ वेळा भारावूनही जात होते भारताशी नकळत तुलना होत होती त्या आवेगानच पहिली वीस-पचवीस प्रकरणं लिहून झाली त्याला दहा एक वर्षे होऊन गेली आता ऑस्ट्रेलिया खेळाच्या रिंगणात आहे आमचे क्रिकेटियर्स बरेच वेळा इथे येऊनही गेलेत रवी शास्त्रीनी इथून गाडी जिकून नेली हे भारतातल्या मंडळीनी दूरदर्शनवर पाह्यलंय तशी देशाची सुसपन्नता आजही आहे "राजाला दिवाळी माहीतच नाही" म्हणतात ना, तस सगळं आबादीआबादच होत थोड आजही आहे

१९८८ साली ऑस्ट्रेलियाचा द्विशतसावत्सरिक महोत्सव झाला एवढ्या मोठ्या भूखंडाच्या शोधानतर ह्या धरित्रीमातेचा ह्या मोठ्या भूभागाचा 'दोनशेवा वाढदिवस' म्हणजे लहान मुलाचा वाढदिवस साजरा करण्यासारखंच होतं बाळ पावल टाकायला लागल्यावर पांगुळगाडा आणण्याची घाई व्हावी, पण तुरूतुरू चालणाऱ्या बाळाचा पागुळगाडा केव्हा सुटला हे लक्षातही येत नाही तसच देशाची इतक्या थोड्या अवधीत झालेली प्रगती, मानमरातबान मिळवलेल राष्ट्र हे नामाभिधान जुन्या पुराणकालीन देशांनाही मान उच करून पहाव लागत आहे

आपला वाढदिवस साजरा करताना, गतकालाची यशस्वी वाटचाल, जगाचं लक्ष वेधून घेणारे हे कार्यक्रम उत्साहाने वाढदिवस

साजरा करणारी ही ऑस्ट्रेलियन मंडळी, भावी काळाची आव्हान स्वीकारायची ह्या भावनामिश्रित कळकळीची पार्श्वभूमी, समारंभाच्या मागे दिसत होती १९८६ सालापूर्वीच मंडळी कामाला लागलीत

१ जानेवारी १९८८ ला दूरदर्शनवर दाखवलेलं मंगल-स्तवन, 'आता घरात अंबाबाईचं नवरात्र बसलंय बर का' असं श्रद्धापूर्वक सांगणारे आजोबा समोर उभे राहतात आकाशाला झाकून टाकणारे ३००,००० रंगीबेरंगी फुगे, एका नव्या राष्ट्राचा उदय होऊन आज दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत हे जणू आकाशातल्या बापाला दाखवताहेत ह्या देशात जन्माला आलेले नागरिक काही पूर्वपुण्याईचा वारसा घेऊन आलेत नक्की, असं म्हणायला हवं

"आमच्याच आजोबा-पणजोबानी ह्या देशाची जडणघडण केली आहे" आजोबा बोलतच राह्यलेत "चेहरामोहरा नसलेली ही निर्मनुष्य जमीन, एकटीच फळाफुलांनी बहरत होती पुन्हा कोमेजत होती डोंगर कपारीतून नद्या मुकाटपणे वाहत होत्या कधी पाऊस त्यातच जीव घेणारी थंडी दुष्काळाचे कितीतरी पावसाळे ह्या जमिनीला पडलेल्या भेगा सांगत होत्या पोटात दडवलेली ही संपत्ती, सगळंच जगाला अज्ञात होतं"
आजोबांचे शब्द कानावर पडताहेत

मी वाचलेला इतिहास आणि हा झगझगीत प्रकाश अंगावर रोमांच उठत होते समोरच्या टी व्ही वर हजारो पावलांचा एका ठेक्यात एका लयीत चाललेला नृत्याचा कार्यक्रम त्यात स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, रुमानियन, जर्मन, तर पूर्वेकडचे बँकॉक आदी देशाचा ऑर्केस्ट्रा, सगळंच अभूतपूर्व!

ह्या देशाला मानाचा मुजरा बर्थ-डे ला देणारे मानकरी पहिलं (?) हे उंटांचं पथक! अफगाणिस्थानातून कधी काळी उंटाच वाहन घेऊन उदरनिर्वाहासाठी पठाण मंडळी इकडे आलेली आहेत देशाचा मध्यभाग 'अलाईस-स्प्रिंग' वाळवंटच आहे डिसें ७ १९८५ ला निघून १ जाने १९८८ ला साऊथ ऑत ॲडलेइच्या टाऊन-हॉलमध्ये हे पथक दाखल झालं तसं सातही स्टेटसमधून कार्यक्रम उत्सव साजरे होताहेत

(जगातून) ६१ जहाज (१७ देशातून) सिडनी बंदरात येऊन आपल्या उंच शिडांनी शुभसंदेश देत आहेत पोलंडच्या जहाजाची शिडं,

ती इतकी मोठी व उच शिड, त्याना हार्बर ब्रीज खालून येणं मुष्कील झालय समोर दूरदर्शनवर दिसतय, दुसरा नबर भारताच्या 'वरुण' जहाजाचा लागलाय ह्या जहाजाच स्वागत करायला ऑस्ट्रेलियाची छोटी मोठी जहाजं नटून सजून फेर धरून उभी आहेत ब्रिटनची विमान - ॲक्रोब्याटिक्स् करत ऑपिरा हाऊसवरून फिरताहेत

रात्री रोषणाई, दारूकाम निळ्या आकाशात रंग भरत होते तशीच लोकाच्या डोळ्यात अभिमानाची चमक दिसत होती तर ऑस्ट्रेलियाची पहिली शभरी, तो सोहळ्याचा दिवस, आजोबांकडून ऐकलेल्या खडतर वाटचालीच्या कथा आठवून वयस्क मडळींना गहिवरून आलेल दिसत होतं 'युनियन जॅक' फडकवल्याचा तो पहिला दिवस, ते राष्ट्रगीत ऐकत असल्याचा तो भास, सगळ पुन्हा डोळ्यांपुढं तरळून गेल असाव तशी राजकुटुबाची मंडळी उपस्थित होती आमचं स्वतन्त्र राष्ट्र म्हटल तरी पहिला धागा ओढला जात होता घराघराच्या बाल्कनीतून गच्च्यांवरून ऑपिरा हाऊसच्या पायऱ्यावरून माणसं नुसती ठासून भरली होती जगन्नाथपुरीची रथयात्रा व पढरपूरची आषाढी एकादशीला निघालेली रथाची मिरवणूक डोळ्यापुढे भर्रकन् येऊन गेली मनाचे पख विज्ञानाला पकडून ठेवता येत नाहीत हे सागायला शास्त्रज्ञाची परवानगी नको तेही कानावर हात ठेवतील

ब्रिस्बेन स्टेटमध्ये 'वर्ल्ड-एक्सपो' भरल होत सगळ्या स्टेटस्‌मध्ये उत्सव साजरा करण्याची अहमहमिकाच लागली होती देशात उत्साहभरी लाटच आली होती 'ऑस्ट्रेलियाला जा' असे बोर्ड इंग्लडमध्ये ३०-४० वर्षांपूर्वी लागले होते म्हणतात पण आहे काय तिकडं? जगलच ना? कशाला जायचं? अस सुखवस्तू ब्रिटिश लोकांना वाटलं तर नवल नव्हतं पण आता लक्ष्मीभोवती फेर धरायला सगळ्यानाच यावंसं वाटतय मोठमोठ्या जमिनी तेव्हाच घेऊन ब्रिटिश मेंढपाळ, गुराखी आता उदीमव्यापारात स्थान पटकावून आहेत

भारतातूनही आप्त-स्वकीय, स्नेही, याची ऑस्ट्रेलियाला कस येता येईल? मायग्रेशन व्हिसा कसा मिळेल? नौकरीची खात्री आहे का? अशी विचारणा करणारी पत्र येतात शक्य असेल ती मदत, माहिती आम्ही देतोच पण पाहुण्यांनी दुसरा पाळणा आणणं कस शक्य आहे?

साजरा करणारी ही ऑस्ट्रेलियन मंडळी, भावी काळाची आव्हान स्वीकारायची ह्या भावनामिश्रित कळकळीची पार्श्वभूमी, समारंभाच्या मागे दिसत होती १९८६ सालापूर्वीच मंडळी कामाला लागलीत

१ जानेवारी १९८८ ला दूरदर्शनवर दाखवलेल मगल-स्तवन, 'आता घरात अबाबाईच नवरात्र बसलय बर का' अस श्रद्धापूर्वक सांगणारे आजोबा समोर उभे राहतात आकाशाला झाकून टाकणारे ३००,००० रंगीबेरगी फुगे, एका नव्या राष्ट्राचा उदय होऊन आज दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत हे जणू आकाशातल्या बापाला दाखवताहेत ह्या देशात जन्माला आलेले नागरिक काही पूर्वपुण्याईचा वारसा घेऊन आलेत नक्की, अस म्हणायला हव

"आमच्याच आजोबा-पणजोबानी ह्या देशाची जडणघडण केली आहे" आजोबा बोलतच राह्यलेत "चेहरामोहरा नसलेली ही निर्मनुष्य जमीन, एकटीच फळाफुलानी बहरत होती पुन्हा कोमेजत होती डोंगर कपारीतून नद्या मुकाटपणे वाहत होत्या कधी पाऊस त्यातच जीव घेणारी थंडी, दुष्काळाचे कितीतरी पावसाळे ह्या जमिनीला पडलेल्या भेगा सांगत होत्या पोटात दडवलेली ही सपत्ती, सगळच जगाला अज्ञात होत" आजोबाचे शब्द कानावर पडताहेत

मी वाचलेला इतिहास आणि हा झगझगीत प्रकाश अंगावर रोमाच उठत होते समोरच्या टी व्ही वर हजारो पावलाचा एका ठेक्यात एका लयीत चाललेला नृत्याचा कार्यक्रम त्यात स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, रुमानियन, जर्मन, तर पूर्वेकडचे बँकॉक आदी देशाचा ऑर्केस्ट्रा, सगळच अभूतपूर्व!

ह्या देशाला मानाचा मुजरा बर्थ-डे ला देणारे मानकरी पहिल (?) हे उटाच पथक। अफगाणिस्थानातून कधी काळी उटांचं वाहन घेऊन उदरनिर्वाहासाठी पठाण मंडळी इकडे आलेली आहेत देशाचा मध्यभाग 'अलाईस-स्प्रिंग' वाळवटच आहे डिसें ७, १९८५ ला निघून १ जाने १९८८ ला साऊथ ऑत ॲड्लेड्च्या टाऊन-हॉलमध्ये हे पथक दाखल झालं तस ह्यातही स्टेटस्मधून कार्यक्रम उत्सव साजरे होताहेत

(जगातून) ६१ जहाज (१७ देशांतून) सिडनी बदरात येऊन आपल्या उच शिडानी शुभसंदेश देत आहेत पोलडच्या जहाजाची शिडं,

ती इतकी मोठी व उंच शिड, त्याना हार्बर ब्रीज खालून येण मुष्कील झालय समोर दूरदर्शनवर दिसतय, दुसरा नबर भारताच्या 'वरुण' जहाजाचा लागलाय ह्या जहाजाचं स्वागत करायला ऑस्ट्रेलियाची छोटी मोठी जहाजं नट्न सजून फेर धरून उभी आहेत ब्रिटनची विमानं - ॲक्रोब्याटिक्स् करत ऑपिरा हाऊसवरून फिरताहेत

रात्री रोषणाई, दारूकाम निळ्या आकाशात रग भरत होते तशीच लोकाच्या डोळ्यात अभिमानाची चमक दिसत होती तर ऑस्ट्रेलियाची पहिली शंभरी, तो सोहळ्याचा दिवस, आजोबाकडून ऐकलेल्या खडतर वाटचालीच्या कथा, आठवून वयस्क मंडळींना गहिवरून आलेल दिसत होत 'युनियन जॅक' फडकवल्याचा तो पहिला दिवस, ते राष्ट्रगीत ऐकत असल्याचा तो भास, सगळ पुन्हा डोळ्यापुढ तरळून गेल असाव तशी राजकुटुंबाची मंडळी उपस्थित होती आमच स्वतत्र राष्ट्र म्हटल तरी पहिला धागा ओढला जात होता घराघरांच्या बाल्कनीतून, गच्च्यावरून, ऑपिरा हाऊसच्या पायऱ्यावरून माणस नुसती ठासून भरली होती जगन्नाथपुरीची रथयात्रा व पंढरपूरची आषाढी एकादशीला निघालेली रथाची मिरवणूक, डोळ्यापुढे भर्रकन् येऊन गेली मनाचे पख विज्ञानाला पकडून ठेवता येत नाहीत हे सांगायला शास्त्रज्ञांची परवानगी नको तेही कानावर हात ठेवतील

ब्रिस्बेन स्टेटमध्ये 'वर्ल्ड-एक्सपो' भरलं होतं सगळ्या स्टेटस्‌मध्ये उत्सव साजरा करण्याची अहमहमिकाच लागली होती देशात उत्साहभरी लाटच आली होती 'ऑस्ट्रेलियाला जा' असे बोर्ड इग्लंडमध्ये ३०-४० वर्षांपूर्वी लागले होते म्हणतात पण आहे काय तिकड? जंगलच ना? कशाला जायच? असं सुखवस्तू ब्रिटिश लोकांना वाटल तर नवल नव्हत पण आता लक्ष्मीभोवती फेर धरायला सगळ्यानाच यावंसं वाटतय मोठमोठ्या जमिनी तेव्हाच घेऊन ब्रिटिश मेंढपाळ, गुराखी आता उदीमव्यापारात स्थान पटकावून आहेत

भारतातूनही आप्त-स्वकीय, स्नेही, याची ऑस्ट्रेलियाला कस येता येईल? मायग्रेशन व्हिसा कसा मिळेल? नौकरीची खात्री आहे का? अशी विचारणा करणारी पत्रं येतात शक्य असेल ती मदत, माहिती आम्ही देतोच पण पाहुण्यानी दुसरा पाव्हणा आणण कसं शक्य आहे?

सिंधी निर्वासितानी, महाराष्ट्रात, गुजराथमधे, मध्यप्रदेशात सगळीकडेच पाय हक्कानी पसरले आहेत ते निर्वासित म्हणून आपल्याला गप्पच बसाव लागल पण इथे आलेले भारतीय निर्वासित नाहीत ते दर्जा-आपली पत घेऊन आलेत

ऑस्ट्रेलियाने व्हिएटनामचे निर्वासित म्हणून एक जहाजभर माणस घेतली आहेत पण इतर अर्ज करणाऱ्यांना बऱ्याच चाळण्या लावल्या आहेत आपल्या देशाच्या प्रगतीसाठी १८८२ मध्ये त्यानी सिलोनी कामगार उस मळ्यावर क्वीन्सलँडमध्ये घेतले आता दंग्यानतर निर्वासित म्हणून पुन्हा सिलोनी आले आहेत चीनमध्ये तायवॉन-चौकात दगा झाल्यावर वीस हजार विद्यार्थ्यांना राहण्याची मुदत वाढवून दिली आहे त्याचे त्याच्यावर अवलबून असणारे आईबाप-लहान मुल- म्हणजे चचुप्रवेश करताहेत

ऑस्ट्रेलियात डॉक्टर्स हवे होते तेव्हा त्यांनी प्रवेश दिला आता त्याची मुल, ऑस्ट्रेलियन डॉक्टर्स तयार झालेत फिजोथेरपिस्ट, ऑक्युपेशनल थे कार्डीऑलॉजिस्ट 'फोनवर इटरव्ह्यू' होऊन आले होते, १९७६-७७ मध्ये

कॉम्प्युटरवाल्या लोकाची आता चलती आहे पण ती किती दिवस? त्यांना हवे तेवढे लोक मिळेपर्यंत एकूण skilled workers त्यांना हवे आहेत फिलीपाईन्सच्या मुली नवऱ्या (घरकामाला चागल्या) म्हणून करून आणलेल्या आहेत एशियन लोक आपले जवळचे शेजारी आहेत

[illegible] भाषा एकसुरी होत्या एशियन लोकांजवळ कुशलता, कर्तृत्व असलं तरी भाषेचा मोठा अडसर आलाय हिंदी, चिनी, थाई, व्हिएटनामी सगळ्याच भाषा इंग्रजीपासून फारच वेगळ्या आहेत तेव्हा पौर्वात्य भाषा शिकायला हव्या व त्या लोकांना इंग्लिश यायला हव, म्हणून मायग्रटसाठी 'भाषा-केंद्र' काढली आहेत इंग्रजी मोफत शिकवले जाते इग्रजी बोलायला शिकवायला स्वयंशिक्षक, छोटा कोर्स देऊन तयार केलेत टी.व्ही वर पाठ तयार आहेत उच्चार शिकण्यासाठी घरी 'टेप' देतात ५५० टेबल्स, प्रत्येक टेबलावर छोटा टी व्ही फारच सोईसुविधा केल्या आहेत एका चिनी नर्सला इथल्या हॉस्पिटलमध्ये नोकरी कशी मिळणार? तिला [illegible]

शब्द शिकायला हवेत तेव्हा होमट्यूटरना हे काम करायला मिळते त्या कामाचा अनुभव मलाही मिळाला ती चिनी बाई माझी चांगली मैत्रीण झाली दिल खोलायला भाषा एक हवी ना?

अशी ह्या दहा-बारा वर्षांत आखणी करून वाढलेल्या लोकसंख्येचा देशाला कसा उपयोग होईल हे अजमावून ऑस्ट्रेलियाने झपाट्याने पावलं टाकली आहेत

जपान तर श्रीमंत शेजारी ऑस्ट्रेलियाला दरवर्षी लाखोंनी जपानी प्रवासी येतात त्यांच्याशी बोलायला गाईड हवेत एवढी मोठी जमीन पाहून जपान्यांना इथं धंदे उघडण्याची कल्पना आली आहे टुरिस्टाची संख्या-वाढ देशाच्या बरकतीला हवी आहे, हे आता सगळ्यानाच समजलं आहे तेव्हा ऑस्ट्रेलियन जपानी भाषा शिकताहेत व जपानी इग्रजी शिकताहेत

भारतात भरपूर अठरा भाषा बोलल्या जातात पण सस्कृती, रितीरिवाज, सणसमारंभ सगळे एकच आहेत साजरे करण्याच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी सस्कारात एकात्मता आहे आम्ही भारतीय आहोत, हे अभिमानाने सांगायला हा संस्कृतीचा धागा जोडलेला, नव्हे अतूट आहे

आज ह्या ऑस्ट्रेलियन लोकांना, पाश्चात्त्य सस्कृतीची तुलना करायला हे पूर्वेकडचे लोक आहेत हिंदुधर्मात अशी लग्न होतात घटस्फोटांचे प्रमाण फारच कमी आहे चिनी, जपानी, व्हिएटनामी सगळ्याकडे एकत्र कुटुबपद्धती आहे आपल्याकडे आहेत एवढी Old Homes नाहीत गरिबी असली तरी प्रेमाची, स्नेहाची श्रीमंती आहे म्हणून एकाकीपणाचे रोग नाहीत त्याना हे पटल तरी अगभूत सवयी व जन्मजात संस्कार बदलून शिकणं, वा वळण लावण पेहराव करण्याइतक खासच सोप नाही

देश तसा वेष बदलावा लागतो हवामान पहावं लागत ७३ साली मिळालेली मैत्रीण युरोपच्या टूरला जाणार होती पॅन्ट-सूट तिने शिवायला दिला होता मी कपडे आणायला बरोबर गेले होते "मी टूरला जातीय म्हणून शिवून घेतीय प्रवासात कफर्टेबल ग" म्हणून ती जुना लाब फ्रॉकचा वेष बदलल्याचं समर्थन करत होती तिलाही बदल कसासाच

वाटत होता आता इकडे आजी सर्रास पॅन्ट जीनमध्ये दिसतात झग्यांची कमी जास्त लांबी, आपल्याकडच्या बिनबाह्याच्या पोलक्याची वाटचाल ताजीच आहे की तशीच

स्त्री स्वातन्त्र्याच्या, मुक्तीच्या चळवळीचा दाखला, कमीत कमी कपडे घालून, त्या संभाळून आहेत अमेरिका, फ्रान्सच्या फॅशन्सची क्रेझ आहेच आर्थिक-स्वातंत्र्यासाठी, बरोबरी पुरुषाची, समानता म्हणण बरं, स्त्रिया नोकरीच्या मागे आहेतच सध्या मदीची लाट आलीय तेव्हा तरुण मुलांच्या जागा अडवल्या जाताहेत, नोकरी पार्टटाईम, वयोमर्यादा, पेन्शनीसाठी कमी ठेवावी early retirement वगैरे सुरू झालंय पुरुषांनाही ६५ च्या आधी ६० पर्यंतच रिटायर व्हायला सांगताहेत पेन्शन घेऊन मायदेशी परत गेलेल्या लोकांची संख्या इतकी आहे की लाखो डॉलर्स बाहेर जाताहेत इकडेही सरकारच लक्ष गेलं आहे

दोनशे वर्षात त्यांचा इतिहास तयार झालाय आता ब्रिटिशाच्या इतिहासापेक्षा आपल्या इतिहासाची पुस्तक शाळेतून लावली आहेत वयोवृद्ध मडळींकडून - जुन्या आठवणींबरोबरच, ते जुन्हा पहिल्या वसाहती तो सोन्याचा उपसा झालेला कालखड, इतर देशीयाच्या उड्या कशा पडल्या, भूगर्भातली संपत्ती कुठ, केव्हा, कशी हाती लागली, हे सार लिहून काढण्यासाठी लेखकांना फेलोशिप्स दिल्या ती पुस्तकं सरकारी प्रेसमध्ये छापून निघाली म्युझियम्स तयार झाले अभिमान बाळगण्याइतकी प्रगती झाल्यावर युनियन जॅकवर ऑस्ट्रेलियाचे तारे आले सध्या आपला ध्वजच वेगळा हवा, तो कसा असावा, त्यावर कागारू असावा का ? वगैरेबद्दल चर्चा चालू आहेत राष्ट्राचे कागारू, कोआला सारखे प्राणी, त्यांच्या खाणीत निघालेले 'ओपल्स'चे खडे, 'गम ट्रीज'च ऐश्वर्य पंचरंगी पोपटांच्या पलटणी, ककूबरासारखे गाणारे पक्षी, ही सगळी आपल्या राष्ट्राची बिरूदं म्हणून मिरवायला त्यांना अभिमान वाटणं रास्तच आहे आपण नाही का हत्ती, मोर, हापूसचा आबा आपली वैशिष्ठ्य, मालकी हक्कांनी सागतोच की

आम्ही आलो तेव्हा टी व्ही वरचे कार्यक्रम ब्रिटिश व अमेरिकन सेरीज असायच्या आता हे स्वत चित्रपट काढायला लागलेत बाहेर देशात पाठवायला लागलेत पॉल होगन ह्या ऑस्ट्रेलियन माणसाचा

'क्रोकोडाईल डंडी' चित्रपट चांगलाच गाजला होता त्यात त्यांनी नाव केलं आहे

ऑलिम्पिकची पदक आणून ते क्रीडागण जिंकत आहेत शिक्षणाचा, पदव्यांचा हव्यास नसताना, कामावर दर्जा अवलंबून नसताना, हे लोक आपापल्या व्यवसायात चोख काम करताहेत वर्णभेद, जातिभेद नाही पण "अत्युच्ची पदी थोरही बिघडतो " ह्याची आठवण व्हावी अशी घटना बाहेर उजेडात यायला लागल्यात लिबरल, लेबर असे दोनच पक्ष आहेत राज्यकारभार सुरळीत होता पण बँकेचे खोटेनाटे व्यवहार बाहेर यायला लागलेत परदेशातून येताना सेंटची बाटली मंत्रीणबाईंनी घेतलेली मंत्र्याच्या बॅगेत सापडली म्हणून १९७९ मध्ये टी व्ही वर राजरोस चर्चा होऊन मंत्रीमहाशयांना मुकाटपणे बाहेर निघावं लागल होत तेव्हा देशाच्या प्रामाणिकपणाचं कौतुक वाटलं होतं स्वत ला चिमटा काढून बघावा इतका निर्भेळ माल, काळ्या बाजाराची सावली इथे पडली नव्हती हे म्हणताना आपल्याला लाज वाटावी, असा शुचिर्भूतपणा होता लाचलुचपत, वशिला हे शब्द ऐकायला येत नव्हते स्वच्छतेला तोड नव्हती

आता लहानमोठी सगळ्यांचीच कुलगडी बाहेर यायला लागला आहेत मदी आलीय, महागाई वाढत चाललीय, तरुण पिढी बेजबाबदार व्हायला लागली निशापाण्याबरोबर ड्रग्जची त्यांना संगत लागली आहे विफलता, नैराश्य आलंय, सरकारी बेकार-भत्ता किती दिवस देणार? बाहेरच्या लोकाना देशात घेऊन आपल्या घरच्या मुलांच्या तोंडचा घास का काढताय? असाही सूर ऐकू येतोय देशाच्या प्रगतीला धोका पोचेल असं काही होऊ नये असं वाटतं 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असं होईल की काय अशी अशुभाची पाल मनात चुकचुकते मग अशी उतरती कळा ह्या संपन्न समृद्ध देशाला का यायला लागली? तस आम्हा मध्यमवर्गाला काही मिळत नाही अस नाही काळ्या बाजारात काही गडप होत नाही

केशराच पोतं, हिंगाच म्हणा, रिकाम करून झाडलं तरी वास घमघमत राहतो म्हणतात, तसा तो वास राहो अशी सदिच्छा आमच्या सारख्या परक्या पाहुण्याची पण आहे

जगात सगळीकडेच अराजक माजतंय अस अवतीभवती पाहिल्यावर 'कलियुग' येणार म्हणत होते तेच तर सुरू झालं नाही? असही मनात येतंय

⁂ ⁂

आजच्या २४-६-९२ च्या वृत्तपत्रात
१९९०, ९१ मध्ये १३,५६२ इंडियन्स मायग्रटस घेतले होते आज ९१ ते ९२ फक्त ४१९८ इंडियन मायग्रंटस घेतले
रशियन स्किल-वर्कर म्हणून १५९४ लोक घेतले ते ५५४ (९०-९१ मध्ये) घेतले होते ज्या कामात ऑस्ट्रेलियन शिक्षित लोक कमी पडतात, त्याची जागा भरून काढण्यापुरतेच मायग्रटस घेतले जातात

⁂ ⁂

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २८७८४
REFBK-0027784



## आपण ही पुस्तके वाचलीत का ?

### झटपट !

होय, झटपटच कुणीही स्वयपाक करू शकतो, पण कधी ? स्वयपाकासाठी वापरावयाचे जिन्नस आणि त्याचे गुणधर्म नीट माहीत असतील तर !

पाककलेतील तत्र आणि मत्र, पथ्य आणि सत्य याचा दीर्घ अनुभव असलेली लेखिका सौ. जयश्री कुबेर सादर करीत आहे—

**'झटपट स्वादिष्ट पाकक्रिया'**

हे पुस्तक वाचल्यानतर स्वयपाक नुसता झटपट करता येणार नाही, तर झटपटबरोबर स्वादिष्ट आणि देखणाही असणार, हे अगदी शपथपूर्वक

मग वाचा तर हे पुस्तक झटपट !

**'झटपट स्वादिष्ट पाकक्रिया'** - सौ जयश्री कुबेर

मूल्य ४० रुपये

---

### उबरठ्यावर माप ठेविले

आणि ते उलथून तू नववधू घरात आलीस ! तुझ रूप लक्ष्मीच पण नुसत लक्ष्मीच नव्हे, सुगरणीच पण. तुझ्या पायान सपत्ती आली, तशी हातान चवही आली, अस सर्वांना वाटत नव्या वहिनीच्या हातचे चटकदार, चवदार, चमचमीत चविष्ट पदार्थ खायला सगळे उत्सुक आहेत, अगदी तुझे 'हे' सुद्धा !

— पण कस जमणार ? अस मनातसुद्धा आणू नकोस हे घे नव पुस्तक, खास तुझ्यासाठी लिहिलेल !

**'नववधूसाठी पाकक्रिया'** – सौ संपदा कोपर्डेकर

मूल्य ५० रुपये

---

इंद्रायणी साहित्य, २७३ शनवार पेठ, पुणे ३०